काही पीएच.डी. मार्गदर्शकांकडून महिला संशोधक विद्यार्थ्यांशी लगड केली जाते. त्यांना विनाकारण त्रास दिला जात असल्याचा अनुभव पुण्यातील एका प्रतिष्ठित शिक्षणतज्ज्ञांनी सांगितला. ते म्हणाले, "केवळ संलग्न संशोधन केंद्रात नाही; तर विद्यापीठातील विभागांमध्येही महिला संशोधकांना योग्य वागणूक मिळत नाही. स्वाक्षरीसाठी वारंवार बोलावणे, त्यांच्याशी जवळीक साधणे, लगड करणे, ताटकळत ठेवणे, प्रबंधावरील चर्चेच्या निमित्ताने बाहेर भेटायला बोलावणे आदी प्रकार लपलेले नाहीत." नाइलाजापोटी अनेक विद्यार्थिनी याबद्दल बोलत नसल्याचेही त्यांनी सांगितले.

> विद्यापीठाने संशोधक विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन तक्रार निवारण यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. अगदी निनावी तक्रारीचीसुद्धा विहित मुदतीत चौकशी व्हायला हवी; तरच संशोधक विद्यार्थ्यांना न्याय मिळेल.
>
> **- डॉ. गजानन एकबोटे,** कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

Pune, Main
03/04/2024 Page No. 3

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# शिक्षण संस्था न्यायालयात

## बीबीए, बीसीए अभ्यासक्रम अखत्यारित घेण्याच्या 'एआयसीटीई'च्या निर्णयाला आव्हान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन (बीसीए) अभ्यासक्रम आपल्या अखत्यारित घेण्याच्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) निर्णयाला देशभरातील शिक्षण संस्थांनी न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यात पुण्यातील दोन संस्थांचा समावेश असून, 'एआयसीटीई'च्या निर्णयामुळे संस्था, विद्यार्थी, पालकांवर आर्थिक ताण येणार असल्याची संस्थांची भूमिका आहे.

बीबीए, बीएमएस, बीसीए या पदवी अभ्यासक्रमांना 'एआयसीटीई'ने व्यावसायिक अभ्यासक्रमांचा दर्जा दिला, तसेच या अभ्यासक्रमांसाठी 'एआयसीटीई'ची मान्यता घेणेही बंधनकारक केले. हे अभ्यासक्रम महाविद्यालयांमध्ये राबवण्यासाठी काही निकष निश्चित केले आहेत. मात्र, या निर्णयाला विरोध करून महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडूसह काही राज्यांतील शिक्षण संस्थांनी न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यात पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, राज्य विनानुदानित शिक्षण संस्था संघटना या संस्थांचा समावेश आहे.



### सर्व याचिका एकाच उच्च न्यायालयात

**विविध राज्यांतून दाखल केलेल्या याचिका आता एकाच उच्च न्यायालयात हस्तांतरित करण्यात आल्याची जाहीर नोटिस 'एआयसीटीई'ने संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे, तसेच अभ्यासक्रमांच्या मान्यतेसाठी अनेकदा मुदतवाढ दिली आहे.**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह डॉ. शामकांत देशमुख म्हणाले, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियंत्रणाखाली आणि राज्य सरकारच्या मान्यतेने बीबीए, बीएमएम, बीसीए अभ्यासक्रम राबवण्यात येत होते. मात्र, हे अभ्यासक्रम 'एआयसीटीई'च्या अखत्यारित गेल्यामुळे अनेक बदल करावे लागणार आहेत. सध्या ८० विद्यार्थ्यांची तुकडी ६० विद्यार्थ्यांची होण्याची शक्यता आहे. पायाभूत सुविधा 'एआयसीटीई'च्या निकषांनुसार कराव्या लागणार आहेत. त्यासाठी संस्थांना खर्च करावा लागणार आहे. शुल्क निर्धारण समितीकडून शुल्करचना केली जाणार आहे. त्यामुळे शुल्कात मोठी वाढ होऊ शकते, तसेच दहा टक्के जागा वाढवण्याचा पर्यायही राहणार नाही. या निर्णयामुळे राज्य सरकारवरही आर्थिक ताण येणार आहे. व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था वाचवण्यासाठी हा बदल करण्यात आल्याचा अंदाज आहे.

'आतापर्यंत बीबीए, बीएमएस, बीसीए हे अभ्यासक्रम वाणिज्य, विज्ञान शाखांअंतर्गत, विद्यापीठ आणि यूजीसी यांच्या मान्यतेने चालत होते. आता राष्ट्रीय शिक्षण धोरणाअंतर्गत आता यूजीसी आणि 'एआयसीटीई'चे अस्तित्व संपून उच्च शिक्षण आयोग येणार आहे. त्यामुळे हे अभ्यासक्रम आपल्य अखत्यारित घेण्याच 'एआयसीटीई'ला अचानक घाई क झाली, हा प्रश्न आहे. तुकडीची विद्यार्थीसंख्या कमी करणे, वेगळे प्राचार्य, वेगळे ग्रंथालय असे बदल महाविद्यालयांना करणे शक्य नाही.

आतापर्यंत विद्यार्थ्यांना कमी शुल्कात शिकता येत होते. मात्र 'एआयसीटीई'च्या निर्णयामुळे तसे होणार नाही. हा निर्णय घेताना सव भागधारकांना विश्वासात घेतले नाही. एमबीए हा व्यावसायिक अभ्यासक्रम नसल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला होता. त्या अनुषंगाने 'एआयसीटीई'च्या निर्णयाविरोधात याचिका दाखल केल्याचे राज्य विनानुदानित शिक्षण संस्था संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुधाकर जाधवर यांनी सांगितले.

04/04/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

लोकसत्ता

# बीबीए, बीसीएचे गाऱ्हाणे शिक्षणमंत्र्यांच्या दारात

## 'एआयसीटीई' च्या निर्णयाचा निवडणुकीत फटका बसू शकतो; पुण्यातील संस्थेचे पत्र

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन पदवी (बीसीए) अभ्यासक्रम आपल्या अखत्यारित घेण्याचा निर्णय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) कोणतीही चर्चा न करता घेतला. यंदा निवडणूक वर्ष असल्याने या काळात विद्यार्थी, शिक्षक आणि अन्य घटकांच्या नाराजीचा मोठा फटका बसू शकतो, अशा सूचक शब्दांत इशारा देऊन निर्णय किमान एक वर्ष स्थगित करण्याची मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे केली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाही प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी या संदर्भातील पत्र प्रधान यांना पाठवले आहे. एआयसीटीईने घेतलेल्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या समस्या पत्राद्वारे प्रधान यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत. तसेच शिक्षण संस्थांना होणाऱ्या त्रास, अडचणी याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

एआयसीटीईने घेतलेल्या निर्णयामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत. अभ्यासक्रमांच्या मान्यतेची प्रक्रिया दमवणारी, अनेक प्रकारची माहिती मागणारी आहे. त्यामुळे त्याची पूर्तता करताना महाविद्यालये, शिक्षण संस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्याशिवाय या निर्णयाचा ग्रामीण, आदिवासी, वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना फटका बसणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. निवडणुकीच्या या नाराजीचा मोठा फटका बसू शकतो, असा सूचक इशारा या पत्रातून देण्यात आला आहे.

05/04/2024 | Pune | Page : 08
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

प्रभात

पुणे

प्रभात शनिवार, दि. ६ एप्रिल २०२४ ॥ ३

# पुण्यातील शैक्षणिक संस्थाचालकांचा विरोध

## 'एआयसीटीई'ने बीबीए, बीसीए प्रवेश अखत्यारित घेतल्याच्या निर्णयावरून आक्रमक

प्रभात वृत्तसेवा




**पुणे, दि. ५ -** बीबीए, बीएमएस, बीसीए या पदवी अभ्यासक्रम यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून आपल्या अखत्यारित घेण्याच्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) निर्णयास पुण्यातील शैक्षणिक संस्थाचालकांचा विरोध होत आहे. एआयसीटीईच्या या निर्णयाच्या विरोधात काही संस्थाचालकांनी न्यायालयात धाव घेतली आहे. बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम आपल्या अखत्यारित घेण्याची एआयसीटीईला आवश्यकता का, असा संतप्त प्रश्न उपस्थित होत आहे.

बीबीए, बीएमएस, बीसीए या पदवी अभ्यासक्रमांसाठी एआयसीटीईची मान्यता घेणेही अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, या निर्णयाला विरोध करून महाराष्ट्र राज्यासह कर्नाटक, तमिळनाडू व इतर काही राज्यांतील शिक्षण संस्थांनी न्यायालयात आव्हान दिले आहे. यामध्ये पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी आणि महाराष्ट्र राज्य विनानुदानित शिक्षण संस्था असोसिएशनचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम एआयसीटीईकडे गेल्याने मोठ्या प्रमाणात आणि निकषात बदल करावे लागणार आहेत.

हे सर्व निकषांची पूर्तता करणे यंदाच्या वर्षी शिक्षण संस्थांना अडचणीचे ठरणार आहे. एआयसीटीईच्या निर्णयास विरोध नाही, मात्र याच वर्षी हा निर्णय लागू करणे घाईचे आहे, असे संस्थाचालकांचे म्हणणे आहे.

एआयसीटीईच्या अखत्यारित सदर अभ्यासक्रम गेल्यामुळे ८० विद्यार्थ्यांची तुकडी ६० विद्यार्थ्यांची होण्याची शक्यता आहे. पायाभूत सुविधा पूर्ण कराव्या लागतील. त्यासाठी संस्थांना खर्च करावा लागणार आहे. शुल्क निर्धारण समितीकडून शुल्करचना केली जाणार आहे. त्यामुळे शुल्कात मोठी वाढ होऊ शकते, तसेच दहा टक्के जागा वाढवण्याचा पर्यायही राहणार नाही.

**- डॉ. शामकांत देशमुख,** कार्यवाह, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

बीबीए, बीएमएस, बीसीए हे अभ्यासक्रम वाणिज्य शाखा, विद्यापीठ आणि विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) यांच्या मान्यतेने चालत होते. आता ते आपल्या अखत्यारित घेण्याच्या एआयसीटीईच्या निर्णयाने तुकडीची विद्यार्थी संख्या कमी करणे, वेगळे प्राचार्य, वेगळे ग्रंथालय असे बदल तातडीने करणे शक्य नाही. हा निर्णय घेताना सर्वांना विश्वासात घेण्यात आले नाही.

**- डॉ. सुधाकर जाधवर,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विनानुदानित शिक्षणसंस्था असोशिएसन

PuneCity, 06 Apr 2024, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

सकाळ

# बीबीए, बीसीएबाबत संस्था न्यायालयात

## 'एआयसीटीई'च्या निर्णयाबाबत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना पत्र

**पुणे, ता. ५ :** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) अखत्यारित बीबीए, बीएमएस आणि बीसीए अभ्यासक्रम समाविष्ट करण्याच्या निर्णयाला देशभरातील शिक्षण संस्थांनी न्यायालयात आव्हान दिले आहे. यात पुण्यातील दोन संस्थांचा समावेश आहे. या निर्णयामुळे संस्था, विद्यार्थी, पालकांवर आर्थिक बोजा पडणार असल्याचे संस्थांनी म्हटले आहे. याबाबत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्र लिहिण्यात आले आहे.

एआयसीटीईने या पदव्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांचा दर्जा दिला आहे. या अभ्यासक्रमांसाठी एआयसीटीईची मान्यता घेणेही बंधनकारक आहे. हे अभ्यासक्रम महाविद्यालयांमध्ये राबवण्यासाठी काही निकष निश्चित करण्यात आले आहेत. मात्र, या निर्णयाला विरोध करून महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडूसह काही राज्यांतील शिक्षण संस्थांनी न्यायालयात धाव घेतली आहे. त्यात पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शिक्षण संस्था संघटना या संस्थांचा समावेश आहे. एआयसीटीईमध्ये जसेच्या तसे समाविष्ट करणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, नव्या निकषांमुळे संस्था व महाविद्यालयाची दमछाक होत आहे. वेगवेगळ्या प्रकारची ८८ कागदपत्रे अपलोड करण्यासाठी संस्थांना पुरेसा वेळ हवा. दुसरीकडे नव्या निकषांमुळे शैक्षणिक शुल्क महाग होत आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

### संस्थांचे आक्षेप

- एआयसीटीईच्या अखत्यारित घेण्याची प्रचंड घाई का
- नवे बदल करताना भागधारकांना विचारात घेतले नाही
- तुकडीतील विद्यार्थ्यांची संख्या ८० वरून ६० होण्याची शक्यता
- वेगळे प्राचार्य, वेगळे ग्रंथालय असे बदल तातडीने करणे अशक्य
- व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी (एमबीए) अभ्यासक्रमाच्या वाचवण्यासाठी बदल
- शुल्कवाढीच्या अपरिहार्यतेमुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांवर अन्याय

> पायाभूत सुविधा 'एआयसीटीई'च्या निकषांनुसार कराव्या लागणार आहेत. त्यासाठी संस्थांना खर्च करावा लागणार आहे. शुल्क निर्धारण समितीकडून शुल्करचना केली जाणार आहे. त्यामुळे शुल्कात मोठी वाढ होऊ शकते.
> **- डॉ. शामाकांत देशमुख,** कार्यवाह, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

Pune, Main
06/04/2024 Page No. 302

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

**प्रभात**

# व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमावरून वाद

## 'एआयसीटीई'च्या ताब्यात देण्यास संस्थांचा विरोध

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ७ -** बीबीए, बीएमएस, बीसीए या व्यवस्थापनशास्त्र पदवी अभ्यासक्रम आपल्या अखत्यारित घेण्याचा निर्णय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) घेतला आहे. त्याबाबत कोणाशीही चर्चा केलेली नाही. यंदा निवडणूक वर्ष असल्याने या काळात विद्यार्थी, शिक्षक आणि अन्य घटकांच्या नाराजीचा मोठा फटका बसू शकतो, असे सूचित करुन हा निर्णय किमान एक




वर्ष स्थगित करण्याची मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे केली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाही प्रा. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी या संदर्भातील पत्र प्रधान यांना पाठवले आहे. 'एआयसीटीई'ने घेतलेल्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या समस्या पत्राद्वारे प्रधान यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे अडचणी निर्माण होत आहेत. अभ्यासक्रमांच्या मान्यतेची प्रक्रिया दमवणारी, अनेक प्रकारची माहिती मागणारी आहे. त्यामुळे त्याची पूर्तता करताना महाविद्यालये, शिक्षण संस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्याशिवाय या निर्णयाचा ग्रामीण, आदिवासी, वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना फटका बसणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

PuneCity, 08 Apr 2024, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

**लोकसत्ता**
लोकमान्य लोकशक्ती

# तीन महाविद्यालयांना पाच कोटी रुपयांचा निधी

## पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयाचा समावेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम उषा) योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित तीन महाविद्यालयांची प्रत्येकी पाच कोटी रुपयांच्या निधीसाठी निवड झाली आहे. त्यात मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंड पुणे शहर-जिल्ह्यातील एकमेव आहे.

देशभरातील उच्च शिक्षण संस्थांतील गुणवत्ता सुधारणे, उच्च शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) ही योजना २०१३मध्ये सुरू केली. त्यानंतर २०१८मध्ये योजनेचा दुसरा टप्पा सुरू झाला. तर २०२३मध्ये योजनेचे नाव बदलून पीएम-उषा नावाने योजनेचा तिसरा टप्पा सुरू करण्यात आला आहे. या अनुदानासाठी भारतभरातून अंदाजे २३०० प्रकल्प सादर झाले. महाराष्ट्रातून ६२० प्रकल्प सादर झाले. त्यापैकी ४३ प्रकल्प मंजूर झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंड, नाशिक जिल्ह्यातील भोसला लष्करी महाविद्यालय, नगर जिल्ह्यातील सोनाई येथील मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय यांची निवड झाली.

मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंडच्या निवडीबाबत प्राचार्य डॉ. संजय खरात म्हणाले, की केंद्र आणि राज्य सरकार यांच्या प्रत्येकी ६० टक्के आणि ४० टक्के अशा संयुक्त अर्थसहाय्यातून पीएम-उषा योजनेत महाविद्यालयाला पाच कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प तयार करण्यात आला. या अनुदानामुळे महाविद्यालयात नवीन भौतिक सुविधा निर्माण करता येतील. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व घटकांच्या क्षमतांचा विकास साधणे शक्य होईल. महाविद्यालयला या योजनेसाठी क्षमता विकसन केंद्र म्हणून काम करता येईल. त्याचा फायदा पुण्यातील सर्व महाविद्यालयांना होऊ शकेल.

23/04/2024 | Pune | Page : 14
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# विद्यापीठाशी संलग्न तीन कॉलेजला पाच कोटींचा निधी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम उषा) योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित तीन महाविद्यालयांची प्रत्येकी पाच कोटी रुपयांच्या निधीसाठी निवड झाली आहे. त्यात मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंड महाविद्यालयाचा समावेश आहे.

देशभरातील उच्च शिक्षण संस्थांतील गुणवत्ता सुधारणे, उच्च शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) ही योजना २०१३ मध्ये सुरू केली. त्यानंतर २०१८ मध्ये योजनेचा दुसरा टप्पा सुरू झाला. तर २०२३ मध्ये योजनेचे नाव बदलून पीएम-उषा नावाने योजनेचा तिसरा टप्पा सुरू करण्यात आला आहे. या अनुदानासाठी भारतभरातून अंदाजे २३०० प्रकल्प सादर झाले. महाराष्ट्रातून ६२० प्रकल्प सादर झाले, त्यापैकी ४३ प्रकल्प मंजूर झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंड, नाशिक जिल्ह्यातील भोसला लष्करी महाविद्यालय, नगर जिल्ह्यातील सोनाई येथील मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय यांची निवड झाली.

**पीएम-उषा योजनेत मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंडचा समावेश**

मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंडच्या निवडीबाबत प्राचार्य डॉ. संजय खरात म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकार यांच्या प्रत्येकी ६० टक्के आणि ४० टक्के अशा संयुक्त अर्थसहाय्यातून पीएम-उषा योजनेत महाविद्यालयाला पाच कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प तयार करण्यात आला. या अनुदानामुळे महाविद्यालयात नवीन भौतिक सुविधा निर्माण करता येतील. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व घटकांच्या क्षमतांचा विकास साधणे शक्य होईल. महाविद्यालयाला या योजनेसाठी क्षमता विकसन केंद्र म्हणून काम करता येईल. त्याचा फायदा पुण्यातील सर्व महाविद्यालयांना होऊ शकेल.

Pune Edition
Apr 24, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

विश्लेषण

# बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम आता सुकर की दुष्कर?

चिन्मय पाटणकर
chinmay.patankar@expressindia.com

**व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन (बीसीए) हे पदवी अभ्यासक्रम अ.भा. तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) अखत्यारीत गेले आहेत. या निर्णयाचे परिणाम शिक्षण संस्था तसेच विद्यार्थ्यांवरही होतील...**

**अभ्यासक्रमांबाबतचा निर्णय काय?**

एमबीए, एमसीए हे अभ्यासक्रम आधीच 'एआयसीटीई'च्या अखत्यारीत आहेत, तर बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि राज्य सरकारच्या मान्यतेने राबवले जात होते. मात्र, अलीकडेच 'एआयसीटीई'ने हे अभ्यासक्रम आपल्या अखत्यारीत आणण्याचा निर्णय घेतला; त्यामुळे हे अभ्यासक्रम राबवण्यासाठी महाविद्यालयांना 'एआयसीटीई'ची मंजुरी अनिवार्य करण्यात आली. हे अभ्यासक्रम 'एआयसीटीई'च्या अखत्यारीत गेल्यामुळे त्यांना व्यावसायिक दर्जा मिळणार आहे. राज्यभरातील महाविद्यालयांत या अभ्यासक्रमांच्या एक ते दीड लाखापेक्षा जास्त जागा आहेत. या अभ्यासक्रमांच्या मंजुरीसाठीची प्रक्रिया आता 'एआयसीटीई'कडून राबवण्यात येत आहे.

**निर्णयाचा प्रवेशांवर परिणाम काय?**

आतापर्यंत बीबीए, बीएमएस, बीसीए या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया महाविद्यालय स्तरावर होत होती. त्यात महाविद्यालयाची प्रवेश परीक्षा किंवा थेट गुणवत्तेनुसार प्रवेश दिले जात होते. मात्र, 'एआयसीटीई'च्या निर्णयामुळे या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेची पद्धत बदलणार आहे. ही प्रक्रिया आता महाविद्यालय स्तरावर न राबवता केंद्रीय पद्धतीने होणार आहे. त्यासाठी 'राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षा'कडून एमबीए, एमसीए अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांप्रमाणे स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. त्यासाठीची अर्जप्रक्रिया सुरू असून, अर्ज भरण्यासाठी ३० एप्रिलपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. केंद्रीय परीक्षेमुळे राज्यभरातील विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांना प्रवेशासाठी स्पर्धा करावी लागणार आहे.

**शिक्षण संस्था, तज्ज्ञांचे म्हणणे काय?**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) निर्णयाला देशभरातील शिक्षण संस्थांनी विरोध केला. विविध राज्यांतील शिक्षण संस्थांनी या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले आहे. 'एआयसीटीई'च्या निर्णयामुळे सध्या ८० विद्यार्थ्यांची तुकडी ६० विद्यार्थ्यांची होण्याची शक्यता आहे. 'एआयसीटीई'च्या निकषांनुसार पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी खर्च, शुल्क निर्धारण समितीकडून शुल्करचना केली जाणार आहे. संस्थांना खर्च करावा लागणार असल्याने शुल्कात मोठी वाढ होऊ शकते, तसेच दहा टक्के जागा वाढवण्याचा पर्यायही राहणार नाही. या निर्णयामुळे राज्य सरकारवरही आर्थिक ताण येणार आहे, असे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख सांगतात. महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शिक्षण संस्था संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुधाकर जाधवर यांच्या म्हणण्यानुसार, राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत आता यूजीसी आणि 'एआयसीटीई'चे अस्तित्व संपून 'उच्च शिक्षण आयोग' येणार आहे. त्यामुळे हे अभ्यासक्रम आपल्या अखत्यारीत घेण्याची 'एआयसीटीई'ला अचानक घाई का झाली, हा प्रश्न आहे. या निर्णयानंतर तुकडीची विद्यार्थी संख्या कमी करणे, वेगळे प्राचार्य, वेगळे ग्रंथालय असे बदल महाविद्यालयांना झटपट करणे शक्य नाही. आतापर्यंत विद्यार्थ्यांना कमी शुल्कात या अभ्यासक्रमांचे शिक्षण घेता येत होते. मात्र, 'एआयसीटीई'च्या निर्णयामुळे तसे होणार नाही. हा निर्णय घेताना सर्व भागधारकांना विश्वासात घेण्यात आले नाही.

**विद्यार्थ्यांची संधी जाणार?**

'या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया आता सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे ('सीईटी'द्वारे) होणार असल्याची जागृती विद्यार्थी, पालकांमध्ये पुरेशा प्रमाणात झालेली नाही. सीईटी दिल्याशिवाय प्रवेश मिळणार नाही. परिणामी, प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांची संधी जाऊ शकते,' असे करिअर मार्गदर्शक विवेक वेलणकर यांचे म्हणणे आहे.

**'एआयसीटीई'चे म्हणणे काय?**

'पारंपरिक पद्धतीने (ऑफलाइन) राबवले जाणारे एमबीए, एमसीए, एमटेक, बीटेक अभ्यासक्रम 'एआयसीटीई'च्या अखत्यारीत आहेतच. त्याच धर्तीवर पारंपरिक पद्धतीने (ऑफलाइन) बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम 'एआयसीटीई'च्या अखत्यारीत आले आहेत. काही लोक याबाबत दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रमाच्या चार हजार संस्थांना 'जशा आहेत तशा' तत्त्वावर मान्यता देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना एआयसीटीईकडून शिष्यवृत्तीही दिली जाणार आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे निकष या अभ्यासक्रमांना लावले जाणार नाहीत. सर्व भागधारकांशी चर्चा करून या अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र निकष तयार केले जाणार आहेत,' असे 'एआयसीटीई'चे उपाध्यक्ष डॉ. अभय जेरे यांनी सांगितले.

30/04/2024 | Mumbai(Pune) | Page : 7
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# बीबीए, बीएमएस, बीसीएच्या प्रवेशांचीच परीक्षा

### 'सीईटी'बाबत जागृतीचा अभाव, नोंदणीसाठी मुदतवाढीची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन पदवी (बीसीए) अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) २७ ते २९ मे दरम्यान घेतली जाणार आहे. मात्र, या प्रवेश परीक्षेविषयी विद्यार्थी, पालकांमध्ये जागृतीचा अभाव असून, त्याचा प्रवेशांना फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे नोंदणीसाठी मुदतवाढीची मागणी केली जात आहे.

राज्यभरातील बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रमांच्या एक लाखांपेक्षा जास्त जागा आहेत. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) हे अभ्यासक्रम स्वतःच्या अखत्यारित घेतले. त्यामुळे या अभ्यासक्रमांना व्यावसायिक दर्जा मिळाला आहे. या अभ्यासक्रमांच्या मान्यतेसाठी एआयटीसीईची मान्यताही बंधनकारक करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सीईटी सेलकडून या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्यस्तरीय सीईटी घेतली जाणार आहे.

विनासीईटी या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळणार नाही. ही परीक्षा २७ ते २९ मे या कालावधीत होणार आहे. त्यासाठी सीईटी सेलने नोंदणी प्रक्रिया सुरू करून अर्ज भरण्यासाठी ११ एप्रिलपर्यंतची मुदत दिली आहे.

मॉडर्न महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शामकांत देशमुख म्हणाले, की बीबीए, बीसीए अशा अभ्यासक्रमांचा चांगला प्रतिसाद असतो. या पदवीधारक विद्यार्थ्यांना रोजगारसंधीही मिळत असल्याने वाणिज्य पदवीपेक्षा या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओढा असतो. आतापर्यंत या अभ्यासक्रमांचे प्रवेश महाविद्यालय स्तरावर गुणवत्तेच्या आधारे होत होते. मात्र यंदापासून या अभ्यासक्रमांचे प्रवेश सीईटीमार्फत होणार आहेत. या सीईटीबाबत विद्यार्थी, पालकांमध्ये अद्याप पुरेशी जागृती झालेली नाही. त्यामुळे सीईटीला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद न मिळाल्यास त्याचा फटका प्रवेशांना बसु शकतो. त्यामुळे बारावीच्या परीक्षेनंतर पुरवणी सीईटी घेणे उपयुक्त ठरू शकते.

> बीबीए, बीसीए अशा अभ्यासक्रमांसाठी होणाऱ्या सीईटीबाबत विद्यार्थी, पालकांमध्ये पुरेशी माहिती पोहोचलेली नाही. त्यामुळे ही सीईटी दोनवेळा घ्यावी लागण्याची शक्यता आहे. मे अखेरीस होणाऱ्या या सीईटीच्या नोंदणीची अंतिम मुदत ११ एप्रिल आहे. नोंदणीसाठी किमान एप्रिल अखेरपर्यंत मुदतवाढ दिली पाहिजे.
>
> – **विवेक वेलणकर**, करिअर मार्गदर्शक

> सीईटीशी संबंधित सर्व घटकांशी सीईटीबाबतच्या माहितीसाठी संकेतस्थळ नियमितपणे पाहिले पाहिजे. सीईटी सेलकडून या सीईटीबाबत विविध माध्यमांतून प्रचार करण्यात येत आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सीईटी देण्याचे आवाहन केले जात आहे. या अभ्यासक्रमांना आता व्यावसायिक दर्जा प्राप्त झाल्याने विद्यार्थ्यांना रोजगारसंधीही मिळणार आहेत. विद्यार्थीसंख्या कमी असल्यास सीईटीच्या अर्जांसाठी मुदतवाढ देता येऊ शकेल.
>
> – **महेंद्र वारभुवन**, आयुक्त, सीईटी सेल

03/04/2024 | Mumbai(Pune) | Page : 2
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

» रवींद्र भोसले, पुणे

## सोबत करणारी आठवणींची शिदोरी



शिवाजीनगर इथल्या मॉडर्न महाविद्यालयामधील कला शाखेच्या १९९६ ते १९९९ वर्गातील विद्यार्थ्यांची पुनर्भेट २५ वर्षांनी मोठ्या उत्साहात झाली. २५ फेब्रुवारी रोजी पुण्यात हा सोहळा पार पडला. त्यासाठी गेले सात महिने प्रयत्न सुरू होते. कार्यक्रम सुरू झाल्यानंतर जमलेली गर्दी आणि सगळ्यांच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद पाहता एक वेगळंच समाधान लाभलं.

पुनर्भेटीचा टप्पा २५ वर्षांचा होता. काही मोजकेच विद्यार्थी एकमेकांच्या संपर्कात होते. नियोजनपूर्वक कामाला सुरुवात झाली. जे संपर्कात होते, त्यांच्याकडून अजून काही जणांचे मोबाइल नंबर घेऊन व्हॉट्सॲपवर 'रियुनियन : १९९९ मॉडर्न बी.ए. बॅच' असा ग्रुप तयार झाला. मॉडर्न कॉलेजमधील क्लार्क मानसी शिंदेकडून या बॅचच्या विद्यार्थ्यांच्या घरच्या पत्त्यांची यादी मिळवून ज्यांच्याशी संपर्क झाला नाही, अशा सुमारे १४० जणांना पत्रं पाठवली गेली; जेणेकरून त्यांचा संपर्क होऊन ते कार्यक्रमाला येऊ शकतील. त्यासाठी स्थानिक कमिटी तयार करण्यात आली. त्यांच्या चार ते पाच मीटिंग पार पडून कार्यक्रमाची रूपरेषा तयार केली गेली. त्यानुसार जबाबदारीचं वाटप करण्यात आलं. सर्वांनी आनंदानं कामाची जबाबदारी घेतली.

### दिल, दोस्ती, रियुनियन

चेतन फुगेनं हॉल बुक केला. अखेर कामाचा दिवस उजाडला. प्रत्येकानं स्टेजवर येऊन २५ वर्षांत आपली जडणघडण कशी झाली, याबद्दल थोडक्यात सांगितलं. मार्गदर्शक, पाहुणे म्हणून मॉडर्न कॉलेजचे शिक्षक डॉ. अमृता ओक, प्रा. मानसिंग साळुंके, डॉ. सुधीर उजळंबकर, डॉ. नीता बोकील या कार्यक्रमाला लाभले. भाषण, सगळ्यांशी त्यांनी केलेल्या वैयक्तिक संवादातून आमच्या सर्वांच्या मनात नवीन ऊर्जा निर्माण झाली आणि पुढं अजून बरंच काही करायचं बाकी आहे, याची जाणीव झाली.

सर्व पत्रव्यवहाराचं, भेटीच्या मजकुराचं काम रवींद्र भोसलेनं पाहिलं. सर्व पत्रं, फ्लेक्स, साहित्याची छपाई किरण साळुंकेनं वेळेवर करून दिली. संपूर्ण आर्थिक बाजू आणि रांगोळी कशी उत्तम होईल हे शशिकांत साळुंकेनं एक हाती सांभाळलं. सर्व पत्रं पोस्टात टाकणं, सर्वांचं स्वागत, फोटो काढून त्याची प्रत्येकाला फ्रेम तयार करून देणं, आय.डी. कार्ड तयार करणं, जी मुलं आणि मुलींसाठी वेगवेगळी असतील आणि ज्यावर त्यांचं माहेर व सासर अशी दोन्ही नावं असतील, ती तयार करण्यात आली. या सगळ्याची जबाबदारी गणेश गंगावणे, उमेश भंडारी, रूपाली काटम, सारिका सासवडे यांनी वेळेअगोदर उत्तम पार पाडली. कुलदीप वाळके, शीतल गुड, शफील पठा, नितीन सोनावणे, शोभा पवारनंही आपापल्या परीनं खारीचा वाटा उचलला.

कार्यक्रमाचं सूत्रसंचालन रूपाली राक्षेनं उत्तम केलं. सगळ्यांचा असाच संपर्क टिकून राहावा म्हणून सगळ्यांच्या वैयक्तिक माहितीसह पुढील सहभाग कसा असेल, पुढं काय करण्याची इच्छा आहे अशा स्वरूपाची प्रश्नावली या वेळी भरून घेण्यात आली, जेणेकरून सगळ्यांची सविस्तर माहिती मिळू शकेल. शिक्षकांचा परिचय सोप्या; पण मुद्देसूद पद्धतीनं केतकी टेंबे, शोभा साकोरे, राजश्री मोढवे, विजया सुतार यांनी करून दिला. शिक्षकांचे आभार शोभा पवारच्या भाषणानं मानण्यात आले. मिलिंद शिंदे यांनी कार्यक्रमाचा समारोप आपल्या मित्रांच्या गुणांचं वर्णन करून पुन्हा भेटण्याच्या आवाहनानं खुमासदार केलं.

विशाल उणेचा, रोहिणी गोसावी यांनी भोजनव्यवस्था चोख पार पाडली. जुन्या काळाच्या आठवणींचा पट सगळ्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारेनं वाहत होता. जेवणानंतर विविध गुणदर्शन कार्यक्रम झाले. काही गमतीशीर खेळही झाले. सारिका, शोभा, रूपाली यांच्या नृत्यानं छान माहोल तयार झाला. एकत्रित डान्स, गाणी, एकमेकांना दाद देणं यामुळे आपण आजही कॉलेजमध्येच आहोत, असं सर्वांना जाणवत होतं. आत्ताचा क्षण भरभरून जगू, अशा आविर्भावात सगळे तल्लीन झाले होते. आपलं घर, संसार, ऑफिस सगळं विसरून कार्यक्रमाची मजा घेत असताना अजूनही आपण कॉलेजमध्ये असल्याचा भास होत होता.

कार्यक्रमाचा उद्देश नुसतं भेटणं हा नव्हता, तर त्या भेटीतून पुढील काळात या गटाचं भरीव कामगिरीत कसं रूपांतर करता येईल, याचा गांभीर्यानं विचार करण्यात आला. जाताना सगळे जण भरल्या मनानं आठवणी घेऊन गेले. पुढील काळात कुणाला एकाकी वाटलं, तर आठवणींच्या या शिदोरीतून काही चांगले क्षण आठवून ते पुन्हा नव्या जोमानं कामाला लागतील, यात शंका नाही.

Maharashtra Times 4.4.2024

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

लोकसत्ता

## अभ्यासक्रमांसाठी शिक्षण संस्थांची नवी शक्कल

### बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांच्या नामाभिधानात बदल करून वाणिज्य, विज्ञान पदवीमध्ये समावेश प्रस्तावित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन पदवी (बीसीए) अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) अखत्यारित जाण्यापासून वाचवण्यासाठी शिक्षण संस्थांनी शक्कल लढवली आहे. विद्यापीठ स्तरावर या अभ्यासक्रमांचे नामाभिधान (नोमेनक्लेचर) बदलून त्या अभ्यासक्रमांचा समावेश पारंपरिक वाणिज्य, विज्ञान पदवी अभ्यासक्रमांतर्गत केला जाणार आहे.

बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रमांना व्यावसायिक दर्जा देऊन एआयसीटीईने या अभ्यासक्रमांना स्वतःच्या अखत्यारित घेतले. त्यामुळे या अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत केंद्रीय पद्धतीने राबवली जाणार आहे. त्यासाठी प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. तसेच हे अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्थांना एआयसीटीईच्या निकषांनुसार पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागणार आहेत. त्यासाठी शिक्षण संस्थांना खर्च करावा लागणार आहे.

शुल्क निर्धारण समितीकडून अभ्यासक्रमांचे शुल्क निर्धारित केले जाणार आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांचे शुल्क वाढण्याची शक्यता आहे. या कारणांमुळे एआयसीईटीच्या या निर्णयाविरोधात काही शिक्षण संस्थांनी न्यायालयात धाव घेतली आहे. मात्र, तांत्रिक पातळीवर पर्याय शोधून हे अभ्यासक्रम एआयसीटीईच्या अखत्यारित जाण्यापासून वाचवण्याचाही प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या स्तरावर अभ्यासक्रमांचे नामाभिधान बदलून त्यांना वाणिज्य, विज्ञान पदवीच्या अंतर्गत घेण्यात येत आहे.



बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांचे नाव बदलण्याचा ठराव विद्या परिषदेत मांडला. त्याला विद्या परिषदेने मान्यता दिली. आता व्यवस्थापन परिषदेत त्या बाबतचा प्रस्ताव ठेवला जाणार आहे. तसेच न्यायालयाच्या निर्णयानंतर पुढील निर्णय होईल.

– डॉ. पराग काळकर,
प्र कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

एआयसीटीई संलग्नित बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना सीईटी सेलची प्रवेश परीक्षा द्यावी लागेल, तर नामाभिधान बदललेले अभ्यासक्रम पारंपरिक पदवीअंतर्गत येणार असल्याने त्यासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागणार नाही.

– डॉ. राजेंद्र झुंजारराव,
प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

विद्यापीठ स्तरावर अभ्यासक्रमांचे नामाभिधान बदलल्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होऊ शकतात. बीबीए, बीसीए हे पदवी अभ्यासक्रम विद्यापीठात स्थापित झालेले आहेत, तर वाणिज्य, विज्ञान या पदवी अभ्यासक्रमांतर्गत हे अभ्यासक्रम स्थापित झालेले नाहीत. त्यामुळे काही संस्थांमध्ये एआयसीटीई संलग्नित अभ्यासक्रम, तर काही संस्थांमध्ये नामाभिधान बदलून पारंपरिक पदवीत समावेश केलेले अभ्यासक्रम समांतरपणे चालवले जाणार असल्याकडे उच्चशिक्षणातील जाणकारांनी लक्ष वेधले.

11/04/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

सकाळ

## 'मॉडर्न'च्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**पुणे, ता. १३ :** शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयातील कलाशाखेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. माजी विद्यार्थ्यांनी २५ वर्षांपूर्वीच्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षिका डॉ. अमृता ओक, प्रा. मानसिंग साळुंके, डॉ. सुधीर उजळंबकर, डॉ. नीता बोकील उपस्थित होते. केतकी टेंबे, शोभा साकोरे, राजश्री मोढवे व विजया सुतार यांनी शिक्षकांचा परिचय करून दिला.

रूपाली राक्षे व शीतल गुड यांनी सूत्रसंचालन केले. मिलिंद शिंदे यांनी आभार मानले. रवींद्र भोसले, गणेश गंगावणे, उमेश भंडारी, रूपाली काटम, सारिका सासवडे, कुलदीप वाळके, शीतल गुड, शफील पठाण यांनी नियोजन केले.

Pune, Pune-Today
14/04/2024 Page No. 11

## *News Paper Clippings During April 2024*

### *Section: Education*

सकाळ

# संशोधन केंद्रे बनताहेत भ्रष्टाचाराची कुरणे

## पीएच.डी. मार्गदर्शकाला लाच घेताना अटक झाल्यानंतर प्रश्न ऐरणीवर

**पुणे, ता. ३१ :** पीएच.डी.साठी मार्गदर्शक मिळविण्यापासून ते अंतिम मुलाखतीपर्यंत, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील संशोधन केंद्रे आता भ्रष्टाचाराची कुरणे बनत चालली आहेत. शनिवारी (ता. ३०) भ्रष्टाचारविरोधी पथकाच्या पुण्यातील कारवाईने विद्यादानाच्या पवित्र क्षेत्रातील या भयाण वास्तवावर शिक्कामोर्तब झाले आहे. आजवर खासगीत बोलले जाणारे सत्य आता कायद्याच्या बडग्याने सार्वजनिक झाले आहे.

विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांत विविध विषयांची संशोधन केंद्रे देण्यात आली. तसेच पीएच.डी. मार्गदर्शकांची संख्याही मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. याचा फायदा संशोधनाला होण्याऐवजी मार्गदर्शक प्राध्यापकांसाठी संशोधन




केंद्रे म्हणजे चिरीमिरीचे ठिकाण बनले आहेत, अशी प्रतिक्रिया एका प्रतिष्ठित प्राध्यापकाने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली आहे. ते म्हणतात, "पीएच.डी. संशोधन केंद्रांवर विद्यापीठाचे कोणतेच नियंत्रण पाहायला मिळत नाही. पुरेशा सुविधा नसतानाही अनेक ठिकाणी संशोधन केंद्रे देण्यात आली आहेत. दुसरीकडे बहुतेक मार्गदर्शक प्राध्यापक संशोधक विद्यार्थ्यांना अनेक कामांमध्ये आडकाठी घालतानाचे वास्तव नाकारता येत नाही. सर्वच प्राध्यापक असे नसले, तरी भ्रष्ट आचरण असलेल्या अशा मार्गदर्शकांची संख्या मोठी आहे." भेटवस्तूंपासून ते प्रत्यक्ष आर्थिक लाभापर्यंत विविध गैरमार्ग काही संशोधक प्राध्यापकांकडून राबवला जात असल्याचेही अनेकांनी स्पष्ट केले.

### हिमनगाचे टोक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएच.डी. मार्गदर्शक आणि सांगवीतील बाबूरावजी घोलप महाविद्यालयात अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेला लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले आहे. ही कारवाई म्हणजे हिमनगाचे टोक असून, अनेक मार्गदर्शक विद्यार्थ्यांना विविध प्रकारे छळत असल्याची प्रतिक्रिया पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांनी 'सकाळ'शी बोलताना दिली. साडेतीन ते पाच वर्षांचा पीएचडी कालावधी आणि मार्गदर्शकांच्या हातात सर्व काही असल्याने अनेक विद्यार्थी तक्रारीसाठी पुढे धजावत नसल्याचे विद्यार्थ्यांनी म्हटले आहे.

### संशोधन केंद्रांविषयीचे अनुत्तरीत प्रश्न

- **विद्यापीठाकडून नियंत्रण किंवा पडताळणीची व्यवस्थाच कुचकामी**
- **विद्यार्थ्यांच्या समस्यांचा आढावा घेतला जात नाही**
- **पीएच.डी. मार्गदर्शकांविषयीच्या तक्रारींची व्यवस्थाच नाही**

"पीएच.डी.मार्गदर्शक आणि संशोधन केंद्राला मान्यता देताना विद्यापीठाने विशेष दक्षता घेतली पाहिजे. तसेच वेळोवेळी दोघांचेही मूल्यांकन करायला हवे. गैरप्रकार आढळल्यास ही मान्यता काढून घ्यावी. गरजेपोटी पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांनीही विद्यापीठाला याबाबत सतर्क केले पाहिजे.

**- डॉ. अरुण अडसूळ,**
माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

"विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सेवा आणि सुविधा देणे केंद्रांना बंधनकारक आहे. नव्या ऑनलाइन पीएच.डी. ट्रॅकिंग प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांना गोपनीय पद्धतीने तक्रारही करता येणार आहे.

**- डॉ. पराग काळकर,**
प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

"शिक्षकाने वैयक्तिक आयुष्यात नीतिमत्ता पाळायलाच हवी. पीएच.डी.च्या विद्यार्थ्याला गोपनीय पद्धतीने तक्रार करता येईल, अशी व्यवस्था हवी. गैरप्रकार झाल्यास तातडीने कारवाई करायला हवी.

**- डॉ. पंडित विद्यासागर,**
माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

Pune, Main1
01/04/2024 Page No. 1

सकाळ

# लाचखोर मार्गदर्शकावर विद्यापीठ करणार कारवाई

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एका पीएच.डी. मार्गदर्शकाला नुकतेच लाच घेताना पकडण्यात आले. त्यांच्यावर विद्यापीठाच्या वतीनेही कारवाई करण्यात येणार असून, मार्गदर्शक म्हणून मान्यता काढण्यात येणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

सांगवी येथील बाबूरावजी घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. शकुंतला माने यांना २० हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले आहे. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, ही कारवाई फक्त हिमनगाचे टोक असल्याची प्रतिक्रियाही अनेक शिक्षणतज्ज्ञांनी दिली आहे. विद्यापीठाने तातडीने मार्गदर्शकावर कारवाई करावी आणि पुन्हा असे घडू नये म्हणून कडक धोरण राबवावे, असेही तज्ज्ञांनी म्हटले आहे. विद्यापीठाच्या वतीनेही घटनेचा अभ्यास करण्यात येत असून, मार्गदर्शकावर कठोर कारवाई होईल, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. तातडीने मार्गदर्शक म्हणून मान्यता काढून घेणे आणि त्यांच्या पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना दुसरा मार्गदर्शक देण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रत्यक्ष कारवाईचे स्वरूप विद्यापीठाच्या चौकशीनंतर स्पष्ट होणार आहे.

Pune, Main1
01/04/2024 Page No. 1

## *News Paper Clippings During April 2024*

### *Section: Education*

प्रभात

# पीएच. डी. प्रबंधासाठी लाच मागणाऱ्या प्राध्यापिकेवर कारवाई

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३१** - पुणे विद्यापीठाच्या एका पीएच. डी. मार्गदर्शक प्राध्यापिकेला विद्यार्थ्याकडून लाच घेताना पकडण्यात आले होते. विद्यापीठाच्या वतीनेही त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार असून, त्यांची मार्गदर्शक म्हणून असलेली मान्यता काढण्यात येईल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

सांगवी येथील बाबूरावजी घोलप महाविद्यालयातील प्राध्यापिका यांना विद्यार्थ्याकडून २० हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले आहे. या प्रकारामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, ही कारवाई फक्त हिमनगाचे टोक आहे, अशा प्रतिक्रियाही अनेक शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केल्या आहेत. पुणे विद्यापीठाने तात्काळ या मार्गदर्शकावर कारवाई करावी आणि असे प्रकार पुन्हा घडू नयेत, यासाठी कडक धोरण राबवावे, असेही तज्ज्ञांनी म्हटले आहे. विद्यापीठाच्या वतीने या घटनेचा अभ्यास करण्यात येत असून, मार्गदर्शकावर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. त्यांची तातडीने मार्गदर्शक म्हणून मान्यता काढून घेण्यासह त्यांच्या पीएच. डी.च्या विद्यार्थ्यांना दुसरा मार्गदर्शक देण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. याबाबत होणाऱ्या कारवाईचे स्वरूप विद्यापीठाच्या चौकशीनंतर स्पष्ट होणार आहे.

PuneCity, 01 Apr 2024, Page:007
https://epaper.dainikprabhat.com

सामना

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गाइड नेमताना खबरदारी घ्यावी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'पीएच.डी.'च्या विद्यार्थ्याकडून २० हजारांची लाच घेताना गाइडला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने रंगेहाथ पकडले, ही शरमेची बाब आहे. त्यामुळे विद्यापीठाने पीएच.डी.संदर्भातील गाइड नेमताना सतर्कता बाळगावी, गाइडच्या मानधनात वाढ करावी, गाइडकडून होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करावेत आदी मागण्या 'महापेरेंट्स' पालक संघटनेतर्फे करण्यात आल्या आहेत. मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संघटनेतर्फे देण्यात आला आहे. या मागणीबाबत 'महापेरेंट्स'तर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी संघटनेचे दिलीपसिंह विश्वकर्मा, दत्तात्रय पवार, डॉ. संजय कुंबरे उपस्थित होते. पीएच.डी.च्या विद्यार्थ्याकडून लाच घेताना गाइड रंगेहाथ सापडणे ही विद्यापीठाच्या प्रतिष्ठेवर घाला घालणारी घटना आहे. पीएच.डी.साठी शहरासह ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी विद्यापीठात येत असतात. या विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे विद्यापीठ प्रशासन कानाडोळा करते. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने या विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे, अशा मागण्या संघटनेतर्फे करण्यात आल्या आहेत.

Pune Edition
Apr 1, 2024 Page No. 3
epaper.saamana.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना (एनपीएस): फायदे आणि तोटे

मागच्याच आठवड्यातील गोष्ट! मार्च महिना सुरू झाला की, आपल्यातील अनेक जण कर वाचवण्यासाठी वेगवेगळे गुंतवणूक पर्याय शोधून घाईने पैसे गुंतवून मोकळे होतात. विमा योजनेचा हप्ता, गृहकर्ज, पीपीएफ, एनपीएस, इक्विटी लिंक सेव्हिंग स्कीम अर्थात 'ईएलएसएस' हे पर्याय तर खूप प्रचलित आहेत. त्यातील एनपीएस (नॅशनल पेन्शन स्कीम) यामधील गुंतवणुकीतून जास्त कर सवलत मिळवता येते. आजच्या लेखातून आपण या पर्यायाचा उपयोग कसा करून घेता येईल हे तर जाणून घेणार आहोत. त्याचबरोबर त्यातील त्रुटी देखील समजून घेऊ या.

मुळात 'एनपीएस' म्हणजे एक प्रकारचा कमी खर्चाचा म्युच्युअल फंड आहे. यांच्यामध्ये गुंतवणुकीसाठी समभाग ( E ), सरकारी रोखे ( G ), बिगर सरकारी रोखे ( C ) आणि इतर गुंतवणूक पर्याय ( A ) यांची सांगड घालता येते. इथे फरक इतकाच आहे की, इतर म्युच्युअल फंडांमध्ये आपण फक्त गुंतवू शकतो आणि त्याचा निधी व्यवस्थापक त्या फंडाला लागणाऱ्या गुंतवणुकीच्या नियमांनुसार ठरवतो की, समभाग, सरकारी रोखे आणि बिगर सरकारी रोख्यांमध्ये किती गुंतवणूक करायची. मात्र 'एनपीएस'मध्ये आपल्याकडे गुंतवणूकदाराला E-G-C-A चं प्रमाण ठरवण्यासाठी ४ पर्याय मिळतात:

### 'ॲक्टिव्ह' पर्याय

गुंतवणूदारांच्या वयाच्या ५० वर्षांपर्यंत कमाल ७५ टक्के समभाग निगडित गुंतवणूक ठेवता येते. पुढे मात्र ती प्रत्येक वर्षी आपोआप कमी होऊन त्याच्या वयाच्या ६०व्या वर्षांपर्यंत ५० टक्क्यांवर आणली जाते.

### 'ॲग्रेसिव्ह ऑटो' पर्याय

गुंतवणूदारांच्या वयाच्या ३५ वयापर्यंत कमाल ७५ टक्के समभाग संलग्न गुंतवणूक ठेवता येते. पुढे मात्र ती प्रत्येक वर्षी आपोआप कमी होऊन त्याच्या वयाच्या ५५ व्या वर्षापर्यंत १५ टक्क्यांवर आणली जाते.

### 'मॉडरेट ऑटो' पर्याय

गुंतवणूदारांच्या वयाच्या ३५ वयापर्यंत कमाल ५० टक्के समभाग संलग्न गुंतवणूक ठेवता येते. पुढे मात्र ती प्रत्येक वर्षी आपोआप कमी होऊन त्याच्या वयाच्या ५५ व्या वर्षापर्यंत १० टक्क्यांवर आणली जाते.

### 'कंझर्वेटिव्ह ऑटो' पर्याय

गुंतवणूदारांच्या वयाच्या ३५ वयापर्यंत कमाल २५ टक्के समभाग संलग्न गुंतवणूक ठेवता येते. पुढे मात्र ती प्रत्येक वर्षी आपोआप कमी होऊन त्याच्या वयाच्या ५५ व्या वर्षापर्यंत ती गुंतवणूक ५ टक्क्यांवर आणली जाते.

ज्या गुंतवणूकदारांची जोखीम घेण्याची क्षमता जास्त असते, ते 'ॲक्टिव्ह' पर्याय वापरून जास्त फायदा मिळवू शकतात. परंतु जसजसं वय ५० च्या पलीकडे जाईल, फंड स्वतःच समभाग संलग्न गुंतवणूक कमी करून पैसे कमी जोखमीच्या पर्यायामध्ये प्रत्येक वर्षी घालत जाईल.

१

| कलम | कधी पैसे भरायचे ? | वार्षिक गुंतवणूक | कोण पैसे भरतं ? | किती कर वाचू शकतो ? |
|---|---|---|---|---|
| ८०सी | आर्थिक वर्षामध्ये कधीही | १,५०,००० | गुंतवणूकदार | करदात्याच्या उत्पन्न श्रेणीनुसार कर वाचतो. ३० टक्के उत्पन्न असणाऱ्या गुंतवणूकदारांना जास्त फायदा होतो. |
| ८० सीसीडी (१बी) | | ५०,००० | गुंतवणूकदार | |
| ८० सीसीडी (२) | प्रत्येक महिन्यात पैसे पगारातून कापले जातात | १०%-१४% मूळ मासिक वेतन (बेसिक सॅलरी) | नियोक्ता (एम्प्लॉयर) | |

२

| पर्याय | जमा रक्कम | मासिक निवृत्तिवेतन (६.५ टक्क्यांनुसार) |
|---|---|---|
| ॲक्टिव्ह पर्याय | ११.७९ कोटी | ५.७१ लाख |
| ॲग्रेसिव्ह ऑटो पर्याय | ८.०४ कोटी | रु. ३.९५ लाख |
| मॉडरेट ऑटो पर्याय | ७.१०कोटी | ३.५० लाख |
| कंझर्वेटिव्ह ऑटो पर्याय | ५.९८कोटी | २.९५ लाख |

(आकडे रुपयांमध्ये)



### मार्ग सुबत्तेचा



तृप्ती राणे
लेखिका सेबी नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागार
trupti_vrane@yahoo.com

आजघडीला आपल्याकडे ११ अशी फंड घराणी आहेत, ज्यांच्याकडून आपण एनपीएसमध्ये गुंतवू शकतो. परंतु यातील सुरुवातीपासून असलेले निवृत्ती निधी व्यवस्थापक (पेन्शन फंड मॅनेजर) हे फक्त ६ आहेत - एचडीएफसी, स्टेट बँक, एलआयसी, यूटीआय, कोटक आणि आयसीआयसीआय यांचा फंडांचा तपशील, गुंतवणूक, परतावे हे त्यांच्या आणि एनपीएस ट्रस्टच्या संकेतस्थळावर मिळतात. तुम्ही तुमचा निधी व्यवस्थापक वर्षातून एकदा बदलू शकता. ज्या गुंतवणूकदारांना त्यांच्या पगारातून एनपीएसमध्ये पैसे घालता येतात त्यांना निधी व्यवस्थापक बदलता येत नाही.

तुमच्या E-G-C-A चं प्रमाणसुद्धा तुम्हाला वर्षातून ४ वेळा बदलता येतं. मात्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ही सुविधा उपलब्ध नाहीये.

खासगी क्षेत्रातील गुंतवणूकदारांना त्यांच्या 'एनपीएस'मधील संपत्ती व्यवस्थापन अर्थात 'ॲसेट ॲलोकेशन' चांगल्या पद्धतीने हाताळता येऊ शकतं. जेणेकरून शेअर बाजार खूप वर गेल्यावर समभाग गुंतवणुकीचं प्रमाण कमी करून, सरकारी रोखे वाढवून पोर्टफोलिओची जोखीम कमी करता येऊ शकते. पुन्हा बाजार खाली आला की, रोख्यांचं प्रमाण कमी करून समभागांचं प्रमाण वाढवता येऊ शकतं.

टियर १ च्या खात्यामध्ये दर वर्षी किमान १,००० रुपये गुंतवावे लागतात. टियर २ चं खातं उघडायचं असेल तर टियर १ उघडावंच लागतं. या खात्याला कोणतीही वार्षिक योगदानाची मर्यादा नाहीये. यातील पैसे कधीही आणि कितीही काढता येतात. गुंतवणूकदाराला भांडवली कर मात्र भरावा लागतो. टियर २ मधील पैसे टियर १ मध्ये वळवता येतात.

'एनपीएस'मध्ये गुंतवणूक टियर १ आणि टियर २ मध्ये करता येते. टियर १ मधील गुंतवणूक कर कार्यक्षम असते. पण टियर २ मधील गुंतवणूक ही कर कार्यक्षम नाहीये. प्राप्तिकर नियमांच्या वेगवेगळ्या कलमांखाली 'एनपीएस'मध्ये वार्षिक गुंतवणूक करून खालीलप्रमाणे कर वाचवता येतो:

कलम कधी पैसे भरायचे वार्षिक गुंतवणूक कोण पैसे भरतं? किती कर वाचू शकतो **(तक्ता १ बघा)**

वरील गुंतवणूक ही फक्त जुन्या करप्रणालीमध्ये मिळते. नवीन करप्रणालीनुसार पहिले दोन पर्याय मिळत नाहीत. तेव्हा जर गुंतवणूदार नवीन करप्रणालीमध्ये असेल आणि त्याच्या पगारातून 'एनपीएस'चा हफ्ता जात नसेल तर त्याला हा पर्याय उपयोगाचा नाही.

वयाच्या ६० व्या वर्षी टियर १ मधून ६० टक्के रक्कम काढता येते. त्याच्यावर कर लागत नाही. उरलेल्या ४० टक्के रकमेनुसार निवृत्तिवेतन घ्यावे लागते. या निवृत्तिवेतनावर मात्र करदात्याच्या उत्पन्न श्रेणीनुसार कर भरावा लागतो. जमा रक्कम जर ५ लाख रुपयांपेक्षा कमी असेल, तर ती पूर्णपणे काढता येते.

वयाच्या ६० व्या वर्षाआधी जर 'एनपीएस' बंद करायचं असेल त्यासाठी वेगळे नियम आहेत. इथे २० टक्के पैसे काढून, बाकी ८० टक्के रक्कम निवृत्तिवेतनाच्या माध्यमातून घ्यावी लागते. खातं उघडल्यानंतर ५ वर्षांनी असं करता येतं. परंतु जर जमा रक्कम २.५ लाख असेल, तर सगळेच पैसे काढता येतात.

जर 'एनपीएस'च्या गुंतवणूकदाराचं निधन झालं, (६०च्या आधी किंवा नंतर) तर त्याच्या खात्यात जमा असलेली रक्कम पूर्णपणे त्याच्या नामनिर्देशकाला (नॉमिनी) मिळते.

खातं चालू असताना काही विशिष्ट कारणांसाठी २५ टक्के रक्कम काढता येते, जसं की, मुलांचे उच्च शिक्षण, लग्न, आजारपण किंवा घरासाठी. असं मात्र तीनदाच करता येतं. तेव्हा गुंतवणूकदारांनी पैशांची सोय करताना याबाबतीत जागरूक राहणं गरजेचं आहे.

आता प्रश्न येतो की, जर पगारातून 'एनपीएस'मध्ये रक्कम गुंतवायची संधी मिळत असेल तर ती घ्यावी का? इथे मुळात गुंतवणूकदाराने पुढील काळातील स्वतःच्या आर्थिक गरजा समजून, मग त्यानुसार गुंतवणूक ठरवायची आहे. 'एनपीएस'मध्ये जमा झालेली रक्कम ही वयाच्या ६० पर्यंत सहजासहजी काढता येत नाही. वर सांगितल्याप्रमाणे काही ठराविक परिस्थितीमध्येच आणि काही ठराविक प्रमाणात ही रक्कम काढता येते.

मागील दहा वर्षांचा आढावा घेतल्यावर असं लक्षात येतं की, 'एनपीएस' फंडांचा समभाग निगडित परतावा साधारणपणे १४ टक्के आणि सरकारी आणि बिगरसरकारी रोख्यांवरील परतावा ९ टक्के इतका राहिला आहे. आपण हाच परतावा एखाद्या २५ वर्षांच्या गुंतवणूकदाराला प्रत्येक वर्षी २ लाख रुपये गुंतवून त्याच्या वयाच्या ६० पर्यंत मिळाला तर ३५ वर्षांमध्ये त्याच्याकडे किती रक्कम तयार होऊ शकते हे पाहू या. **(तक्ता २ बघा)**

आता हे निवृत्तिवेतन गुंतवणूकदाराला पुरेसे आहे की नाही? हे मात्र ज्याचं त्याला ठरवावं लागतं. एक लक्षात असू द्या की, निवृत्ती जर वयाच्या ६० व्या वर्षी असेल आणि पुढे किमान २५ वर्ष आयुर्मानाचा अंदाज असेल, तर मुळात ही रक्कम कमी पडू शकेल. त्याशिवाय एकदा का निवृत्तिवेतन घेतले की, उरलेली रक्कम गुंतवणूदाराला कधीच त्याच्या हयातीत मिळत नाही.

'एनपीएस'मधील गुंतवणूक ही जरी कर कार्यक्षम असली, तरीसुद्धा तिच्यावर संपूर्णपणे अवलंबून राहू नये. इतर गुंतवणूक पर्याय जे दीर्घकाळात महागाईसमोर चांगल्या रीतीने पैसे वाढवू शकतात आणि गरजेनुसार काढता येतात, त्यांचासुद्धा विचार प्रत्येक गुंतवणूकदाराने केला पाहिजे. शिवाय काही काळानंतर जर नवीन करप्रणाली वापरली गेली आणि पगारातून 'एनपीएस'चे योगदान होत नसेल, तर मला हा पर्याय फारसा उपयोगाचा वाटत नाही. परंतु ज्या गुंतवणूकदारांना कमी खर्चाचा आणि समभाग निगडित परतावे देणारा शिवाय वयानुसार जोखीम कमी करणारा पर्याय हवा असेल त्यांनी 'एनपीएस'चा विचार करावा.

(जागेअभावी सगळेच मुद्दे मांडता आले नाहीत. कृपया या संदर्भात अधिक माहितीसाठी npstrust.org.in या संकेतस्थळाला भेट देऊ शकता.)

01/04/2024 | Pune | Page : 07
Source : https://epaper.loksatta.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

# पीएचडी प्रवेशाची दोनदा संधी

## शेवटची 'पेट' परीक्षा जूनमध्ये; विद्यार्थ्यांच्या पैशांची, वेळेची बचत होणार

मटा विशेष

हर्ष दुधे
harsh.dudhe@timesgroup.com

### 'नेट' परीक्षेचे अनेक फायदे

- विद्यार्थ्यांना एकाच परीक्षेत ज्युनिअर रिसर्च फेलोशिप, सहायक प्राध्यापक पदासाठी पात्र होण्यासह पीएचडीला प्रवेश घेता येईल.
- विद्यार्थ्यांचे पैसे आणि वेळ अशा दोन्हींमध्ये मोठ्या प्रमाणात बचत होईल.
- विद्यापीठासोबतच इतर सरकारी आणि केंद्रीय विद्यापीठांतही पीएचडीला प्रवेशाची संधी.
- 'नेट' परीक्षा ठरल्याप्रमाणे जून आणि डिसेंबरमध्ये होत असल्याने, विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करण्याची सुविधा मिळेल.



**"सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अधिकाधिक विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी मिळण्याच्या दृष्टीने प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. त्यानुसार 'नेट' परीक्षेच्या गुणांवर पीएचडी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल.**

– डॉ. पराग काळकर,
प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आता वर्षातून दोनदा पीएचडी अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात येत्या जूनमध्ये 'नेट' परीक्षा झाल्यावर, तर दुसऱ्या टप्प्यात डिसेंबरची 'नेट' झाल्यावर प्रवेश प्रक्रिया होणार आहे. त्यामुळे पुणे विद्यापीठातून पीएचडी अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला असून, विद्यार्थ्यांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण होणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'नेट' परीक्षेला 'ज्युनिअर रिसर्च फेलो' आणि सहायक प्राध्यापक पदासाठी पात्र होण्यासोबतच आता पीएचडी प्रवेश परीक्षेचाही दर्जा दिला आहे. त्यामुळे देशातील विद्यापीठे आणि उच्चशिक्षण संस्थांनी स्वतंत्रपणे पीएचडी प्रवेश परीक्षा घेण्याऐवजी 'नेट'च्या परीक्षेच्या गुणांवर पीएचडी अभ्यासक्रमाला प्रवेश द्यावा, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे नेट परीक्षेत मिळणारे गुण; तसेच मुलाखतीचे गुण अशा एकत्रित गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांचा प्रवेश पीएचडी अभ्यासक्रमाला होणार आहे. 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'कडून (एनटीए) नेट परीक्षा जून आणि डिसेंबर अशा दोन टप्प्यांत होते.

विद्यापीठाने 'यूजीसी'च्या सूचनेनुसार नेट परीक्षेच्या गुणांच्या आधारावर पीएचडी अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ही प्रवेश प्रक्रिया दोन वेळा राबवावी लागेल आहे. विद्यापीठाच्या प्रशासनाने आवश्यक उपायोजना आखणे सुरू केले आहे. त्यामुळे आताची 'पेट' परीक्षा शेवटची असेल. येत्या आठवड्यात त्या परीक्षेबाबत सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात येईल. या परीक्षेच्या आयोजनाची बैठक नुकतीच झाली. त्यानुसार परीक्षेचे आयोजन होईल. त्यानंतर विद्यापीठाकडून शेवटची 'पेट' परीक्षा घेण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

### विद्यार्थ्यांचा फायदा होणार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पीएचडी रिसर्च केंद्रांमध्ये साधारण दीड ते दोन हजार जागांवर पीएचडी अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येते. त्यासाठी 'पेट' परीक्षा प्रामुख्याने घेण्यात येते. मात्र, या पेट परीक्षेबाबत दर वर्षी अनिश्चितता असते. पुण्यासह अनेक ठिकाणचे विद्यार्थी या परीक्षेची वाट पाहतात. आता 'नेट'च्या आधारवर पीएचडी प्रवेश होणार आहेत. ही परीक्षा नेहमी ठरल्याप्रमाणे जून आणि डिसेंबर अशा दोन सत्रांत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना दोनदा प्रवेशाची संधी उपलब्ध होणार आहे.

Maharashtra Times 1.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

**प्रभात**

# दुसऱ्या वर्षी निवडता येणार मुख्य विषय

## वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दिलासा; एनईपी नियमावलीत बदल

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३१ -** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीच्या नियमावलीत बदल करण्याचा निर्णय राज्याच्या सुकाणू समितीने घेतला आहे. त्यानुसार आता वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाऐवजी दुसऱ्या वर्षापासूनच मुख्य विषय निवडता येणार आहेत. त्यामुळे इयत्ता बारावी उत्तीर्ण होऊन प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

देशासह महाराष्ट्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सर्व विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमध्ये एनईपीची अंमलबजावणी केली जाणार आहे. विद्यार्थी व पालकांमध्ये एनईपीबाबत फारशी जागृती नाही. मात्र, मागील वर्षापासून सर्व स्वायत्त महाविद्यालयांमध्ये एनईपीची अंमलबजावणी सुरू झाली आहे. ही अंमलबजावणी करताना स्वायत्त महाविद्यालयांना येणाऱ्या

> राज्यात एनईपी अंमलबजावणीच्या दृष्टीने काही बदल करण्यात आले आहेत. यासंदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यामुळे विद्यार्थी द्वितीय वर्षापासून मेजर विषय निवडू शकतील.
>
> – डॉ. शैलेंद्र देवळाणकर
>
> संचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.

अडचणींबाबत राज्याच्या सुकाणू समितीतर्फे आढावा घेण्यात आला. त्या वेळी बहुतांश महाविद्यालयांनी प्रथम वर्षापासूनच विद्यार्थ्यांना मुख्य विषय निवडण्याची संधी देऊ नये. हा नियम विद्यार्थ्यांना जाचक ठरत आहे. त्याचप्रमाणे केवळ दोन विषयांना विद्यार्थी अधिक पसंती देत आहेत. एका विषयास विद्यार्थी मिळत नसल्याने एका विषयाचे प्राध्यापक अतिरिक्त ठरण्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे यात बदल करावा, अशी विनंती करण्यात आली होती. त्यानुसार सुकाणू समितीने यात बदल केला आहे.

PuneCity, 01 Apr 2024, Page:007
https://epaper.dainikprabhat.com

**प्रभात**

# शालार्थ आयडीमध्ये भानगडींचाच भरणा

## ▌एकही प्रकरण परिपूर्ण नाही ▌३४३ प्रस्तावात त्रुटीच त्रुटी ▌

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३१ -** पुणे विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीच्या ३४३ प्रस्तावांमध्ये त्रुटींचाच भरणा अधिक असल्याची बाब उघड झालेली आहे. बोगस कागदपत्रांसह एकही प्रकरण परिपूर्ण नसल्याने त्रुटीची पूर्तता करण्यासाठी आता शेवटचीच संधी देण्यात आली आहे. यापुढे त्रुटीयुक्त प्रस्ताव सादर करण्यास मनाई आहे.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वैयक्तिक मान्यता मिळाल्यानंतर त्यांना वेतनासाठी शालार्थ आयडी मिळविण्याचे बंधन असते. त्यासाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे प्रस्ताव दाखल होतात. त्याची तपासणी करून ते अंतिम मान्यतेसाठी पुणे बोर्डाच्या अध्यक्षांकडे पाठवली जातात. आता शालार्थ आयडीचे कामकाज माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातील सहसंचालक हरून आतार यांच्याकडे आहे. आतार यांनी दाखल झालेली ३४३ प्रकरणे कसून तपासली असून, त्यातील एकही प्रकरण मंजूर करण्याच्या योग्यतेचे नसल्याची बाब समोर आली आहे.

### भानगडीच्या प्रकरणांना चाप बसणार का?

पुणे बोर्डाच्या अध्यक्षा मंजूषा मिसकर यांनी नियमबाह्य शालार्थ आयडीची प्रकरणे फेटाळण्याचा धडाकाच लावला होता. कोणत्याही दबावाला बळी न पडता पारदर्शक कामकाजाला त्यांनी प्राधान्य दिले होते. त्यापाठोपाठ शिक्षण सहसंचालक हरून आतार यांनीही नियमबाह्य प्रकरणांना थारा न देण्याचा निर्धार केला आहे. कागदपत्रांची बोगसगिरी केलेल्या अशा प्रकरणांना कायमस्वरूपी चाप बसणार का? असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

२० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनुदानप्रकरणी प्रस्ताव सादरीकरणासाठी एक वर्ष इतका प्रदीर्घ कालावधी देऊनही संबंधित संस्था, कनिष्ठ महाविद्यालय आणि पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून परिपूर्ण प्रस्ताव सादर होत नसल्याची बाब उघड झालेली आहे.

शालार्थ आयडीची प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने संस्था, कनिष्ठ महाविद्यालय आणि पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे प्रयत्न दिसून येत नाहीत, असा ठपकाही ठेवण्यात आलेला आहे.

### आयडीच्या प्रकरणांतील त्रुटी

वैयक्तिक मान्यता जावक नोंदवहीची प्रमाणित प्रत जोडलेली नाही, बिंदूनामावलीची प्रत नसणे, आरक्षण न तपासता शिफारस करून प्रस्ताव करणे, शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पडताळणी न करता प्रस्ताव सादर, नियुक्तीनंतर शैक्षणिक अर्हता प्राप्त करणे, संच मान्यतेमध्ये पद नसताना प्रस्ताव, अनुदान घोषित झालेल्या शिक्षक पदांपेक्षा ज्यादा पदांना विभागीय शिक्षण उपसंचालकांनी अनुदान घोषित करणे, तीन वर्षांच्या विलंबाने प्रकरणे सादर, संस्थेकडून प्राप्त खुलाशाची पडताळणी नसणे.

PuneCity, 01 Apr 2024, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# 'संशोधक विद्यार्थी, मार्गदर्शकांच्या तक्रारींची तातडीने दखल घ्या'

## तक्रार निवारण केंद्राची मागणी

**पीएच.डी. प्रबंधासाठी लाच मागण्याची घटना विद्यापीठाची प्रतिमा मलिन करणारी आहे. या प्रकरणी विद्यापीठाने स्वतंत्र चौकशी समिती नेमून दोषींवर कारवाई करण्याची मागणी विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीचे राहुल ससाणे यांनी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे केली.तक्रारी जाणून घेण्यासाठी निवृत्त वरिष्ठ प्राध्यापकांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र पीएच.डी. तक्रार निवारण केंद्राची व्यवस्था करावी, विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण केले जाते अशा केंद्रांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.**

**पुणे** : पीएच.डी. प्रबंधासाठी मार्गदर्शक प्राध्यापिकेने लाच घेतल्याच्या प्रकरणाची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गंभीर दखल घेतली. संशोधक विद्यार्थी आणि मार्गदर्शक यांच्या तक्रारींची दखल घेऊन त्याचे निराकरण करावे, पीएच.डी.बाबत कोणतेही चुकीचे काम होणार नसल्याची दक्षता घेण्याचा आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्राचार्य, विभागप्रमुखांना दिला. तसेच संशोधक, विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी सोडवण्याबाबत बैठक घेऊन त्याचा अहवाल १६ एप्रिलपर्यंत सादर करण्याचीही सूचना देण्यात आली.

विद्यापीठाने या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. पीएच.डी.च्या संशोधक विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. पीएच.डी. संशोधक विद्यार्थी आणि मार्गदर्शक यांच्यात वादविवाद होतात. त्याबाबत एकमेकांविरोधातील तक्रारी, निवेदने लेखी स्वरूपात न येता तोंडी होतात. त्यामुळे विद्यापीठाला अशा तक्रारीवर कार्यवाही करता येत नाही. यापुढे अशा तक्रारींचे वेळीच निराकरण करणे आवश्यक आहे. वाद सोडवण्यासाठी सर्व संशोधन केंद्रांनी प्रत्यक्ष (ऑफलाइन) आणि ऑनलाइन बैठक आयोजित करावी. बैठकीत संशोधनाची गुणवत्ता टिकवताना विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची अडवणूक, नुकसान, दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घेण्यास सांगावे. समस्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले.

02/04/2024 | Pune | Page : 14
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

**लोकसत्ता**

लोकमान्य लोकशक्ती

# पदवीला मुख्य विषय दुसऱ्या वर्षी निवडण्याची मुभा

### सुकाणू समितीकडून नियमांत शिथिलता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०नुसार अंमलबजावणीमध्ये पदवी अभ्यासक्रमाबाबत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. त्यानुसार पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षी मुख्य विषय निवडण्याबाबत शिथिलता देण्यात आली असून, विद्यार्थी आता पहिल्या वर्षाऐवजी दुसऱ्या वर्षी मुख्य विषय निवडू शकणार आहेत.

राज्यातील स्वायत्त महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अंमलबजावणी सुरू करण्यात आली. तर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमध्ये धोरण राबवले जाणार आहे. स्वायत्त महाविद्यालयांमध्ये सुरू झालेल्या अंमलबजावणीचा राज्य सुकाणू समितीकडून आढावा घेण्यात आला. त्यात पदवीच्या पहिल्या वर्षी विद्यार्थ्यांनी मुख्य विषय निवडण्याचा नियम जाचक असल्याचा प्रतिसाद महाविद्यालयांकडून नोंदवण्यात आला.

राज्याच्या सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर म्हणाले, की पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्याच वर्षी विषय निवडण्यात विद्यार्थ्यांना अडचणी येतात, काही विषयांना प्रवेश होत नाहीत, शिक्षकांच्या कार्यभाराबाबत प्रश्न स्वायत्त महाविद्यालयांकडून उपस्थित करण्यात आले होते. ही बाब विचारात घेऊन पहिल्या वर्षी मुख्य विषय निवडण्यासंदर्भात शिथिलता देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आता पदवीच्या पहिल्या वर्षी मुख्य विषय निवडण्याची आवश्यकता नाही.

> पदवी अभ्यासक्रमात पहिल्या वर्षाऐवजी दुसऱ्या वर्षी विद्यार्थ्यांना मुख्य विषय निवडण्याची मुभा देण्याचा निर्णय चांगला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विषय निवडताना अधिक स्पष्टता येईल. हा निर्णय आधी झाला असता तर अधिक चांगले झाले असते.
>
> – सुनील गायकवाड, प्राचार्य, स. प. महाविद्यालय

### विद्यापीठांच्या स्तरावर फेरआढावा

**येत्या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू केले जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठांकडून अभ्यासक्रम, रचना निश्चित करण्यात आली आहे. मात्र, आता प्रथम वर्षाऐवजी दुसऱ्या वर्षी मुख्य विषय निवडण्याची मुभा देण्याच्या निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठांच्या अभ्यास मंडळांना फेरआढावा घ्यावा लागणार आहे.**

02/04/2024 | Pune | Page : 02

Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# भेटवस्तू, पैसे अन् पार्ट्यांची बिले

## काही मार्गदर्शकांचा कारभार; गरजेपोटी विद्यार्थ्यांची अडवणूक

**सम्राट कदम** : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. १ : नेट उत्तीर्ण झाल्यावर मी 'पीएच.डी.'साठी गाइडची शोधाशोध केली. ओळखीतील एका प्राध्यापकाकडे पीएच.डी.साठी नोंदणीही झाली. सुरुवातीचे दीड वर्षे सगळे व्यवस्थित चालू होते. पण नंतर त्यांनी माझ्याकडे भेटवस्तू मागण्यास सुरुवात केली. एवढेच नाही तर त्यांच्या खासगी पार्ट्यांसाठी मला बिले द्यावी लागली होती. छोट्या-मोठ्या गोष्टींसाठी पैसे मागणे तर नित्याचे झाले होते. या आर्थिक आणि मानसिक छळामुळे पीएच.डी. सोडण्याचा विचार माझ्या मनात अनेकदा आला होता, अशी प्रतिक्रिया सूरज (नाव बदलले) यांनी दिली. आज सूरजसारखे असंख्य विद्यार्थी पीएच.डी. मार्गदर्शकांच्या तुघलकी कारभाराला कंटाळले आहेत.**

पुण्यात पीएच.डी. मार्गदर्शकाला लाच घेताना रंगेहाथ पकडल्यानंतर सर्वच स्तरांतून प्रतिक्रिया उमटत आहेत. केवळ निवडक महाविद्यालयांतील संशोधन केंद्र नव्हे, तर बहुतेक पीएच.डी. मार्गदर्शकांकडूनही विद्यार्थ्यांची लूट होत असल्याचा प्रकार समोर येत आहे. विद्यार्थ्यांच्या मजबुरीचा काही मार्गदर्शक गैरफायदा घेत असल्याची माहिती एका वरिष्ठ प्राध्यापकाने 'सकाळ'ला दिली. ते म्हणाले, "बहुतेक सर्व प्राध्यापक या वृत्तीचे नाहीत. पण काही लोकांमुळे सर्वांचीच बदनामी होत आहे. संशोधक विद्यार्थ्यांची गरज असल्यामुळे तो मुकाटपणे सर्व काही सहन करतो. संशोधन केंद्रातील प्रवेशशुल्क जास्त असते. त्यात पीएच.डी. गाइड आढेओढे घेत अनेक मार्गाने पैसे उकळत असल्याच्या घटनाही लपलेल्या नाहीत. मात्र, पुराव्याअभावी कोणीच काही करू शकत नाही." पीएच.डी. मार्गदर्शकांच्या संशोधनाचा दर्जा आणि त्यांच्या नीतिमत्तेचीच पडताळणी करायला हवी, असेही मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

विज्ञान शाखेच्या तुलनेत कला आणि विशेषतः वाणिज्य शाखेतील विद्यार्थी सर्वाधिक बळी पडत असल्याचे निरीक्षण सर्वांनीच नोंदविले आहे. 'तुलनात्मक' अभ्यासाच्या जंत्रीत विद्यार्थी अशा जाचाला अडकल्याची प्रतिक्रिया जाणकारांनी दिली.




### असा घेतात गैरफायदा...

- प्रवेशानंतर सुरुवातीचे वर्ष-दोन वर्षे कोणतीच मागणी होत नाही
- पीएच.डी.चे काम अर्ध्यावर आल्यावर भेटवस्तूंची अप्रत्यक्ष मागणी
- तुमच्या गावची ही वस्तू प्रसिद्ध आहे. तुम्ही आणली नाही कधी? ते हॉटेल फार भारी, कधी गेला का नाही?... अशा प्रकारे मागणी होते.
- एखाद्या परिषदेसाठी स्वतःचे शुल्क विद्यार्थ्याला भरायला लावणे, तसेच येण्या-जाण्यासाठी विद्यार्थ्यालाच मोटार करायला लावायची
- प्रबंधाच्या एका चॅप्टरप्रमाणेही पैसे मागितले जातात. कागदावर स्वाक्षरीसाठीही पैसे घेण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.
- विद्यार्थ्याची पीएच.डी. सात ते आठ वर्षांपर्यंत लांबविले जाण्याचे प्रकारही घडले आहेत

> संलग्न महाविद्यालयांतील संशोधन केंद्रांना पीएच.डी. मार्गदर्शकांची तातडीची बैठक घेण्यास सांगितले आहे. विद्यार्थ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांचीही ऑनलाइन बैठक घ्यावी, असे सुचविले आहे. त्याचा कार्यपूर्ती अहवाल विद्यापीठाला पाठविण्याचे निर्देश दिले आहेत.
> **- डॉ. पराग काळकर**, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
02/04/2024 Page No. 2

## *News Paper Clippings During April 2024*

### *Section: Education*

सकाळ

# विद्यापीठातील लाचखोरी लाजिरवाणी

## विद्यार्थी समितीचे कुलगुरूंना पत्र; तक्रार निवारण केंद्राची मागणी



पुणे, ता. १ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रात प्रबंधासाठी लाच घेतल्याचा प्रकार उघडकीस आला. ही अत्यंत लाजिरवाणी व विद्यापीठाची प्रतिमा मलिन करणारी घटना आहे. त्यांच्यावर तातडीने आळा घालावा, अशी मागणी विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीने कुलगुरूंना केली आहे. या संदर्भात सत्यशोधन समिती स्थापन करावी, अशी मागणी केली आहे.

समितीने संशोधक विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात कुलगुरूंना पत्र दिले. त्यात ते म्हणतात, "घडलेल्या प्रकाराचे गांभीर्य ओळखून स्वतंत्र सत्यशोधन समिती स्थापन करावी. सखोल चौकशीनंतर दोषींवर योग्य कारवाई करावी. अशा घटना पुढे घडणार नाहीत, म्हणून विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या तक्रारी जाणून घेण्यासाठी निवृत्त वरिष्ठ प्राध्यापकांच्या नियंत्रणाखाली एक स्वतंत्र पीएच.डी. तक्रार निवारण केंद्राची व्यवस्था करावी. जेणेकरून संशोधक विद्यार्थी तक्रारी नोंदवू शकतील."

### विद्यार्थ्यांच्या मागण्या

- विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांतील संशोधन केंद्रातील पीएच.डी. शुल्कात समानता असावी
- काही मार्गदर्शकांनी प्रोग्रेस रिपोर्ट आणि जेआरएफ फेलोशिप अर्जावरती सहीसाठी पैशांची मागणी केल्याच्या तक्रारी
- ज्या केंद्रावर संशोधनासाठी उपयुक्त सेवा-सुविधा उपलब्ध नसतील अशा संशोधन केंद्राची तत्काळ मान्यता रद्द करावी
- विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण करणाऱ्या केंद्राच्या प्रमुखांवर कायदेशीर कठोर कारवाई करावी
- री-रजिस्ट्रेशन व एक्स्टेंशनसंदर्भात परिपत्रक काढून निराकरण करावे

"संशोधन केंद्रावर केंद्रप्रमुख व मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थ्यांना सातत्याने दबावात ठेवून त्यांचे आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण करत आहेत. दबावामुळे बरेच विद्यार्थी कुणाचीही तक्रार करत नाहीत. अशा विद्यार्थ्यांनी तत्काळ आमच्याशी अथवा विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधावा.

**- राहुल ससाणे,**
विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती

Pune, Main
02/04/2024 Page No. 2

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता

# नाव गोपनीय ठेवून तक्रार करण्याची उमेदवारांना सुविधा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पीएच.डी. मार्गदर्शक त्रास देत असल्यास संशोधक उमेदवारांना तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पीएच.डी. प्रक्रिया सुधारणेसाठी संकेतस्थळाची निर्मिती केली असून, त्यात संशोधक उमेदवार तक्रार नोंदवू शकणार आहेत. तसेच उमेदवारांना त्यांचे नाव गोपनीयही ठेवता येणार आहे.

> पीएच.डी. प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी संशोधक उमेदवारांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणातील प्रतिसादांचे विश्लेषण करण्यात येणार आहे. त्यानंतर पीएच.डी.च्या संकेतस्थळात अधिक सुधारणा केल्या जाणार आहेत.
> – **डॉ. पराग काळकर**, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सांगवीतील बाबूरावजी घोलप महाविद्यालयात पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध नाकारून सुधारणा करत पुन्हा सादर करणे आणि त्याला मान्यता देण्यासाठी वीस हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या मार्गदर्शक प्राध्यापिकेला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला. या प्रकारानंतर पीएच.डी. मार्गदर्शकांकडून संशोधक उमेदवारांच्या केल्या जाणाऱ्या शोषणाचा गंभीर मुद्दा उपस्थित झाला आहे. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर म्हणाले, की पीएच.डी. मार्गदर्शक शोषण करत असल्याची एकही अधिकृत तक्रार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे अद्याप दाखल झालेली नाही. शोषण होत असल्यास 'पीएच.डी. ट्रॅकिंग सिस्टिम' संकेतस्थळाची निर्मिती तक्रार नोंदवण्याची सुविधा केली आहे.

02/04/2024 | Pune | Page : 14
Source : https://epaper.loksatta.com

---

लोकमत

# शेकडो प्राध्यापकांची गाईडशिप धोक्यात

## 'यूजीसी'च्या नियमांची अंमलबजावणी

**राम शिनगारे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न पदवी महाविद्यालयांतील शेकडो प्राध्यापकांची पीएच.डी. गाईडशिप धोक्यात आली आहे.

यूजीसीने पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या मान्यताप्राप्त प्राध्यापकांनाच पीएच.डी.चे मार्गदर्शक होता येईल, असे स्पष्ट केलेले आहे. या नियमाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनाने ४ एप्रिल रोजी होणाऱ्या विद्यापरिषदेच्या बैठकीत हा विषय ठेवला आहे. तीत मंजुरी मिळाल्यावर ६ एप्रिल रोजी व्यवस्थापन परिषदेत हा विषय येणार आहे. दोन्ही बैठकांमध्ये मंजुरीनंतर प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येईल. यूजीसीने वर्षभरापूर्वी एक अधिसूचना काढून पीएच.डी.चे मार्गदर्शक होण्याविषयीची नियमावली जाहीर केली. या नियमानुसार विद्यापीठ किंवा संलग्न महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या पूर्णवेळ प्राध्यापकांना नियमानुसार पीएच.डी.चे मार्गदर्शक होता येईल. पदवी अभ्यासक्रमांच्या प्राध्यापकांना गाईडशिप देता येणार नाही. विद्यापीठ प्रशासन कोणाचीही गाईडशिप काढून घेणार नाही, मात्र, पदवीच्या प्राध्यापकांकडे यापुढे पीएच.डी.चे विद्यार्थी देण्यात येणार नाहीत. त्यामुळे आपोआप गाईडशिप संपुष्टात येईल. यूजीसीची नियमावली देशातील सर्व विद्यापीठांना बंधनकारक आहे.

### ५ हजार संशोधक अन् १७०८ गाईड

विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांत तब्बल १ हजार ७०८ प्राध्यापक पीएच.डी.चे गाईड आहेत. या गाईडकडे ५ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी संशोधन करीत आहेत. या १ हजार ७०८ गाईडपैकी केवळ विद्यापीठातील विभाग व उपकेंद्रातील कार्यरत १५० प्राध्यापकांसह एम.एड., एम.फार्म., एम.ई., एम.ए., एम.एस्सी. आणि एम.कॉम. या अभ्यासक्रमांच्या पूर्णवेळ मान्यताप्राप्त प्राध्यापकांनाच नियमानुसार पीएच.डी.चे गाईड होता येणार आहे.

### इतर विद्यापीठांमध्ये नियम लागू

राज्यातील बहुतांश अकृषी विद्यापीठांमध्ये पीएच.डी. गाईडशिपसंदर्भात यूजीसीने जाहीर केलेले नियम लागू झाले आहेत. हे नियम लागू न केल्यास पदवी महाविद्यालयात होणारे पीएच.डी.चे संशोधनच नियमबाह्य ठरणार आहे.



> विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांची अंमलबजावणी विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीनंतर केली जाणार आहे. इतर विद्यापीठांमध्ये हा नियम लागू झालेला आहे.
> **-डॉ. विजय फुलारी**, कुलगुरू

Chhatrapati Sambhajinagar Main
Page No. 2 Apr 02, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

### *Section: Education*

# पीएच.डी. मार्गदर्शकाला लाच घेताना अटकेनंतर मार्गदर्शक व संशोधकांना सूचना

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएच.डी. मार्गदर्शक आणि सांगवीतील बाबूराव घोलप महाविद्यालयात अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेला लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले. या घटनेनंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासन खडबडून जागे झाले. विद्यार्थी व गाईड यांच्यातील वादाचे निराकरण करण्याचे आणि तोंडी स्वरूपात येणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्याचे आदेश विद्यापीठाने सर्व संलग्न संशोधन केंद्रांना दिले आहेत. तसेच संशोधन मार्गदर्शकांची व संशोधक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन किंवा ऑफलाईन बैठक घेऊन त्याबाबतचा अहवाल विद्यापीठाला १५ दिवसांत सादर करावा, असे परिपत्रक विद्यापीठातर्फे सर्व संशोधन केंद्रांना पाठवण्यात आले आहे.

विद्यापीठाने काढलेल्या परिपत्रकानुसार विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक, संलग्नित संशोधन केंद्रे यांना सूचना देण्यात आल्या आहेत. संशोधन केंद्रांमध्ये अनेक विद्यार्थी विविध विषयांवर संशोधन करीत आहेत. या पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामध्ये संशोधन मार्गदर्शक व त्यांचेकडील विद्यार्थी यांच्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे वादविवाद होत असतात. तसेच एकमेकांविषयी असलेल्या तक्रारी/निवेदने विद्यापीठाकडे लेखी स्वरूपात न दाखल होता तोंडी स्वरूपात प्राप्त होतात. त्यामुळे अशा तोंडी तक्रारीवर कार्यवाही करता येत नाही. परंतु, अशा तक्रारी आपल्याकडे प्राप्त होत असतील तर त्याची वेळीच दखल घेऊन त्याचे निराकरण करावे. पीएच.डी.बाबत कोणतेही चुकीचे काम होणार नाही, याची सर्वांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व संशोधन केंद्रांच्या प्रमुखांनी आपापल्या संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांची ऑफलाईन/ऑनलाईन पध्दतीने बैठकीचे आयोजन करावे.

या बैठकीमध्ये संशोधन हा भाग महत्वाचा आहे. तसेच संशोधनाची गुणवत्ता टिकवताना विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची अडवूणक / नुकसान / दिरंगाई होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यास सांगावे.

Kesari 2.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

### *Section: Education*

City | Pune Times Mirror

# Colleges face staff crunch for exams

**Most teaching and non-teaching staff are engaged in election duty**

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

The academic circle in the city has appealed to the Savitribai Phule Pune University (SPPU) to postpone the examination schedule of the undergraduate and postgraduate degree courses given the engagement of lakhs of teachers in election duty.

The Lok Sabha elections will be held in two phases on May 7 and May 13 in Pune, Nagar, and Nashik districts, and along with officials and employees of government offices in the state, teachers have also been given election work. This has brought to the fore the issue of conducting the exams smoothly since they are clashing with the election period.

Speaking to Pune Mirror, professor Sunil Chavan, faculty of a well-known college in Pune, said, "We are engaged in the Lok Sabha election training programme. Some undergraduate and post-graduate semester examinations are planned during the election days. So, it will be difficult to manage manpower for the exams.

"We cannot fully depend on non-teaching staff for conducting and monitoring exams. So, we demanded that the SPPU clarify whether we postpone the examination timetable. In Pune, Nagar, and Nashik, 8.5 lakh students will attend these exams. If confusion persists, it may result in the collapse of the academic calendar."

Professor Smita Joshi, faculty of a well-known college in Nagar, said, "In our college, only five people are working.



Staff conducting an exercise for elections FILE PHOTO

The rest of the 25 teaching and non-teaching staff are engaged in election duty. Our college founder has also instructed all teaching and non-teaching staff to work for a political party after completion of college work.

"We have double tension and workload. In the upcoming two months, the UG and PG timetable table has already been published, but we don't have responsible faculties and other staff to conduct the exams smoothly.

"We demand that the SPPU and the college management decide on manpower arrangements. Otherwise, there will be chaos during the exams."

Geeta Kulkarni, principal of a well-known college in Nashik, said, "We are facing a manpower crunch for the upcoming degree course exams because 65 percent of our staff is engaged in election duty. Out of that 45 percent are teaching and others are non-teaching staff. So, we have a fear that there will be chaos during the voting dates.

"Most of the subject faculties are engaged in election duty; so, how will we manage thousands of students' exams smoothly? We have to publish the results in time. We have instructions from SPPU that in any case we cannot cancel or postpone any subject exams. We have already planned to maintain the academic calendar as per the state government order."

Speaking to Pune Mirror, Dr. Parag Kalkar, pro-vice-chancellor of SPPU, said, "It is true that teaching staff got election duty. But we have plans for all the exams. We have instructed all affiliated colleges and institutes to deploy additional manpower for examinations. We have strict instructions from our chancellor, i.e., the governor's office to conduct the exams smoothly. From next academic year, we will start all colleges as per the academic calendar."

Pune Mirror 2.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# राज्यात पुढील काळात 12 समूह विद्यापीठे

**पुढारी विशेष**
**गणेश खळदकर**
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : राज्य सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने सुरू केलेल्या समूह विद्यापीठांच्या संकल्पनेला राज्यातील अनेक शैक्षणिक संस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे येत्या काळात राज्यात ११ ते १२ समूह विद्यापीठे तयार होणार आहेत. यामध्ये नामांकित दोन संस्थांनी प्रस्तावसुद्धा दाखल केल्याची माहिती उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.**



अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात समूह विद्यापीठे अर्थात क्लस्टर विद्यापीठ विद्यापीठांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्यामुळे राज्य शासनाने क्लस्टर विद्यापीठासंदर्भातील नियमावली मंजूर करून राज्यातील संस्थाचालकांना आपल्या विविध महाविद्यालयांचे मिळून क्लस्टर विद्यापीठ स्थापन करण्याचे आवाहन केले आहे. परंतु, समूह विद्यापीठे निवडताना अत्यंत काटेकोरपणे निवडली जाणार आहेत. ज्या महाविद्यालयांनी किंवा शैक्षणिक संस्थांनी समूह विद्यापीठासाठी प्रस्ताव सादर केला, त्यांच्यामध्ये खरेच ती क्षमता आहे का? याची चाचपणी केली जाणार आहे. स्वायत्त महाविद्यालये होऊन त्यांच्याकडे दहा वर्षांचा अनुभव आहे का? ते स्वत: परीक्षा घेऊ शकतात का? याचा आढावा घेतला जाणार आहे.

## दोन समूह विद्यापीठांचा प्रस्ताव दाखल

केवळ विद्यापीठे वाढावीत म्हणून आलेल्या प्रत्येक प्रस्तावाला हिरवा कंदील दाखवायचा आणि नंतर संबंधित समूह विद्यापीठांनी मनमानी कारभार करायचा, असे प्रकार सरकार खपवून घेणार नसल्याचे देखील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. वर्षातून दोन ते तीन समूह विद्यापीठेच तयार करण्याचा सरकारचा मानस आहे. त्यासाठी नियमावलीत बसणाऱ्या संस्थांचाच विचार केला जाणार आहे. ११ ते १२ संस्था डीपीआर अर्थात डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट बनवत आहेत. त्यातील दोन संस्थांनी प्रस्ताव सादर केले आहेत. यासाठी माळी समिती नियुक्त करण्यात आली आहे. संबंधित समितीसाठी ज्या संस्थांनी अर्ज केले, त्या संस्थांची कसून तपासणी करणार आहे. त्यानंतरच संबंधित शैक्षणिक संस्थांना समूह विद्यापीठासाठी हिरवा कंदील दाखविला जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## दहा विद्यापीठांसाठी डीपीआरचे काम सुरू

### पुण्यातील शैक्षणिक संस्थांचे वेट अँड वॉच...

पुण्यातील शैक्षणिक संस्थांनी समूह विद्यापीठाचा प्रस्ताव शासनास सादर केला नाही. समूह विद्यापीठांबाबत निर्माण झालेले गैरसमज दूर करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी संस्थाचालकांची बैठक घेतली. परंतु, कुलगुरू निवडीच्या प्रक्रियेवर शासनाचा अंकुश तसेच कुलसचिव, अधिष्ठता यांसह विविध पदांची निर्मिती करून त्यांच्या वेतनाचा भार संस्थांना सोसावा लागणार आहे. त्यामुळे सध्या अनेक संस्थांनी वेट अँड वॉच भूमिका घेतली आहे.

"राज्यात भविष्यात दहा ते बारा समूह विद्यापीठे तयार होणार आहेत. साधारण दहा विद्यापीठे डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करीत आहेत. तर दोन नामांकित संस्था समूह विद्यापीठांसाठी प्रस्ताव देखील सादर करीत आहेत. यावर माळी समिती काम करीत आहे. त्यामुळे राज्यात समूह विद्यापीठांसाठी शैक्षणिक संस्थांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

- **डॉ. शैलेंद्र देवळाणकर**, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय

Pune Edition
Apr 3, 2024 Page No. 05
newspaper.pudhari.co.in

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# दहावी, बारावीच्या सहा लाखांवर विद्यार्थ्यांना शुल्कमाफी

## तब्बल ३२ कोटींवर मिळणार शुल्क प्रतिपूर्ती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) राज्यातील दुष्काळी भागातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी, शुल्क प्रतिपूर्ती देण्याचे जाहीर केले आहे. त्यानुसार दुष्काळी भागातील बारावीच्या २ लाख ८४ हजार २०८ विद्यार्थ्यांना, तर दहावीच्या ३ लाख २८ हजार ९१४ अशा एकूण ६ लाख १३ हजार १२२ विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती मिळणार आहे. तसा शासननिर्णयच शालेय शिक्षण विभागाने जाहीर केला आहे.

यंदा राज्यात कमी पाऊस पडल्याने राज्यभरातील ४० तालुक्यांसह १ हजार २१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त भागातील दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ, शुल्क प्रतिपूर्ती करण्याची योजना आहे. त्या अनुषंगाने दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांनी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधण्याबाबत राज्य मंडळाने विद्यार्थ्यांना, तसेच त्यासंदर्भातील कार्यवाहीबाबत शाळांना सूचना दिल्या आहेत.

दुष्काळग्रस्त भागातील दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांच्या शुल्कमाफी, शुल्क प्रतिपूर्तीसाठी ३२ कोटी ७ लाख ९७ हजार ४७५ रुपयांचा निधी आवश्यक असल्याचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाच्या योजना विभागाकडून सादर करण्यात आला होता. यामध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी १५ कोटी ८८ लाख २४ हजार ९२५ रुपये, तर दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी १६ कोटी १९ लाख ६२ हजार ५५० कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

Pune Edition
Apr 3, 2024 Page No. 05
newspaper.pudhari.co.in

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

## संशोधकांच्या समस्यांबाबत बैठक घ्यावी : उपकुलसचिव

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रांच्या संचालकांनी येत्या १६ एप्रिलपर्यंत संशोधन मार्गदर्शक तसेच संशोधक विद्यार्थ्यांच्या बैठका घ्याव्यात. यामध्ये विद्यार्थ्यांना कोणकोणत्या समस्या आहेत याची दखल घेऊन निराकरण करावे तसेच त्याचा अनुपालन अहवाल विद्यापीठाला सादर करावा. असे स्पष्ट निर्देश विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाचे उपकुलसचिव मुंजाजी रासवे यांनी संशोधन केंद्रांचे संचालक तसेच विद्यापीठातील विभागप्रमुखांना दिले आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न संशोधन केंद्रांमध्ये अनेक विद्यार्थी विविध विषयांवर संशोधन करीत आहेत. या पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सर्व संशोधन केंद्रांचे अहवाल विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संशोधन केंद्रप्रमुखांच्या बैठकीचे आयोजन विद्यापीठामार्फत करण्यात येईल, असेदेखील स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Apr 3, 2024 Page No. 03
newspaper.pudhari.co.in

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

## लाचखोराची गाइडशिप रद्द

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पीएच. डी. प्रबंध सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांकडे लाच मागणाऱ्या सांगवी येथील बाबूरावजी घोलप महाविद्यालयातील प्राध्यापिकेची गाइडशिप सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या प्राध्यापिकेकडे मार्गदर्शन घेणाऱ्या आठही विद्यार्थ्यांना दुसऱ्या गाइडकडे स्थलांतरित करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाकडून लाचप्रकरणी गाइडवर कठोर कारवाई करण्यात आली आहे. विद्यापीठातर्फे लवकरच याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले जाणार आहे.

बाबूरावजी घोलप महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका आणि पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून कार्यरत डॉ. शकुंतला माने यांनी एका विद्यार्थ्याचा पीएच. डी.चा शोधप्रबंध विद्यापीठाकडे मान्यतेसाठी सादर करण्यासाठी २५ हजार रुपयांची लाच मागितली.

> संबंधित प्राध्यापिकेची गाइडशिप रद्द करण्यात आली आहे. संबंधित प्राध्यापिकेकडे असणारे पीएच. डी.चे विद्यार्थी अन्य मार्गदर्शकाकडे देण्यात येऊन त्याचा अनुपालन अहवाल विद्यापीठाकडे येत्या सात दिवसांमध्ये सादर करावा, असे स्पष्ट निर्देश संशोधन केंद्रांच्या संचालकाला दिले आहेत.
>
> **- डॉ. पराग काळकर,**
> प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

परंतु, संबंधित विद्यार्थ्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्यानंतर एसीबीने सापळा रचून डॉ. माने यांच्यावर कारवाई केली. त्यावर सर्वच क्षेत्रांतून टीका झाली. त्यानंतर विद्यापीठाने संबंधित प्राध्यापिका डॉ. माने यांची गाइडशिप रद्द करण्याचा निर्णय घेतला.

Pune Edition
Apr 3, 2024 Page No. 05
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सामना

# 'पीएच.डी.' प्रक्रिया सुधारण्यासाठी अखेर विद्यापीठाला आली जाग

पुणे, दि. ३ (प्रतिनिधी) – 'पीएच.डी.' मार्गदर्शक त्रास देत असल्याच्या तक्रारीनंतर विद्यापीठाला खडबडून जाग आली असून, संशोधक उमेदवारांना तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'पीएच.डी.' प्रक्रिया सुधारण्यासाठी संकेतस्थळाची निर्मिती केली असून, त्यात संशोधक उमेदवार तक्रार नोंदवू शकणार आहेत. उमेदवारांना त्यांचे नाव गोपनीयही ठेवता येणार आहे.

सांगवीतील बाबूरावजी घोलप महाविद्यालयात पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध नाकारून सुधारणा करीत पुन्हा सादर करणे आणि त्याला मान्यता देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या मार्गदर्शक प्राध्यापिकेला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला. या प्रकारानंतर आता पीएच.डी. मार्गदर्शकांकडून संशोधक उमेदवारांच्या केल्या जाणाऱ्या शोषणाचा गंभीर मुद्दा उपस्थित झाला आहे.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर म्हणाले, 'पीएच.डी. मार्गदर्शक शोषण करीत असल्याची एकही अधिकृत तक्रार नसली, तरी प्रशासनाने उपाययोजना सुरू केल्या आहेत.'

Pune Edition
Apr 3, 2024 Page No. 3
epaper.saamana.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

लोकमत

# विद्यापीठाचा महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाशी करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. त्यानुसार विधी विद्यार्थ्यांसाठी व्यवसायाभिमुख पदवी, पदविका अभ्यासक्रम राबविणे तसेच संशोधन वाढीसाठी एकत्रितपणे काम केले जाणार आहे.

कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी आणि महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. दिलीप उके यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, विधी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रतापसिंह साळुंके, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्यचे संचालक डॉ. संजय ढोले, विधी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. नरेश वाघमारे यांच्या उपस्थितीत सामंजस्य



करार करण्यात आला.

विधी विद्यार्थ्यांसाठी व्यवसायाभिमुख पदवी, पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. तसेच संशोधनावरही भर दिला जाईल तसेच विधी विद्यार्थ्यांसाठी विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि कार्यक्रमाचे संयुक्तपणे आयोजन करण्यात येणार आहेत. या करारांतर्गत दोन्ही विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापकांचे आदानप्रदान होणार असून, संशोधनासाठी दोन्ही विद्यापीठांच्या रिसोर्सचाही संयुक्तपणे वापर केला जाणार आहे.

Pune Main
Page No. 2 Apr 04, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# खासदाराने पुण्याचा शैक्षणिक अॅम्बेसेडर व्हावे

## दिल्लीत शैक्षणिक प्रश्न मांडण्याच्या व सोडविण्याच्या राजकीय इच्छाशक्तीची गरज

मटा जाहीरनामा

हर्ष दुधे
Harsh.Dudhe@timesgroup.com

**पुणे :** शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुणे शहराच्या खासदाराने शहराच्या विकासकामांसह 'शिक्षणाचा अॅम्बेसेडर' म्हणून काम करायला हवे. 'एम्स', 'आयआयटी'सारख्या राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्था पुण्यात आणण्यासाठी प्रयत्न करतानाच शहरातील ऐतिहासिक जुन्या शैक्षणिक संस्थांना राष्ट्रीय दर्जा देण्यासह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सर्वांगीण विकास कसा करता येईल, याचा ध्यास खासदाराकडे हवा, अशी आग्रही भूमिका शिक्षणतज्ज्ञांनी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'मटा जाहीरनामा' या व्यासपीठावर मांडली.

महाराष्ट्र टाइम्स राजकारण

शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकार दरबारी प्रयत्न करायला हवेत. पुण्याच्या खासदाराने शहराचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून आणि तरुणाईचे रोल मॉडेल म्हणून काम केल्यास, अनेक प्रलंबित शैक्षणिक प्रश्न सुटतील, अशी आग्रही मागणी शिक्षणतज्ज्ञांनी केली.



पुण्यातील शैक्षणिक सुविधांबाबत मते मांडतानाच विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यावर भर देणारा खासदार असावा, असे मत शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गजांनी 'मटा जाहीरनामा'च्या व्यासपीठावर व्यक्त केले. या वेळी (डावीकडून) डॉ. विजय खरे, डॉ. पराग काळकर, डॉ. भूषण पटवर्धन आणि डॉ. नितीन करमळकर उपस्थित होते.

### 'खासदाराने पुणे, दिल्लीतील दुवा व्हावे'



(चित्र : एआय)

शिक्षणाचे माहेरघर ही शहराची ओळख व्यापक करण्यासाठी खासदार पुणे व राजधानी दिल्लीतील दुवा झाला पाहिजे. त्यासाठी त्याने विद्यापीठ, शिक्षण संस्था; तसेच शिक्षणतज्ज्ञांशी नियमित संवाद ठेवावा. पुण्यातील अनेक शैक्षणिक प्रश्न थेट दिल्लीशी निगडित असल्याने, त्याने त्या प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासोबतच त्याचा वेळोवेळी फॉलोअप घ्यायला हवा. पुण्यात 'आयआयएम', 'आयआयटी'सारख्या संस्था याव्यात, यासाठी त्याने दिल्लीदरबारी पाठपुरावा केला पाहिजे. नवीन शिक्षण संस्था आणतानाच, जुन्या शिक्षण संस्थांची ओळखही जपली पाहिजे. खासदार निधीच्या माध्यमातून विद्यापीठ आणि जुन्या शैक्षणिक संस्थांना पाठबळ कसे देता येईल, याबाबत विचार करायला हवा. आपल्या पदाचा केवळ राजकीय विचार करण्यापेक्षा शहराला नवी दिशा आणि ओळख देण्यासाठी त्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याने तरुणाईचा 'रोल मॉडेल' होऊन, युवावर्गाची ऊर्जा योग्य दिशेने वळविण्याचे काम करावे.

- डॉ. भूषण पटवर्धन, माजी उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग

### 'विद्यार्थ्यांच्या होस्टेल, जेवणाचा प्रश्न सुटावा'

पुणे शहरात उच्च शिक्षणासाठी, स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधांची 'सपोर्ट सिस्टीम' आवश्यक आहे. या मुलांसाठी राहण्याची, होस्टेलची संख्या वाढायला हवी. वंचित घटकांतील विद्यार्थ्यांच्या राहण्याचा आणि जेवणाचा प्रश्न सुटला पाहिजे. या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळते, सरकारी विद्यापीठांमध्ये त्यांना परवडणाऱ्या दरात शिक्षण मिळते. त्यामुळे खासगी विद्यापीठांच्या आक्रमणात सर्वसमावेशक सरकारी विद्यापीठांना धक्का लागू नये, अशी खासदाराची भूमिका असावी. सरकारी विद्यापीठे अधिक सक्षम होण्यासाठी खासदाराने प्रयत्न करावा. त्यासाठी खासदार निधीचा वापर करता येईल.

- डॉ. पराग काळकर, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### 'परप्रांतीय विद्यार्थ्यांसाठी शहर सुरक्षित हवे'

खासदाराचा निधी केवळ रस्त्यांवर खर्च होता कामा नये, तो विद्यापीठांच्या सक्षमीकरणासाठीही दिला पाहिजे. होस्टेल, प्रयोगशाळा, शैक्षणिक इमारतींची उभारणी खासदार निधीतून होऊ शकते. शिक्षणाची 'इकोसिस्टीम' शाश्वत व्हावी, यासाठी विद्यापीठात नावीन्यपूर्ण उपक्रम आणि अभ्यासक्रम राबविण्यात या निधीचा विनियोग होऊ शकतो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना विद्यापीठांचा उद्योगांशी 'कनेक्ट' विकसित करण्यात, सामाजिक संस्थांचा निधी विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी वळविण्यात खासदार महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. परप्रांतातून आणि परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुणे शहरात अधिक सुरक्षित वातावरण निर्माण करण्यावर भर देता येऊ शकतो.

- डॉ. नितीन करमळकर, माजी कुलगुरू आणि अध्यक्ष, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी सुकाणू समिती



### 'परदेशी विद्यार्थ्यांना योग्य सुविधा मिळाव्यात'

'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' असा लौकिक असलेल्या पुण्याच्या खासदाराने शैक्षणिक आणि सांस्कृतिक अॅम्बेसेडर म्हणून काम करावे. खासदार हा शहराचा सांस्कृतिक प्रतिनिधी असून, त्याने केवळ राजकारण न करता शहराचा सर्वांगीण विकास केला पाहिजे. जगातील १०५ देशांमधील मुले पुण्यात शिकत असून, येथील उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण होत आहे. या विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक आणि पायाभूत सुविधा मिळण्यासाठी खासदाराने राजकीय इच्छाशक्तीची जोड दिल्यास हे शहर आंतरराष्ट्रीय शिक्षण क्षेत्रात नावारूपाला येईल; तसेच पुण्याचा सांस्कृतिक व शैक्षणिक वारसाही जोपासला जाईल. त्यासाठी पुण्यात शिकण्यासाठी येणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांना योग्य सुविधा मिळवण्यासाठी खासदाराने आग्रही असायला हवे. त्याने केवळ पक्षाचे नव्हे, तर शहराचे शैक्षणिकदृष्ट्या प्रतिनिधित्व केले पाहिजे.

- डॉ. विजय खरे, संचालक, आंतरराष्ट्रीय केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### शिक्षणतज्ज्ञांच्या प्रमुख मागण्या...

- शहराच्या खासदाराने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी विद्यापीठाला दत्तक घ्यावे.
- पुण्यातील जुन्या शैक्षणिक संस्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी दिल्लीत पाठपुरावा करायला हवा.
- पुणे शहरात संरक्षण विद्यापीठ आणि क्रीडा विद्यापीठ होण्यासाठी खासदाराने पुढाकार घ्यावा.
- शिक्षण संस्थांजवळ मद्यविक्री, नाइटलाइफ अशा गोष्टींना खासदाराचा विरोध असावा.
- विद्यापीठ व शिक्षण संस्थांना निधी मिळवून देण्यासाठी खासदाराने प्रयत्न करावेत.
- परदेशी व खासगी विद्यापीठांच्या आक्रमणात सर्वसमावेशक सरकारी विद्यापीठाला धक्का लागू नये.
- शहरातील वाहतूक कोंडी सोडवून विद्यार्थ्यांना सुलभ प्रवासासाठी पाठपुरावा करावा.

Maharashtra Times 4.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# गैरप्रकाराचे धागेदोरे विद्यापीठ प्रशासनापर्यंत

## विद्यार्थीही लाटतात शिष्यवृत्ती; प्रामाणिक असणाऱ्यांचे होतेय शोषण

■ सम्राट कदम : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ३ : वर्षभर अनुपस्थित राहिलेल्या एका पीएच.डी.च्या विद्यार्थ्याला आम्ही त्याच्या सोयीने नवीन संशोधन केंद्र बदलून दिले. मात्र, त्यानंतरही वर्षभर तो आमच्याच संशोधन केंद्राच्या नावाने शिष्यवृत्ती घेत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विद्यापीठ प्रशासनातील काही लोकांचाही त्यात सहभाग होता. एकदा तर विद्यार्थ्यांच्या हजेरी पत्रकावर 'बॅक डेटेड' स्वाक्षरीसाठी विद्यापीठ प्रशासनातूनच फोन आला होता. त्यामुळे पीएच.डी.तील गैरप्रकाराला केवळ मार्गदर्शकच नव्हे, तर विद्यार्थी आणि प्रशासनही जबाबदार आहे, असा अनुभव एका वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी 'सकाळ'शी बोलताना सांगितला.**




पीएच.डी.च्या विषय निश्चितीपासून अंतिम प्रमाणपत्रापर्यंत प्रशासनाच्या लालफितीच्या कारभारामुळे प्रामाणिक संशोधक विद्यार्थ्यांचे अक्षरशः शोषण होते, तर दुसरीकडे काही विद्यार्थी प्रशासनासोबत आर्थिक संगनमत करत आपले काम धसास लावून घेत असतात, अशी माहिती एका वरिष्ठ संशोधक विद्यार्थ्याने दिली. ते सांगतात, "विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांत वेळोवेळी होणारे बदल, विद्यापीठाची सर्क्युलर्स आणि कागदपत्रांची पूर्तता करताना संशोधक विद्यार्थ्यांची अक्षरशः दमछाक होते. अनेक कामे प्रलंबित ठेवली जातात. आता ऑनलाइन सिस्टीम आली आहे. तरीही त्यातील कच्च्या दुव्यांचा फायदा घेत विद्यार्थ्यांची अडवणूक केली जाते." गैरप्रकारांना खतपाणी घालणारे अनेक कच्चे दुवे आहेत. त्यांच्यावर लक्ष देण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली.

### शिष्यवृत्ती लाटणारे विद्यार्थी...

पीएच.डी.ला प्रवेश असताना खासगीत नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची कमतरता नाही. मात्र, पूर्णवेळ पीएच.डी. करतो, असे दाखवून सारथी, बार्टी, महाज्योती, टार्टी आदी संस्थांसह विद्यापीठांची शिष्यवृत्ती लाटणारे विद्यार्थीही गैरप्रकारास खतपाणी घालत आहेत. वर्षभर संशोधन केंद्रात अनुपस्थित राहणे, शेवटच्या वर्षाला प्रबंध लिहायला घेणे, प्रबंधाच्या कामाचे कंत्राट देणे, पैसे देऊन सर्वेक्षण करणे, थोडासा बदल करून प्रबंध लिहिणे आदी गैरप्रकार राज्यातील संशोधनाचा दर्जा दर्शवते. विशेषतः कला आणि वाणिज्य शाखेतील बहुतांश संशोधने ही वरवरची असतात, तर विज्ञान शाखेत एखादा पॅरामीटर बदलत नवा निष्कर्ष काढणारी संशोधने पीएच.डी.च्या पदवीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे, असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले.

### प्रशासकीय पातळीवर अडणारी कामे....

- रिसर्च रिव्ह्यू कमिटीचा (आरआरसी) अहवाल येऊन विषयाला मान्यता मिळणे
- विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चितीचे प्रमाणपत्र मिळणे
- पीएच.डी.च्या कालावधीत प्रशासनाशी फारसा संबंध नाही
- विषयाच्या नावातील किंवा गाइड बदलासंदर्भात
- सिनॉप्सीस सबमिशननंतर कागदपत्रांची प्रक्रिया

"विद्यापीठाने पीएच.डी.साठी ऑनलाइन ट्रॅकिंग सिस्टीम विकसित केली आहे. ज्यामध्ये स्वयंचलित पद्धतीने सर्व टप्प्यांवरील कार्यवाही पूर्ण केली जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांचे सर्व प्रशासकीय अडथळे दूर होतील. तसेच तक्रारी संदर्भातही आम्ही मोठे पाऊल उचलले असून, विद्यार्थ्यांना गोपनीय पद्धतीने तक्रार करता येईल. त्यावर कारवाईही विहित मुदतीत होईल.

**— डॉ. पराग काळकर**, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

संशोधन सोडून पीएच.डी.च्या कार्यपद्धतीत भ्रष्ट आचरणाने जागा घेतली आहे. त्याचे वृत्तांकन आमच्या या मालिकेतून झाले. यामध्ये प्रामाणिक विद्यार्थी भरडला जात असून या शोषणाविषयी तुमचे मत नावासह क्यूआर कोड स्कॅन करून किंवा editor.pune@esakal.com या मेलवर, तसेच ८४८४९७३६०२ या व्हॉट्सॲप क्रमांकावर कळवा.

Pune, Main
04/04/2024 Page No. 5

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

{ BRIBE CASE }

# Baburaoji Gholap College professor loses PhD guideship

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) administration in a circular released on Wednesday cancelled the guideship of Shakuntala Mane, the professor at Baburaoji Gholap College in Sangvi, found allegedly accepting a bribe for giving approval to a PhD thesis.

The anti-corruption bureau (ACB) had arrested the professor of economics after receiving complaint from a PhD scholar that his guide was seeking bribe to clear the thesis.

The Pune University had appointed Mane as a guide of the scholar in 2022.

According to the university authorities, Mane had eight students under his guidance, and they have been shifted by the university to another guide.

SPPU pro-vice-chancellor Parag Kalkar said, "A letter has been sent to the college by the university and instructions have been given to transfer the students under Mane to another guide."

The sleuths caught Dr Mane red handed as she was accepting the first installment of Rs 20,000 bribe from the complainant, as per an ACB press release.

Meanwhile, the Savitribai Phule Pune University Student

ACCORDING TO THE UNIVERSITY AUTHORITIES, MANE HAD EIGHT STUDENTS UNDER HIS GUIDANCE, AND THEY HAVE BEEN SHIFTED BY THE UNIVERSITY TO ANOTHER GUIDE

Struggle Action Committee has demanded that the incident has tarnished the image of the varsity.

In a letter to the vice-chancellor, the committee stated that some PhD scholars are facing pressure from mentors regarding completion of theses.

"All our research students facing any wrongdoing are requested to immediately correspond with the university administration," said Rahul Sasane of the committee.

"The university should form an independent fact-finding committee, conduct a thorough investigation and take appropriate action.

"The varsity should arrange an independent PhD Grievance Redressal Centre under retired senior professors to know the issues faced by scholar students," he said.

Hindustan Times 4.4.2024

# *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

### स्वायत्त कॉलेजमध्ये आता पेटद्वारेच पीएच. डी.चे प्रवेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयांमध्ये यापुढे पीएच. डी.चे प्रवेश पेट परीक्षेव्दारेच घेण्यात यावेत, असे स्पष्ट निर्देश विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे यांनी दिले आहेत.

विद्यापीठाच्या जुन्या धोरणानुसार संलग्न स्वायत्त महाविद्यालये, परिसंस्थांमध्ये त्यांच्याकडील पीएच. डी. प्रवेशासंदर्भात, विद्यापीठ अनुदीन आयोगाचे दि. ५ जुलै २०१६ च्या राजपत्रात प्रसिध्द नियम विचारात घेऊन सविस्तर माहितीपुस्तक तयार करून महाविद्यालये, परिसंस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. त्यातील नियमांचे तंतोतंत पालन करून योग्य प्रक्रियेचा अवलंब करून पीएच. डी. प्रवेश प्रक्रिया राबवावी, असे ठरले होते. परंतु, यामध्ये आता विद्यापीठाकडून बदल करण्यात आला आहे.

विद्यापीठाच्या सुधारित धोरणानुसार स्वायत्त महाविद्यालयातील पीएच. डी. अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा त्या-त्या स्वायत्त दर्जाप्राप्त महाविद्यालयाने स्वतंत्रपणे न घेता विद्यापीठाच्या नियमित प्रवेश प्रक्रियेतून अर्थात पेटव्दारे राबविण्यात यावी.

तसेच पेट या प्रवेश परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी त्या-त्या स्वायत्त दर्जाप्राप्त महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून प्राप्त करून घेऊन मुलाखतीची प्रक्रिया त्यांच्या स्तरावर पूर्ण करणे गरजेचे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pubhari 4.4.2024

### आचारसंहितेच्या काळात राजकीय कार्यक्रम नको

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्याल यांमध्ये मतदार नोंदणी, नवमतदारांना प्रोत्साहन कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. परंतु, संबंधित कार्यक्रमांमध्ये राजकीय व्यक्ती तसेच कोणत्याही राजकीय पक्षाला प्रवेश देण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. अभिजित कुलकर्णी यांनी संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांना दिले आहेत.

**विद्यापीठे, कॉलेजना सूचना**

डॉ. कुलकर्णी यांनी दिलेल्या निर्देशानुसार, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अनुषंगाने राज्याचे प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी यांनी आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत नवीन मतदार नोंदणी व नवमतदारांमध्ये मतदानाप्रती जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या आहेत. परंतु, ते करीत असताना विद्यापीठे, महाविद्यालये यांच्यामध्ये आयोजित कार्यक्रमांमध्ये राजकीय पक्षांशी संबंधित व्यक्ती व राजकीय पक्षांचे नेते/कार्यकर्ते यांचा कोणताही सहभाग घ्यायचा नाही. तसेच त्यांच्याकडून संबंधित कार्यक्रमाचा प्रचाराकरिता उपयोग करून घेतला जाणार नाही. याची दक्षता घेण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत महाविद्यालय, परिसंस्थांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करताना योग्य ती दक्षता घेण्याबाबत संबंधितांस सूचित करण्यात यावे, असे डॉ. कुलकर्णी यांनी स्पष्ट केले आहे.

Pubhari 4.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# एमएचटी सीईटीसाठी तब्बल सव्वासात लाख विद्यार्थ्यांचे अर्ज

### विविध १८ सीईटींसाठी १२ लाख जणांची नोंदणी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात इंजिनिअरिंग, फार्मसी आणि अ‍ॅग्रिकल्चरच्या प्रवेशासाठी होणाऱ्या एमएचटी-सीईटी परीक्षेसाठी सव्वासात लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे यंदाही इंजिनिअरिंग प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये चुरस पाहायला मिळणार आहे. त्याचप्रमाणे एमबीए सीईटी राज्यात एक लाख ३८ हजार ६८३ विद्यार्थ्यांनी दिल्याने एमबीएसाठी चांगले महाविद्यालय मिळण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चढाओढ राहणार आहे. दरम्यान, सीईटी सेलकडून घेण्यात येणाऱ्या विविध १८ सीईटी परीक्षांसाठी आत्तापर्यंत १२ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) इंजिनिअरिंग, एमबीए, एमसीए, फार्मसी, लॉ, फाइन आर्ट्स अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षा घेण्यात येतात. त्यानुसार अनेक परीक्षांची नोंदणी पूर्ण झाली असून, काही परीक्षाही झाल्या आहेत. त्याचप्रमाणे काही सीईटींच्या नोंदणीसाठी मुदतवाढ मिळाली आहे. इंजिनिअरिंग, फार्मसी आणि अ‍ॅग्रिकल्चरच्या प्रवेशासाठी होणाऱ्या एमएचटी-सीईटी परीक्षेसाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी नोंदणी करतात. गेल्या वर्षी ६ लाख ३६ हजार ८०४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यंदा ही संख्या वाढून ७ लाख २५ हजार ६४० झाली आहे. त्यामुळे परीक्षेसाठी साधारण ९० हजार विद्यार्थी वाढले आहेत. एप्रिल महिन्यात येत्या काही दिवसांत पीसीबी गटाची, तर मे महिन्याच्या पहिल्या पंधरा दिवसांत पीसीएम गटाची परीक्षा होणार आहे. अशावेळी चांगल्या महाविद्यालयात इंजिनिअरिंग, फार्मसी, अ‍ॅग्रिकल्चर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा राहणार आहे. विधी (तीन वर्षे) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी होणाऱ्या सीईटीसाठी ८० हजार १२५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विधी (पाच वर्षे) अभ्यासक्रमाच्या सीईटीसाठी ३३ हजार ८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, अजूनही नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. त्याचप्रमाणे बीएड (स्पेशललेक्टिव्ह) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी होणारी सीईटी ७२ हजार ३७८ विद्यार्थ्यांनी दिली, अशी माहिती सीईटी सेलकडून देण्यात आली आहे.

- चांगले कॉलेज निवडण्यासाठी राहणार चढाओढ
- इंजिनिअरिंग प्रवेशासाठी असणार चुरस
- विधीसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू



### एमबीए प्रवेशासाठी चुरस

यंदा एमबीए सीईटीला १ लाख ३८ हजार ६८३ विद्यार्थी बसले. या परीक्षेला गेल्या वर्षी एक लाख १२ हजार २०९ विद्यार्थी बसते होते. त्यामुळे एमबीए प्रवेशासाठी चुरस पाहायला मिळेल. एमसीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी होणाऱ्या सीईटीसाठी ३८ हजार ४७९ विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली. एमबीए आणि एमसीए अशा दोन्ही परीक्षा होऊन काही दिवस झाले आहेत. त्यामुळे या परीक्षांच्या निकालाकडे विद्यार्थी-पालकांचे लक्ष लागले आहे.

### यंदा पहिल्यांदाच सीईटी

बीबीए, बीसीए, बीबीएम, बीएमएस अशा अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी होणाऱ्या सीईटीसाठी आत्तापर्यंत ११ हजार ८९० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ही नोंदणी प्रक्रिया ११ एप्रिलपर्यंत सुरू राहणार असल्याने विद्यार्थ्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. यंदा पहिल्यांदाच ही सीईटी होत आहे.

Pubhari 4.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# सीबीएसई ११ वी, १२ वीच्या परीक्षा पद्धतीत होणार बदल

**पुणे, ता. ४ :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) अकरावी, बारावीच्या परीक्षांमधून आता अभ्यासक्रमातील संकल्पनांबाबत विद्यार्थ्यांमध्ये कितपत स्पष्टता आली आहे, हे तपासण्यात येणार आहे. यासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रश्नपत्रिकेच्या पद्धतीत बदल केला जाणार असल्याचे 'सीबीएसई'ने स्पष्ट केले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सीबीएसईने यापूर्वीच बदल स्वीकारण्यास सुरूवात केली आहे. अभ्यासक्रमांतील संकल्पनांची स्पष्टता विद्यार्थ्यांना यावी आणि त्यासाठी आवश्यक क्षमता त्यांच्यात विकसित व्हावी, यावर भर देणारे प्रश्न अधिक विचारले जाणार आहेत. याप्रकारे प्रश्नपत्रिकेत बदल करण्यास सीबीएसईने सुरूवात केली आहे. त्यादृष्टीने प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपातही बदल केला जाणार आहे. या अंतर्गत अकरावी-बारावीच्या परीक्षेतील बहुपर्यायी प्रश्न वाढविण्यात येतील. त्याचप्रमाणे बहुपर्यायी प्रश्न, स्रोत आधारित एकत्रित प्रश्न आणि अन्य प्रश्नांचे प्रमाण ४० ते ५० टक्क्यांनी वाढविणार आहेत तर लघु आणि दीर्घ उत्तरे लिहिणे अपेक्षित असणाऱ्या प्रश्नांची संख्या ३० ते ४० टक्क्यांनी कमी करण्यात येईल, असे 'सीबीएसई'ने स्पष्ट केले आहे.

> राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (२०२०) अनुषंगाने सीबीएसईने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. त्यानुसार शाळांमध्ये क्षमतेवर आधारित शिक्षणावर भर दिला जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यता, क्रिटिकल आणि सिस्टिम थिंकिंग निर्माण व्हावी, त्यादृष्टीने बदल करण्यात येत आहेत. अकरावी-बारावीच्या परीक्षेत वास्तविक जीवनातील संकल्पनांच्या वापराचे मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक त्या क्षमतेवर आधारित प्रश्नांची टक्केवारी वाढविणार आहे.
>
> **- जोसेफ इमॅन्युअल,** संचालक (शैक्षणिक), केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ

Pune, Main
05/04/2024 Page No. 3

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# संशोधन केंद्रांकडून मागविला अनुपालन अहवाल

## विद्यापीठाकडून १६ एप्रिलपर्यंतची मुदत; शैक्षणिक हित जोपासण्याचे आवाहन

**पुणे, ता. ४ : संशोधक विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तातडीने एक परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताची काळजी घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करत त्याचा अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संशोधन केंद्रांनी १६ एप्रिलपर्यंत हा अहवाल विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाकडे सादर करायचा आहे.**

सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील पीएच.डी. मार्गदर्शक प्राध्यापिकेला लाच घेताना अटक झाल्यानंतर संशोधन केंद्रांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाला. तसेच 'सकाळ'च्या वतीनेही 'पीएच.डी.चा काळाबाजार' ही वृत्तमालिका प्रसिद्ध करण्यात आली होती. त्या दरम्यानच विद्यापीठाच्यावतीने ही पावले उचलण्यात आली आहेत. उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी यासंबंधीचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यात ते म्हणतात, "संशोधन केंद्रामधील पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मार्गदर्शक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे वादविवाद होत असतात. त्यांची तक्रार लेखी स्वरूपात दाखल होत नाही. अशा तक्रारींची वेळीच दखल घेऊन निराकरण करावे. पीएच.डी.बाबत कोणतेही चुकीचे काम होणार नाही, याची सर्वांनी दक्षता घेणे आवश्यक आहे." विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताची काळजी घेणे महत्त्वाचे कर्तव्य आणि जबाबदारी असल्याचेही विद्यापीठाने म्हटले आहे.




### अनुपालन अहवाल पुरेसा आहे?

मागील एक ते दोन दशकांपासून पीएच.डी. प्रक्रियेत अनागोंदी आहे. पीएच.डी.चा दर्जा, प्रशासकीय अडचणी आणि त्यातील भ्रष्ट आचरणाला चाप बसविण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची आवश्यकता आहे. विद्यार्थी, मार्गदर्शक, संशोधन केंद्र आणि विद्यापीठ प्रशासन सर्वच स्तरावर याची पडताळणी करणे गरजेचे आहे. अनुपालन अहवालातून कागदी कारवाई पूर्ण होईल, मात्र व्यवस्था सुधारण्यासाठी सातत्याने सर्वसमावेश प्रयत्नांची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

### महत्त्वाच्या सूचना

- संशोधन केंद्रप्रमुखांनी पीएच.डी. मार्गदर्शकांची बैठक घ्यावी. संशोधनाची गुणवत्ता टिकवताना विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची अडवणूक, नुकसान आणि दिरंगाई होणार नाही, याबद्दल दक्षता घ्यावी.
- पीएच.डी.च्या नोंदणीकृत विद्यार्थ्यांची विषयनिहाय बैठक घ्यावी. त्यांच्या अडचणींचे निराकरण तातडीने करावे.
- दोन्ही बैठकांचे आयोजन करून अनुपालन अहवाल सादर करावा.

"संशोधकविषयक कोणतेही काम अडणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व संशोधन केंद्रांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठ स्तरावर केंद्रप्रमुखांच्या बैठकीचे आयोजन करण्यात येईल. आम्हाला विश्वास आहे की, यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागतील.

**- डॉ. पराग काळकर**, प्र कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
05/04/2024 Page No. 3

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

**प्रभात**

# ऑफलाइन पद्धतीने होणारी शेवटची 'सेट' उद्या

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ५** - विद्यापीठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक पदासाठी घेण्यात येणारी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) रविवारी (७ एप्रिल) होत आहे. महाराष्ट्र आणि गोव्यातील केंद्रांवर ही परीक्षा होणार असून गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा या परीक्षेसाठी उमेदवार नोंदणीमध्ये वाढ झाली आहे. पारंपरिक (ऑफलाइन) पद्धतीने होणारी ही शेवटची परीक्षा ठरणार आहे. यापुढची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागाच्या माध्यमातून ही परीक्षा होते. गेल्यावर्षी या परीक्षेसाठी एक लाख १९ हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती. यंदा ही संख्या १ लाख २८ हजार २४३ इतकी आहे. १७ शहरांतील २८९ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारांना डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध केले होते.

**■ यंदाची 'पेट' परीक्षा ही शेवटची?**

राष्ट्रीय स्तरावरील पात्रता परीक्षा (नेट) गुणांच्या आधारे पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतला आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची यंदाची पीएच.डी. पात्रता परीक्षा (पेट) ही या पद्धतीतील शेवटची परीक्षा ठरण्याची चिन्हे आहेत.

PuneCity, 06 Apr 2024, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

**प्रभात**

# तब्बल २०० विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज अपात्र

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित काही विधी महाविद्यालयांनी भरले अनुत्तीर्णांचेही अर्ज

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ५** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नित काही विधी अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांतील तब्बल २०० विद्यार्थी अपात्र ठरले आहेत. विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास नियमानुसार एक वर्षाचा ब्रेक घ्यावा लागतो. मात्र, काही महाविद्यालयांनी नियमाला हरताळ फासून २०० अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरल्याची बाब विद्यापीठ परीक्षा विभागाच्या संगणक प्रणालीतून उघडकीस आली. २०० विद्यार्थी प्रवेशासाठी अपात्र ठरले असून, त्यांचे परीक्षा अर्ज रद्द करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने घेतला आहे.

विधी तीन वर्षे अभ्यासक्रमाच्या एखादा विद्यार्थी पहिल्या वर्षात दोन विषयांत अनुत्तीर्ण झाला, द्वितीय वर्षात त्याला 'एटीकेटी' मिळाली. अशावेळी पहिले वर्ष सर्व विषयात उत्तीर्ण नसल्याने या विद्यार्थ्यास तिसऱ्या वर्षात प्रवेश मिळत नाही. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात प्रवेश मिळावा आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी एक विशेष बाब म्हणून ऑक्टोबर २०२३ मध्ये परीक्षेला बसण्याची संधी देण्याचा निर्णय विद्यापीठाच्या विद्या परिषदेने घेतला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला होता.

दरम्यान, विधी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात पूर्णपणे विद्यार्थी अनुत्तीर्ण ठरले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे वर्ष वाया गेले आहे. अशा अपात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन ऑक्टोबर २०२३ मधील परीक्षांच्या निकालानंतर त्यांचे परीक्षा अर्ज ते पात्र आहेत, असे भासवून विद्यापीठाची दिशाभूल केली. या महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या परीक्षा विभागास विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्याची विनंती केली. त्यानुसार परीक्षा अर्ज स्वीकारण्यात आले. या अर्जांची पडताळणी केली असता, तब्बल २०० अपात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर परीक्षा विभागाने सर्व अर्जांची तपासणी केली. हे सर्व नियमबाह्य पद्धतीने झाल्याचे सिद्ध होताच हे परीक्षा अर्ज संगणकीय प्रणालीतून काढल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

> विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची विसंगत माहिती देउन त्यांची दिशाभूल काही महाविद्यालयांनी केली असल्याचे दिसून येत आहे. या विद्यार्थ्यांना विद्यापीठामध्ये पाठवून दबावतंत्राचा वापर केला जात आहे. ही बाब गंभीर आहे. त्यामुळे संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **डॉ. महेश काकडे,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

PuneCity, 06 Apr 2024, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# संशोधनाद्वारे धोरणात्मक बदल व्हायला हवेत : डॉ. काळकर

**पुणे, ता. ५ :** "संशोधनाच्या सहकार्याने धोरणात्मक बदल व्हायला हवेत," असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी व्यक्त केले.

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सच्या (आयआयएमएस) वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'व्यवस्थापनातील नावीन्यता आणि माहिती तंत्रज्ञान' असा परिषदेचा विषय होता. परिषदेत पुणे विद्यापीठ, मलेशियाचे प्रेरदाना विद्यापीठ, नेपाळच्या पोखरा विद्यापीठाचे मुनि ग्लोब कॉलेज, मलेशियाचे म्हासा विद्यापीठ आणि इंडो युरोपियन एज्युकेशन फाउंडेशनमधील व्याख्याते, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या वेळी आयआयएमएसचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे, यशस्वी संस्थेचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी, हिताची एस्टिमो ब्रेक सिस्टम्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल खांडेकर, विद्यापीठाच्या संशोधन पार्क फाउंडेशनच्या समर्थ उद्यम तंत्रज्ञान फोरमचे संचालक डॉ. सदाशिव पाधी उपस्थित होते. परिषदेत १३० संशोधन प्रबंध सादर करण्यात आले. शंतनुराव किर्लोस्कर अध्यासनाचे माजी प्रमुख कॅप्टन डॉ. सी. एम. चितळे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

Pune, Main
06/04/2024 Page No. 302

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना तिसऱ्या वर्षात 'बढती'

## विधी महाविद्यालयांकडून सोयीचा गैरवापर

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

विधीच्या प्रथम आणि द्वितीय अशा दोन्ही वर्षांमध्ये नापास झालेल्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एका निर्णयाचा गैरवापर करून तिसऱ्या वर्षाला सर्रास प्रवेश दिला जात असल्याची घटना समोर आली आहे. विद्या परिषदेने घेतलेल्या एका निर्णयाचा उलट अर्थ काढून पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यांमधील काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. मात्र, विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने त्यांना अपात्र ठरवल्याने आता परीक्षा विभागावर दबाव टाकण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**निर्णयाचा गैरफायदा**

या निर्णयाचा गैरफायदा काही विधी महाविद्यालयांकडून घेतला जात असून, या महाविद्यालयांकडून पहिले आणि दुसरे वर्ष अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनाही तिसऱ्या वर्षात प्रवेश दिला जात असल्याचे परीक्षा विभागाच्या लक्षात आले. त्यानंतर या विद्यार्थ्यांना परीक्षा प्रणालीतून बाहेर काढण्यात आले. परिणामी, आता तिन्ही जिल्ह्यातील काही विधी महाविद्यालये 'या विद्यार्थ्यांना विद्यापीठाला जाब विचारा,' असे सांगत असून, या महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांचा आधार घेऊन दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी केला आहे.

**'विद्यार्थ्यांवर कारवाई होणारच'**

'विद्या परिषदेने घेतलेला निर्णय विधी महाविद्यालयांनी पुन्हा एकदा तपासून घ्यावा. दुसऱ्या वर्षातील विषय उत्तीर्ण असतील आणि पहिल्या वर्षाचे काही विषय राहिले असतील, तर विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी त्यांना तात्पुरता प्रवेश देणे, असा निर्णय आहे. इथे काही विधी महाविद्यालये दोन्ही वर्षांत अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनाही तिसऱ्या वर्षात प्रवेश देत आहेत. या विद्यार्थ्यांवर कारवाई केली जाणार आहे,' असे परीक्षा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### सात हजार विद्यार्थ्यांना फायदा

करोनाच्या काळामुळे परीक्षा घेण्याच्या प्रकारात अनेक बदल झाले. करोनाच्या काळात ऑनलाइन, मग करोना संपल्यानंतर ऑफलाइन अशा परीक्षांमुळे अभियांत्रिकीच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षातील विद्यार्थी काही विषयांत अनुत्तीर्ण राहिले. या विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या वर्षातील विषय सुटले असतील आणि पहिल्या वर्षातील काही विषय राहिले असतील, अशा विद्यार्थ्यांना तिसऱ्या वर्षात तात्पुरते प्रवेश देण्याचा निर्णय विद्यापीठाच्या विद्या परिषदेने घेतला. या निर्णयामुळे जवळपास सात हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना फायदा झाला.

(चित्र : एआय)



"विद्या परिषदेने घेतलेल्या निर्णयाची योग्य अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. सात हजार पात्र विद्यार्थ्यांचे नुकसान केलेले नाही. मात्र, दोन्ही वर्षांत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांवर कारवाई केली आहे.

**- डॉ. महेश काकडे,**
संचालक, परीक्षा मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 7.4.2024

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

नवभारत

# नई शिक्षा नीति से अभिभावकों में चिंता

## केंद्रीय विद्यालय में अन्य कक्षा के छात्रों को प्रवेश नहीं

■राजेश रेवते@नवभारत

**माजरी.** नई शिक्षा नीति 2020 के तहत शिक्षा मंत्रालय ने 15 फरवरी 2024 को जारी किए गए नोटिस में कहा था कि नए शैक्षणिक सत्र 2024-25 एडमिशन प्रक्रिया शुरू हो गए हैं. इसलिए प्रवेश को लेकर निर्देश जारी किया गया है. नई शिक्षा नीति 2020 के मुताबिक, नए नियम के तहत क्लास पहली में एडमिशन के लिए बच्चों की उम्र 31 मार्च 2024 को पूरे 6 साल होनी चाहिए. जिसको लेकर पहले भी निर्देश जारी किया जा चुका है. इस साल सेशन 2024-25 के लिए फिर से निर्देश जारी कर उम्र सीमा के तहत नई प्रवेश प्रक्रिया शुरू की है. लेकिन अभिभावकों के लिए चिंता की बात यह है की केंद्रीय विद्यालय मे अब हर कक्षा में चालीस की जगह केवल 32 बच्चों को ही लिया जाएगा. केंद्रीय विद्यालय न्यू माजरी में कक्षा पहली में दो सेक्शन में अस्सी छात्रों को एडमिशन मिलता था. लेकिन अब वह घटकर मात्र 64 ही छात्र को एडमिशन दिया जायेगा. पूर्व में आरटीई के तहत 80 छात्रों में से 25 प्रतिशत यानी 25 छात्रों को निःशुल्क में एडमिशन दिया जाता रहा. लेकिन अब उसकी संख्या घटकर मात्र 16 ही छात्रों को आरटीई के तहत एडमिशन दिया जायेगा. माजरी परिसर के प्रार्मिक विद्यालय से शिक्षा ग्रहण करने के बाद कक्षा पांचवीं और आठवीं में छात्र केंद्रीय विद्यालय न्यू माजरी में एडमिशन किया करते थे, लेकिन नई शिक्षा नीति के तहत एक कक्षा में 32 छात्र का परिपत्रक जारी होने से केंद्रीय विद्यालय न्यू माजरी में पहली व तीसरी के अलावा अन्य किसी भी कक्षा में छात्रों को एडमिशन नहीं मिल रहा.

Pune Edition
07-april-2024 Page No. 7
epaper.enavabharat.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रभात

# सेट परीक्षेसाठी ८५ टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिति

**महाराष्ट्र, गोव्यातील १७ शहरांत २९८ केंद्रांवर परीक्षा**

**प्रभात वृत्तसेवा**

**शहरनिहाय उपस्थितीची टक्केवारी**

मुंबई ७९.६४, पुणे ८२.०५, कोल्हापूर ८८.९९, नाशिक ८६.८४, जळगाव ८७.०९, छत्रपती संभाजीनगर ८४.१७, नांदेड ८५.३४, अमरावती ८८.४८, नागपूर ८५.०९, गोवा ८६.५५, सोलापूर ८३.७५, चंद्रपूर ८९.७२ , गडचिरोली ८९. ८४, अहमदनगर ८७.२१, धुळे ८६.४६, रत्नागिरी ८६.४२, परभणी ८७.३५

**पुणे, दि. ७** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सहायक प्राध्यापकपदाच्या पात्रतेसाठी रविवारी घेण्यात आलेल्या सेट परीक्षेला यंदा सर्वाधिक तब्बल ८५ टक्के विद्यार्थ्यांनी उपस्थिति लावली. यावर्षी सेटची शेवटची ऑफलाइन परीक्षा असल्याने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक असल्याचे स्पष्ट होत आहे.

महाराष्ट्र व गोवा राज्यातील प्रमुख १७ शहरांमधील २९८ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा झाली. विद्यापीठातर्फे ही शेवटची ऑफलाइन सेट परीक्षा घेण्यात आली. यूजीसीच्या निर्देशानुसार विद्यापीठाकडून पुढील सर्व परीक्षा या नेटप्रमाणे ऑनलाइन पद्धतीने आयोजित कराव्या लागणार आहेत. यंदा सेट परीक्षेसाठी १ लाख २८ हजार २४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील १ लाख ९ हजार १५४ विद्यार्थी उपस्थिती होते. तर १९ हजार ८९ विद्यार्थी परीक्षेस गैरहजर राहिले. एकूण ८५.११ टक्के विद्यार्थी परीक्षेस उपस्थित होते. यंदा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत ५ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

PuneCity, 08 Apr 2024, Page:007
https://epaper.dainikprabhat.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# विद्यापीठाला आयुष मंत्रालयाचे 'सेंटर ऑफ एक्सलन्स'

## आयुर्वेदाच्या आंतरशाखीय संशोधनास मिळणार चालना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील आरोग्यशास्त्र विभागास 'आयुष सेंटर ऑफ एक्सलन्स' या प्रकल्पाकरिता नुकतेच अर्थसाहाय्य मंजूर केले आहे. हा प्रकल्प भारत सरकारच्या राष्ट्रीय कोशिका विज्ञान केंद्र व भारती विद्यापीठाचे औषधशास्त्र महाविद्यालय यांच्या सहकार्याने सुरू होत आहे.



या प्रकल्पाची माहिती देताना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी म्हणाले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ भारतीय ज्ञानशाखांच्या संशोधन व प्रशिक्षणात अग्रेसर आहे. जग अनेक समस्यांनी ग्रस्त असताना आयुर्वेद व योग यांच्या ज्ञानाचा वारसा अभ्यासणे आवश्यक आहे. विद्यापीठातील आरोग्यशास्त्र विभागाबरोबरच जैव माहितीशास्त्र, प्राणिशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र हे विभागही या प्रकल्पात सहभागी आहेत. याद्वारे आयुर्वेदाच्या आंतरशाखीय संशोधनास चालना मिळेल.

राष्ट्रीय कोशिका विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. मोहन वाणी म्हणाले, आधुनिक साधनांच्या साहाय्याने आयुर्वेदाच्या संकल्पना व औषधांचा अभ्यास या प्रकल्पात अभ्यासाला जाईल. आयुर्वेदाच्या औषधांचा सांध्यांच्या विकारामध्ये होणारा उपयोग तसेच आयुर्वेद चिकित्सेने शरीरातील जीवाणुंवर होणारा परिणाम या प्रकल्पात अभ्यासला जाणार आहे.

भारती विद्यापीठाचे औषधशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आत्माराम पवार म्हणाले, हा प्रकल्प खऱ्या अर्थाने नवीन शैक्षणिक धोरणाच्या एकत्रित संशोधन संकल्पनेचे उत्तम उदाहरण आहे. बायोटेक्नॉलॉजी, फार्मसी, मॉलिक्युलर बायोलॉजी, हेल्थकेअर अशा क्षेत्रांतील सर्व तज्ज्ञ एकत्र येत असल्यामुळे उत्तम संशोधन यातून होणार आहे, असे त्यांनी नमूद केले. विद्यापीठातील आरोग्यशास्त्र विभाग सुमारे २५ वर्षे आयुर्वेद व योग संशोधनात अग्रेसर आहे. विभागातील प्रा. भूषण पटवर्धन यांनी संशोधनाची सुरुवात केली. या विभागाने आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाचे प्रकल्प सिद्धीस नेले आहेत. प्रा.पटवर्धन हे आयुष मंत्रालयाचे राष्ट्रीय संशोधन प्राध्यापक तसेच या प्रकल्पाचे मार्गदर्शकदेखील आहेत.

> आयुर्वेदाची ज्ञानपरंपरा व अत्याधुनिक विज्ञान यांच्या परस्पर संवादाची आज आवश्यकता आहे. हा संवाद संशोधन रूपाने विकसित व्हावा याकरिता हा प्रकल्प मोलाची भूमिका पार पाडू शकतो. 'आयुष सेंटर ऑफ एक्सलन्स' हा सन्मान विद्यापीठास दुसऱ्यांदा मिळाला असून, विद्यापीठाच्या कार्याचा हा गौरव आहे.
>
> **- डॉ.भूषण पटवर्धन,** प्रकल्प मार्गदर्शक.

My Pune Edition
Apr 8, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव विश्वास व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### शेवटची ऑफलाइन सेट परीक्षा सुरळीत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सहायक प्राध्यापक पदासाठी घेण्यात येणारी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) रविवारी (दि. ७) सुरळीत पार पडली. विद्यापीठामार्फत घेण्यात आलेली ही शेवटची ऑफलाइन परीक्षा आहे. आता यापुढील काळात नेट परीक्षेसारखीच सेट परीक्षादेखील ऑनलाइनच होणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने यापूर्वीच स्पष्ट केले.

सहायक प्राध्यापक पदासाठी नेटच्या धर्तीवर राज्यस्तरावर सेट परीक्षा घेण्यात येते. महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांसाठी विद्यापीठाच्या सेट विभागाच्या माध्यमातून ही परीक्षा घेण्यात येते. गेल्या वर्षी या परीक्षेसाठी एक लाख १९ हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती, तर यंदा एक लाख २८ हजार २४३ उमेदवारांनी नोंदणी केली होती. महाराष्ट्र आणि गोव्यातील १७ शहरांतील २८९ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली. शेवटची ऑफलाइन परीक्षा असल्यामुळे प्रश्नपत्रिकेची काठिण्यपातळी कमी असेल, असा उमेदवारांचा समज होता. प्रत्यक्षात मात्र सेट पेपरच्या दोन्ही प्रश्नपत्रिकांची काठिण्यपातळी जास्तच असल्याचे दिसून आले. त्यातही पेपर एकचे प्रश्न जास्तच कठीण असल्याचे मत उमेदवारांनी व्यक्त केले.

**पुढील वर्षापासून ऑनलाइनच होणार : विद्यापीठाचे स्पष्टीकरण**

**१९ हजारांवर गैरहजर**

सेट परीक्षेसाठी १ लाख २८ हजार २४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १ लाख ९ हजार १५४ उमेदवारांनी सेट परीक्षेला हजेरी लावली, तर १९ हजार ८९ उमेदवार गैरहजर राहिले. पुण्यात २१ हजार १७ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १७ हजार २४५ परीक्षेला हजर राहिले, तर ३ हजार ७७२ उमेदवार गैरहजर राहिले.

Pune Edition
Apr 8, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव विश्वास व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### परीक्षा शुल्कमाफी प्रस्तावांसाठी मुदतवाढ

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारने दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पुणे विभागीय शिक्षण मंडळाने याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ दिली असून, शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये १२ एप्रिलपर्यंत शुल्कमाफीचे प्रस्ताव सादर करू शकतील.

दुष्काळग्रस्त भागातील दहावी, बारावीच्या परीक्षेत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कमाफीच्या प्रस्तावांसाठी २८ मार्चपर्यंतची मुदत देण्यात आली होती. परंतु, तांत्रिक अडचणींमुळे शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना प्रस्ताव सादर करण्यात अडचणी आल्याने मुदतवाढीची मागणी पुणे जिल्हा मुख्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाने पुणे विभागीय शिक्षण मंडळाकडे केली होती. या पार्श्वभूमीवर पुणे विभागीय शिक्षण मंडळाने आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना येत्या १२ एप्रिलपर्यंत प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ दिली. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक, प्राचार्यांनी तातडीने संपर्क साधून पात्र विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाइन पद्धतीने राज्य मंडळ कार्यालयाला १२ एप्रिलपर्यंत सादर करावी, असे मंडळाचे विभागीय सचिव औदुंबर उकिरडे यांनी स्पष्ट केले.

**१२ एप्रिल पर्यंत प्रस्ताव सादर करता येणार**

Pune Edition
Apr 8, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# प्रोफेशनल कोर्सेससाठी चुरस

**पुढारी वॉच**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकडे विद्यार्थ्यांचा कल दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातूनच यंदा विधी, अभियांत्रिकी, एमबीए आदी अभ्यासक्रमांच्या सीईटी परीक्षेसाठी गेल्या वर्षीच्या तुलनेत सर्वाधिक अर्ज आल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे यंदा एमबीए, अभियांत्रिकी, विधीसह अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी चांगलीच चुरस निर्माण होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) इंजिनिअरिंग, एमबीए, एमसीए, फार्मसी, लॉ, फाइन आर्ट्स अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षा घेण्यात येतात. त्यानुसार अनेक परीक्षांची नोंदणी पूर्ण झाली असून, काही परीक्षाही झाल्या आहेत. त्याचप्रमाणे काही सीईटींच्या नोंदणीसाठी मुदतवाढ मिळाली आहे. इंजिनिअरिंग, फार्मसी आणि ॲग्रिकल्चरच्या प्रवेशासाठी होणाऱ्या एमएचटी-सीईटी परीक्षेसाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी नोंदणी करतात. गेल्या वर्षी ६ लाख ३६ हजार ८०४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यंदा ही संख्या वाढून ७ लाख २५ हजार ६४० झाली आहे. त्यामुळे यंदा साधारण ९० हजार विद्यार्थी वाढल्यामुळे अभियांत्रिकी प्रवेशासाठी चुरस वाढणार असल्याचे दिसून येत आहे.

**एमबीए, अभियांत्रिकी, विधी प्रवेशासाठी विशेष स्पर्धा**

**यंदा सीईटी देणाऱ्यांचा टक्का वाढला**

## विधीसाठी १ लाखांवर अर्ज

दरवर्षी विधी तीन आणि पाच वर्षे अभ्यासक्रमांसाठी चांगलीच चुरस असते. यंदा विधी (तीन वर्षे) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी होणाऱ्या सीईटीसाठी ८० हजार १२५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विधी (पाच वर्षे) अभ्यासक्रमाच्या सीईटीसाठी ३३ हजार ८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, अजूनही नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे यंदा विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी चांगलीच स्पर्धा होणार असल्याचे दिसून येत आहे.

## यंदा एमबीएच्या स्पर्धेत २६ हजार ४७४ विद्यार्थी जास्त

यंदा एमबीए सीईटीला १ लाख ३८ हजार ६८३ विद्यार्थी बसले. या परीक्षेला गेल्या वर्षी १ लाख १२ हजार २०९ विद्यार्थी बसले होते. त्यामुळे एमबीए प्रवेशाच्या स्पर्धेत यंदा २६ हजार ४७४ विद्यार्थी जास्त आहेत. एमसीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी होणाऱ्या सीईटीसाठी ३८ हजार ४७९ विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली. एमबीए आणि एमसीए अशा दोन्ही परीक्षा होऊन, काही दिवस झाले आहेत. त्यामुळे या परीक्षांच्या निकालाकडे विद्यार्थी-पालकांचे लक्ष लागले आहे.

Pune Edition
Apr 8, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

MONDAY, APRIL 8, 2024
www.educationtimes.com
CAMPUS Education TIMES

# MOOCs exams in offline mode will enhance access and convenience

**The implementation of the proposed idea will make it more affordable for the learners**

Rajlakshmi.Ghosh
@timesgroup.com

PHOTO FOR REPRESENTATION



To increase the low exam registrations compared to the enrolled students for MOOCs (Massive Open Online Courses), the SWAYAM board is contemplating the idea of allowing universities and autonomous colleges to conduct offline examinations for the online learners of MOOCs. The move is expected to reduce students' financial burden and provide greater access and awareness about the programmes. Once the exams are conducted offline by universities and colleges, the examination cost would be considerably reduced. The examinations for MOOCs, as of now, are conducted through the NTA which cost learners around Rs 600. If universities and autonomous colleges are permitted to conduct the exams, it will cost around Rs 200-Rs 300 per paper.

As per a *ToI* report, presently, over 37.6 lakh learners are enrolled with MOOCs while the exam enrolment is only around 8.1 lakh. Discussing the viability of the proposed initiative, Prof Nageshwar Rao, vice-chancellor, IGNOU says, "The offline mode of the exams will ensure better access, connect and convenience if the universities are permitted to conduct the exams of the SWAYAM courses as well. Students will be familiarised with the MOOCs courses and exams through peers, faculty and administrative staff once the exams are conducted in the universities and colleges."

### Comfort level

"The offline mode is a better proposition for most of the students who are pursuing their programmes in Humanities and Social Sciences. Relatively, their online/computer-related exposure is somewhat less. The initiative will also help to minimise clash of examination dates between university exams and the MOOCs exams. The students will be in their comfort zones once MOOCs exams get conducted on the campus," he says. Also, the credit transfer process will become easier as students will get grade cards from the same institution. "The initiative will boost NEP 2020 implementation, keeping in view the credit transfer, digital learning and multidisciplinary programmes," he says.

**There should be a provision to allow students to redo the test when they fail**

"MOOCs certification should be free of cost for registered students at public universities or else it will deter students from taking these courses since they have already paid for the university's courses," says BJ Rao, vice-chancellor, University of Hyderabad, adding, "The purpose is to disseminate knowledge and not collect money. The MOOCs on SWAYAM are extremely good courses to help meet this need."

There should be a provision to allow students to redo the test when they fail. If it is conducted within the university system, students are likely to complete the courses. "It does not matter if the exams for the courses are held online/offline, but if students have to pin their hopes on a single attempt, it is likely to put the fear of failure in them. Moreover, the examination fee under the existing system may not be affordable for students from the disadvantaged sections and remains a key reason for many dropping out of the system even if the enrolment for the courses is free," he adds.

### Value of certification

PV Navaneethakrishnan, former professor and director, entrance exams and admission, Anna University, Chennai, attributes the large-scale attrition rates to time constraints, low attention spans, lack of guidance, social interaction and motivation. "The offline exams in universities and colleges can help address these challenges," he says, noting that in 2021, there were 220 million candidates registered globally in MOOCs, with over 3,100 courses. "SWAYAM hosts about 10,000 courses for 30 million learners. However, less than 5% of registered candidates complete the courses and a still smaller percentage take the online exams, more so because of the scare of online exams and doubts arising among learners about the value of certification," Navaneethakrishnan says.

He advocates the need for arranging tutorials and periodical assessment tests offline to help address the situation, since it would infuse more confidence among the learners. "Such occasional human intervention will also enliven the online learning process," says Navaneethakrishnan.

The Times of India 8.4.2024

## News Paper Clippings During April 2024

## Section: Education

# Univ rejects 200 law students' exam forms

**SwatiShindeGole**
@timesgroup.com

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) has rejected exam forms of 200 law students from various affiliated colleges following their ineligibility to fit in the exam criteria.

As per SPPU rules, students who have failed need to take a one-year break before attempting the exam again if they have failed in two subjects in the first year, and received ATKT in the second year.

The student will not be allowed to sit for third-year exams till the first-year subjects are cleared.

"Some colleges filled up forms of ineligible students. During our audit, we found 200 such students, and we have rejected all such exam applications," exam department chief Mahesh Kakde said.

He said the college administration was at fault for forwarding such applications to SPPU. "Some colleges have also sent exam forms of students who have not cleared a single subject in the second year. We have rejected these forms and told colleges to correct their records," Kakde added.

The Times of India 8.4.2024

# PUNE VARSITY GETS AID FOR AYUSH PROJECT

**PUNE:** The Ministry of AYUSH, Government of India has sanctioned financial support to the Department of Health Sciences at Savitribai Phule Pune University (SPPU) for the project 'AYUSH Center of Excellence'. This project is being started in collaboration with the National Center for Cell Science (NCCS) of the Government of India and the Poona College of Pharmacy of Bharti Vidyapeeth University.

SPPU Vice-Chancellor Suresh Gosavi said about this development, "SPPU is a leader in research and training in Indian disciplines. This project in the university is glory of the work done by university in this field. When the world is suffering from many problems, it is necessary to study legacy of knowledge of Ayurveda and Yoga."

The Department of Health Sciences at SPPU has been at the forefront of Ayurveda and Yoga research for nearly 25 years. Dr Bhushan Patwardhan of the department started the research. HTC

Hindustan Times 8.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकमत

# शिकविण्यासाठी १४ हजार तज्ज्ञ

## 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' अंतर्गत नोंदणी; एनईपीमुळे करता येणार अध्यापन

न्यूज अपडेटस्

**प्रशांत बिडवे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित आणि प्रायोगिक ज्ञान मिळावे या उद्देशाने 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' अंतर्गत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना उच्च शिक्षण संस्थांमध्ये अध्यापनाची संधी दिली जाणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेतस्थळावर आजवर १४ हजारांपेक्षा जास्त तज्ज्ञांनी नोंदणी केली आहे. एनईपी अंमलबजावणीमुळे यंदा उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठांना रिक्त प्राध्यापकांच्या पदांपैकी दहा टक्के पदांवर या तज्ज्ञांची प्राध्यापक म्हणून नियुक्ती करता येणार आहे.

यूजीसीने नवीन शैक्षणिक धोरणातील शिफारसीनुसार उद्योग आणि विविध व्यावसायिक क्षेत्रातील तज्ज्ञांना शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी करून घेण्यासाठी 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' हे नवीन पद निर्माण केले आहे. एनईपीमध्ये कौशल्यावर आधारित शिक्षण, औद्योगिक क्षेत्राच्या गरजा लक्षात घेत व्यवसाय शिक्षण अंतर्भूत करणे, ऑन जॉब ट्रेनिंग, इंटर्नशिप यावर भर दिला आहे. अनुभवी व्यक्ती विद्यार्थ्यांना प्रयोगशील ज्ञान देऊ शकेल.

खासगी विद्यापीठाकडून अशी पदे भरण्यात येत आहेत. सुरुवातीस एक वर्ष नियुक्ती आणि त्यानंतर तीन ते चार वर्षांपर्यंत मुदतवाढ देता येईल. संस्था स्तरावर उपलब्ध निधीतून या पदाचे मानधन द्यावे लागणार आहे.



### शासकीय संस्थांत एकही नियुक्ती नाही

शासकीय विज्ञान संस्था, मुंबई, शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, मुंबई, शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर आणि शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथे प्रत्येकी एक जागेवर 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' अंतर्गत जाहिरात देत निवडप्रक्रिया राबविण्यात आली. मात्र, योग्य व्यक्ती न मिळाल्याने गतवर्षी कोणाचीही नियुक्ती झाली नाही.

### या क्षेत्रातील तज्ज्ञांना संधी

अभियांत्रिकी, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, प्रसारमाध्यम, समाजशास्त्र, साहित्य, स्थापत्यसेवा, समाज विकास, पंचायतराज, ग्रामीण विकास, जलसंवर्धन, सेंद्रीय शेती, न्यायिक व्यवसाय, नगररचना, आदिवासी विकास तसेच लोकप्रशासन आदी विविध क्षेत्रांत वैशिष्ट्यपूर्ण योगदान दिलेला तसेच एका व्यवसायात किमान १५ वर्षांचा अनुभव असलेल्या व्यक्ती पात्र ठरणार आहेत.

### यूजीसीच्या संकेतस्थळावर नोंदणी

युजीसीच्या https://pop.ugc.ac.in/ या संकेतस्थळावर तज्ज्ञांना नोंदणी करता येणार आहे. दि. ८ एप्रिलपर्यंत १४ हजार ७२ तज्ज्ञ आणि ४०८ उच्च शिक्षण संस्थांनी नोंदणी केली आहे. तसेच विविध संस्थांमध्ये रिक्त जागांसाठी अर्ज मागविण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केल्या जात आहेत.

विद्यार्थ्यांना सिद्धांतासह व्यावहारिक ज्ञान मिळणे गरजेचे आहे. वर्गातील शिक्षण आणि बाजारपेठेची मागणी यातील अंतर कमी होईल. एखाद्या क्षेत्रात हयात घालविलेल्या व्यक्तीला शिकविण्याची संधी दिली, तर तो उत्तमरीत्या शिकवू शकतो.

**- डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण**

Pune Main
Page No. 2 Apr 09, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# 'तंत्रशिक्षण'च्या प्रश्नपत्रिका आता स्थानिकसह दोन भाषांमध्ये

### 'एआयसीटीई'चे तंत्रशिक्षण संस्थांना निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका स्थानिकसह दोन भाषांमध्ये देण्याचे निर्देश अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) दिले आहेत. या संदर्भातील परिपत्रक 'एआयसीटीई'ने संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे.

भारतीय भाषांतून तंत्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी 'एआयसीटीई'कडून अभियांत्रिकी पदवीपूर्व आणि पदविका अभ्यासक्रमांना जागा वाढवून दिल्या जात आहेत. भारतीय भाषांमध्ये परीक्षा घेतल्याचा वेगवेगळ्या पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांना फायदा होऊ शकतो, असे 'एआयसीईटी'ने नमूद केले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व नसते. भारतीय भाषांमध्ये परीक्षा घेतल्यामुळे भाषा हा ज्ञान आणि कौशल्यात अडथळा ठरणार नाही. भाषेवरील प्रभुत्वाचा विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील कामगिरीवर लक्षणीय परिणाम होतो. प्रश्नपत्रिकेत आता स्थानिक भाषेत प्रश्न दिल्याने विद्यार्थ्यांना संकल्पना सहजपणे समजून घेऊन परिणामकारक पद्धतीने उत्तर देता येईल. भारतीय भाषा ही कोणत्याही व्यक्तीची सांस्कृतिक ओळख असते.

### एकूण प्रवेश गुणोत्तर वाढण्यास मदत

पदवीस्तरावर अभ्यासक्रम आणि प्रश्नपत्रिकांत स्थानिक भाषेचा स्वीकार केल्यास पदवी अभ्यासक्रमांच्या पटनोंदणीतही वाढ होईल, अशी केंद्र सरकारला आशा आहे, असेही या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

Pune Edition
Apr 9, 2024 Page No. 13
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# आता एमबीए, एमसीए एकात्मिक अभ्यासक्रमांसाठीही सीईटी

- **बीबीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएमची सीईटीच संबंधित अभ्यासक्रमांसाठी लागू**



**परीक्षेची तारीख नंतर कळवणार**

महा-बी. बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम सीईटी २०२४ एमबीए इंटीग्रेटेड आणि एमसीए इंटीग्रेटेड या सामाईक प्रवेश परीक्षेची तारीख निश्चित झाल्यानंतर उमेदवार व पालकांच्या माहितीस्तव www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, असे सीईटीसेलने स्पष्ट केले आहे.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलमार्फत यंदापासून एमबीए आणि एमसीए एकात्मिक अभ्यासक्रमांसाठीही सीईटी परीक्षा लागू केली आहे. त्यासाठीची नोंदणी आणि अभ्यासक्रमासंदर्भात सीईटीसेलने निर्देश दिले आहेत. त्यानुसार बीबीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएमची सीईटीच संबंधित अभ्यासक्रमांसाठी लागू करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत बीबीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या महा-बी. बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम सीईटी २०२४ ही सामाईक प्रवेश परीक्षा राज्यात प्रथमच होणार आहे. त्याचप्रमाणे एमबीए इंटीग्रेटेड आणि एमसीए इंटीग्रेटेड या अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ प्रवेशासाठी महा-बीबीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम सीईटी २०२४ या सामाईक प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीत ज्या उमेदवारांना एमबीए इंटीग्रेटेड आणि एमसीए इंटीग्रेटेड या अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यायचे आहेत अशा उमेदवारांनी संबंधित सीईटी देणे अनिवार्य आहे. संबंधित सीईटीसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू असून, उमेदवारांना येत्या १८ एप्रिलपर्यंत नोंदणी करता येणार आहे.

Pune Edition
Apr 9, 2024 Page No. 13
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# प्रश्न पीएच.डी. संशोधनाच्या दर्जाचा

**भाष्य**



डॉ. रामानंद नंद

**पीएचडी संशोधनाच्या दर्जाचा प्रश्न धोरणात्मक धरसोडीमुळे तीव्र बनला आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे साध्य करायची असतील तर पीएचडी पदवी आणि त्यासाठीचे शिक्षण-संशोधन याची प्रतिष्ठा आणि माहात्म्य पुनःप्रस्थापित करण्याची गरज आहे.**

देशात पीएच.डीसाठी करण्यात येणाऱ्या संशोधनाचा दर्जा कितपत समाधानकारक आहे, याविषयी अलीकडे चिंता व्यक्त होते. प्रबंधाला मान्यता देण्यासाठी लाच घेतली गेल्याचे नुकतेच घडलेले प्रकरण हे मूळ दुखण्याचे एक लक्षण आहे. एकूणच हा प्रश्न विकोपाला गेला आहे. संशोधनाच्या दर्जातील घसरण आणि संबंधित समस्यांची विविध कारणे आहेत. त्यापैकी एक ठळक कारण म्हणजे सातत्याने केले गेलेले धोरणात्मक बदल.

संशोधक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळण्याचे एक उत्तम साधन म्हणून पीएच.डी पदवीकडे पाहिले जाते. आपापल्या क्षेत्रातील नावीन्यपूर्ण कल्पनांवर हे विद्यार्थी काम करतात आणि त्या त्या विषयाच्या आकलनात आपल्या संशोधनातून भर घालतात. त्यांना त्याआधी जे प्रशिक्षण मिळते, ते अत्यंत महत्त्वाचे असते. ते प्रशिक्षण आणि त्यांच्या अनुभवाची जोड यातून स्वतंत्रपणे केलेले संशोधन ही बाब मोलाची असते. अशा संशोधकांची संख्या वाढणे हे ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचे. पण मग हे सगळे आपल्याकडे नीट घडत का नाही?

माझ्या मते पीएच.डी पदवीसाठी केलेल्या अभ्यास-संशोधनाचा दर्जा घसरण्यामागे काही धोरणात्मक कारणे आहेत. या पदवीच्या संदर्भातील नियमनाची चौकट वेळोवेळी बदलत गेली. विद्यापीठ अनुदान मंडळाने (यूजीसी) पीएच.डीच्या पात्रतेसंबंधीचे जे नियम २०१०मध्ये नव्याने केले, त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांनी २००९पूर्वी नोंदणी केली आहे आणि ज्यांना 'सहाय्यक प्राध्यापक' होण्याची इच्छा आहे, त्यांच्यासाठी 'राष्ट्रीय पात्रता परीक्षा' (नेट) अनिवार्य करण्यात आली. त्यानंतर यूजीसीचे तत्कालिन अध्यक्ष अरुण निगवेकर यांनी २०१५मध्ये नवी मार्गदर्शक नियमावली आखली. निगवेकर समितीच्या शिफारशी स्वीकारून २०१६मध्ये विद्यापीठात नोकरी मिळविण्यासाठी 'नेट' अनिवार्य नाही, असे ठरले. त्यानंतर सहाय्यक प्राध्यापकपदाचे अनेक इच्छुक पीएच.डीकडे वळले. त्यानंतर नव्या शैक्षणिक धोरणातील काही तरतुदी सौम्य करत 'यूजीसी'ने अधिसूचना काढली आणि पीएच.डीसाठी 'नेट' सक्तीचे राहणार नाही, असा निर्णय घेतला.

मूलगामी बदल सुचविणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये आले. त्यावेळी ठरविलेले एक उद्दिष्ट म्हणजे उच्च शिक्षणसंस्थांमधील प्रवेशसंख्या २०३५ पर्यंत ५० टक्क्यांनी वाढवणे. ते साध्य करण्यासाठी पीएच.डीच्या जागा वाढविण्यात आल्या. महाविद्यालयीन शिक्षकांनाही त्यासाठी प्रवृत्त करण्यात आले. एका अर्थाने या पदवीचे 'लोकशाहीकरण' करण्यात आले. त्यातून प्रवेशसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढली. परंतु सातत्याने धोरणात्मक बदल झाल्याने गोंधळ वाढला. प्रवेशाविषयीचे निकष



वेळोवेळी बदलण्यात आले. २०१८ मध्येनियमांतील काही तरतुदी शिथिल करण्यात आल्या आणि पीएच.डी अभ्यासक्रम राबवण्यास महाविद्यालयांना परवानगी देण्यात आली. मुळात पीएच.डी अभ्यासक्रमाच्या बाबतीत झालेला हा विस्तार नीट राबविण्याइतकी विद्यापीठांकडील साधनसामग्री पुरेशी नाही, हे लक्षात घेऊन यूजीसीने महाविद्यालयीन अध्यापकवर्गाला पीएच.डीसाठी मार्गदर्शक म्हणून काम करण्याची परवानगी दिली. परंतु त्यासाठी त्यांना पुरेसा अवधी व प्रशिक्षण दिले गेले नाही. विद्यापीठांनीदेखील ठरविलेली उद्दिष्टे राबविण्याची घाई केली. पण त्यामुळे संभ्रमात भरच पडली. ही घाई करण्यामागे विद्यार्थी व शिक्षक संघटनांनी आणलेला दबावही काही प्रमाणात कारणीभूत होता. महाराष्ट्राचेच उदाहरण पाहू. अखिल भारतीय पातळीवरील उच्चशिक्षण सर्वेक्षणानुसार २०१७-१८ आणि २०२१-२२ या दरम्यान पीएच.डीसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या एकदम ९३ टक्क्यांनी वाढली. याच काळातील देशाची सरासरी वाढ ३२ टक्क्यांची होती. पण ही संख्यात्मक झेप घेताना त्यासाठी पायाभूत सुविधांचा, क्षमतांचा विकास हे मात्र झाले नाही. या संख्यात्मक वाढीत पीएच.डीच्या दर्जासाठी पुरेसे नियमन नव्हते.

## नियमनाचा अभाव

२०११ ते २०१७ या काळातही डॉक्टरेटसाठी मोठ्या प्रमाणावर नोंदणी झाली. या संख्यात्मक विस्तारात दर्जाचे काय होणार हा प्रश्न यूजीसीपुढे होता. त्यामुळे दर्जा नियंत्रणासाठी प्रबंधांचे मूल्यमापन करण्यासाठी काही उपाय केले गेले. पीएच.डीसाठी निवडलेल्या विषयाची छाननी विद्यापीठांचे संशोधन मंडळ व अभ्यासमंडळ यांच्याकडून करणे अनिवार्य करण्यात आले. याशिवाय अध्यापक आणि तज्ज्ञ यांचा समावेश असलेल्या शैक्षणिक परिषदेमार्फत प्रबंधांचे मूल्यमापन करण्याची व्यवस्था झाली. तपासणी आणि नियंत्रणाची व्यवस्था तयार केल्यानंतरही विषयांचा उथळपणा हा प्रश्न सुटला नाहीच. ढिसाळ धोरणात्मक नियोजनाची समस्याही पीएच.डीच्या बाबतीत सातत्याने दिसून आली.

२००९पूर्वी पीएच.डी अभ्यासक्रमाचे पुरेसे नियमन नव्हते. प्रबंध प्रसिद्ध करण्याची अट नव्हती. पार्टटाइम पीएच.डी हा रिवाज बनला होता. २०१६ मध्ये दर्जा सुधारण्यासाठी काही उपाय केले गेले. नियतकालिकांत संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले पाहिजेत, अशी अट घालण्यात आली. त्यातून निव्वळ फायद्यासाठी काढलेल्या नियतकालिकांचे पेव फुटल्याचे पाहून नियतकालिकांतील प्रसिद्धी सक्तीची न ठेवता ऐच्छिक करण्यात आली. वेगवेगळ्या प्रयत्नांनंतरही पीएच.डीच्या दर्जाविषयीची चिंता दूर झाली नाही. हे सगळे घडत असतानाच शैक्षणिक क्षेत्रात करीअर करू इच्छिणाऱ्यांच्या मनोभूमिकेतही बदल होत गेला. प्रवेशपात्रता, प्रशिक्षण यांचे महत्त्व सातत्याने कमी केले गेले. गेल्या दोन दशकांत ही जी धरसोड पहायला मिळाली त्यामुळे प्रतिष्ठित शिक्षणसंस्थांसह सर्वच ठिकाणच्या भरती प्रक्रियेचेही अवमूल्यन झाले.

'नेट' परीक्षेचे बंधन काढून टाकल्यानंतर पीएच.डीचे महत्त्वच कमी झाले. केवळ चांगल्या नोकरीसाठी या गोष्टी करणाऱ्यांच्या दृष्टीने पीएच.डी हा 'चेकलिस्ट'पुरता विषय उरला. परिणामतः जिज्ञासा, ज्ञानलालसा आणि त्यातून केलेले संशोधन ही प्रक्रिया बऱ्याचअंशी लुप्त झाली आणि वेतनभत्ते आणि नोकरीतील संधी यापुरती ती सीमित झाली. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर समाजाने शैक्षणिक नोकऱ्यांना असलेले एक प्रकारचे उच्चस्थानच काढून घेतल्यासारखे झाले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (२०२०) जी दूरदृष्टी दाखविण्यात आली आणि जे व्यापक ध्येय ठरविण्यात आला, त्याच्याशी हे चित्र विसंगत आहे. शिक्षकाचे महत्त्व ओळखणारी शिक्षणव्यवस्था आणण्याचे ध्येय आपण धोरणात निश्चित केले आहे. ते यशस्वी व्हायचे असेल तर पीएच.डी पदवी आणि त्यासाठीचे शिक्षण-संशोधन याची प्रतिष्ठा आणि माहात्म्य पुनःप्रस्थापित करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांमधील कुतूहल जागविणारा, शिक्षणाची गोडी निर्माण करणारा अध्यापकवर्ग ही फार मोठी शक्ती असते. पण अशा प्रेरणादायी शिक्षकांची संख्या अल्प आहे. त्यामुळे उच्चशिक्षण संस्थांकडून जे काही परिणाम अपेक्षित आहेत, ते मिळत नाहीत. यूजीसीने वेळोवेळी नियमावलींमध्ये जे बदल केले, त्यामागे सखोल विचार नव्हता. त्या निर्णयांमुळे बऱ्याचदा विद्यार्थी आणि शिक्षकांत असंतोषच निर्माण झाला. एनसीटीई,यूजीसी, एआयसीटीई यासारख्या विविध यंत्रणांऐवजी उच्चशिक्षण संस्थांच्या नियमनासाठी एकच समावेशक संस्था असावी, हा विचार अद्याप साकार होऊ शकलेला नाही. या विविध यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव दिसतो. हे चित्र बदलण्यासाठी उपायांची गरज आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० उच्चशिक्षण क्षेत्रातील व्यापक सुधारणा घडवून आणेल, अशी अपेक्षा आहे.

■ लेखक 'सेंटर ऑफ पॉलिसी रिसर्च अँड गव्हर्नन्स'चे संचालक आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या आखणीप्रक्रियेत ते सहभागी होते.

Pune, Main
09/04/2024 Page No. 6

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# कुलसचिव, अधिष्ठाता भरती आचारसंहितेमुळे लांबणार

**पुणे, ता. ८ :** 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'च्या अंमलबजावणीची महत्त्वपूर्ण धुरा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रभारी अधिष्ठाता आणि कुलसचिवांवर असणार आहे. कारण लोकसभेच्या आचारसंहितेमुळे या पदांच्या मुलाखतीसाठी जूनपर्यंत वाट पहावी लागणार आहे, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

विद्यापीठात जवळपास वर्षभरापासून पूर्णवेळ अधिष्ठाता नाही तर कुलसचिवपदाचा कार्यभार प्रभारींकडे आहे. तसेच 'सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेस'च्या संचालकपदाच्या मुलाखतीही प्रलंबित आहे. याबाबत विद्यापीठाच्या अधिसभेत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मात्र, आचारसंहिता लागू झाल्यामुळे विद्यापीठांना कोणत्याच पदांच्या मुलाखती घेता येत नाहीत. परिणामी विद्यापीठातील रिक्त पदांच्या मुलाखतीसाठी जूनपर्यंत वाट पहावी लागणार आहे. राज्यातील एका विद्यापीठाने आचारसंहितेच्या काळात मुलाखती घेता येतील का, याबाबत निवडणूक अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता. मात्र, आचारसंहिता लागू झाल्यानंतर मुलाखती घेता येणार नसल्याचे विद्यापीठाला कळवण्यात आले आहे.

Pune, Pune-Today
09/04/2024 Page No. 1

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# बनावट पुस्तकांपासून दूर राहा!

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) तयार केलेल्या शालेय अभ्यासक्रमांच्या पुस्तकांना पायरसीची वाळवी लागल्याचे समोर आले आहे. एनसीईआरटीच्या संकेतस्थळावरील उपलब्ध पुस्तके खासगी प्रकाशकांनी एनसीईआरटीची परवानगी न घेता पाठ्यपुस्तकांची छपाई केल्याचे निदर्शनास आले आहे. पालक, विद्यार्थ्यांनी अशा बनावट पुस्तकांपासून दूर राहण्याचे आवाहन एनसीईआरटीकडून करण्यात आले आहे.

एनसीईआरटीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. एनसीईआरटी ही शालेय शिक्षणाबाबत केंद्र सरकारला सल्ला देणारी संस्था आहे. सर्व इयत्तांच्या शैक्षणिक अध्ययन आणि अध्यापनासाठी अभ्यासक्रमनिर्मिती, पुस्तकांच्या वितरणाचे काम या संस्थेमार्फत केले जाते.

**राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे पालक-विद्यार्थ्यांना आवाहन**

एनसीईआरटीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली पुस्तके काही खासगी प्रकाशकांनी परवानगी न घेता स्वतःच्या नावाने प्रकाशित केल्याचे निदर्शनास आले आहे. कोणीही व्यक्ती किंवा संस्थेने व्यावसायिक कारणासाठी एनसीईआरटीची पुस्तके किंवा पुस्तकातील काही भाग विनापरवानगी वापरल्यास कॉपीराइट कायदा १९५७ चे उल्लंघन होते, असे एनसीईआरटीने नमूद केले आहे.

'पायरसी' केलेल्या पाठ्यपुस्तकांतील आशयात चुका असू शकतात तसेच ते राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ च्या मूलभूत तत्त्वाविरुद्ध आहे. त्यामुळे अशा पुस्तकांपासून दूर राहावे. पाठ्यपुस्तके, कृतिपुस्तकांची पायरसी करणारी व्यक्ती निदर्शनास आल्यास त्याबाबतची माहिती pd.ncertnic.in या ई-मेलद्वारे कळविण्याचे आवाहन केले आहे.

Pune Edition
Apr 10, 2024 Page No. 09
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता

लोकमान्य लोकशक्ती

# विद्यापीठात गुद्द्यांची नवी संस्कृती

## विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांतील हिंसक प्रकरणांमध्ये वाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणून नावलौकिक असलेल्या, मोठा वैचारिक वारसा लाभलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात गुद्द्यांची नवी संस्कृती उदयाला आली आहे. गेल्या काही काळात विद्यापीठात विद्यार्थी, विद्यार्थी संघटनांमधील हाणामारीच्या घटना सातत्याने होत असून, या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेत राजकारणासह जात-धर्माच्या मुद्द्यांवर हिंसक घटना होत आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे राज्यातील आघाडीचे विद्यापीठ आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थ्यांसह परराज्यातील आणि परदेशातील विद्यार्थीही या विद्यापीठात प्रवेश घेतात. मात्र गेल्या काही काळात विद्यापीठात हाणामारीच्या घटना घडल्या आहेत. त्यात विद्यार्थी संघटनांमध्ये सदस्य नोंदणीवरून वाद होऊन मारामारी, ललित कला केंद्रातील नाट्यसादरीकरणावरून वाद आणि तोडफोड, व्हॉट्सॲपवरील पोस्ट डिलिट केली म्हणून विद्यार्थ्याला मारहाण असे प्रकार गेल्या काही महिन्यांत घडले. तर नुकताच 'लव्ह जिहाद'चा आरोप करून एका विद्यार्थ्याला मारहाण करण्यात आली. अशा प्रकरणांमुळे विद्यापीठातील वातावरण गढूळ झाले आहे. पूर्वी विद्यापीठात हिंसक घटनांचे प्रकार अपवादाने व्हायचे. मात्र गेल्या काही महिन्यांमध्ये त्यात वाढ होत आहे. अशा घटनांमुळे विद्यापीठाची राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अप्रतिष्ठा होते. भविष्यात त्याचा परिणाम प्रवेश, विद्यापीठाची क्रमवारी यावरही होऊ शकतो.

तसेच सेल्फ सेन्सॉरशीपसारखी स्थिती निर्माण झाली आहे. असे प्रकार अजिबातच होता कामा नयेत, ही परिस्थिती कुठवर जाणार हे कळत नाही, व्यवस्था म्हणून खच्चीकरण होत आहे, अशी भावना विद्यापीठातील काही प्राध्यापकांनी व्यक्त केली.

> गेल्या काही काळात विद्यापीठातील वादविवादांच्या घटना वाढल्या आहेत हे खरे आहे. विद्यार्थी संघटनांसाठी कार्यपद्धती निश्चित केली होती. मात्र त्याला विरोध झाल्याने ती स्थगित करावी लागली. अशा घटना घडू नयेत हाच विद्यापीठ प्रशासनाचा प्रयत्न आहे. त्यासाठी सर्व घटकांनी एकत्र येऊन विद्यापीठाच्या प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.
>
> – **डॉ. सुरेश गोसावी**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### सुरक्षा व्यवस्थेवर करोडोंचा खर्च

विद्यापीठाकडून सुरक्षा व्यवस्थेवर करोडो रुपये खर्च केले जात आहेत. सर्वत्र सीसीटीव्ही, सुरक्षारक्षक असूनही हाणामारीच्या घटना होतच असल्याने ही व्यवस्था काय कामाची असा प्रश्न विचारला जात आहे.

> मारामारीच्या घटनांमागे जुने हेवेदावे, प्रसिद्धीसाठी समाजमाध्यमांचा वापर करून गर्दी जमवणे, राजकीय हस्तक्षेप असे प्रकार होत असू शकतात. हे प्रकार रोखण्यासाठी शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले पाहिजे. संवाद साधला पाहिजे. तसेच विद्यापीठाचे ओळखपत्र गळ्यात असणे अशी सक्तीची शिस्तही असली पाहिजे. जेणेकरून विद्यापीठातील विद्यार्थी आणि बाहेरच्या व्यक्ती ओळखता येतील. या घटनांमागे बाहेरचा हस्तक्षेप नाही ना, याचा तपास केला पाहिजे. तसेच विद्यापीठाच्या प्रतिष्ठेला बाधा येणार नाही याची खबरदारी विद्यापीठातील आणि विद्यापीठाबाहेरील संबंधितांनी घेतली पाहिजे.
>
> – **डॉ. अरुण अडसूळ**, माजी कुलगुरू

10/04/2024 | Pune | Page : 08

Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकांनाही 'पायरसी'ची वाळवी

#### खासगी प्रकाशकांकडून विनापरवानगी छपाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे:** साहित्यिक पुस्तकांची पायरसी होण्याचे प्रकार आजवर अनेकदा उघडकीस आले आहेत. मात्र आता राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) तयार केलेल्या शालेय अभ्यासक्रमांच्या पुस्तकांना पायरसीची वाळवी लागल्याचे समोर आले आहे.

एनसीईआरटीच्या संकेतस्थळावरील उपलब्ध पुस्तके खासगी प्रकाशकांनी एनसीईआरटीची परवानगी न घेता पाठ्यपुस्तकांची छपाई केल्याचे निदर्शनास आले आहे. पालक, विद्यार्थ्यांनी बनावट पुस्तकांपासून दूर राहण्याचे आवाहन एनसीईआरटीने केले आहे.

एनसीईआरटीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. एनसीईआरटी ही शालेय शिक्षणाबाबत केंद्र सरकारला सल्ला देणारी संस्था आहे. सर्व इयत्तांच्या शैक्षणिक अध्ययन आणि अध्यापनासाठी अभ्यासक्रम निर्मिती, पुस्तकांच्या वितरणाचे काम या संस्थेमार्फत केले जाते. एनसीईआरटीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली पुस्तके काही खासगी प्रकाशकांनी परवानगी न घेता स्वतःच्या नावाने प्रकाशित केल्याचे निदर्शनास आले आहे. कोणीही व्यक्ती किंवा संस्थेने व्यावसायिक कारणासाठी एनसीईआरटीची पुस्तके किंवा पुस्तकातील काही भाग विनापरवनागी वापरल्यास कॉपीराइट कायदा १९५७चे उल्लंघन होते, असे एनसीईआरटीने नमूद केले आहे.

'पायरसी' केलेल्या पाठ्यपुस्तकांतील आशयात चुका असू शकतात, ते राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३च्या मूलभूत तत्त्वाच्या विरुद्ध आहे. पाठ्यपुस्तके, कृतिपुस्तकांची पायरसी करणारी व्यक्ती निदर्शनास आल्यास त्याची माहिती pd.ncert@nic.in इमेलद्वारे कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

10/04/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

प्रभात

### पुणे विद्यापीठातील नियुक्त्या रखडल्या

लोकसभा आचारसंहितेचा परिणाम

#### कुलसचिव, अधिष्ठाता पदांसाठी जूनमध्ये मुलाखती

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ९** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव, अधिष्ठाता या पदांसाठी मुलाखती आता जून महिन्यापर्यंत घेता येणार नसल्याचे स्पष्ट होत आहे. यासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आचारसंहिता काळात कोणत्याही विद्यापीठांना कोणत्याच पदाच्या मुलाखती घेता येणार नसल्याचे सूचित केले आहे. त्यामुळे आता या पदाच्या नियुक्तीसाठी जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

राज्यातील एका विद्यापीठाने आचारसंहितेच्या काळात मुलाखती घेता येतील का? याबाबत निवडणूक अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता. मात्र, आचारसंहिता लागू झाल्यानंतर मुलाखती घेता येणार नसल्याचे विद्यापीठाला कळविण्यात आले. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियुक्त्याही रखडणार आहेत. विद्यापीठाच्या कुलसचिव, अधिष्ठाता आणि सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस संचालक या महत्वाच्या पदावर सध्या प्रभारी व्यक्तींना नियुक्त करण्यात आले आहे. मात्र, या सर्व पदांसाठी अर्ज केलेल्या व्यक्तींकडून मुलाखती केव्हा घेतल्या जाणार आहेत, याबाबत विचारणा केली जात आहे.

अधिष्ठाता पदासाठी आरक्षण लागू आहे किंवा नाही, याबाबत विद्यापीठाने शासनाकडे पत्रव्यहार केला आहे. मात्र त्याचे उत्तर अद्याप विद्यापीठाला मिळाले नाही.

PuneCity, 10 Apr 2024, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# सहावी, नववी, अकरावीसाठी राष्ट्रीय क्रेडिट फ्रेमवर्क लागू होणार

## चालू शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणीसाठी सीबीएसईची तयारी



मुंबई, दि. १० (प्रतिनिधी) - चालू शैक्षणिक वर्षापासून सहावी, नववी आणि अकरावीच्या वर्गांसाठी राष्ट्रीय क्रेडिट फ्रेमवर्क (एनसीआरएफ) लागू करण्याचा निर्णय सीबीएसई बोर्डाने घेतला आहे. शालेय एनसीआरएफ हा सीबीएसईचा पायलट प्रोजेक्ट असून शाळांनी यात सहभागी होण्याचे आवाहन सीबीएसईने केले आहे.

शालेय, उच्च आणि व्यावसायिक शिक्षणाचे एकत्रिकीकरण करण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत गेल्या वर्षी एनसीआरएफ लॉन्च केले होते. त्यानुसार पूर्वप्राथमिक स्तरापासून थेट पीएचडीपर्यंत विद्यार्थ्यांना त्यांचे क्रेडिट जमा करता येणार आहे. सीबीएसईने एनसीआरएफची प्रयोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून सीबीएसई शाळांच्या मुख्याध्यापकांना सूचना दिल्या आहेत. त्यानुसार एनसीआरएफच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांची यंदापासून अंमलबजावणी करण्याच्या सूचना शाळांना दिल्या आहेत.

बोर्डाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण किंवा कौशल्य शिक्षणातील सर्व क्रेडिटसाठी एकूण ४० क्रेडिट दिले जातील. "विद्यार्थी ४० क्रेडिटपेक्षा जास्त अभ्यासक्रम/कार्यक्रम/विषय/प्रकल्प घेऊ शकतात आणि त्यासाठी अतिरिक्त क्रेडिट मिळवू शकतात. विद्यार्थ्यांनी कमावलेली क्रेडिट शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये (एबीसी) जमा केली जातील. पुढे ती अपार आयडी आणि डिजीलॉकरशी जोडली जातील, असेही बोर्डाने म्हटले आहे.

पायलट प्रोजेक्ट आपल्या शाळेत राबविण्यासाठी इच्छुक असलेल्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी (https : //forms .gle/5 A B 2 i u ² a 1k62r2E3A) या लिंकवर संपर्क साधावा, असे आवाहन सीबीएसई बोर्डाने केले आहे.

Kesari 11.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# पीएच.डी.च्या व्यवहार्यतेवरच प्रश्नचिन्ह

## दर्जा अन् प्रोत्साहनाच्या समन्वयाची गरज; यूजीसीकडूनही बदल

**पुणे, ता. १० : ज्ञानाच्या जिज्ञासेऐवजी पदोन्नतीचा हव्यास आणि डॉक्टर म्हणून मिरविण्याच्या उद्देशाने पीएच. डी. खरोखरच व्यवहार्य राहिली आहे का? हा प्रश्न आता शिक्षणतज्ज्ञांनीच उपस्थित केला आहे. देशभर दरवर्षी हजारो लोकांना पीएच.डी. प्रदान करण्यात येते. मात्र त्यातील किती प्रबंध उपयोजित आणि मूलभूत ज्ञानात भर घालतात, हाच फार मोठा प्रश्न आहे.**

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सहाय्यक प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी पीएच.डी. पदवी आवश्यक ठरवली आहे. पीएच.डी.चा काळाबाजार नावाची वृत्तमालिका 'सकाळ'ने प्रसिद्ध केली. त्यानंतर शैक्षणिक वर्तुळात पीएचडीच्या व्यवहार्यतेवर बरीच चर्चा होत आहे. एका वरिष्ठ प्राध्यापकाने सांगितले की 'आज अनेकजण पदव्युत्तर पदवीनंतर नोकरी नाही म्हणूनही पीएच. डी.साठी प्रवेश घेतात. उदंड झालेले मार्गदर्शक आणि नियंत्रणाअभावी सर्वांचेच साटेलोटे झाले आहे. आज पीएच.डी. पदवी असावी का नाही, हाच प्रश्न मला पडतोय.''

पदवी अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांना पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता देऊ नये अशी अधिसूचना यूजीसीने काढली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने याच्या अंमलबजावणीचा निर्णय घेतला आहे. इतरही विद्यापीठांत यासंबंधी निर्णय होण्याची अपेक्षा आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने पीएच. डी.च्या धोरणात अनेक बदल अपेक्षीत आहेत. दर्जा सुधारण्यासाठी अशा नियमांची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली.




ज्ञान-विज्ञान विमुक्तये



" संशोधनासाठी आवश्यक सुविधा, निधी मिळायलाच हवा. पण त्यासाठी योग्य प्रोत्साहनही हवेच. सगळ्याच गोष्टी स्वान्तः सुखाय होत नाहीत. या दोन्हींचीही सांगड घालायला हवी. मुळात नीतिमत्ता गरजेची आहे. आजच्या काळात शिक्षकांबाबत अशी अपेक्षा बाळगण्याची वेळ येणे निराशाजनक आहे.
**- डॉ. पंडित विद्यासागर**, माजी कुलगुरू,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

### ...म्हणून व्यवहार्यतेवर प्रश्नचिन्ह

- सुमारे ८० टक्क्यांहून अधिक संशोधने दर्जाहीन
- उपयोजित आणि मूलभूत संशोधनाचा अभाव
- पदोन्नतीसाठी प्राध्यापकांचे पीएचडीला प्राधान्य
- शिष्यवृत्ती, पाठ्यवृत्ती मिळविण्यासाठीही पीएच.डी.
- अनेक प्रबंध बाजारू पद्धतीने उपलब्ध होतात
- थोडीफार विद्यापीठे सोडता अनेक ठिकाणी पीएच.डी. म्हणजे अक्षरशः बाजार

" संशोधनासाठी जिज्ञासा, स्वयंस्फूर्तता, कल्पकता आणि तार्किक विचारशक्ती हवी. कोणत्याही आमिषाने उपयोजित किंवा मूलभूत संशोधन होऊ शकत नाही. पीएच.डी. हा प्रकारच आज कालबाह्य झाला आहे. चांगला संशोधक हा उत्तम अध्यापक असेलच असे नाही.
**- डॉ. अरुण अडसूळ**, माजी कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
11/04/2024 Page No. 3

सकाळ

# एमबीए, एमसीए 'एकात्मिक'साठीही 'सीईटी'

## विद्यार्थ्यांना परीक्षा अनिवार्य असल्याची राज्य कक्षाची माहिती

**पुणे, ता. १० :** यंदा राज्यात बीसीए, बीबीए, बीबीएम अभ्यासक्रमानंतर आता एमबीए एकात्मिक आणि एमसीए एकात्मिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीही 'सीईटी' घेण्यात येणार आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये या दोन्ही अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना सामाईक प्रवेश परीक्षा देणे अनिवार्य असणार आहे, असे महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने स्पष्ट केले आहे.

२०२४-२५ करिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे बी.बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी 'महा-बी. बीसीए/बीबीए/बीबीएम सीईटी' परीक्षा राज्यात प्रथमच घेण्यात येणार आहे. तसेच एमबीए एकात्मिक आणि एमसीए एकात्मिक अभ्यासक्रमांना २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी 'महा-बी.बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम सीईटी' या सामाईक प्रवेशामध्ये समाविष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित अभ्यासक्रमासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी याची नोंद घ्यावी. तसेच सामाईक प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणीची प्रक्रिया करावी, असे आवाहन प्रवेश परीक्षा कक्षातर्फे करण्यात आले.

'महा-बी.बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम सीईटी २०२४' या प्रवेश परीक्षेसाठी संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेला अभ्यासक्रम आणि माहिती पुस्तिका 'एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमासाठीही लागू असणार आहे, असे प्रवेश परीक्षा कक्षाने सांगितले.

**'सीईटी'साठी ऑनलाइन अर्ज नोंदणीचा कालावधी**

| परीक्षेचे नाव | तपशील | नोंदणी कालावधी |
|---|---|---|
| महा-बी.बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम सीईटी आणि एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड | ऑनलाइन अर्ज नोंदणी आणि अर्ज निश्चिती करणे | १८ एप्रिलपर्यंत |

**अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : www.mahacet.org**

Pune, Main
11/04/2024 Page No. 3

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# 'पीएचडी वापराबाबत निकष बदला'

### माजी सिनेट सदस्यांची मागणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे



(चित्र : एआय)

### या गोष्टींचाही विचार व्हावा...

- पीएचडीप्राप्त प्राध्यापकांना वेतनवाढ दिली जाते. केवळ यासाठीच प्राध्यापक पीएचडी करतात का, याचा अभ्यास करावा.
- पीएचडीसाठीची नियमावली काटेकोर करून यातील गैरव्यवहारांना प्रतिबंधित करणारी असणे आवश्यक आहे.
- गैरव्यवहार आढळल्यास पीएचडी पदवी रद्द करणे आणि मार्गदर्शक प्राध्यापकाची मार्गदर्शक पदावरून हकालपट्टी करणे. पीएचडीमुळे मिळालेले आर्थिक लाभ वसूल करणे.
- पीएचडी पदवीतून शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होते का, याचे उत्तर समोर आणावे.

पीएचडीच्या शोधनिबंधाला मान्यता देण्यासाठी एका प्राध्यापिकेने विद्यार्थ्यांकडे पैशांची मागणी केल्यामुळे शिक्षण क्षेत्रात पीएचडी पदवीचा वापर किंवा अनिवार्य करण्याच्या नियमावलीबाबत बदल करण्यात यावा, अशी मागणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी सिनेट सदस्यांनी केली आहे. प्राध्यापकपदासाठी पीएचडी पदवी अनिवार्य पात्रता निकष म्हणून निश्चित केली आहे. त्याची आवश्यकता आहे का, याचा विचार करण्याची वेळ आल्याचे सदस्यांनी म्हटले आहे.

**'निवडीत प्राधान्य हवे'**

'पीएचडी पदवी अनिवार्य न करता विविध पदावंर निवडीसाठी प्राधान्य देण्यात येईल, असा नियमांत बदल करणे आवश्यक आहे. पीएचडी शोधनिबंधाचा उपयुक्तता निर्देशांक विविध निकषांवर ठरवता यावा. त्यानुसार पीएचडी उपयोगिता निर्देशांक उच्च असणाऱ्या उमेदवाराला प्राध्यापकासोबतच इतर पदांसाठीच्या निवडीत प्राधान्य, असा नियम करणे आवश्यक असल्याचे मत माजी सिनेट सदस्य धनंजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले आहे.

**'चर्चा होण्याची आवश्यकता'**

'पीएचडी संशोधन आणि त्याचा विविध क्षेत्रातील उपयोगिता, याचा धांडोळा घेतला तर त्याचे प्रमाण अत्यल्प आहे. ही वस्तुस्थिती शिक्षणाच्या शिखर संस्थेतील निर्णय घेणारे व्यक्ती मान्य करतील का, यावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. पीएचडी ही पदवी प्रतिष्ठा आणि पदासाठी उपयुक्त असते, याबाबत खरेच मूल्य उरले आहे का,' असा प्रश्न कुलकर्णी यांनी उपस्थित केला आहे.

**आलेख असमाधानकारक**

पीएचडी संशोधनातून नोंदविलेले स्वामित्व हक्क व त्याचा समाजासाठी झालेला उपयोग, याचा आलेख समाधानकारक नाही. संशोधनावर आधारित उद्योग आणि व्यवसाय निर्मिती होऊ शकते.

याकडे संबंधित व्यवस्था आवश्यक लक्ष देत नाहीत. संबधित प्राध्यापक या स्वामित्व हक्काचे आपली शैक्षणिक प्रगती नोंद अधिक सक्षम करण्याच्या पलीकडे उपयोग करत नाही, या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

Maharashtra Times 12.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# CUET-UG applicants opting for 4+ papers this yr, up from 2+

### 1.5 Lakh Dip In Number Of Candidates

Manash.Gohain
@timesgroup.com



**THE BIG TEST**

| | 2024 | 2023 | 2022 |
|---|---|---|---|
| **Total application (fee paid) in lakh | 13.4 | 14.9 | 9.9 |
| Male | 7.1 | 8.3 | 5.6 |
| Female | 6.3 | 6.6 | 4.3 |

**Marginal changes in number expected after payment reconciliation with bank data

**APPLICATION TREND**

| *Top 10 domain subjects | 2024 | 2023 | 2022 |
|---|---|---|---|
| General test | 8,34,207 | 8,08,597 | 5,24,277 |
| Chemistry | 7,01,750 | 6,58,358 | 2,79,869 |
| Physics | 6,72,773 | 6,34,078 | 2,58,211 |
| Maths/ Applied mathematics | 4,86,365 | 4,87,609 | 2,68,752 |
| Biology/Biological studies/Biotecnology/ Biochemistry | 3,91,409 | 4,02,224 | 1,61,840 |
| Economics/ Business economics | 2,13,996 | 2,28,125 | 1,50,646 |
| Business studies | 1,93,252 | 2,03,613 | 1,37,023 |
| Accountancy/ Book-keeping | 1,80,795 | 1,86,848 | 1,22,497 |
| Political science | 1,61,333 | 2,03,508 | 1,28,470 |
| History | 1,37,568 | 1,88,949 | 1,22,139 |

*Top 5 language subjects

| Subjects | 2024 | 2023 | 2022 |
|---|---|---|---|
| English | 10,07,336 | 9,72,846 | 5,95,403 |
| Hindi | 2,07,839 | 2,61,966 | 2,14,908 |
| Sanskrit | 8,901 | 6,370 | 9,099 |
| Bengali | 9,065 | 4,784 | 6,760 |
| Urdu | 6,726 | 12,800 | 3,522 |

States/UTs with 75k+ applications

| | |
|---|---|
| Uttar Pradesh | 3,43,067 |
| Delhi | 1,44,406 |
| Bihar | 99,061 |
| Jharkhand | 90,661 |
| Rajasthan | 82,633 |
| Madhya Pradesh | 77,091 |
| Haryana | 75,548 |

*NOTE: Each applicant can apply for multiple subjects (max 6)/universities/courses

**New Delhi:** The number of candidates for Common University Entrance Test — Undergraduate (CUET-UG) 2024 dropped by around 1.5 lakh this year, but the number of tests opted for more than doubled (from 28 lakh to 57.6 lakh in this period). A CUET-UG aspirant is allowed to apply for a maximum of six subjects and the latest application trend indicates that the number of subjects per applicant is up to 4.3 from 2.3 last year.

Nearly 75% CUET-UG aspirants will sit for English exam and 62% for General test this year. Subject-wise application trend for the majority of the popular domain in sciences and language papers has recorded a new high, like English breaching the 10 lakh mark.

However, there is a dip in commerce, social sciences and humanities. The test also recorded nearly a 3% increase in female participation.

This year over 13.4 lakh candidates have registered for the common entrance test for admission to central universities as well as for participating state, deemed and private universities. In 2023 the test recorded over 14.9 lakh registrations, up from 9.9 lakh in 2022 in the first edition of the test.

"Anything above 10 lakh is a big number. This is a small variation, which happens in such a large examination and 13.4 lakh anyways is a big number," said UGC chairperson M Jagadesh Kumar.

According to National Testing Agency (NTA) officials, the number could marginally increase as payment reconciliation of some candidates is still pending.

"Though there is a marginal drop in the number of candidates, we hope the attendance will be better this year due to two reasons. There are more cities and centres where the exam will be delivered and therefore candidates will have to travel comparatively less. Another reason is the hybrid mode where for some subjects the exam will be conducted in pen-paper mode, such as subjects with higher registrations as well as for those in certain specific regions where computer/ IT infrastructure is an issue," said Subodh Kumar Singh, director general, NTA. The final dates and the subjects for which pen-paper mode will be available will be decided next week.

Category-wise the percentage of female candidates has moved up from 44.3% in 2023 to 47% this year. In the first edition in 2022, the percentage of female participation was 43.4%.

The total number of general candidates is 5.4 lakh (40.3%), followed by 4.8 lakh (35.8%) of OBC (non-creamy layer). There are 1.4 lakh SC aspirants, and Gen-EWS and ST with over 88,000 each.

Even though the total number of candidates witnessed a dip, subject-wise numbers of test takers have increased in the third edition of the exam for the seven of the 10 top choices.

In sciences, chemistry with seven lakh registrations is the top choice, followed by physics (6.7 lakh), mathematics/ applied mathematics (4.8 lakh), and biology (3.9 lakh). Barring biology, each of these subjects as well as other science/ technology subjects like computer science (1 lakh) has registered a new high. Domain subject registration is led by General test with a record 8.3 lakh candidates. On the other hand commerce, humanities and social sciences have seen a drop in numbers.

Political science which crossed the two lakh mark last year now stands at 1.6 lakh, while the number of aspirants for history dropped by over 51,000. Business studies too dropped below the two lakh mark. In languages, along with English (which increased from 9.7 lakh to over 10 lakh), numbers for Sanskrit and Bengali increased significantly, while Urdu which was the third most preferred language in 2023 has dropped to fifth. The number of aspirants for Hindi, the second highest preferred language paper, too has dropped by over 54,000.

There are seven states/ UT with over 75,000 registrations, led by Uttar Pradesh with 3.4 lakh, followed by Delhi with 1.4 lakh and Bihar with over 99,000 aspirants.

The Times of India 12.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# Former VCs condemn religious identity-based violence at SPPU

## 'Students Must Be Able To Express Freely On Campus'

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Several former vice-chancellors of SPPU have condemned violence rooted in religious identity at the university in the wake of the recent assault on a first-year undergraduate student, who was also threatened to abandon studies on the institute's campus.

The former vice-chancellors called for "preservation of Savitribai Phule Pune University (SPPU), named after one of the first woman teachers in India and a social reformer, as a bastion of intellectual freedom". Some of them advocated for "a robust statement" from the SPPU administration and said they were "disappointed with the deterioration of its free atmosphere".

On Sunday, a first-year vocational degree course student walking with his classmates on the SPPU campus was confronted by at least six men who falsely accused him of 'love jihad', threatened and assaulted him and also told him to quit studies.

Arun Adsool, a former VC of the university, blamed the "bad influence of social and political events in the country on the youth" for the incident.

"Students are all into showmanship, name and fame. The mindset of the youth is changing because of the socio-political events. Students are deviating from ethics and integrity. The university should make identity cards a must for students and staff on the campus, so that it is easy to identify outsiders," he said.

Without a strong action or message from the university, such incidents would not stop, said W N Gade, another former VC of SPPU. "The university administration must firmly deal with such incidents. Students from different communities come to SPPU because of its free atmosphere. Their religions and ideologies do not matter. Students must be able to express themselves freely on the campus without any fear," he said.

"If students were involved in the attack, they must be punished by the university. For outsiders, strict police action is expected," Gade said.

P B Vidyasagar, who has been the SPPU acting VC many times, said Sunday's incident was deplorable. "This should not happen anywhere in the country, and especially on a university campus. I do not know the exact reason behind this. But if this has happened on religious grounds, then the university should educate its students."

Nitin Karmalkar, also a former VC of SPPU, said, "Sunday's incident was highly condemnable. There should be a proper inquiry. Whoever is guilty should be punished. How can an incident like this occur on the university campus? People from different walks of life from all over the world study here. You cannot single out anyone. The students should not be scared."

### 'VARSITY SHOULD NOT BE SILENT'

"Nowadays, institutes only focus on cognitive skills. However, there is an equal, if not greater, need to focus on non-cognitive skills that deal with behaviour, interaction, attitude and interpersonal skills – **Arun Adsool**

"I feel very sorry that the SPPU campus has deteriorated to such an extent. Lack of tolerance among students is the saddest thing to happen to the campus – **W N Gade**

"The university must have a dialogue with the students on the matter, instead of keeping silent. They must publish a policy stating what they stand for as a university – **P B Vidyasagar**

"SPPU must ensure that all students, irrespective of their religion, caste and gender find it comfortable to stay and study on the campus – **Nitin Karmalkar**

SPPU teachers want strict stance against assaults

SPPU student beaten up over 'love jihad', told to quit studies; cops check CCTV

TOI report on April 11, 2024

The Times of India 12.4.2024

# News Paper Clippings During April 2024

## Section: Education

लोकमत

जनमन

### पीएच.डीचा दर्जा कुठे हरवला?




**पीएच.डीला** प्रवेश घेणाऱ्यांची संख्या खूप वाढली आहे. तसेच पीएच.डी. पदवी प्राप्त करणारेही वाढले आहेत; पण त्या प्रमाणात नवीन ज्ञाननिर्मिती झाली का? ह्या प्रश्नाचे उत्तर मात्र नकारार्थी येते. पीएच.डी. पदवीधारकांनी समाजाच्या विविध घटकांना भेडसावणारे प्रश्न हाताळले आहेत आणि त्यामुळे लोकांचे जीवनमान उंचावले आहे, असे फार कमी बाबतींत घडताना दिसले आहे.

काचेच्या वातानुकूलित टॉवरमध्ये अगम्य विषयांवर संशोधन करणाऱ्यांचा काही उपयोग आहे, असे समाजालाही वाटत नाही, इतके अवमूल्यन पीएच.डी. पदवीचे झाले आहे.

यूजीसी या नियामक संस्थेने वारंवार धोरणांत बदल केल्यामुळे या पदवीचा रुबाब हरवला आहे. पीएच.डी. पदवी प्राप्त करण्यासाठी आवश्यक प्रबंध सादर करण्याआधी दोन संशोधनपर निबंध आंतरराष्ट्रीय संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध करणे बंधनकारक होते, ही प्रमुख अटही आता युजीसीने काढून टाकली आहे.

बनावटगिरीला आळा घालण्यासाठी साहित्य उचलेगिरीची तपासणी बंधनकारक करूनही दर्जाबाबतीत प्रश्न सुटलेले नाहीत. २०२० चे धोरण राबवायला २०२४ वर्ष उजाडावे लागले.

या धिम्या गतीने प्रगती कशी साधणार ? इंडस्ट्री ४.० आता इंडस्ट्री ५.० ह्या नव्या तंत्रज्ञानातील क्रांती अमलात आणण्याची तयारी करत असताना शिक्षण क्षेत्रातील बदल मात्र फारच धिम्या गतीने चालले आहेत.

संशोधनासाठी मूलभूत सोयींची वानवा आहे. संशोधकांना फेलोशिप वेळेवर मिळत नाही. भारतातील पीएच. डी. प्रबंधाचे वैशिष्ट्य म्हणजे फार कमी प्रबंध पदवीसाठी नाकारले जातात.

सगळेच प्रबंध उत्कृष्ट; मग दर्जा कुठे हरवला? १०४३ विद्यापीठे ४२३४३ उच्च शिक्षण संस्था तसेच ११७७९ विशेष दर्जा प्राप्त संस्था हे सगळे मिळून अडीच टक्के संस्था पीएच. डी.ला प्रवेश देतात. जगात पीएच. डी. निर्माण करण्यात चौथ्या क्रमांकावर देश पोहोचला आहे. संख्या वाढली; पण दर्जा कुठे हरवला त्याचा शोध आता सुरू झाला आहे.

**- प्रा. डॉ. गिरीश नाईक,**
कोल्हापूर

समकालीन महत्त्वाचे मुद्दे मांडणारी, नवी चर्चा सुरू करणारी वाचक-पत्रे या स्तंभामध्ये प्रसिद्ध केली जातील. आपली पत्रे येथे पाठवा : janman@lokmat.com

Pune Main
Page No. 6 Apr 13, 2024
Powered by: erelego.com

लोकमत

# सहा-सात महिन्यांच्या मानधनात वर्षभर काम

### सीएचबी प्राध्यापकांची पिळवणूक, जूनअखेरपर्यंत मानधन देण्याची मागणी

**प्रशांत बिडवे**
लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये रिक्त पदांवर ९ महिने कालावधीसाठी तासिका तत्त्वावर प्राध्यापकांची नियुक्ती केली जाते. मात्र, केवळ सहा-सात महिन्यांच्या मानधनात त्यांना वर्षभर राबावे लागत असल्याचे चित्र आहे.

महाविद्यालयांकडून प्राध्यापकांना उशिरा नियुक्ती देणे तसेच शैक्षणिक वर्ष संपल्यानंतरही विविध कामे करून घेतली जातात. त्यामुळे सीएचबी प्राध्यापकांची पिळवणूक होत असून त्यांचा नियुक्ती कालावधी जूनपर्यंत वाढवावा आणि मानधन द्यावे, अशी मागणी होत आहे.

महाविद्यालयात पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया जूनमध्ये सुरू होते. मात्र, बहुसंख्य महाविद्यालयात ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये तासिका तत्त्वावरील पदे भरण्यात येतात. त्यामुळे नियुक्ती दिल्यानंतर परीक्षेच्या कालावधीत तसेच दिवाळी सुटी यामुळे अनेकांना केवळ सहा ते सात महिन्यांचे मानधन मिळते. तेही दर महिन्याला नियमितपणे दिले जात नाही.

> सीएचबी प्राध्यापकांना जूनमध्ये नियुक्ती द्यावी. तसेच एनईपी अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर पुढील शैक्षणिक वर्षाचा सीएचबी आदेश काढताना तो बारा महिन्यांचा असला पाहिजे.
> **- डॉ. प्रमोद तांबे, समन्वयक, नेट-सेट, पीएडीधारक संघर्ष समिती**

सीएचबी प्राध्यापकांना शैक्षणिक वर्ष संपताच मार्च-एप्रिलमध्ये कार्यमुक्त केले जाते. त्यानंतरही तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना विविध कामांसाठी महाविद्यालयांकडून तोंडी आदेश देत बोलाविण्यात येते. अगदी निकाल लागेपर्यंत कार्यरत राहावे लागते. या दरम्यान, विविध कामांबद्दल अत्यंत तुटपुंजे पैसे दिले जातात. त्यामध्ये घरखर्च भागविणे शक्य होत नसल्याची व्यथा प्राध्यापकांनी व्यक्त केली आहे.



#### शासनाने निर्णय घेणे गरजेचे

सीएचबी शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत नियुक्ती द्यावी ही धोरणात्मक बाब आहे. शासन स्तरावरून त्याचा निर्णय होणे अपेक्षित असल्याचे शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

#### एप्रिलनंतरचे काम कोणाकडून करून घेणार?

- तासिका तत्त्वावर नेमणूक केलेल्या प्राध्यापकांना ९ महिन्यांसाठी प्रतिमहिना जास्तीत जास्त (सैद्धांतिक व प्रात्यक्षिक) दोन्ही धरून ३६ तासिकांचे मानधन दिले जाते. सीएचबी प्राध्यापकांना परीक्षाविषयक कामे देऊ नयेत असा नियम आहे.
- वर्षभर अध्यापन व मूल्यमापनाचे कामकाज सुरूच असते. त्यामुळे पुढील तीन महिन्यांचे कामकाज विद्यापीठ व महाविद्यालय कोणाकडून करून घेणार आहे? त्यामुळे जूनअखेरपर्यंत वेतन द्यावे, अशी मागणी नेट-सेट, पीएडीधारक संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

#### रिक्त पदांमुळे 'सीएचबी'वर मदार

राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांत मोठ्या प्रमाणात प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांकडून उच्चशिक्षणाचा गाडा ओढण्याचे काम सुरू आहे. पुढील शैक्षणिक वर्षात पुन्हा नियुक्ती मिळावी तसेच कायमस्वरूपी पदांवर वर्णी लागावी यासाठी जादा कामे करत राहणे भाग पडते.

Pune Main
Page No. 4 Apr 13, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# महाविद्यालयांत आता परीक्षांचे पडघम

## यंदा प्रवेशपत्रावरच वेळापत्रक; जूनअखेर निकाल

**पुणे, ता. १२ : प्रात्यक्षिकांचे जर्नल्स, प्रकल्पांचा अहवाल, तोंडी परीक्षांची लगबग आणि लेखी परीक्षेच्या तयारीमुळे महाविद्यालये सध्या गजबजून गेली आहेत. कोरोनानंतर प्रथमच उन्हाळी सत्राच्या परीक्षा वेळेवर आणि कोणत्याही वादंगांशिवाय पार पडत आहेत. जून महिन्याच्या अखेरपर्यंत सर्व परीक्षांचे निकाल लावण्यासाठी महाविद्यालयांसह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागानेही कंबर कसली आहे.**

पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांमध्ये उन्हाळी सत्राच्या परीक्षांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. अनेक महाविद्यालयांत आता प्रात्यक्षिक परीक्षा पार पडत असून, प्रथम वर्षाच्या परीक्षाही सुरू झाल्या आहेत. महाविद्यालयस्तरावर पदवीच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा २५ एप्रिलपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यानंतर आठवडेभरातच गुणदान पूर्ण करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी केले आहे. विद्यापीठातर्फे द्वितीय वर्षापासून पुढील परीक्षा घेण्यात येत असून, २० एप्रिलपासून लेखी परीक्षांना सुरुवात होत आहे. ३० मेपर्यंत जवळपास सर्वच अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षा पूर्ण करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. अभ्यासक्रमांना उशीर झाला असेल, अशा परीक्षा १५ जूनपर्यंत पूर्ण होणार आहेत.

### नव्या उत्तरपत्रिका पोहोचल्या

**यंदापासून विद्यार्थ्यांना परीक्षेत पुरवण्या देण्यात येणार नाहीत. त्याऐवजी उत्तरपत्रिका २४ आणि ३६ पानांची करण्यात आली आहे. उन्हाळी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर तीनही जिल्ह्यांतील महाविद्यालयापर्यंत नव्या उत्तरपत्रिका पोहोचविण्यात आल्याची माहिती परीक्षा विभागाने दिली आहे. उत्तरपत्रिकांच्या तपासणीसाठी दोन ते तीन तालुके मिळून एक कॅप सेंटर देण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.**

### प्रवेशपत्रावर वेळापत्रक

कोरोनादरम्यान विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध करणे बंद झाले होते. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी प्रवेशपत्रावरच सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध करावे, अशी मागणी अधिसभेत करण्यात आली होती. अखेरीस परीक्षा विभागाच्यावतीने यंदापासून जवळपास सर्वच अभ्यासक्रमांचे वेळापत्रक प्रवेशपत्रावरच देण्यात येत आहे, अशी माहिती डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

> “ उन्हाळी सत्र परीक्षांच्या दृष्टीने महाविद्यालयस्तरावरील तयारीचा आढावा घेण्यात आला आहे. त्यादृष्टीने कार्यशाळाही घेण्यात आल्या असून, जूनअखेरपर्यंत सर्व निकाल घोषित करण्याची आमची तयारी आहे.
>
> **- डॉ. महेश काकडे**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Pune, Main
13/04/2024 Page No. 3

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# गैरप्रकारांवर हवी संशोधनाची मात्रा

## 'पीएचडीचा काळाबाजार'वर वाचकांच्या प्रतिक्रिया

**पुणे, ता. १२ :** पीएच.डी.तील काळाबाजार हा केवळ आजकालचा प्रश्न नसून, कित्येक दशकांची कीड आहे. त्यावर मुळापासूनच उपचार करायला हवेत, अशी प्रतिक्रिया 'सकाळ'च्या वाचकांनी दिली आहे. शैक्षणिक व्यवस्थेचेच सामाजिक अधःपतन झाले असून, अधिकारावरील लोकांनी आजवर घेतलेल्या बोटचेप्या भूमिकेचा हा परिणाम आहे. पीएच.डी. प्रक्रियेतील सर्वच घटकांनी सजग राहत ही कीड मुळापासून नष्ट करावी, असे आवाहनही वाचकांनी केले आहे.

'पीएच.डी.चा काळाबाजार' ही वृत्तमालिका नुकतीच 'सकाळ'मधून प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यावर समाजातील सर्वच घटकांनी प्रतिक्रिया दिल्या असून, त्यातील काही प्रतिक्रिया....




"पीएच.डी.वरील शोधपत्रकारिता समाजासमोर येणे आवश्यक होते. मला आश्चर्य याचे वाटते, की गेले कित्येक दशके हे घोटाळे पुणे विद्यापीठात होत असतानाही 'नॅक'च्या यादीत विद्यापीठ कायम अव्वल कसे असते. या लेखमालेत जे घडत आहे, ते मी ३० वर्षांपूर्वी प्रत्यक्ष अनुभवले आहे. ही कीड खूप जुनी आहे. विषय हाती घेतल्याबद्दल 'सकाळ'चे अभिनंदन.

**- गिरीश परांजपे,** पुणे

"एका महत्त्वाच्या पण दुर्लक्षित विषयावर अभ्यासपूर्ण वृत्तमालिका 'सकाळ'ने प्रसिद्ध केली आहे. शिक्षण क्षेत्रातील बाजारीकरणाला यामुळे वाचा फोडली गेली आहे.

**- हर्षल जोशी,** पुणे

"पीएच.डी.तील गैरप्रकारांचा विषय अंत्यत खोल आणि गंभीर स्वरूपाचा आहे. त्यावर सर्वच घटकांनी काम करायला हवे.

**- सागर शिंदे,** छत्रपती संभाजीनगर

"पीएच.डी.तील गैरप्रकार उघडकीस आल्याने आश्चर्य वाटाण्याचे कारण नाही. या बाबत तक्रारी करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रशासन, पोलिस दखल घेत नाही. प्रशासन एखादी चौकशी समिती नेमते. तिचा अहवाल जाहीर होत नाही. या प्रश्नावर अधिक गांभिर्याने काम करायला हवे.

**- राजेश बेल्हेकर,** महर्षीनगर, पुणे

"पीएच.डी.च्या संदर्भाने विद्यार्थ्यांकडून केवळ पैसेच नाही तर परदेशी सहली, चारचाकी गाड्या मागण्याचे प्रकारही घडले आहेत. विद्यार्थ्यांची आर्थिक कुवत आणि अडचण पाहून असे घडते.

**- एक वाचक**

Pune, Main
13/04/2024 Page No. 3

# पीएचडीबाबत निकष बदला

**पुणे :** पीएच.डी पदवी अनिवार्य न करता विविध पदावर निवडीसाठी प्राधान्य देण्यात येईल, असा नियमांत बदल करणे आवश्यक आहे. पीएच.डी शोधनिबंधाचा उपयुक्तता निर्देशांक विविध निषकषांवर ठरवता यावा. त्यानुसार पीएच.डी उपयोगिता निर्देशांक उच्च असणाऱ्या उमेदवाराला प्राध्यापकासोबत परत पदांसाठीच्या निवडीत प्राधान्य, असा नियम करणे आवश्यक आहे, असे मत माजी अधिसभा सदस्य धनंजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले आहे.

पीएच.डीच्या शोधनिबंधाला मान्यता देण्यासाठी एका प्राध्यापिकेने विद्यार्थ्यांकडे पैशांची मागणी केल्यामुळे शिक्षण क्षेत्रात पीएचडी पदवीचा वापर किंवा अनिवार्य करण्याच्या नियमावलीबाबत बदल करण्यात यावा, अशी मागणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी अधिसभा सदस्यांनी केली आहे. प्राध्यापकपदासाठी पीएचडी पदवी अनिवार्य पात्रता निकष म्हणून निश्चित केली आहे. त्याची आवश्यकता आहे का, याचा विचार करण्याची वेळ आल्याचे सदस्यांनी म्हटले आहे. पीएचडी ही पदवी प्रतिष्ठा आणि पदासाठी उपयुक्त असते, याबाबत खरेच मूल्य उरले आहे का, असा प्रश्न कुलकर्णी यांनी उपस्थित केला. पीएचडी संशोधनातू नोंदवलेले स्वामित्व हक्क व त्याचा समाजासाठी झालेला उपयोग, याचा आलेख समाधानकार नाही. संशोधनावर आधारित उद्योग आणि व्यवयाय निर्मिती होऊ शकते. याकडे संबधित व्यवस्था आवश्यक लक्ष देत नाहीत. संबधित प्राध्यापक या स्वामित्व हक्काचे आपली शैक्षणिक प्रगती नोंद आधिक सक्षम करण्याच्या पलीकडे उपयोग करत नाही, या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. पीचडीप्राप्त प्राध्यापकांना वेतनवाड दिली जाते. केवळ यासाठीच प्राध्यापक पीएचडी करतात का, याचा अभ्यास करावा, पीएचडीसाठीची नियमावली काटेकोर करुन यातील गैरव्यवहारांना प्रतिबंधित करणारी असणे आवश्यक आहे. तसेच पीएचडी पदवीतून शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होते का, याचे उत्तर समोर आणावे याचाही विचार व्हावा.

Kesari 13.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# सीएचबी प्राध्यापकांची कोंडी

## नऊ महिन्यांचे कंत्राट; काम मात्र बारा महिने

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील सीएचबी (तासिका तत्त्वावरील प्राध्यापक) प्राध्यापकांची मुदत २० मार्चला संपुष्टात आली असून, शैक्षणिक वर्ष ३० एप्रिलला संपणार आहे. परंतु, जूनअखेरपर्यंत परीक्षेचे कामकाज सुरू असणार आहे. महाविद्यालयांमध्ये सीएचबी प्राध्यापकांची नऊ महिन्यांसाठी नियुक्ती केली जाते. परंतु, काम मात्र बारा महिने करावे लागत आहे. त्यामुळे त्यांची कोंडी होत असल्याची माहिती नेट-सेट, पीएच.डी.धारक संघर्ष समितीने दिली आहे.**



"१९९६ सीएचबीच्या जीआरनुसार प्राध्यापकांच्या जागा रिक्त होताच टप्प्याटप्प्याने कायमस्वरूपी भरती करण्याची देखील तरतूद केली असताना अचानक २००८ पासून शासनाने १९९६ च्या जीआरला बगल देऊन अनुदानित सीएचबी नावाचा नवीन जीआर काढला व आजपर्यंत पात्रताधारकांची पिळवणूक सुरूच ठेवली. बारा महिन्यांचे शैक्षणिक वर्ष नऊ महिन्यांची ऑर्डर व सहा महिने पगार, हा अजब प्रकार न थांबल्यास शासनाला येणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांची जागा दाखवून देण्यात येईल.

-**प्रा. ओंकार कोरवले,** समन्वयक, नेट-सेट पीएच.डी.धारक संघर्ष समिती

"संघर्ष समितीच्या माध्यमातून आतापर्यंत सात वेळेस धरणे आंदोलन करण्यात आले, तरीदेखील १०० टक्के प्राध्यापक भरतीचा कोणताही मार्ग खुला केला नाही. नवीन शैक्षणिक धोरणासाठी मात्र मोठ्या प्रमाणावरती सेमिनार व प्रशिक्षण वर्ग सुरू केले आहेत. पात्रता पिळवणूक करून स्वतःचा मोठेपणा मिळवणाऱ्या राजकीय नेत्यांचा संघर्ष समिती निषेध करत आहे.

- **डॉ. प्रमोद तांबे,** समन्वयक, नेट-सेट, पीएच.डी.धारक संघर्ष समिती

नेट-सेट, पीएच.डी.धारक संघर्ष समितीच्या प्राध्यापकांनी दिलेल्या माहितीनुसार, महाविद्यालयांमध्ये सीएचबी प्राध्यापकांची नऊ महिन्यांसाठी नियुक्ती केली जाते, परंतु सी.बी.सी.एस. पॅटर्नमध्ये संपूर्ण वर्षभर अध्यापन व मूल्यमापनाचे कामकाज सुरूच असते.

राहिलेल्या तीन महिन्यांचे कामकाज नेमके विद्यापीठ व महाविद्यालय कोणाकडून करून घेणार आहे, यासंदर्भात नेट-सेट,पीएचडीधारक संघर्ष समितीकडून शिक्षण संचालक उच्च व तंत्र शिक्षण विभाग पुणे, सहाय्यक शिक्षण संचालक, विद्यापीठाचे कुलगुरू यांना निवेदन देऊन लेखी खुलासा मागितला आहे. परंतु, विद्यापीठ प्रशासन व संचालक कार्यालयाकडून अद्याप कुठलाही खुलासा प्राप्त झालेला नाही. या निवेदनाच्या माध्यमातून प्राध्यापकांना जून अखेरपर्यंत विद्यापीठाकडून वेतन देण्यात यावे. तसेच पुढील सीएचबी आदेश काढताना तो बारा महिन्यांचा असावा, अशी मागणी संघर्ष समितीकडून वारंवार करण्यात आली आहे.

शासनाने जीआर काढून सीएचबीधारकांना परीक्षेचे कामकाज करता येणार नाही, असा नियम तयार केला आहे. प्रत्यक्ष मात्र सर्व कामे या प्राध्यापकांकडून करून घेतली जातात. यासाठी विद्यापीठेही महाविद्यालये व प्राचार्यांना सीएचबीधारकांकडून काम करून घेण्यासाठी तोंडी सूचना देतात व नाईलाजाने संबंधित प्राध्यापक हे काम करतात, हे अत्यंत नियमाबाह्य आहे. शासनाच्या माध्यमातून पात्रताधारक प्राध्यापकांनी अनुदानित जागेवर भविष्यामध्ये आपला दावा करू नये, यासाठी बारा महिन्यांच्या शैक्षणिक वर्षांमध्ये नऊ महिन्यांची ऑर्डर देऊन अघटनात्मक कार्य करून घेतले जात असल्याचे देखील संघटनेने स्पष्ट केले.

Pune Edition
Apr 13, 2024 Page No. 12
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

### सहावी, नववी, अकरावीला पुढील वर्षापासून क्रेडिट सिस्टिम

सीबीएसई संलग्न शाळांमध्ये पायलट प्रोजेक्ट राबविणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्कअंतर्गत केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईने शाळांमध्ये एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून सहावी, नववी आणि अकरावीमध्ये क्रेडिट सिस्टिमद्वारे शिक्षण दिले जाईल. क्रेडिट सिस्टीम ही प्रणाली पायलट प्रोजेक्ट म्हणून लागू करण्याची तयारी मंडळाने केली आहे.

या प्रणालीअंतर्गत, विद्यार्थ्यांनी नववीमध्ये वर्षातून २१० तास अभ्यास केला तर त्यांना ४०- ५४ क्रेडिट गुण मिळतील. सर्व विषयांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच हे क्रेडिट दिले जाईल. यासाठी वर्षभर वर्गात ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य असेल. विद्यार्थ्याला मिळणारे क्रेडिट्स शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये जोडले जातील. विद्यार्थ्याला इयत्ता नववीसाठी ऑफर केलेल्या संभाव्य क्रेडिटनुसार पाच विषय उत्तीर्ण करावे लागतील. त्यात दोन भाषा आणि तीन विषयांचा समावेश असेल.

अकरावीमध्ये एक भाषा आणि चार विषय उत्तीर्ण झाल्यास विद्यार्थी ४० क्रेडिट मिळण्यास पात्र असेल. प्रत्येक विषयासाठी २१० तास दिले जातील. अंतर्गत मूल्यांकन, शारीरिक शिक्षण, कार्यानुभव आणि सामान्य अभ्यासासाठी १५० तास असतील. जर विद्यार्थ्याने सहावा विषय घेतला तर तो ४७ क्रेडिट मिळण्यास पात्र असेल.

Pune Edition
Apr 13, 2024 Page No. 12
Powered by: erelego.com

सकाळ

### 'आयसीएसआय'तर्फे आता क्रेडिट कोर्स

बी. नरसिम्हन : 'यूजीसी'सह विद्यापीठांशी करार

**पुणे, ता. १२ :** भारतीय कंपनी सचिव संस्थेच्या (आयसीएसआय) वतीने शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून आता क्रेडिट कोर्स शिकविण्यात येणार आहे. यासंबंधी विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) अध्यक्ष प्रा. एम. जगदेश कुमार यांच्याशी चर्चा झाल्याची माहिती आयसीएसआयचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. नरसिम्हन यांनी दिली.

अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बी. नरसिम्हन यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेतली. या वेळी पुणे शाखेचे सचिव विशाल साळुंके, केंद्रीय समितीचे सदस्य पवन चांडक, समीर सिद्धेश्वर उपस्थित होते. 'आयसीएसआय'च्या कामाचा आढावा नरसिम्हन यांनी घेतला. नवीन शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) पार्श्वभूमीवर अभ्यासक्रमांतील बदलांचीही माहिती त्यांनी दिली.

नरसिम्हन म्हणाले, "आयसीएसआयच्या अभ्यासक्रमांना पदव्युत्तर पदवीचा दर्जा देण्यासंदर्भात यूजीसीसोबत नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्याचवेळी विद्यापीठांच्या माध्यमातून 'एनईपी'नुसार काही ऐच्छिक क्रेडिट अभ्यासक्रम देण्यासंबंधी आम्हाला विचारणा करण्यात आली आहे. तसेच आमच्या प्राध्यापकांना प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस म्हणूनही यूजीसी मान्यता देणार आहे. भांडवली बाजारातील गुंतवणुकीपासून ते 'सेबी'च्या कायद्यांपर्यंत विविध क्रेडिट अभ्यासक्रमांची आम्ही रचना करणार आहोत." संस्थेच्यावतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आदींशी करार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

**अध्यक्ष म्हणाले...**

- **अग्निवीर, अनाथ विद्यार्थ्यांसाठी शुल्क माफ**
- **कृत्रिम बुद्धिमत्ता, पर्यावरणीय सामाजिक हमी आदी विषयांचा समावेश**
- **विद्यापीठांद्वारे करिअर जागृती कार्यक्रम राबविणार**
- **आंतरराष्ट्रीय लवादांची स्थापना करणार**

Pune, Main
13/04/2024 Page No. 3

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# जूनपासून शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

जूनपासून म्हणजेच नव्या शैक्षणिक वर्षात राज्याच्या शिक्षण क्षेत्रात अनेक नवे बदल दिसतील, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी एका कार्यक्रमात बोलताना दिली.

**उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती**

परराष्ट्रमंत्री डॉ. जयशंकर यांची मुलाखत बालगंधर्व नाट्यगृहात झाली. या वेळी तरुणांची मोठी गर्दी होती. त्या वेळी राज्याचे उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, नवे शैक्षणिक धोरण या पूर्वीच्या राज्यातील सरकारने लागू केले नाही. आमचे सरकार येताच आम्ही बराच बदल केला आहे. त्याची सुरुवात यंदाच्या शैक्षणिक वर्षात दिसेल. विज्ञान शाखेसह अभियांत्रिकीच्या विद्यार्थांना प्रायोगिक शिक्षण देण्यात येईल, त्यांना प्रशिक्षणासाठी कंपनीत, तर वाणिज्य पदवीधरांना बँकेत पाठवले जाणार आहे.

### ४० हजार विद्यार्थ्यांना जर्मन भाषेचे प्रशिक्षण देणार

राज्यातील दोनशे स्वायत्त महाविद्यालयांनी नवे शैक्षणिक धोरण लागू केले आहे. त्याअंतर्गत सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांना जर्मन भाषा शिकवली जाणार आहे.

My Pune Edition
Apr 14, 2024 Page No. 06
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकमत

# कुलगुरूंनी केला विद्यार्थ्यांसोबत अभ्यास

## विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयातील उपक्रमास मोठा प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** जयकर ग्रंथालयाला मोठा वारसा असून, येथून खूप मोठी माणसं घडलेली आहेत. मी स्वत:ला विद्यार्थीच समजतो. एक विद्यार्थी म्हणून आपण एकमेकांकडून काही शिकत असतो. डिजिटल युगातही वाचन, लेखन संस्कृती खूप महत्त्वाची आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पोस्ट ग्रॅज्युएट स्टुडन्टस् असोसिएशन (डाप्सा) तर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित '१८ तास अभ्यास अभियान'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. अभिजित कुलकर्णी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष डॉ. सुनील धिवार, मोहन कांबळे, डाप्साचे अध्यक्ष अमोल सरोदे, आदी उपस्थित होते. कुलगुरूंनी स्वत: काही तास ग्रंथालयात विद्यार्थ्यांबरोबर बसून अभ्यास केला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त '१८ तास अभ्यास अभियान'मध्ये कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी जयकर ग्रंथालयात विद्यार्थ्यांसोबत बसून अभ्यास केला.

### मोबाइल बंद ठेवतो हे महत्त्वाचे

- कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले की, मोबाइलमुळे आपले लक्ष विचलित होते. त्यामुळे एक सलग १८ तास अभ्यास करत असताना किती तास मोबाइल बंद ठेवतो यालाही महत्त्व आहे.
- उद्दिष्ट पूर्ण करायचे असेल तर प्रेरणा घेऊन अभ्यास करणे गरजेचे आहे. केवळ एक दिवसाच्या अभ्यासाने एकाग्रता वाढणार नाही. त्यात सातत्य असले पाहिजे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये एक वैचारिक साक्षरता निर्माण होईल.

Pune Main
Page No. 5 Apr 15, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# विद्यार्थ्यांसोबत बसून कुलगुरूंचा अभ्यास

## पुणे विद्यापीठात '१८ तास अभ्यास अभियाना'चे उद्घाटन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाला मोठा वारसा असून, येथून खूप मोठी माणसं घडलेली आहेत, अशा या वास्तूत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सलग १८ तास अभ्यास करण्याचा राबविला जात असलेला उपक्रमात स्तुत्य आहे. मात्र, विद्यार्थ्यांनी केवळ एक दिवस नाही, तर वर्षभर या अभ्यासात सातत्य ठेवावे, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी शनिवारी केले. तसेच, कुलगुरूंनी स्वत: काही तास ग्रंथालयात विद्यार्थ्यांबरोबर बसून अभ्यास केला.



**विद्यापीठात सलग १८ तास वाचन उपक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी कुलगुरू डॉ. गोसावी यांच्यासह डाप्सा संघटनेचे पदाधिकारीदेखील उपस्थित होते.**

विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पोस्ट- ग्रॅज्युएट स्टुडन्ट्स असोसिएशनतर्फे (डाप्सा) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित '१८ तास अभ्यास अभियाना'च्या उद्घाटनप्रसंगी डॉ. सुरेश गोसावी बोलत होते. या वेळी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. अभिजित कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सदानंद भोसले आदी उपस्थित होते.

डॉ. गोसावी म्हणाले, मी स्वत:ला विद्यार्थीच समजतो. तसेच, विद्यार्थी म्हणून आपण एकमेकांकडून काही शिकत असतो. बऱ्याचदा मोबाईलमुळे आपले लक्ष विचलित होते. त्यामुळे सलग १८ तास अभ्यास करत असताना किती तास मोबाईल बंद ठेवतो यालाही महत्त्व आहे. आपल्याला काही उद्दिष्टे पूर्ण करायची असतील, तर एक प्रेरणा घेऊन अभ्यास करणे गरजेचे आहे.

डॉ. खरे म्हणाले, येथे १८ तास अभ्यास करून विद्यार्थ्यांनी निश्चितच त्यांचे ध्येय प्राप्त करावे. मात्र, या अभ्यासातून निर्माण होणाऱ्या ऊर्जेचा वापर ते समाजासाठी करत नाहीत तोपर्यंत त्याचा उपयोग होणार नाही.

या कार्यक्रमाचे संयोजन डाप्सा संघटनेचे अध्यक्ष अमोल सरोदे यांच्यासह सागर सोनकांबळे यांनी केले. कार्यक्रमात डॉ. विलास आढाव, डॉ. सदानंद भोसले, डॉ. सुनील धिवार आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. किरण भद्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

My Pune Edition
Apr 15, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# अभ्यासातून विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक साक्षरता निर्माण व्हावी

## कुलगुरू डॉ. गोसावी : आंबेडकर जयंतीनिमित्त '१८ तास अभ्यास' उपक्रमाचे आयोजन

**पुणे, ता. १४ :** जयकर ग्रंथालयाला मोठा वारसा असून, येथून खूप मोठी माणसं घडलेली आहेत, अशा या वास्तूत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सलग १८ तास अभ्यास करण्याचा राबविला जात असलेला उपक्रम स्तुत्य आहे. विद्यार्थ्यांनी केवळ एक दिवस नाही तर वर्षभर या अभ्यासात सातत्य ठेवावे. अभ्यासातून विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक साक्षरता निर्माण व्हावी, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी शनिवारी केले.

विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पोस्ट-पोस्ट ग्रॅज्युएट स्टुडन्टस् असोसिएशनतर्फे (डाप्सा) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित '१८ तास अभ्यास अभियाना'च्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. गोसावी बोलत होते.

यावेळी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. अभिजित कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सदानंद भोसले, अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विलास आढाव, अधिसभा सदस्य राजेंद्र घोडे, मुकुंद पांडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष डॉ. सुनील धिवार, मोहन कांबळे, डाप्साचे अध्यक्ष अमोल सरोदे आदी उपस्थित होते. गेल्या १५ वर्षांपासून १८ तास अभ्यास अभियान राबवले जात असल्याचे डॉ. विजय खरे यांनी यावेळी नमूद केले.

### कुलगुरू स्वतः ग्रंथालयात

**■ डॉ. गोसावी यांनी जयकर ग्रंथालयाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर त्यांनी स्वतः काही तास ग्रंथालयात विद्यार्थ्यांबरोबर बसून अभ्यासही केला.**

Pune, Main
15/04/2024 Page No. 3

सकाळ

# 'एनईपी'ची अंमलबजावणी विद्यार्थी केंद्रित हवी

## शिक्षणतज्ज्ञांचे मत : लवचिकतेच्या नावाखाली धरसोड वृत्ती नको

**पुणे, ता. १४ : स्वायत्त महाविद्यालयांमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीला एक वर्ष पूर्ण होत आहे. यादरम्यान पदवीच्या प्रथम वर्षाऐवजी आता द्वितीय वर्षापासून विद्यार्थ्यांना मुख्य विषय (मेजर) निवडता येईल, हा मोठा बदल करण्यात आला. मुळातच हा बदल विद्यार्थी केंद्रित आहे का, असा प्रश्न तज्ज्ञांनी उपस्थित केला असून, दीर्घकालीन हिताच्या धोरणासाठी धरसोड वृत्ती नको, असा सूरही आता शैक्षणिक वर्तुळात उमटत आहे.**



'एनईपी'मध्ये पदवीच्या पहिल्या वर्षापासूनच मुख्य (मेजर) आणि ऐच्छिक (मायनर) विषय निवडण्याची तरतूद केली होती. मात्र, स्वायत्त महाविद्यालयांतील अंमलबजावणीचा आढावा घेतल्यानंतर सुकाणू समितीने यात हा महत्त्वपूर्ण बदल सुचविला आहे. मुळात धोरण ठरवितानाच सर्व घटकांशी चर्चा केली आहे. असे असतानाही अंमलबजावणीच्या स्तरावरील ही लवचिकता विद्यार्थीहिताची आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. कारण पहिल्याच वर्षी मुख्य विषय निवडल्यामुळे काही विषयांसाठी विद्यार्थीच मिळत नव्हते. पर्यायाने अशा विषयांतील प्राध्यापकांच्या नोकरीवर गदा येणार का, असा प्रश्न उपस्थित झाला होता. तर दुसरीकडे विद्यार्थ्याला मुख्य विषय निवडण्यासाठी एक वर्षाचा कालावधी मिळतो. त्यामुळे त्यालाही मोठा दिलासा मिळाल्याचा दावाही तज्ज्ञांचा एक गट करतो. विद्यार्थ्यांचे हित बाजूला करून केवळ प्राध्यापक आणि संस्थांच्या हितासाठी निर्णय झाले, तर 'एनईपी'ची लवचिकता व्यवस्थेसाठी घातक ठरू शकते. येत्या शैक्षणिक वर्षापासून संलग्न महाविद्यालयांत 'एनईपी'ची अंमलबजावणी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर सखोल आढावा घ्यावा, धोरणाच्या अंमलबजावणीशी अशी धरसोड वृत्ती 'एनईपी'साठीच मारक ठरेल, असे मतही तज्ज्ञांनी व्यक्त केले.

### नेमके झालेय काय?

राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासूनच 'एनईपी'ची अंमलबजावणी केली होती. त्यांना येणाऱ्या अडचणी आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिसादासंदर्भात आढावा घेण्यात आला होता. त्यात बहुतांश महाविद्यालयांनी प्रथम वर्षापासूनच विद्यार्थ्यांना मुख्य विषय निवडण्याची संधी देऊ नये. हा नियम विद्यार्थ्यांना जाचक ठरत आहे. तसेच केवळ दोन विषयांना विद्यार्थी अधिक पसंती देत आहेत. एका विषयास विद्यार्थी मिळत नसल्याने, एका विषयाचे प्राध्यापक अतिरिक्त ठरण्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे यात बदल करावा, अशी विनंती केली होती. त्यानुसार सुकाणू समितीने यात बदल केला.

> देशपातळीवरील वास्तव आणि सांख्यिकी माहिती घेऊनच धोरणाची निर्मिती होणे गरजेचे आहे. 'एनईपी'च्या अंमलबजावणीतील तथ्य माहीत नसल्यामुळे स्वायत्त महाविद्यालयांनी दिलेल्या माहितीच्या आधारे बदल केले. अगोदरच याची कल्पना असती, तर हा धरसोडपणा झाला नसता.
>
> **डॉ. अरुण अडसूळ,** माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> विद्यार्थ्यांचे विषय निवडीचे स्वातंत्र्य लक्षात घेता, बदल सकारात्मक आहे. 'एनईपी'मध्ये अध्ययन, अध्यापन पद्धतीत मूलगामी बदल अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना सर्व प्रक्रियेत सहभागी करत महाविद्यालयांनी येत्या काळात व्यावसायिक, औद्योगिक आणि कौशल्य प्रशिक्षणासाठी केंद्र स्थापन करणे गरजेचे आहे.
>
> **डॉ. पंडित विद्यासागर,** माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

Pune, Main
15/04/2024 Page No. 3

## *News Paper Clippings During April 2024*

### *Section: Education*

# 'सीबीएसई'त क्रेडिट सिस्टीम

## पुढील वर्षापासून सहावी, नववी आणि अकरावी या इयत्तांत प्रणाली लागू होणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) शाळांमध्ये सहावी, नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांच्या गुणांसाठी क्रेडिट सिस्टीम राबवली जाणार आहे. या प्रणाली अंतर्गत सहावीच्या विद्यार्थ्याला ४० क्रेडिट, तर नववीच्या विद्यार्थ्याला ४० ते ५४ क्रेडिट आणि अकरावीच्या विद्यार्थ्याला ५० ते ४७ क्रेडिट दिले जाणार आहेत. येत्या शैक्षणिक वर्षापासून २०२४-२५ हा बदल लागू करण्यात येणार आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय आणि उच्च शिक्षणात वेगवेगळे बदल केले जात आहेत. त्यानुसार नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क (एनसीआरएफ) अंतर्गत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी पावले उचलली जात आहेत. याचाच एक भाग म्हणून शाळांमध्ये क्रेडिट सिस्टीम लागू करण्यात येणार आहे. सुरुवातीला पथदर्शी प्रकल्प म्हणून देशातील काही शाळांत सहावी, नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी क्रेडिट सिस्टीम राबवली जाणार आहे. सहावीच्या विद्यार्थ्यांना नऊ विषयांसाठी एकूण ४० क्रेडिट असतील. विद्यार्थ्यांना सर्व विषयांत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. दुसरी अट म्हणजे वर्षभरात वर्गात ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य राहणार आहे.

### 'क्रेडिट' होणार जमा ॲकॅडमिक बँकेत

विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार मिळणारे क्रेडिट हे 'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट'मध्ये जमा करता येणार आहे. त्यासाठी शाळांना अपार आयडीचा किंवा डीजिलॉकरचा वापर करावा लागणार आहे. त्यासाठी 'सीबीएसई'ने संलग्न शाळांना प्रणालीत सहभागी होण्याचे आवाहन केले असून, त्यासाठी लिंक दिली आहे. या पथदर्शी प्रकल्पात सहभागी होणाऱ्या शाळांना मंडळाकडून मार्गदर्शन करण्यात येईल, असे 'सीबीएसई'ने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.



### ■ नववीत ४० ते ५४ क्रेडिट

या प्रणालीअंतर्गत नववीत वर्षभरातून २१० तास प्रत्येक विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला ४० ते ५४ क्रेडिट प्रदान केले जाणार आहेत. विद्यार्थ्याला इयत्ता उत्तीर्ण होण्यासाठी दोन भाषा आणि तीन मुख्य विषय अशा एकूण विषयांत पाच विषयांत उत्तीर्ण होणे गरजेचे आहे.

### ■ पाच विषयांसाठी ४० क्रेडिट

विद्यार्थ्यांनी पाच विषय घेतल्यास त्यांचा २१० प्रति विषयाप्रमाणे एक हजार ५० तास अभ्यास होतो. यात १५० तास अंतर्गत मूल्यांकन, शारीरिक शिक्षण, कार्यानुभव आणि सामान्य अभ्यासासाठी असेल. प्रत्येक विषयासाठी एकूण सात क्रेडिट राहतील. विद्यार्थी पाच विषयांत उत्तीर्ण झाल्यास, त्याला ४० क्रेडिट मिळतील. विद्यार्थ्याने सहा किंवा सात विषय घेतल्यास, क्रेडिट ४७ किंवा ५४ पर्यंत मिळतील.

### ■ अकरावीतही क्रेडिट मिळणार

अकरावीतही विद्यार्थ्यांना क्रेडिट मिळणार असून, त्यासाठी विद्यार्थ्याला पाच विषयांत उत्तीर्ण व्हावे लागेल. या विषयात एक भाषा विषय आणि चार मुख्य विषय असतील. विद्यार्थी या पाच विषयांत उत्तीर्ण झाल्यास विद्यार्थ्यास ४० क्रेडिट दिले जातील. नववीप्रमाणे अकरावीत अंतर्गत मूल्यांकन, शारीरिक शिक्षण, कार्यानुभव आणि सामान्य अभ्यासासाठी १५० तास असतील. मंडळाने दिलेली पात्रता विद्यार्थ्याने पूर्ण केल्यास, त्याच्या सहाव्या विषयाचे गुण ग्राह्य धरण्यात येतील. त्यानुसार विद्यार्थ्याला ४७ क्रेडिट मिळणार आहेत, असे 'सीबीएसई'कडून सांगण्यात आले आहे.

Maharashtra Times 15.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

पुढारी
www.pudhari.com

# ग्रंथालयांची आर्थिक चणचण थांबेना

**पुढारी वॉच**

सुवर्णा चव्हाण
पुढारी प्रतिनिधी

**व्यवस्थापन, भाडे, वीजबिल, पुस्तकांची किंमत... अशा विविध गोष्टींचा खर्च वाढल्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांचा खर्च भरमसाट झाला असून, महिन्याचा खर्च भागविणेही ग्रंथालयांना अडचणीचे होत आहे. त्यात अनुदानात ६० टक्क्यांनी वाढ झाली असली तरी अनुदान मिळण्यास आताही सातत्य नसल्याने ग्रंथालयांना आर्थिक चणचण सोसावी लागत आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनापासून ते पुस्तक खरेदीपर्यंतचा खर्च करणेही ग्रंथालय व्यवस्थापनाला कठीण होत आहे. वाचनचळवळीला प्रेरणा देणारे उपक्रम राबविण्यासाठीही ग्रंथालय व्यवस्थापनाकडे निधी उपलब्ध नाही. काटकसर करून ग्रंथालये चालविली जात आहेत. त्यामुळेच काही ग्रंथालयीन व्यवस्थापनांकडून ग्रंथालय कायमस्वरूपी बंद करण्याचा विचार होत आहे.**

- **तुटपुंज्या अनुदानात ग्रंथालयांचा खर्च भागेना**
- **व्यवस्थापनासह विविध खर्चात झाली वाढ**
- **काहीजण ग्रंथालय बंद करण्याचा करताहेत विचार**



संग्रही छायाचित्र

पुण्यात वाचनचळवळीचा पाया भक्कम करणारी अनेक ग्रंथालये आहेत. राज्यात एकूण ११ हजारांहून अधिक सार्वजनिक ग्रंथालये असून, त्यात शासकीय अनुदानित ग्रंथालयांची संख्या मोठी आहे. अकरा वर्षांनंतर २०२३ मध्ये ग्रंथालयांच्या अनुदानात ६० टक्के वाढ करण्यात आली. पण, असे असले तरी अनुदान मिळण्यात सातत्य नसल्याने, तसेच शासकीय ग्रंथालयांची वार्षिक सदस्य शुल्कही कमी असल्याने ग्रंथालयांना खर्चासाठी उपलब्ध होणारी रक्कम कमी आहे. ग्रंथालयांच्या खर्चात सध्या ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. ग्रंथालयांना हा खर्च परवडणारा नसून काटकसर करून खर्च चालवला जात आहे.

पुणे मराठी ग्रंथालयाचे अध्यक्ष धनंजय बर्वे म्हणाले, ग्रंथालयांची आर्थिक स्थिती सुधारलेली नाही. अनुदान वेळेवर येत नसल्याने व्यवस्थापनाच्या मासिक खर्चाचे नियोजन करणे अडचणीचे जाते. आर्थिक अडचणींमुळे नवीन पुस्तक खरेदी, वाचन संस्कृतीला प्रेरणा देणा-या उपक्रमांचा खर्च करणे अवघड होत आहे. दरवर्षी आम्ही ८ ते १० लाख रुपयांची नवीन पुस्तक खरेदी करतो, परंतु त्यात आता घट झाली आहे. खरेदीचे प्रमाण ३० ते ३५ टक्केच आहे. देणग्या, वर्गणी आणि इतर निधींतून खर्च करत आहोत.

"

आमच्या ग्रंथालयाला 'क' दर्जा आहे. गेल्या काही वर्षांत आमच्या ग्रंथालयाचा दर्जा बदललेला नसल्याने आम्हाला तुटपुंजे अनुदान मिळते. त्यामुळे अनुदानावर ग्रंथालयाचा खर्च तरी कसा करणार? गेल्या २५ वर्षांपासून मी ग्रंथालय चालवत आहे. आता आम्हाला १ लाख ४ हजार रुपये शासकीय अनुदान मिळते. त्यात कर्मचाऱ्यांचे वेतन, पुस्तक खरेदी आणि उपक्रमांचा खर्च कसा करणार, असा प्रश्न पडतो. बहुतांश ग्रंथालये भाड्याने जागा घेऊन चालविली जातात. भरमसाट भाडे ग्रंथालय व्यवस्थापनांना करणे कठीण जात आहे.

**- ॲड. शैलजा मोळक,**
अध्यक्ष, जिजाऊ ग्रंथालय (विश्रांतवाडी)

वाढलेल्या महागाईमुळे ग्रंथालयांचा खर्च वाढला आहे. अनुदानात ग्रंथालयांचा खर्च नाही. म्हणूनच अनुदानाव्यतिरिक्त ग्रंथालयांना काटकसर करून खर्च करावा लागतो. ग्रंथालयांना आता आर्थिक पाठबळाची गरज आहे.

**- दिलीप भिकुले,**
ग्रंथपाल, सिद्धार्थ वाचनालय

My Pune Edition
Apr 16, 2024 Page No. 06
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# 'सीएचबी' प्राध्यापकांचे तीन महिन्यांचे पगार थकले

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**



राज्यात अकृषी महाविद्यालयातील सीएचबी अर्थात तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचे जानेवारी ते मार्च २०२४ या तीन महिन्यांचे मानधन आणि पूर्णवेळ प्राध्यापकांचे शैक्षणिक वर्ष २०२३ मधील वेतनातील फरक (थकबाकी) मार्च २०२४ महिन्यात मिळणे अपेक्षित असते. परंतु या वर्षी अनेक विभागातील सहसंचालक कार्यालयाकडून ते देण्यात आले नाही, याकडे गांभियनि लक्ष द्यावे, असे पत्र महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेने उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना दिले आहे.

**उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे धाव**

संघटनेचे अध्यक्ष डॉ. संदीप पाथ्रीकर यांनी दिलेल्या पत्रानुसार, राज्यात सध्या कुठलीच आपत्कालीन परिस्थिती नाही. दुष्काळ नाही, महामारी नाही मग सीएचबी प्राध्यापकांच्या घेतलेल्या हक्काच्या तासिकेत जाणीवपूर्वक कपात करूनसुद्धा मिळणारे मानधन शिक्षण विभाग वेळेत देत नाही. राज्यात अकृषी महाविद्यालयात ५० टक्के प्राध्यापक काम करतात. बाकी ५० टक्के जागा वर्षानुवर्षे रिक्त आहेत. १०० टक्के वर्कलोड ५० टक्के प्राध्यापक पूर्ण करतात. किमान या प्राध्यापकांचे मानधन व थकबाकी तरी वेळेत देण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहात का? हा सर्वांना पडलेला प्रश्न आहे, चंद्रकांत पाटील राज्याचे एक वरिष्ठ व जबाबदार मंत्री आहेत. परंतु शिक्षण विभागात जो अनागोंदी कारभार सुरू आहे याकडे त्यांनी लक्ष द्यावे. राज्यात प्राध्यापक भरती व भरतीप्रक्रियाबद्दल कुठलेच सरकार संवेदनशील नाही. १०० टक्के भरती करायची नाही मग राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी अपुऱ्या मनुष्यबळावर कशी होणार यावर सुद्धा विचार करण्याची गरज असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे

My Pune Edition
Apr 16, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# शाळा स्तरावर 'एनईपी'च्या अंमलबजावणीची प्रतीक्षा

## शिक्षण विभागाकडून स्पष्टतेची गरज; 'सकाळ'च्या बैठकीत शिक्षणसंस्था चालकांची मागणी

**पुणे, ता. १६ : ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी) मोठी चर्चा होत असताना शालेय शिक्षणात हे धोरण प्रत्यक्षात कधीपासून लागू होणार, त्याचे टप्पे काय असणार, त्याबाबत अद्याप शिक्षण विभागाने स्पष्टता दिलेली नाही. एनईपीच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने पूर्वतयारी म्हणून किंवा महत्त्वाचे पाऊल म्हणून राज्य सरकार आणि शिक्षण विभागाने या टप्प्यावर मार्गदर्शक सूचना देणे आवश्यक आहे,'' असे मत शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केले.**




**सकाळ कार्यालय, बुधवार पेठ :** 'सकाळ'च्या वतीने सिंहगड रस्ता परिसरातील शाळांच्या अनुषंगाने शिक्षण संस्थाचालक आणि मुख्याध्यापकांची बैठक घेण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवर.

'सकाळ माध्यम समूहा'च्या वतीने सिंहगड रस्ता परिसरातील शाळांच्या अनुषंगाने शिक्षणसंस्था चालक आणि मुख्याध्यापकांची बैठक मंगळवारी आयोजित केली होती. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, शाळेच्या वेळा बदलण्याचा सरकारी निर्णय, शाळा प्रवेशाबाबतच्या मार्गदर्शक सूचना हे निश्चित करण्यापूर्वी सरकारने सर्वेक्षण करून शाळांमधील सद्यःस्थिती, शाळांमध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्यांचा अनुभव हे विचारात घ्यायला हवे, असे आग्रही मत शिक्षणसंस्था चालकांनी 'सकाळ'च्या व्यासपीठावरून व्यक्त केले.

■ **राजीव जगताप (संस्थापक अध्यक्ष, अभिनव एज्युकेशन सोसायटी) :**
शिक्षण क्षेत्रातून सरकार स्वतःचा हात काढून घेत असल्याने शिक्षणाचे बाजारीकरण होत आहे. एनईपीच्या अंमलबजावणीबाबत चर्चा होत असताना, हे धोरण शहरी आणि निमशहरी भागात सहज स्वीकारले जाईल. परंतु, ग्रामीण आणि दुर्गम भागात पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत का, याबाबत सरकार कोणते पावले उचलणार? याची स्पष्टता शिक्षण विभागाने देणे आवश्यक आहे.

■ **अस्मिता व्यापारी, संस्थापक अध्यक्ष, ज्ञानदीप इंग्लिश मीडियम स्कूल :**
शिक्षणहक्क कायद्यानुसार (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवर विनाअनुदानित शाळांनी आतापर्यंत विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला आहे. परंतु सरकारने आरटीईअंतर्गत शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम दिलेली नाही. पुढील काळात या अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्काची प्रतिपूर्ती सरकारमार्फत दिली जाणार आहे की नाही? याची स्पष्टता शिक्षण विभागाने करणे अपेक्षित आहे.

■ **सागर कोल्हे, संचालक, क्रेझ इंग्लिश मीडियम स्कूल :**
नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात व्यावसायिक आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाला महत्त्व दिले आहे. त्या-त्या स्थानिक गरजेनुसार किंवा उपलब्धतेनुसार कोणत्या प्रकारच्या व्यावसायिक-कौशल्य अभ्यासक्रमाची तयारी शालेय स्तरावर होणे अपेक्षित आहे, याबाबत मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. शाळा स्तरावर एनईपीबाबत पावले उचलली जात नाहीत, हे वास्तव आहे.

■ **संजना निकम, संस्थापक, व्हर्सेटाइल स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय :**
सध्या सीबीएसई, आयसीएसई, आयबी अशा बोर्डांच्या स्पर्धेमुळे एसएससी बोर्डाला कमी लेखले जात आहे. पाठ्यपुस्तकी शिक्षणाबरोबरच कौशल्य, अनुभव, प्रात्यक्षिक, प्रयोगशील आणि उपक्रमशील शिक्षणाला महत्त्व आहे. त्यादृष्टीने शिक्षण विभागाने शाळांना मोकळीक आणि संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

■ **अनिकेत चव्हाण, संचालक, धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठान :**
पालकांकडून शाळांचे पूर्ण शुल्क येत नसल्याने विनाअनुदानित शाळांचे आर्थिक गणित बिघडत आहे. आरटीई २५ टक्के राखीव जागांवर शाळांनी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम सर्व शाळांना समान वाटप तत्त्वावर द्यावी. शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम काही शाळांनाच दिली जात असल्याने अनेक छोट्या शाळा शुल्कप्रतिपूर्तीच्या रकमेपासून दूर आहेत.

■ **सोनाली खांदारकर, संस्थापक संचालक, एच. ई. एस. इंग्लिश मीडियम स्कूल :**
विनाअनुदानित शाळांना सरकारचे कोणत्याही प्रकारचे अर्थसाहाय्य मिळत नसले, तरीही अनेक पालक शाळांचे पूर्ण शुल्क भरत नाहीत, हे वास्तव आहे. सध्या हे प्रमाण वेगाने वाढत आहे. अखेर वर्ग शिक्षकांनाच शुल्क भरण्याबाबत पालकांकडे सातत्याने पाठपुरावा करावा लागत आहे.

■ **डॉ. संजीव लाटे, संस्थापक, विश्वभारती इंग्लिश मीडियम स्कूल, धायरी :**
विनाअनुदानित शाळा म्हटलं की, कायमच नफ्याबद्दल बोलले जाते. परंतु पूर्णपणे खासगी शाळा चालविणे सोपे नाही. अनुदानित शाळांना सर्व खर्च सरकारमार्फत दिला जातो. तर विनाअनुदानित शाळांना प्रत्येक खर्च स्वतः करावा लागतो. अशात पालकांकडून पूर्ण शुल्क दिले जात नसल्याने या शाळा आर्थिक कोंडीत सापडतात.

■ **डॉ. अजिंक्य चव्हाण, संचालक, उत्कर्ष इंग्लिश मीडियम स्कूल :**
एनईपीच्या अंमलबजावणीबाबत सरकारने मार्गदर्शक सूचना देणे आवश्यक आहे. व्यावसायिक, कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाला पुढील काळात महत्त्व असणार आहे. त्यादृष्टीने शाळा स्वतःहून पुढाकार घेऊन उपक्रम, अभ्यासक्रम राबवीत आहेत. परंतु, शिक्षण विभागाने आत्तापासूनच शाळांना दिशा देणे महत्त्वाचे ठरणार आहे.

■ **डॉ. एकता दीक्षित, संचालक, ॲकमे इंग्लिश मीडियम स्कूल :**
विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमावर आधारित शिक्षणाबरोबरच आता व्यावहारिक, संस्कारक्षम, मूल्यांवर आधारित शिक्षण देण्याची जबाबदारी शाळांवर असणार आहे. एनईपीनुसार भारतीय संस्कृती, व्यावसायिक, कौशल्य, उपक्रमशील शिक्षणासाठी राज्य सरकारने मार्गदर्शक सूचना देणे अपेक्षित आहे.

■ **सारिका बाबर, संस्थापक संचालक, प्राचार्य, क्लारा ग्लोबल स्कूल :**
आंधळेपणाने पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण करणारी धोरणे सरकारमार्फत आणली जात आहेत. सर्वेक्षण करून धोरण तयार करणे अपेक्षित आहे. सध्या शहरी, निमशहरीभाग, ग्रामीण भाग विस्तारत असून नव्या शाळा उभारल्या जातील. मात्र, सध्या नवीन शाळा सुरू करण्याची प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट असून, त्यात सुटसुटीतपणा आणण्यासाठी पावले उचलावीत.

Pune, Pune-Today
17/04/2024 Page No. 102

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# दहावी-बारावीच्या उत्तरपत्रिका आजच जमा करा

## विभागीय सचिव औदुंबर उकिरडे यांचे मुख्याध्यापक, प्राचार्यांना स्पष्ट निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या दहावी-बारावी परीक्षेच्या उत्तरपत्रिका गुरुवारी (दि.१८ एप्रिल) संकलन केंद्रावर जमा कराव्यात अन्यथा संबंधित नियामकास स्वखर्चाने विभागीय मंडळाच्या कार्यालयात उत्तरपत्रिका जमा कराव्या लागतील, असे स्पष्ट निर्देश विभागीय सचिव औदुंबर उकिरडे यांनी राज्य मंडळाशी संलग्न शाळांच्या मुख्याध्यापक, प्राचार्यांना दिले आहेत.

राज्य मंडळाकडून नऊ विभागीय मंडळामार्फत दहावीची परीक्षा १ ते २६ मार्च आणि बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९ मार्चदरम्यान घेण्यात आली. दहावी-बारावीची परीक्षा सुरू असतानाच संबंधित विषयाची परीक्षा संपली की पेपर तपासणीचे काम सुरू होते. पेपर तपासणी झाल्यानंतर संबंधित विषयाच्या उत्तरपत्रिका संकलन केंद्रावर जमा केल्या जातात. परंतु यंदा पुणे, सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यातील नियुक्त नियामकांनी काही अपरिहार्य कारणांमुळे निर्धारित दिनांकास उत्तरपत्रिका जमा केलेल्या नाहीत. उत्तरपत्रिका जमा करण्यासाठी अडचणी आलेले नियामक व त्यांचे प्रमुख नियामक यांच्या अडचणी विचारात घेऊन संबंधितांना उत्तरपत्रिका जमा करण्यासाठी गुरुवारची (दि. १८ एप्रिल) मुदत देण्यात आली आहे. यानंतर मात्र संबंधित नियामकास स्वखर्चाने विभागीय मंडळाच्या कार्यालयात उत्तरपत्रिका जमा कराव्या लागतील, असा स्पष्ट इशारा उकिरडे यांनी दिला आहे.

### या ठिकाणी उत्तरपत्रिका जमा कराव्या:

### संपूर्ण सोलापूर जिल्हा

१. श्रीछत्रपती शिवाजी माध्य. विद्यालय, प्रभात टॉकीजसमोर, सोलापूर (सकाळी ११ ते १)
२. जनता विद्यालय, टेंभुर्णी, जि. सोलापूर (२.३० ते ४.३०)
३. श्रीनारायणदास रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे (५ ते ५.३०)

### संपूर्ण अहमदनगर जिल्हा

१. के. जे. सोमय्या हायस्कूल, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (सकाळी ११ ते १)
२. ए. इ. सो.चे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, अहमदनगर (२.३० ते ४.३०)

### संपूर्ण पुणे जिल्हा

- मंडळ कार्यालय, शिवाजीनगर, पुणे ०५. (कार्यालयीन वेळेत)

Pune Edition
Apr 18, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

***News Paper Clippings During April 2024***

***Section: Education***

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# पूर्वप्राथमिक शिक्षण बोलीभाषेत

## 'एनसीईआरटी'कडून देशभरात ५४ अभ्यासक्रम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये स्थानिक भाषा, मातृभाषेतून शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने एनसीईआरटीने देशभरातील ५४ स्थानिक भाषांत पूर्वप्राथमिक ते दुसरीपर्यंतचा अभ्यासक्रम तयार करून प्रसिद्ध केला आहे. या भाषांमध्ये राज्यातील खान्देशी भाषेचाही समावेश असून, या खान्देशी अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना खान्देशी भाषेतील अक्षरे, शब्द आणि अंकांचे उच्चार, लेखन शिकता येणार आहे.

### वेगळेपण काय?

**खान्देशी भाषा शिक्षण प्रवेशिका या पुस्तकानुसार खान्देशी भाषेतील अक्षरे, शब्द, अंक देण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, अ अऊत (नांगर), आ आकटी (शेकोटी), इ इज (वीज), ई इस्तो (विस्तव), ऐ ऐना (आरसा) अशा पद्धतीने अक्षरे शिकवली जातील. तर यक (एक), सऊ (सहा), दा (दहा), आकरा (अकरा), सोया (सोळा) अशा पद्धतीने अंक शिकवले जाणार आहेत. तसेच कविता, चित्रेही देण्यात आली आहेत.**



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२२मध्ये तीन ते आठ या वयोगटांतील मुलांना त्यांच्या मातृभाषा, घरात बोलली जाणारी भाषा, प्रादेशिक भाषेत शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. आदिवासीबहुल भागातील मुलांना वर्गशिक्षण पद्धती समजू शकत नसल्याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर होतो. त्यामुळे केंद्र सरकारने ३ ते ५ या वयोगटांतील मुलांना, पहिली ते दुसरीच्या मुलांना प्राथमिक स्तरावर मुलभूत साक्षरता देण्याची व्यवस्था केली आहे. त्यात स्थानिक लोकगीते, कथांच्या माध्यमातून मौखिक भाषा विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे.

पुस्तकातील कथा, चित्रे, संवाद याद्वारे हे केले जात आहे. वाचन आणि लेखनाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी, मुलांच्या सोयीसाठी खान्देशी भाषेतील गाणी, शब्द, अक्षरे देण्यात आली आहेत. त्यामुळे मुलांना त्यांच्या मातृभाषेतून मराठी ध्वनि आणि लिपी शिकता येईल. मातृभाषेतील उपलब्ध अक्षरे आणि मातृभाषेत नसलेली मराठी अक्षरे एकत्र करून खान्देशी भाषा शिक्षण प्रवेशिका हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. या पुस्तकाद्वारे ध्वनिची ओळख तसेच वर्णमालेची ओळख होण्यास मदत होणार आहे.

18/04/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*



# संशोधनातील साटेलोटे!

■ शुभदा नगरकर

व्यवसायामध्ये अथवा कामाच्या ठिकाणी आर्थिक किंवा सामाजिक बाबींशी संबंधित कोणताही निर्णय घेताना वैयक्तिक हितसंबंधांना प्राधान्य देण्याने 'स्वारस्य संघर्ष' किंवा 'हितसंबंधांचा संघर्ष' (कॉन्फ्लिक्ट ऑफ इंटरेस्ट्स - सीओआय) निर्माण होतो. म्हणजेच कोणत्याही कामाचे कर्तव्य करीत असताना त्यात वैयक्तिक स्वार्थ किंवा हितसंबंध नसावेत; तसेच एखादी व्यक्ती दोन भूमिका बजावत असताना व्यक्तिगत बाबी बाजूला ठेवून समाजाभिमुख निर्णय घेतला जावा. अशा प्रकारच्या 'हितसंबंधांच्या संघर्षा'ला आपण कधी न कधी सामोरे जातच असतो.

कार्यालयामध्ये वैयक्तिक कामे करणे, शिक्षकाचा मुलगा/मुलगी तो शिकवीत असलेल्या वर्गात असेल, तर त्याला/तिला विशेष वागणूक किंवा उच्च श्रेणी देणे, डॉक्टरांनी कमिशन मिळते म्हणून एखाद्या विशिष्ट कंपनीनीचीच औषधे रुग्णांना (योग्य नसले तरीही) लिहून देणे, आर्थिक गुंतवणूक सल्लागारांना ज्या कंपन्या त्यांच्या उत्पादनांसाठी जास्त कमिशन देतात, त्याच कंपन्यांमध्ये ग्राहकांना गुतंवणूक करावयाचा आग्रह धरणे ही काही याची उदाहरणे. अशा प्रकारचे 'साटेलोटे' मानवाच्या प्रगतीत अडथळे निर्माण करते.

संशोधन हे ज्ञान वाढवण्यात, नावीन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी आणि सामाजिक आव्हानांना सामोरे जाण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. हे आरोग्यसेवा आणि तंत्रज्ञानापासून कला, मानवता, सामाजिक विज्ञान आणि पर्यावरणीय अभ्यासापर्यंत विविध क्षेत्रांमध्ये पुराव्यावर आधारित निर्णय घेण्यास मदत करते. त्यामुळे संशोधनात नैतिकता नसेल, तर असे संशोधन मानवाच्या अधोगतीचे कारण बनू शकते. म्हणूनच संशोधनातील प्रामाणिकता आणि विश्वासार्हता महत्त्वाची. संशोधनात संशोधकाचे हितसंबंध गुंतलेले असतील तर त्या अभ्यासाच्या परिणामांची विश्वासार्हता कमी होते.

संशोधनात वैयक्तिक संबंध गुंतलेले असतील आणि केवळ आर्थिक नफा मिळवणे असाच उद्देश असेल, तर त्या संशोधनाच्या अभ्यासाची रचना, निष्कर्षांचे स्पष्टीकरण आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे राहील. उदाहरणार्थ, बरेच वेळा विद्यापीठातील प्राध्यापक त्याच व्यवसायातील कंपनीसाठी सल्लागार आणि संशोधक म्हणून काम करत असतात. त्यांच्या दुहेरी जबाबदाऱ्यांमुळे, प्राध्यापकांना त्यांच्या संशोधन प्रकल्पांमध्ये ज्ञानाचा निष्पक्ष शोध घेण्यापेक्षा कंपनीच्या हितांना पुढे ठेवण्यास प्रवृत्त केले जाऊ शकते. त्यामुळे 'हितसंबंधांचा संघर्ष' होऊ शकतो. म्हणूनच त्या प्राध्यापकाने त्याचा कंपनीमधील सहभाग स्पष्ट करावा लागतो. तसेच, ज्या कंपनीच्या उत्पादनाचा अभ्यास केला जात आहे याच कंपनीत संशोधक नोकरीस असेल तर अशा कंपनीत संशोधक शेअर्स ठेऊ शकतो किंवा त्याचा संशोधनाशी संबंधित पेटंट असू शकतो. यामुळे संशोधकाला केवळ वैज्ञानिक गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी त्याला आर्थिक फायदा कसा होईल, असे संशोधनाचे परिणाम निर्माण करण्यास कंपनी संशोधकाला प्रवृत्त करू शकते.

चित्र : एआय



**संशोधनात आणि प्रकाशनात कोणत्याही प्रकारचे साटेलोटे घातकच ठरतात. वैयक्तिक किंवा आर्थिक हितसंबंधांमुळे वैज्ञानिक अभ्यासाची विश्वासार्हता तर कमी होतेच; परंतु संशोधनासाठी दिलेला वेळ, निधी याचा अपव्यय होतो.**

अमेरिकेतील 'ऑफिस ऑफ रिसर्च इंटिग्रिटी'ने याबाबतची उदाहरणे दिली असून, औषध उद्योग आणि डॉक्टरांचे आर्थिक संबंध यावर भाष्य केले आहे. कॅनडातील टोरांटो विद्यापीठातील स्टेलफॉक्स आणि सहकाऱ्यांनी कॅल्शियम-चॅनेलच्या संदर्भात प्रकाशित झालेले शोधनिबंध आणि इतर अहवाल यांचा अभ्यास केला. संशोधकांना ज्या कंपन्यांनी निधी पुरविला आहे, त्या कंपनांच्या औषधांना समर्थन देणारे निष्कर्ष प्रसिद्ध केल्याचे या अभ्यासातून आढळले. यावरून औषध कंपन्या आणि संशोधक यांच्यातील संबंध दिसून येतात.

काही वेळेस संशोधकाच्या कुटुंबातील सदस्यदेखील अभ्यासात भाग घेतात. याचा संशोधकाच्या निष्पक्षपातीपणावर आणि निर्णयावर परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे अभ्यासाची प्रामाणिकता धोक्यात येऊ शकते. एकाच क्षेत्रातील संशोधकांमध्ये शत्रुत्व असू शकते. ज्यामुळे ते एकमेकांच्या संशोधनाचे महत्त्व कमी करतात किंवा स्वतःच्या निष्कर्षांना मोठे करून सांगतात. काही संशोधनाच्या शाखांमध्ये संशोधनासाठी मर्यादित निधी उपलब्ध नसतो. अशा वेळी संशोधक अतिरिक्त निधी प्राप्त करण्यासाठी संशोधनाच्या गुणवत्तेशी तडजोड करतात. त्यामुळे अभ्यास मात्र चुकीचा होऊ शकतो आणि निधीचा अपव्यय होऊ शकतो. अशा प्रकारची अनेक प्रकरणे ब्रिटनमधील 'कमिटी ऑफ पब्लिकेशन एथिक्स' या संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. या संस्थेने याबाबत मार्गदर्शक तत्त्वेही दिलेली आहेत.

संशोधनाचे निष्कर्ष रिसर्च जर्नलमध्ये प्रसिद्ध करतानाही वेगवेगळ्या प्रकारचे हितसंबंध गुंतलेले दिसून येतात. यामध्ये संशोधक, प्रकाशक, समीक्षक; तसेच प्रकाशकाचे कर्मचारी यांचे साटेलोटे दिसून येते. जेव्हा संशोधनात पुरेसे योगदान न देणाऱ्या व्यक्तींचा (व्यक्ती मित्र, किंवा परिवारातील सदस्य) लेखक म्हणून समावेश केला जातो तेव्हा लेखनाच्या श्रेयावरून वाद उद्भवू शकतात. रिसर्च जर्नलसचे संपादक, किंवा समीक्षकांचे लेखकांशी वैयक्तिक किंवा व्यावसायिक संबंध असू शकतात, ज्यामुळे 'पीअर रिव्ह्यू' (सहकाऱ्यांद्वारे विश्लेषणाच्या) प्रक्रियेत त्यांच्या पेपर्सना प्राधान्य दिले जाते. उत्कृष्ट जर्नल्स समीक्षकांच्या पुनरावलोकनाची धोरणे तयार करतात, ज्यायोगे या प्रक्रियेमध्ये गोपनीयता आणि पारदर्शकता सुनिश्चित केली जाते. कधी कधी संपादकांवर विशिष्ट प्रकारच्या संशोधनाला प्राधान्य देण्यासाठी दबाव येऊ शकतो.

संशोधक त्यांची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी किंवा पदोन्नतीसाठी उत्कृष्ट जर्नलमध्ये त्यांचे संशोधन प्रकाशित करण्याच्या प्रयत्नात संशोधनाच्या निष्कर्षांचे अवाजवी महत्त्व वाढवतात किंवा नैतिकता पणाला लावणाऱ्या संशोधन प्रकियेमध्ये भाग घेण्यास प्रवृत्त होऊ शकतात. शैक्षणिक संस्था आणि भागीदार व्यावसायिक कंपन्या यांच्यातील संशोधन करारांमध्ये संशोधनाच्या निष्कर्षांच्या प्रकाशनावर नियंत्रण ठेवणारी कलमे असू शकतात, ज्यामुळे शैक्षणिक स्वातंत्र्य आणि व्यावसायिक हितसंबंधांमध्ये संघर्ष निर्माण होतो. प्रथितयश प्रकाशकांनी आणि संशोधकांनी 'हितसंबंधांचा संघर्ष' नसल्याचे स्पष्ट करण्याचा आग्रह म्हणूनच धरला जातो.

असे संबंध शासकीय समित्या, धोरणे ठरवणारी आस्थापने, प्रकल्प मान्य करणाऱ्या समित्या अशा अनेक ठिकाणी काम करणाऱ्या अधिकारी व्यक्तींनाही लागू होतात. विशिष्ट ज्ञानशाखांत कार्य करत असताना संबंध तयार होतातच. एखाद्या विषयातील तज्ज्ञ उद्योगाशीही संबंधित असणे यात प्रत्येक वेळी काळेबेरे असतेच, असेही नसते. अशावेळी संबंध व हितसंबंध यातील फरक ओळखणे आवश्यक ठरते. याकरिता आपले संबंध लपवून न ठेवता ते उघडपणे नमूद करण्याचा मार्गही उपलब्ध असतोच. म्हणून महत्त्वाच्या पदांवर काम करत असताना किंवा काहीही प्रकाशित करताना इतर जबाबदारी, आर्थिक लाभ, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायद्याच्या शक्यता गृहीत धरून असे संबंध उघडपणे सांगणे अत्यावश्यक ठरते.

संशोधनात आणि प्रकाशनात कोणत्याही प्रकारचे साटेलोटे घातकच ठरते. वैयक्तिक किंवा पैशाच्या हितसंबंधांमुळे वैज्ञानिक अभ्यासाची विश्वासार्हता तर कमी होतेच; परंतु संशोधनासाठी दिलेला वेळ, निधी याचा अपव्यय होतो. उच्च शिक्षण संस्थांनी कितीही धोरणे आणली तरी वैयक्तिक नैतिकतेला पर्याय नाही. व्यापक सामाजिक भान लक्षात ठेवून संबंधित व्यक्तींनीच स्वतःहून याचा विचार करण्याची संवेदनशीलता निर्माण करणे हे शिक्षण व्यवस्थे पुढचे आव्हान आहे.

**(लेखिका सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रकाशन नैतिकता केंद्राच्या समन्वयक आहेत.)**

Maharashtra Times 18.4.2024

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

सकाळ

# विद्यार्थ्यांच्या अडचणींचा आढावा

## पीएच.डी.बाबत बहुतांश संशोधन केंद्रांमध्ये बैठका पूर्ण

**पुणे, ता. १७ :** पीएच.डी.च्या संशोधक विद्यार्थ्यांच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी बहुतांश संशोधन केंद्रांमध्ये ऑनलाइन बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवार(ता. १६)पर्यंत अशी बैठक न घेतलेल्या केंद्रांना पुन्हा एकदा सूचित करण्यात येणार आहे. तसेच एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विद्यापीठ स्तरावर केंद्र समन्वयकांची आढावा बैठक घेण्यात येणार आहे.

सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील संशोधक मार्गदर्शकाला लाच घेताना पकडण्यात आले होते. त्यानंतर पीएच.डी. प्रक्रियेतील संपूर्ण काळाबाजारच 'सकाळ'ने चव्हाट्यावर आणला होता. त्याची दखल घेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संशोधन केंद्रांना विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी ऑनलाइन बैठकांचे आयोजन करत अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. मंगळवारपर्यंत नगर, नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील बहुतांश केंद्रांच्या बैठकी पार पडल्या आहेत. संशोधन केंद्रप्रमुखांनी पीएच.डी. मार्गदर्शकांची बैठक घ्यावी, त्याचबरोबर संशोधनाची गुणवत्ता टिकवताना विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची अडवणूक, नुकसान आणि दिरंगाई होणार नाही, याबद्दल दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची विषयनिहाय बैठक घेतल्यानंतर अडचणींचे निराकरण तातडीने करावे. तसेच विद्यार्थी आणि मार्गदर्शकांच्या स्वतंत्र बैठकींचा अनुपालन अहवाल सादर करावा, असे विद्यापीठाने सांगितले होते.

> बहुतांश संशोधन केंद्रांनी पीएच.डी. विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन बैठका घेतल्या आहेत. राहिलेल्या केंद्रांना सक्त सूचना दिल्या जातील. लवकरच केंद्र समन्वयकांची विद्यापीठ स्तरावर ऑनलाइन बैठक पार पडेल.
>
> **- डॉ. पराग काळकर,**
> प्र-कुलगुरू,
> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**आकडे बोलतात...**

**एक हजार**
सावित्रीबाई पुणे विद्यापीठातील नोंदणीकृत मार्गदर्शक

**२५०**
मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे

**१३ हजार (अंदाजे)**
संशोधन केंद्रांमधून पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

**साधारण दीड हजार**
दरवर्षीची पीएच.डी. प्रवेश संख्या

Pune, Main
18/04/2024 Page No. 3

## News Paper Clippings During April 2024

## Section: Education

**सामना**

# राष्ट्रीय शिक्षण धोरणात खान्देशीला मानाचं पान

**पुणे, दि. १८ ( प्रतिनिधी ) - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये स्थानिक भाषा, मातृभाषेतून शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने एनसीईआरटीने देशभरातील ५४ स्थानिक भाषांत पूर्वप्राथमिक ते दुसरीपर्यंतचा अभ्यासक्रम तयार करून प्रसिद्ध केला आहे. या भाषांमध्ये राज्यातील खान्देशी भाषेचाही समावेश असून, या खान्देशी अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना खान्देशी भाषेतील अक्षरे, शब्द आणि अंकांचे उच्चार, लेखन शिकता येणार आहे.**



## स्थानिक मातृभाषेतून विद्यार्थ्यांना अक्षर ओळरव

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२२मध्ये तीन ते आठ या वयोगटांतील मुलांना त्यांच्या मातृभाषा, घरात बोलली जाणारी भाषा, प्रादेशिक भाषेत शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. आदिवासीबहुल भागातील मुलांना वर्गशिक्षण पद्धती समजू शकत नसल्याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर होतो. त्यामुळे केंद्र सरकारने ३ ते ५ या वयोगटांतील मुलांना, पहिली ते दुसरीच्या मुलांना प्राथमिक स्तरावर मूलभूत साक्षरता देण्याची व्यवस्था केली आहे. त्यात स्थानिक लोकगीते, कथांच्या माध्यमातून मौखिक भाषा विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे.

पुस्तकातील कथा, चित्रे, संवाद याद्वारे हे केले जात आहे. वाचन आणि लेखनाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी, मुलांच्या सोयीसाठी खान्देशी भाषेतील गाणी, शब्द, अक्षरे देण्यात आली आहेत. त्यामुळे मुलांना त्यांच्या मातृभाषेतून मराठी ध्वनी आणि लिपी शिकता येईल. मातृभाषेतील उपलब्ध अक्षरे आणि मातृभाषेत नसलेली मराठी अक्षरे एकत्र करून खान्देशी भाषा शिक्षण प्रवेशिका हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. या पुस्तकाद्वारे ध्वनीची ओळख तसेच वर्णमालेची ओळख होण्यास मदत होणार आहे.

### वेगळेपण काय?

- खान्देशी भाषा शिक्षण प्रवेशिका या पुस्तकानुसार खान्देशी भाषेतील अक्षरे, शब्द, अंक देण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, अ अऊत (नांगर), आ आकटी (शेकोटी), इ इज (वीज), ई ईस्तो (विस्तव), ऐ ऐना (आरसा) अशा पद्धतीने अक्षरे शिकवली जातील. तर यक (एक), सऊ (सहा), दा (दहा), आकरा (अकरा), सोया (सोळा) अशा पद्धतीने अंक शिकवले जाणार आहेत. तसेच कविता, चित्रेही देण्यात आली आहेत.

Pune Edition
Apr 19, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

सकाळ

# शाळांमध्ये बदलांचा 'श्री गणेशा'

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कृती, उपक्रमशील शिक्षणावर भर

**मीनाक्षी गुरव** : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. १८ : प्रत्यक्ष अनुभव, उपक्रमातून अभ्यासक्रमातील संकल्पना विद्यार्थ्यांना शिकवणे, मातृभाषेबरोबरच विविध भाषांची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे असो वा शिकविण्याच्या नावीन्यपूर्ण संकल्पनांच्या अनुषंगाने शिक्षकांना प्रशिक्षण देणे असो, याद्वारे आता शाळांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून महत्त्वाकांक्षी बदलांची नांदी झाल्याचे दिसून येत आहे.**

खराडी येथील सुंदरबाई मराठे विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय सोमवंशी म्हणाले, ''राज्य सरकारच्या शिक्षण विभागाने 'एनईपी'च्या अनुषंगाने शिक्षकांना आणि मुख्याध्यापकांना प्रशिक्षण दिले आहे. परंतु, सरकारी स्तरावर हे धोरण कधीपासून लागू करायचे याबाबत स्पष्टता करण्यात आलेली नाही. शैक्षणिक वर्ष २०२३-२४पासून हे धोरण लागू होणार असे यापूर्वी सांगण्यात आले होते, परंतु त्याप्रमाणे धोरण लागू करण्यात आले नाही. अनुदानित शाळा असल्याने कोणतेही नवे बदल करताना सरकारची परवानगी घ्यावी लागते. परंतु, विद्यार्थ्यांना व्यवहार, कौशल्य आणि व्यवसायावर आधारित ज्ञान देण्यासाठी शाळा स्तरावर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.''

### शाळांनी अशी केली पूर्वतयारी

- केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापेक्षा त्यातील संकल्पना समजणे आणि त्यांचा प्रत्यक्षात वापरावर भर
- उपक्रम, प्रकल्पांवर आधारित परीक्षा पद्धती
- कौशल्य आणि व्यावसायिक शिक्षणासाठी विविध पातळ्यांवर चाचपणी सुरू
- उद्योगसमूह, विविध संस्था यांच्या सुसंवाद वाढविणे
- शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक, तज्ज्ञ यांचे मार्गदर्शन घेणे
- विद्यार्थ्यांच्या गुणांकनाला महत्त्व देण्याऐवजी मूल्यमापन
- क्षमतांचे विश्लेषण करण्याला प्राधान्य देणे
- मातृभाषेबरोबरच परदेशी भाषा शिकविणे
- जीवनकौशल्य शिकविण्याला महत्त्व
- विद्यार्थ्यांमधील क्रिटिकल थिंकिंग, डिझाइन थिंकिंग विस्तारावर भर

### अशी आहे स्थिती

- शालेयस्तरावर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (२०२०) अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या नाहीत
- परिणामी, शाळा स्तरावर 'एनईपी'ची अंमलबजावणी कधीपासून होणार, याबाबत शाळांमध्ये संभ्रम कायम
- 'एनईपी'च्या अंमलबजावणीच्या दृष्टीने पूर्वतयारी म्हणून शाळांनी नवे बदल स्वीकारत पावले उचलण्यास सुरुवात केली आहे

"एनईपी ही प्रक्रिया असून मुलांच्या समग्र विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल आहे. धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आणखी स्पष्टता आणण्याची, प्रशिक्षण देण्याची गरज आहे. खासगी शाळा म्हणून कौशल्य आणि व्यावसायिक शिक्षणाला आधीपासूनच महत्त्व दिले जात आहे. आता त्याला अधिकाधिक तंत्रज्ञानाची जोड देण्याच्यादृष्टीने पावले उचलली जातील.

**- डॉ. तृप्ती आगरवाल,**
अध्यक्ष, विश्वकर्मा ग्रुप ऑफ स्कूल्स

"शिक्षकांना देशासह सिंगापूर, फिनलंड येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जात आहे. पारंपरिक परीक्षा पद्धतीला छेद देत अभ्यासक्रमातील संकल्पना विद्यार्थ्यांना समजल्या आहेत की नाही, यासाठी उपक्रमशील परीक्षांची आखणी केली आहे. परीक्षेतून विद्यार्थ्यांचे केवळ गुणांकन करण्याऐवजी त्यांचे मूल्यांकन, निरीक्षणशक्ती आणि त्यांच्या क्षमतांचे विश्लेषण केले जाते.

**- मिलिंद लडगे,**
मुख्य व्यवस्थापकीय संचालक, आर्यन्स वर्ल्ड स्कूल

"'एनईपी'च्या धर्तीवर माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन यांच्या संपर्क साधण्यात येणार आहे. कौशल्यावर आधारित शिक्षण देण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना कंपन्यांची ओळख करून देण्यात येणार आहे.

**- संजय सोमवंशी**, मुख्याध्यापक,
सुंदरबाई मराठे विद्यालय, खराडी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टिकोनातून आपल्या शाळांमध्ये होत असलेल्या पूर्वतयारीबाबत आणि धोरणाच्या अंमलबजावणीबाबत तुमचे मत नावासह क्यूआर कोड स्कॅन करून किंवा editor.pune@esakal.com या मेलवर, तसेच ८४८४९७३६०२ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर कळवा.

Pune, Pune-Today
19/04/2024 Page No. 3

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

लोकमत

# राज्य मंडळाच्या शाळांमध्येही लागू होणार 'क्रेडिट सिस्टिम'

## शिक्षण आयुक्तांचे सूतोवाच : अन्य कौशल्यांनाही मिळणार वाव

लोकमत विशेष

अविनाश साबापुरे
लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** विद्यार्थी केवळ पुस्तकी हुशार न बनता त्यांना प्रत्यक्ष जीवनकौशल्ये आत्मसात करता यावी, यासाठी नव्या शिक्षण धोरणात खास तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण 'परफॉर्मन्स' पाहून त्यांना 'क्रेडिट' दिले जाणार आहे. ही क्रेडिट पद्धती सीबीएसई शाळांपाठोपाठ आता राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांमध्येही लागू केली जाणार आहे.

२०२४-२५ या सत्रापासून इयत्ता नववी आणि अकरावीसाठी ही पद्धती लागू केली जाणार आहे. तर २०२५-२६ या सत्रात इयत्ता दहावी आणि बारावीसाठी लागू केली जाणार आहे. सीबीएसई शाळांमध्ये इयत्ता सहावी, नववी आणि अकरावीसाठी ही पद्धती लागू करणार असल्याचे सीबीएसई बोर्डाने नुकतेच जाहीर केले आहे.



### पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना वापरता येणार क्रेडिट

- राज्य मंडळाच्या शाळांमध्ये क्रेडिट पद्धती लागू करण्याबाबत राज्याचे शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी सूतोवाच केले आहे.
- विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे क्रेडिट 'अ‍ॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट'मध्ये जमा करून ठेवले जाणार आहे.
- बँकेतील या क्रेडिटचा विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेतेवेळी उपयोग होण्याची शक्यता आहे.

### असे दिले जाईल क्रेडिट

१ प्रत्येक वर्षात १२०० शैक्षणिक तासिका विद्यार्थ्यांना पूर्ण कराव्या लागतील.

२ त्या बदल्यात त्यांना ४० श्रेयांक किंवा क्रेडिट दिले जातील.

३ श्रेयांकाच्या मोजणीसाठी दर ३० तासिकांसाठी एक श्रेयांक असे सूत्र असेल.

४ एखाद्या विद्यार्थ्याला या ४० श्रेयांकापेक्षाही अधिक श्रेयांक मिळविता येतील.

५ त्यासाठी विद्यार्थ्याला आवडीप्रमाणे अतिरिक्त अभ्यासक्रम, कार्यक्रम, विषय, प्रकल्प घेता येतील.

### या गोष्टींसाठी मिळेल क्रेडिट

वर्गातील शिक्षण, प्रात्यक्षिक, नवोपक्रम प्रयोगशाळेतील कामगिरी, वर्गातील प्रकल्प, क्रीडा, योग, शारीरिक उपक्रम, विविध कलाप्रकार, संगीत, हस्तकला, सामाजिक कार्य, राष्ट्रीय छात्र सेना, परीक्षा, चाचण्या, व्यावसायिक शिक्षण, प्रशिक्षण आणि कौशल्य शिक्षण, क्षेत्रभेटी, प्रत्यक्ष कार्यानुभव, इंटर्नशिप, अ‍ॅप्रेंटिसशिप आदींमधील विद्यार्थ्यांचा सहभाग व कामगिरी लक्षात घेऊन क्रेडिट दिले जाणार आहेत.

कला, क्रीडा, व्यवसाय शिक्षण या बाबींचा आजच्या शिक्षण पद्धतीत 'एक्स्ट्रा करिक्युलर' म्हणून समावेश आहे. परंतु, आता क्रेडिट सिस्टिममुळे तो सिलॅबसचाच भाग बनेल. राज्य मंडळाच्या शाळांमध्ये क्रेडिट सिस्टिम याच सत्रात लागू होईल का, हे आताच नाही सांगता येणार, मात्र लवकरात लवकर लागू करण्याचा प्रयत्न आहे.

**- सूरज मांढरे,** शालेय शिक्षण आयुक्त

Pune Main
Page No. 8 Apr 19, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# नवीन शैक्षणिक वर्ष ऑगस्टमध्ये सुरू होणार

## 'यूजीसी'चे देशातील विद्यापीठांना पत्र

**पुणे, ता. १९ :** कोरोनानंतर जवळपास सर्वच विद्यापीठांचे शैक्षणिक वेळापत्रक पूर्ववत होत आहे. अनेक राज्यांत नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. याच पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) नवीन शैक्षणिक वर्ष ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

'यूजीसी'ने सर्व विद्यापीठांना तसे पत्र पाठविले असून पदवीपूर्व वर्ग ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे विस्कळित झालेले शैक्षणिक वेळापत्रक पुर्ववत होण्यास मदत होईल. 'यूजीसी'ने विद्यापीठांना नियमांचा संदर्भ देत शैक्षणिक वेळापत्रक लवकर प्रसिद्ध करण्यास सांगितले आहे. त्यामुळे संस्थेचे व संलग्न महाविद्यालयांचे शैक्षणिक उपक्रम वेळेत पार पाडता येतील. शैक्षणिक सत्र पुन्हा रुळावर आणण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून 'यूजीसी'ने मागील पदवी वर्गांचे निकाल जूनच्या अखेरीस जाहीर करण्याचीही सूचना दिली आहे.

### पुणे विद्यापीठाचीही तयारी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची उन्हाळी सत्र परीक्षा सुरू झाली आहे. शनिवारनंतर (ता.२०) बहुतेक विद्याशाखांच्या लेखी परीक्षा सुरू होतील. जूनअखेरपर्यंत सर्व अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. त्यामुळे ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये सुरू होण्याची अपेक्षा आहे.

Pune, Main
20/04/2024 Page No. 5

## *News Paper Clippings During April 2024*

### *Section: Education*

सकाळ

# आता आंतरवासिता कक्ष अनिवार्य

## विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचना जाहीर; ८ ते १२ श्रेयांक

**पुणे, ता. १९ : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पदवी अभ्यासक्रमांना आठ ते १२ श्रेयांकाची आंतरवासिता (इंटर्नशिप) बंधनकारक करण्यात आली आहे. त्यासाठी आता महाविद्यालयांत आंतरवासिता कक्ष स्थापन करणे अनिवार्य असून, मार्गदर्शक सूचनाही विद्यापीठाने जारी केल्या आहेत.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५पासून एनईपीची अंमलबजावणी होत आहे. पदवी अभ्यासक्रम आता चार वर्षांचा होणार असून, त्यात आंतरवासिता अनिवार्य करण्यात आली आहे. पारंपारिक किंवा व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रत्येक सत्रात आठ ते १२ श्रेयांकांची आंतरवासिता अपेक्षित आहे. त्या दृष्टीने पूर्वनिर्धारित, कालबद्ध, प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना प्रदान करण्यासाठी ही केंद्रे कार्यरत असणार आहेत. संशोधनाबरोबरच कार्यानुभवाचा अनुभव विद्यार्थ्यांना याद्वारे मिळणार आहे.

> “ आंतरवासिता कक्षासाठी प्रत्येक महाविद्यालयाला नोडल अधिकाऱ्याची नोंदणी करण्यास सांगितले आहे. तसेच विद्यापीठ स्तरावरील इंटर्नशिप पोर्टलमध्ये उपलब्ध सुविधांचाही विद्यार्थ्यांना पुढील काळात वापर करता येईल.
> **- डॉ. पराग काळकर,** प्रकुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### केंद्राची उद्दिष्टे

- औद्योगिक किंवा व्यावसायिक वातावरणाचा विद्यार्थ्यांना अनुभव करून देणे
- व्यवसायासाठी आवश्यक विश्लेषणात्मक आणि व्यवस्थापकीय कौशल्य संपादित करण्याची संधी उपलब्ध करणे
- रोजगार आणि संशोधनाच्या दृष्टीने कौशल्य विकास आणि संधी उपलब्ध करणे

### केंद्राची कार्यपद्धती

- स्थानिक उद्योग, सेवा आणि व्यावसायिकांच्या गरजा ओळखून विद्यार्थ्यांना प्रकल्प उपलब्ध करणे
- नवीन संस्था, आस्थापने, प्रयोगशाळा शोधणे आणि त्यांना विद्यार्थ्यांशी जोडून देणे
- शैक्षणिक संस्थांनी उद्योगांशी दीर्घकालीन करार करणे
- उद्योग, विषयतज्ज्ञ, संघटना, आस्थापने आणि विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी डिजिटल पोर्टल तयार करणे
- विद्याशाखानिहाय मार्गदर्शन आणि पर्यवेक्षण करणे
- विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी तज्ज्ञांची उपलब्धता करणे

### कोणाकडून मिळणार आंतरवासिता

- औद्योगिक क्षेत्र, सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योग, व्यावसायिक आस्थापना, बँक व वित्तीय संस्था, अशासकीय संस्थांकडील आंतरवासिता उपलब्ध करावयाची आहे.

Pune, Main
20/04/2024 Page No. 5

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# बीबीए, बीएमएस, बीसीए प्रवेश परीक्षा नोंदणीसाठी मुदतवाढ

## आतापर्यंत ४८ हजार १८२ विद्यार्थ्यांची नोंदणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन (बीसीए) पदवी अभ्यासक्रमांच्या समाईक प्रवेश परीक्षेसाठी (सीईटी) ४८ हजार १८२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या परीक्षेच्या नोंदणीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षाने घेतला आहे.

एमबीए, एमसीए या व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या धर्तीवर बीसीए, बीबीए, बीएमएस हे पदवी अभ्यासक्रम आपल्या अखत्यारित घेण्याचा निर्णय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) घेतला. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची सीईटी राज्य सीईटी सेलकडून घेण्यात येते. त्याच धर्तीवर बीसीए, बीबीए, बीएमएस या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीही प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे.

या परीक्षेतील गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया होणार आहे. त्यानुसार बीबीए, बीसीए, बीएमएस अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या सीईटीची नोंदणी सुरू केली. राज्य सीईटी सेलचे आयुक्त महेंद्र वारभुवन यांनी दिलेल्या माहितीनुसार बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम प्रवेश सीईटीसाठी नोंदणीसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम, एमबीए, एमसीए एकात्मिक अभ्यासक्रम सीईटी २७ ते २९ मे या कालावधीत होईल.

### ‘नर्सिंग’साठी नोंदणी

**सीईटी सेलने दिलेल्या माहितीनुसार, बीएस्सी नर्सिंग या अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी ५४ हजार ४१३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या अभ्यासक्रमाच्या सीईटीच्या नोंदणीसाठी २५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.**

20/04/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# पदवी अभ्यासक्रमानंतर आता थेट पीएच.डी.ला प्रवेश

### यूजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेशकुमार यांची माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

### जून २०२४च्या सत्रापासून अंमलबजावणी

**चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील कोणत्याही शाखेच्या उमेदवारांना त्यांना ज्या विषयात पीएच.डी. करायची आहे, त्यासाठी परीक्षा देण्याची परवानगी देण्यात आली आहे. जून २०२४च्या सत्रापासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे.**

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोग राष्ट्रीय पात्रता परीक्षेमध्ये (यूजीसी नेट) एक मोठा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार चार वर्षे, आठ सत्रांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहे. विद्यार्थ्याने ज्या विषयात पदवी मिळवली असेल, त्या विषयात पीएच.डी. करता येणार आहे. यूजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेशकुमार यांनी एक्स या समाजमाध्यमाद्वारे ही माहिती दिली.

सहायक प्राध्यापक पदासाठी, कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीसाठी यूजीसी-नेट ही परीक्षा राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणामार्फत (एनटीए) वर्षातून दोन वेळा घेतली जाते. डिसेंबर आणि जून अशा सत्रांत ही परीक्षा होते. अलीकडेच यूजीसीने घेतलेल्या निर्णयानुसार पीएच.डी.साठी नेट परीक्षेतून प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठांतर्फे घेतल्या जाणाऱ्या पीएच.डी. प्रवेशपरीक्षेची आवश्यकता संपुष्टात आली आहे. यूजीसी-नेट परीक्षेची नोंदणी प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रा. एम. जगदेशकुमार यांनी बदलाची माहिती दिली.

यापूर्वीच्या नियमानुसार यूजीसी नेट परीक्षा देण्यासाठी उमेदवार पदव्युत्तर पदवीधारक असणे आवश्यक होते. तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला असलेल्या विषयात उमेदवारांना पीएच.डी. करता येत होती. प्रा. जगदेशकुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षातील अथवा सत्रातील उमेदवारांना नेट परीक्षा देऊ शकतो.

21/04/2024 | LS_SUN_City | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# चार वर्षांच्या पदवीनंतर आता थेट यूजीसी नेट परीक्षेसाठी पात्र

### यूजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेशकुमार यांची माहिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोग राष्ट्रीय पात्रता परीक्षेमध्ये (यूजीसी नेट) एक मोठा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार चार वर्षे, आठ सत्रांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहे. विद्यार्थ्याने ज्या विषयात पदवी मिळवली असेल, त्या विषयात पीएच.डी. करता येणार आहे.

यूजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेशकुमार यांनी समाजमाध्यमाद्वारे ही माहिती दिली. सहायक प्राध्यापक पदासाठी, कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीसाठी यूजीसी-नेट ही परीक्षा राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणामार्फत (एनटीए) वर्षातून दोनवेळा घेतली जाते. डिसेंबर आणि जून अशा सत्रांत ही परीक्षा होते. अलीकडेच यूजीसीने घेतलेल्या निर्णयानुसार पीएच.डी.साठी नेट परीक्षेतून प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठांतर्फे घेतल्या जाणाऱ्या पीएच.डी. प्रवेश परीक्षेची आवश्यकता संपुष्टात आली आहे. यूजीसी-नेट परीक्षेची नोंदणी प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रा. एम. जगदेशकुमार यांनी बदलाची माहिती दिली. यापूर्वीच्या नियमानुसार यूजीसी नेट परीक्षा देण्यासाठी उमेदवार पदव्युत्तर पदवीधारक असणे आवश्यक होते. तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला असलेल्या विषयामध्येच उमेदवारांना पीएच.डी. करता येत होती.

प्रा. जगदेशकुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षातील उमेदवारांना नेट परीक्षा देता येणार आहे. चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील कोणत्याही शाखेच्या उमेदवारांना त्यांना ज्या विषयात पीएच.डी. करायची आहे. त्यासाठी परीक्षा देण्याची परवानगी देण्यात आली आहे. जून २०२४ च्या सत्रापासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

Pune Edition
Apr 21, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# दहावी-बारावीचा निकाल यंदा मे महिन्यातच!

**पुढारी विशेष**

**गणेश खळदकर**
पुढारी प्रतिनिधी

- **बारावीचा तिसऱ्या, तर दहावीचा चौथ्या आठवड्यात निकाल**
- **उत्तरपत्रिका संकलित करण्यावर सध्या राज्य मंडळाचा भर**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावी-बारावी परीक्षेचा निकाल यंदा पहिल्यांदाच मे महिन्यात जाहीर होणार आहे. मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात बारावीचा, तर चौथ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने राज्य मंडळ जलदगतीने तयारी करीत असल्याची माहिती राज्य मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

राज्य मंडळाकडून नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावीची परीक्षा १ ते २६ मार्च आणि बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९ मार्च यादरम्यान घेण्यात आली. दहावी-बारावीची परीक्षा सुरू असतानाच संबंधित विषयाची परीक्षा संपली की पेपर तपासणीचे काम सुरू करण्यात आले होते. पेपर तपासणी झाल्यानंतर संबंधित विषयाच्या उत्तरपत्रिका जमा करण्यासाठी संकलन केंद्रांवर जमा करण्यासाठी ठरावीक मुदत देण्यात आली होती. त्यानुसार उत्तरपत्रिका संकलित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. दरवर्षी कोकण आणि मुंबई विभागाकडून उत्तरपत्रिका संकलन **पान ६ वर ▸**

Pune Edition
Apr 20, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# दहावी-बारावीचा निकाल यंदा मे महिन्यातच!

**(पान १ वरून)**

आणि अन्य काम उशिरापर्यंत सुरू असते. यंदा मात्र या दोन्ही विभागांचे काम पूर्ण झाले आहे. तसेच, राज्य मंडळाने यंदा उत्तरपत्रिका ठरावीक ठिकाणी जाऊन गोळा करण्यासाठी यंत्रणा कामाला लावली आहे. त्यामुळे उत्तरपत्रिका गोळा करण्यासाठीचा कालावधी वाचला आहे. तसेच, परीक्षा झाली की दरवर्षी उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार किंवा परीक्षा काळात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा कामास नकार, असे प्रकार सर्रास घडतात. यंदा मात्र असे कोणतेही प्रकार घडलेले नाहीत. त्याचबरोबर जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देशात लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीचे वातावरण राहणार आहे. त्यामुळे देखील निकाल लवकर लावण्यावर राज्य मंडळाचा भर असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

दरवर्षी बारावीचा निकाल जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात, तर दहावीचा निकाल जुलै महिन्यात पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात लागत असतो. परंतु, यंदा मात्र परीक्षांमध्ये कोणताही मोठा गैरप्रकार होण्यापासून रोखण्याची कामगिरी करणाऱ्या राज्य मंडळाने निकाल लवकर लावण्यासाठी पावले उचलली आहेत. त्यामुळे यंदा पहिल्यांदाच मे महिन्यातच दोन्ही निकाल जाहीर होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

> ❝ यंदा दहावी तसेच बारावीचा निकाल मे महिन्यातच जाहीर करण्यासाठी राज्य मंडळ प्रयत्नशील आहे. त्यानुसार मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात बारावीचा, तर चौथ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर करण्याचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने राज्य मंडळाकडून दैनंदिन फॉलोअप सुरू असून, निकालाचे काम जलदगतीने करण्यासाठीच्या आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.
>
> \- **शरद गोसावी**, अध्यक्ष,
> महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

Pune Edition
Apr 20, 2024 Page No. 08
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

लोकमत

# आता पीजी नसले तरी करता येईल पीएचडी

## ७५% गुणांसह ४ वर्षांची पदवी हीच असेल पात्रता

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पीएचडी तसेच नेट परीक्षा देण्यासाठी आता पदव्युत्तर पदवी असण्याची आवश्यकता नसणार आहे. चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम ७५ टक्के गुणांसह वा समकक्ष गुण मिळालेले विद्यार्थी आता नेट व पीएचडीसाठी पात्र ठरतील, अशी माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) अध्यक्ष जगदीश कुमार यांनी दिली. आतापर्यंत विद्यार्थ्यांना पीएचडीसाठी पदव्युत्तर पदवी ५५ टक्के गुणांसह उत्तीर्ण होणे आवश्यक होते.

पीएचडीची प्रवेश प्रक्रिया शनिवारपासून सुरू झाली असून ती १० मेपर्यंत सुरू राहणार आहे. यंदाच्या वर्षी १६ जून रोजी होणारी परीक्षा ही ऑनलाइन ऐवजी ऑफलाइन पद्धतीने होणार आहे. याबाबत माहिती देताना कुमार म्हणाले, चार वर्षांची पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याला पीएचडी प्रवेश परीक्षेला बसता येईल. विशेष म्हणजे त्याने ज्या विषयात पदवी प्राप्त केली, त्याशिवाय अन्य विषयातही त्यास पीएचडी करता येईल. केवळ त्याने ७५ टक्के वा समकक्ष गुण प्राप्त करणे अनिवार्य आहे.

### आरक्षित गटास ५ टक्के सवलत

पीएचडी प्रवेश परीक्षेसाठी एससी, एसटी, ओबीसी, दिव्यांग, ईडब्ल्यूएस आदी आरक्षित गटाला ५ टक्के गुणांची सवलत दिली जाईल, असेही कुमार म्हणाले.

Mumbai Main
Page No. 1 Apr 22, 2024
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

### शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी वेळापत्रक जाहीर करा

#### 'यूजीसी'चे उच्च शिक्षण संस्थांना निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी विद्यापीठांनी त्यांचे शैक्षणिक वेळापत्रक जाहीर करावे. वर्षभरात होणाऱ्या सर्व उपक्रमांचा, पदवी प्रदानासंदर्भातील तारखांचाही त्यात समावेश असला पाहिजे. उच्च शिक्षण संस्थांनी शैक्षणिक वर्ष सुरू करणे, परीक्षेचे वेळापत्रक, निकाल जाहीर करणे याबाबतच्या नियोजनाचे पालन करावे, असे स्पष्ट निर्देश विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने उच्च शिक्षण संस्थांना दिले आहेत. यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी यासंदर्भातील परिपत्रक जाहीर केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांना निर्देश दिले आहेत. त्यानुसार बिगरव्यावसायिक पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे वर्ग ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात, तर द्वितीय वर्षाचे वर्ग जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात सुरू पान ८ वर ▸

Pune Edition
Apr 22, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

### शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी वेळापत्रक जाहीर करा

(पान १ वरून) करावे लागणार आहेत. तसेच सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जुलैअखेरपर्यंत जाहीर करावे लागणार आहेत. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांचे शैक्षणिक वर्ष विस्कळीत झाले होते. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ते बऱ्याच प्रमाणात पूर्वपदावर आले आहे. या पार्श्वभूमीवर यूजीसीकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सुरू करण्याच्या अनुषंगाने सूचना दिल्या आहेत. नव्या शैक्षणिक वर्षाचे वर्ग सुरू करण्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्ष आणि त्या पुढील विद्यार्थ्यांना प्रकल्प, कार्यप्रशिक्षण (इंटर्नशिप) वगैरे लक्षात घेता दोन आठवड्यांची सवलत देता येऊ शकते. उच्च शिक्षण संस्थांच्या शैक्षणिक वेळापत्रकात शैक्षणिक वर्षातील वर्ग सुरू होणे, परीक्षा, सुट्ट्या, शैक्षणिक सत्राचा शेवटचा दिवस अशी माहिती दिलेली असते. शैक्षणिक वेळापत्रकामुळे संबंधित सर्व भागधारकांना वर्षभरातील कार्यक्रमांचे नियोजन करणे शक्य होते. त्यामुळे सुनियोजित वेळापत्रक जाहीर केल्याने शैक्षणिक उपक्रम नियोजनानुसार पूर्ण करणे शक्य होते. तसेच संशोधनामध्ये गुणवत्तेचा प्रचार होण्यास मदत होते. त्याअनुषंगाने यूजीसीकडून (औपचारिक शिक्षणाद्वारे प्रथम पदवी मान्य करण्यासाठी किमान मानक सूचना) वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

Pune Edition
Apr 22, 2024 Page No. 08
Powered by: erelego.com

***News Paper Clippings During April 2024***

***Section: Education***

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# यूजीसी नेट १६ जूनला

## १० मेपर्यंत करता येणार ऑनलाइन अर्ज

- **१३ ते १५ मेदरम्यान अर्जात दुरुस्तीची संधी**
- **जून परीक्षेपासून काही महत्त्वाचे बदल**



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणातर्फे विद्यापीठ अनुदान आयोग राष्ट्रीय पात्रता परीक्षेसाठी (यूजीसी नेट) अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार १० मेपर्यंत अर्ज करता येणार आहे. १३ ते १५ मेदरम्यान अर्जात दुरुस्ती करण्याची संधी देण्यात येणार असून, परीक्षा १६ जूनला घेतली जाणार आहे. एनटीएने या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

डिसेंबर आणि जून अशी वर्षातून दोन वेळा यूजीसी नेट ही परीक्षा घेतली जाते. यूजीसीने जूनमध्ये होणाऱ्या परीक्षेपासून काही महत्त्वाचे बदल केले आहेत. त्यानुसार नेट परीक्षेद्वारे कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीसह सहायक प्राध्यापक पदासाठीची पात्रता, सहायक प्राध्यापक पदासह पीएच.डी. प्रवेशासाठीची पात्रता, केवळ पीएच.डी.साठी प्रवेश दिला जाणार आहे. तसेच, चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाच्या, शेवटच्या सत्राच्या विद्यार्थ्यांनाही थेट पीएच.डी.ला प्रवेश देण्यासाठी नेट परीक्षा देता येणार आहे. त्यामुळे जूनमध्ये होणारी परीक्षा अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

**दोन्ही प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी**

अधिकृत सूचनेनुसार, १६ जूनला होणारी परीक्षा ८३ विषयांसाठी घेतली जाणार आहे. ही परीक्षा एक किंवा अधिक सत्रांमध्ये घेतली जाईल. परीक्षेतील दोन्ही प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. उमेदवारांना दोन्ही प्रश्नपत्रिकांसाठी तीन तासांचा अवधी दिला जाईल.

Pune Edition
Apr 22, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकमत

# वाचनाने ज्ञान प्राप्तीसह विचारांची दालनेही होतात खुली

**प्रासंगिक**

२३ एप्रिल रोजी साजरा होणारा 'जागतिक ग्रंथ दिन' आजच्या परिस्थितीत प्रत्येकाने 'घरोघरी असावी ग्रंथसंपदा' या विचारानेच नाही तर कृतीतूनही अंगीकारला पाहिजे.

सर्जनशील ज्ञानप्राप्तीसाठी वाचन, विचार आणि कल्पनाशक्ती या प्रमुख पायऱ्या समजल्या जातात. वाचनाने ज्ञान प्राप्त तर होतेच पण विचारांची दालनेही खुली होतात. असं म्हणतात की, आपल्या आवडीच्या, निवडीच्या विषयावर आवर्जून केलेलं वाचन हे खरं वाचन.

आजच्या संदर्भात सांगायचे तर फावल्या वेळी वा उदासी घालवण्यासाठी अथवा मन रमवण्यासाठी व्हॉटस अप, ट्विटर, नेटसर्फिंगशिवाय जो कथा, कादंबरी, काव्य आदी वाचनास प्राधान्य देतो, तो खरा वाचक.

वाचनाची सवय अंगीकारणे आवश्यक आहे. वाचन हा एक मूक संवाद असून, त्यातून निश्चितपणे प्रगती होते. त्यामुळे आपण कितीही धावपळीत असलो तरी दिवसातून एक तास तरी मनापासून वाचनासाठी दिला पाहिजे. ग्रंथ हे विचारांना दिशा देतात, जगण्याला आयाम देतात. खऱ्या अर्थाने जीवन जगायला शिकवतात. नवीन सुचण्याची प्रेरणा ग्रंथ वाचनातून वृद्धिंगत होते.

महात्मा ज्योतिबा फुले या द्रष्ट्या क्रांतीसूर्याने एके ठिकाणी म्हटले आहे की, शारीर आणि भौतिक सुखाची साधने गोळा करण्यासाठी द्रव्य वेचण्याऐवजी तोच पैसा ग्रंथखरेदीसाठी सत्कारणी लावावा. हे आवाहन करताना ते म्हणतात,

थोडे दिन तरी मद्य वर्ज्य करा।
तोच पैसा भरा ॥ ग्रंथासाठी॥
ग्रंथ वाचीताना मनीं शोध करा।
देऊं नका थारा॥ वैरभावा॥

महात्मा फुले यांचे हे आवाहन, अंगीकारलेले तर सोडूनच देऊ, पण कानावर पडलेलेही फारसे नसतील. यात काहीसे तथ्य असले तरी मुळात, वाचनाकडे असणारा ओढा एकंदरीतच ओहोटीस लागला आहे किंवा काय, अशी शंका यावी असेच सध्याचे चित्र



असल्याचे वारंवार म्हटले जाते. आजचे वाचन हे तात्पुरते, मतलबी आहे, या वाचनाने "मला ताबडतोब काय फायदा होईल?" असे तरुणांचे म्हणणे असते, असेही बोलले जाते. 'आताची पिढी वाचत नाही', अशी ओरडही सुरू असते. पण हे तितकेसे खरं नाही. कारण त्यांनी काय वाचावे, वाचनातून काय मिळते, हे तरूणाईपर्यंत नीटसे पोहोचतच नाही.

तीन दशकांपूर्वी वाचनाकरिता पुस्तक, नियतकालिके हीच माध्यमं उपलब्ध होती. त्यामुळे अनेकांच्या घरामध्ये पुस्तकांचा, मासिकांचा मोठा संग्रह होत असे. बदलत्या काळानुसार घरोघरी दूरचित्रवाणी, संगणक, मोबाइल, टॅब, किंडल यांसारखी साधने ज्ञान व रंजनासाठी वापरली जात आहेत. आजची पिढी पुस्तके हातात घेऊन वाचण्यास तेवढी तत्पर नसली, तरीही तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ज्ञानाची शिदोरी गोळा करण्याकरिता वाचनाची माध्यमे मोठ्या प्रमाणात वापरली जात आहेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे वाचनसंस्कृतीही बदलली आहे. पुस्तकांसोबत ई बुक, ई माध्यमे, ऑडिओ- बुक्स, ब्लॉग, फेसबुक, स्टोरी टेल आदी अनेक माध्यमांतून लिहिले जाते, बोलले जाते. संगणक, लॅपटॉप, मोबाइलवर ते वाचले जाते. चांगल्याची निवड कशी करायची, हे त्यांना सांगितले तर नववाचक घडविला जाईल. ग्रंथांपर्यंत वाचक येत नसेल तर वाचकांपर्यंत ग्रंथ गेले पाहिजेत. आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज वाचन साधनातूनही सकस, दर्जेदार साहित्य त्यांच्यापर्यंत पोहोचायला हवे. वाचक कधीच चांगला वाचक असत नाही. तो घडावा लागतो, घडवावा लागतो. अनेक घरांमध्ये सुखसोयींयुक्त विविध गोष्टी आहेत, पण एखादे वाचनीय पुस्तक संग्रही असावे, अशी मानसिकता नाही. त्यामुळेच अन्न, वस्त्र, निवारा या सोबतच ग्रंथसुद्धा मानवाची मूलभूत गरज असल्याचे मान्य केले पाहिजे. घरात माणसं राहतात तशी पुस्तकही असावीत. पुस्तकांनाही प्रत्येकाच्या वैयक्तिक संग्रहात स्थान असावे. व्यक्तिगणिक एकेका पुस्तकानं त्यात भर पडली की घरातच ग्रंथालय बनत जाईल. ग्रंथांच्या अस्तित्वाने घर अधिक समृद्ध होईल. दरमहा वा विशिष्ट कालावधीत प्रत्येकानेच ग्रंथ, पुस्तकांची खरेदी करणे कर्तव्य मानले पाहिजे. ज्यांना ग्रंथ खरेदी शक्य नाही, अशांना ते भेट दिले पाहिजेत. ग्रंथांमुळे केवळ शब्दसंपदा नाही तर विचारही समृद्ध होतात. त्यासाठीच 'घरोघरी असावी ग्रंथसंपदा' ही जीवनावश्यक गरज मानली तर 'जागतिक ग्रंथदिवस' हा केवळ एका दिवसाचा उपचार न राहता तो जगण्याचा एक अविभाज्य भाग बनेल.



**प्रसाद भडसावळे**
संदर्भ ग्रंथपाल व माहितीतज्ज्ञ.

Pune Main
Page No. 9 Apr 22, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रभात

# आता पदवीनंतर थेट पीएच.डी.

## युजीसीचा निर्णय; जून २०२४ च्या सत्रापासून अंमलबजावणी

प्रभात वृत्तसेवा




पुणे, दि. २१ - नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार आता चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू आहे. चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील कोणत्याही शाखेच्या उमेदवारांना त्यांना ज्या विषयात पीएच.डी. करायची आहे त्यासाठी परीक्षा देण्याची परवानगी देण्यात आली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी जून २०२४च्या सत्रापासून केली जाणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग राष्ट्रीय पात्रता परीक्षेमध्ये (युजीसी नेट) एक मोठा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार चार वर्षे, आठ सत्रांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहे. युजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेशकुमार यांनी सोशल मीडियाद्वारे ही माहिती दिली. सहायक प्राध्यापक पदासाठी, कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीसाठी युजीसी-नेट ही परीक्षा राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणामार्फत (एनटीए) वर्षातून दोनवेळा घेतली जाते. डिसेंबर आणि जून अशा सत्रांत ही परीक्षा होते. अलीकडेच युजीसीने घेतलेल्या निर्णयानुसार पीएच.डी. साठी नेट परीक्षेतून प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठांतर्फे घेतल्या जाणाऱ्या पीएच.डी. प्रवेश परीक्षा आता संपुष्टात आली आहे.

दरम्यान, युजीसी-नेट परीक्षेची नोंदणी प्रक्रिया सुरू होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रा. एम. जगदेशकुमार यांनी बदलाची माहिती दिली. यापूर्वी युजीसी नेट परीक्षेसाठी उमेदवार पदव्युत्तर पदवीधारक असणे आवश्यक होते. आता चार वर्षांच्या पदवीनंतर विद्यार्थ्यांनी कोणत्या अभ्यासक्रमातून पदवी घेतली आहे, हे महत्त्वाचे असणार नाही. त्यांच्या आवडीच्या विषयावर पीएचडी करता येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

PuneCity, 22 Apr 2024, Page:007
https://epaper.dainikprabhat.com

प्रभात

# महाविद्यालयांत इंटर्नशिप कक्ष सुरू करणे अनिवार्य

पुणे, दि. २१ - नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) पदवी अभ्यासक्रमांना आठ ते १२ श्रेयांकाची आंतरवासिता (इंटर्नशिप) बंधनकारक करण्यात आली आहे. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात आंतरवासिता कक्ष स्थापन करणे अनिवार्य असून, त्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचनाही विद्यापीठाने जारी केल्या आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५पासून 'एनईपी'ची अंमलबजावणी होत आहे. पदवी अभ्यासक्रम आता चार वर्षांचा होणार असून, त्यात इंटर्नशिप अनिवार्य करण्यात आली आहे. पारंपरिक किंवा व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रत्येक सत्रात आठ ते १२ श्रेयांकांची इंटर्नशिप अपेक्षित आहे. त्या दृष्टीने पूर्वनिर्धारित, कालबद्ध, प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना प्रदान करण्यासाठी ही केंद्रे कार्यरत असणार आहेत. संशोधनाबरोबरच कार्यानुभवाचा अनुभव विद्यार्थ्यांना याद्वारे मिळणार आहे.

PuneCity, 22 Apr 2024, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# UGC eases its eligibility norms for PhD courses

**HT Correspondent**

letters@hindustantimes.com

**NEW DELHI:** The University Grants Commission (UGC) on Sunday started the application process for the June 2024 edition of the National Eligibility Test (NET), allowing students with four-year undergraduate degrees having a minimum of 75% aggregate score to directly apply and pursue PhD in any discipline, officials said.

In 2022, the UGC had amended the UGC (Minimum Standards and Procedures for Award of Ph.D Degree) Regulations, 2016, marking students having four-year undergraduate degrees eligible for admission to PhD programmes. The commission has now implemented the

continued on →7

Hindustan Times 22.4.2024

**PHD COURSES**

changes.

The letter comes against the backdrop of UGC's proposal to de-reserve a vacancy — reserved for Scheduled Caste (SC), Scheduled Tribes (ST) and Other Backward Classes (OBC) candidates — if enough candidates from these categories are not available. Following criticism, the proposal was withdrawn and the Union education ministry also ensured that no reserved post was to be de-reserved.

A senior UGC official said higher education institutions have to furnish data on its university-monitoring portal. "Universities have been asked to mandatorily provide statistics of teaching, non-teaching posts and admissions in all categories across all courses in the academic year 2023-24 on the UGC's monitoring portal. It is to ensure that the policy is implemented strictly at all levels," the official said.

According to the data submitted by the Union education ministry in Parliament in 2023, 7,033 posts for teachers are sanctioned for OBC, SC, and ST candidates in central universities. Of these, 3,007 posts are vacant.

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# शुल्कनिश्चितीसाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी प्रस्ताव पाठवावेत

- ७ मेपर्यंत प्रस्ताव सादर करण्याची महाविद्यालयांना मुदत
- निर्देशांचे पालन केले नाही तर कारवाई करण्याचे केले स्पष्ट

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

ज्या महाविद्यालयांना शुल्कनिश्चिती करून तीन वर्षे झाली अशा महाविद्यालयांनी सन २०२४-२५ च्या शुल्कनिश्चितीकरिता प्रस्ताव सादर करणे अनिवार्य आहे. त्यामुळे राज्यातील विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी येत्या ७ मेपर्यंत प्रस्ताव सादर करावेत, असे स्पष्ट निर्देश उच्च शिक्षण संचालनालयाच्या शिक्षण शुल्क समितीने संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना दिले आहेत.

**शिक्षण शुल्क समितीचे महाविद्यालयांच्या प्राचार्यांना निर्देश**

शिक्षणशास्त्र महाविद्यालये, शारीरिक शिक्षणशास्त्रे महाविद्यालये, स्वायत्त संस्था व विद्यापीठाच्या केंद्रांनी संकेतस्थळावरील संपूर्ण अर्ज सहपत्रित विद्यापीठनिहाय वेळापत्रकात नमूद केलेल्या कालावधीतच प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. प्रस्ताव महाविद्यालयाच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी व्यक्तिशः प्रस्तुत कार्यालयाकडे सादर करावा. प्रस्ताव सादर न केल्यास शिक्षण शुल्क समितीने निश्चित करण्यात येणारे दंडात्मक शुल्क आणि १० हजार रुपये प्रतिमहिना विलंब शुल्क घेण्यात येणार आहे. ज्या महाविद्यालयांनी विकास शुल्काकरिता स्वतंत्र विकास खाते क्रमांक व विकास योजना सादर केल्या होत्या, अशा महाविद्यालयांना विकास योजनांवर खर्च केल्याबाबतचा विकास शुल्काचा स्वतंत्र ताळमेळ प्रस्तावासोबत सादर करण्याच्या अटीवर विकास शुल्क मंजूर करण्यात आले आहे. विकास शुल्काचा स्वतंत्र लेखापरीक्षण केलेला ताळमेळ (हिशेब) प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक राहील; अन्यथा विकास शुल्क मंजूर करण्यात येणार नाही. ज्या महाविद्यालयांनी यापूर्वी स्वतंत्र विकास शुल्क खाते काढलेले नसेल, त्यांनी असे खाते काढून त्याचा तपशील प्रस्तावासोबत सादर करावा; अन्यथा अशा महाविद्यालयांचे विकास शुल्क मंजूर केले जाणार नाही.



महाविद्यालयांनी प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता स्वतंत्र प्रस्ताव सादर करणे बंधनकारक आहे. महाविद्यालयांनी प्रस्तावासोबत शासन, यूजीसी, एनसीटीई, विद्यापीठ यांच्या मान्यता, परवानगी पत्र, ना-हरकरत प्रमाणपत्र, आदेश, संलग्नीकरण प्रमाणपत्र तसेच सर्व अभिलेख यांच्या प्रती सादर करणे बंधनकारक राहील. समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार प्रस्ताव सादर न करणाऱ्या महाविद्यालयांची नावे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई तसेच एनसीटीई, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील आणि समिती जो निर्णय घेईल, त्यानुसार संबंधित महाविद्यालयांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Apr 23, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

पुढारी
www.pudhari.com

# पुस्तकविश्व बहरतेय!

**सुवर्णा चव्हाण**

**पुणे : एका महिन्यात जवळपास १०० हून अधिक नवीन पुस्तके येत असल्याचे ऐकून आश्चर्य वाटेल... हे खरंय... पुस्तकविश्वात रोज नव्या विषयांवरील पुस्तकांची भर पडत असून, प्रकाशन संस्थांकडून कवितासंग्रह असो वा माहितीपर पुस्तके, अशा विविध पुस्तकांची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली जात आहे. गेल्या वर्षभरात अंदाजे साडेपाच हजार नवीन छापील पुस्तके प्रकाशित झाली असून, एका प्रकाशकाकडून महिनाभरात ८ ते १० पुस्तकांची निर्मिती होत आहे.** **(पान ४ वर)**

" वाचनसंस्कृतीत वाढ झाली आहे. त्यामुळे पुस्तकांची निर्मितीही वाढत आहे. मागील वर्षी १५० पुस्तकांची निर्मिती आम्ही केली होती. यंदाच्या वर्षीही १५० पुस्तके प्रकाशित होणार आहेत. पुस्तकांच्या निर्मितीचे काम सुरू आहे.

**- अखिल मेहता,**
मेहता पब्लिशिंग हाऊस

" काही प्रमुख २५ ते ३० प्रकाशकांकडून वर्षभरात किमान शंभर पुस्तके प्रकाशित केली जात आहेत. आम्ही १०० ते १२५ पुस्तकांची निर्मिती करत आहोत. छापील पुस्तकांच्या वाचकांची संख्या २६ टक्क्यांनी वाढली असून, त्यामुळे आता पुस्तकांचा खपही वाढला आहे. तरुणवर्गाचा चरित्र आणि आत्मचरित्रांकडे कल आहे.

- **घनश्याम पाटील,** चपराक प्रकाशन

**जागतिक पुस्तक दिन विशेष**

- दररोज पुण्यात ३ ते ४ मराठी पुस्तकांची भर
- वाचकसंख्याही २६ टक्क्यांनी वाढली
- पुण्यासह मुंबई, कोल्हापूर, सातारा, सांगली, नागपूर जिल्ह्यांमध्येही पुस्तकनिर्मिती वाढली

### तरुणाईला काय आवडते?

गेल्या काही वर्षांत अनेक नव्या विषयांवर पुस्तके येत आहेत. फक्त कथा- कादंबऱ्या, कवितासंग्रह नाही, तर आता सामाजिक, राजकीय, माहितीपर, कला- संस्कृती, मोटिव्हेशनल, विज्ञान-तंत्रज्ञान, क्रीडा अशा विविध विषयांवर पुस्तके येत असून, त्याकडे वाचकांचा कल आहे. त्यात ऐतिहासिक पुस्तकांना सर्वाधिक मागणी आहे. १८ ते ३५ वयोगटातील तरुण विविध विषयांवरील छापील पुस्तके खरेदी करून वाचत आहेत. आत्मचरित्रे, चरित्रात्मक पुस्तके, ऐतिहासिक, सामाजिक, मोटिव्हेशनल... अशा वेगवेगळ्या विषयांवरील पुस्तके तरुण वाचत आहेत.

### 'प्रिंट ऑन डिमांड'चा पर्याय...

जलदगतीने पुस्तक छापून हवे असेल, तर सध्या 'प्रिंट ऑन डिमांड'चा पर्याय प्रकाशन विश्वात चर्चिला जात आहे आणि अनेक प्रकाशकांकडून त्यानुसार पुस्तके छापून दिली जात आहेत. प्रिंट ऑन डिमांडनुसार कमी कालावधीत पुस्तक छापले जाते, त्यामुळे या पर्यायाचा वापरही राज्यभरातील अनेक प्रकाशकांकडून होताना दिसत आहे.

### सोशल मीडियावरही प्रसिद्धी

विशेष म्हणजे काळाप्रमाणे बदलत नवीन पुस्तकांच्या प्रसिद्धीसाठी संस्थांकडून सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. त्याशिवाय पुस्तकांच्या प्रसिद्धीसाठी टीझर, व्हिडीओही तयार केले जात असून, संस्थांची सोशल मीडिया टीम त्यासाठी जोमाने काम करत आहे.

My Pune Edition
Apr 23, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

लोकसत्ता

# नियतकालिक चळवळीच्या अस्ताच्या कारणांचा दस्तावेज पुस्तकरूपात

**विद्याधर कुलकर्णी, लोकसत्ता**

**पुणे :** मराठी नियतकालिकांची चळवळ आताशा जवळपास बंद पडली आहे. या चळवळीच्या अस्ताच्या कारणांचा एक प्रकारे दस्तावेज ठरू शकेल, असे पुस्तक रविवारी (२८ एप्रिल) प्रकाशित होत आहे. 'सांस्कृतिक समृद्धीसाठी' हे ब्रीद असलेल्या अंतर्नाद मासिकाच्या २६ वर्षांच्या प्रवासावर 'अंतर्नाद : एका मासिकाचा उदयास्त' हे पुस्तक मौज प्रकाशनातर्फे प्रकाशित होत आहे.

**भानू काळे लिखित 'अंतर्नाद : एका मासिकाचा उदयास्त'चे रविवारी प्रकाशन**

मराठी नियतकालिक चळवळीला मोठी परंपरा आहे. 'माणूस', 'सत्यकथा', 'सोबत', 'समाजप्रबोधन पत्रिका' आदी नियतकालिकांनी मराठी वाचकाला साठच्या दशकापासून साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारिक खाद्य पुरवून समृद्ध केले. पुढे ऐंशीच्या दशकानंतर नियतकालिकांची लाट ओसरत गेली. दूरचित्रवाणी आणि मनोरंजनाच्या अन्य माध्यमांच्या उदयाच्या झंझावातात नियतकालिके आर्थिकदृष्ट्या चालवणेही कठीण होऊ लागले. अशा संघर्षाच्या काळातच 'अंतर्नाद'चा जन्म झाला होता.




### 'अंतर्नाद'चे संकेतस्थळ विकसित

**महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या (एमकेसीएल) सहकार्याने 'अंतर्नाद'चे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. त्यामुळे या मासिकाचे अंक आता संकेतस्थळावर उपलब्ध होणार असून, वाचकांच्या मनातील 'अंतर्नाद' अखंडित झंकारणार आहे.**

'अंतर्नाद' मासिकाने मराठी साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रात मोठे योगदान दिले. या मासिकाचा उदय आणि ते का बंद पडले, या विषयी विश्लेषणात्मक कथन करणारे हे पुस्तक आहे.

'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे यांनी ते लिहिले आहे. एखादे नियतकालिक प्रत्यक्षात कसे सुरू झाले आणि ते कसे बंद पडले याविषयीचे मराठीतील हे बहुधा पहिलेच पुस्तक असावे.

'मराठी नियतकालिकांना एक वैभवशाली परंपरा आहे. दुर्दैवाने ऐंशीच्या दशकानंतर ती ओसरत गेली. 'अंतर्नाद'चा पहिला अंक ऑगस्ट १९९५ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याच सुमारास भारतामध्ये इंटरनेट आणि मोबाइलची सुरुवात झाली होती. इंग्रजी शाळा आणि रंगीत दूरचित्रवाणी त्यापूर्वीच घराघरांत पोहोचले होते.

त्या झंझावातापुढे अनेक नियतकालिकांनी मान टाकली. तेव्हाच्या प्रतिकूल वातावरणात 'अंतर्नाद'ची वाटचाल सुरू झाली. पुढील २६ वर्षांच्या वाटचालीतील संघर्षाचे, तसेच सार्थकतेचे क्षण आणि 'अंतर्नाद'च्या खिडकीतून दिसलेले साहित्यविश्व वाचकांपुढे मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे केला आहे. अभ्यासकांना कायमस्वरूपी उपयुक्त ठरावा, असा हा दस्तावेज आहे,' असे भानू काळे यांनी सांगितले.

मौज प्रकाशन, साधना साप्ताहिक आणि अंतर्नाद मित्रमंडळातर्फे पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम होणार आहे. एस. एम. जोशी सभागृह येथे सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या कार्यक्रमात परराष्ट्र सेवेतील निवृत्त अधिकारी ज्ञानेश्वर मुळे, राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे (एमकेसीएल) मुख्य मार्गदर्शक विवेक सावंत यांच्या उपस्थितीत पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

23/04/2024 | Pune | Page : 15
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सामना

डॉ. प्रीतम भि. गेडाम ▪ prit00786@gmail.com

# छापील आणि ई-पुस्तके : महत्त्व, फायदे आणि तोटे

**जागतिक ज्ञान, आंतरिक शांती, सक्षम मार्गदर्शन, प्रेरणा, प्रोत्साहन, मदतनीस, समस्यांचे निराकरण, जागरूकता, उत्तम साथीदार, गुरू, सल्लागार अशा अनेक मौल्यवान गुणांचे सार म्हणजे पुस्तके. पुस्तके मानवी जीवनाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत निःस्वार्थ साथीदार बनून यशाचा मार्ग दाखवण्यासाठी मार्गदर्शकाची भूमिका बजावतात. आता तर इंटरनेटच्या माध्यमातून पुस्तके फक्त एका क्लिकवर उपलब्ध आहेत. आपल्याला पाहिजे तेव्हा आणि कुठेही आपण ई-पुस्तके वाचू आणि संग्रहित करू शकतो.**

पुस्तकांचे महत्त्व समजून वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी २३ एप्रिल रोजी जगभरात 'जागतिक पुस्तक आणि कॉपीराईट दिन' साजरा केला जातो. या वर्षी २०२४ ची थीम आहे 'रीड योर वेठ' जी वाचनाची आवड वाढवण्यासाठी निवड आणि आनंदाच्या महत्त्वावर भर देते. आयुष्यात पुस्तकांचे स्थान अतुलनीय आहे. एक चांगले पुस्तक शंभर मित्रांच्या बरोबरीचे असते. ज्याला पुस्तकांचे महत्त्व कळले आहे तो आयुष्यात कधीही अपयशी होऊ शकत नाही. पुस्तकांच्या मदतीने आपण जगाच्या प्रत्येक क्षेत्रात सर्वोत्तम स्थान प्राप्त करू शकतो.

सतत पुस्तके वाचण्याची सवय माणसाच्या जीवनाचा विकास करते. वाचनाने मेंदू तल्लख होऊन स्वविचार करत काही नवीन ज्ञान शोधण्याची शक्ती आपल्याला मिळते. वाचन सुरू ठेवल्याने आपण हुशार बनतो. लेखन कौशल्य, भाषा कौशल्ये सुधारतात. लक्ष केंद्रित आणि एकाग्रता वाढते. आपण जीवनात अंधारातून प्रकाशाकडे जातो. आपण आपल्या वेळेचा योग्य वापर करू शकतो. नवीन माहिती आणि ज्ञान मिळवू शकतो. वाचनामुळे तणाव कमी होतो. आपण नेहमी सजग आणि सतर्क राहतो व वाचनामुळे आपल्याला चांगली झोप लागते. स्मृतिभ्रंशापासून बऱ्याच प्रमाणात आपण दूर राहतो.

डिजिटलायझेशनमुळे प्रत्येक जण त्यांच्या मागणीनुसार आणि सोयीनुसार पुस्तके ऑनलाईन वाचू शकतो. ऑनलाईनद्वारे आपण जगाशी नेहमीच जोडलेले राहतो. वाचकांच्या आवडीनुसार जगभरातील विषयांवरील पुस्तके उपलब्ध आहेत. अनेक प्रकाशक, कंपन्या, शैक्षणिक संस्था, व्यावसायिक, ई-बुक विक्रेते, सरकारी पोर्टल व इतर त्यांच्या वेबसाईटवर डिजिटल स्वरूपात पुस्तके अपलोड करतात. जेणेकरून ई-पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचू शकतील. आता तर वाचनाचा वेळ वाचवण्यासाठीसुद्धा डिजिटल मार्केटमध्ये ऑडिओ बुक्सही उपलब्ध आहेत.

ई-पुस्तके अगदी सहज उपलब्ध आहेत, पण ती छापील कागदी पुस्तकांची जागा घेऊ शकत नाहीत. बरेच लोक ऑनलाईन पुस्तके डाऊनलोड करतात. परंतु फार कमी लोक ती पूर्णपणे वाचतात. ही ई-पुस्तके आपल्याला कागदी पुस्तकांप्रमाणे वाचण्यास प्रवृत्त करत नाहीत. जेव्हा की, या बऱ्याचदा त्रासदायक वाटतात. कागदी पुस्तकांच्या विपरीत ई-पुस्तकांमध्ये आसक्ती किंवा प्रेरणा नसलेली दिसते. आपण स्वतःला त्यांच्याशी भावनिकरीत्या जोडू शकत नाही. वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी कागदी पुस्तके मुख्य सहायक असतात. ई-पुस्तकांमध्ये आपण बहुतेक मर्यादित माहिती वाचतो



आणि नंतर पुष्कळदा ती विसरतो, तर कागदी पुस्तकात वाचताना आपण विषयाच्या खोलात जाऊन समस्येवर उपाय शोधतो. संपूर्ण पुस्तक वाचतो. त्यामुळे पुस्तकातील संपूर्ण ज्ञान आपल्या नेहमी लक्षात राहते आणि पुस्तकाचादेखील उद्देश हाच आहे की, त्याच्या ज्ञानाचा संपूर्ण लाभ वाचकांपर्यंत पोहोचावा, तर बहुतेक वाचक ई-पुस्तकांमध्ये केवळ उपयुक्त माहिती शोधतात. तांत्रिक बिघाड हीदेखील एक समस्या आहे आणि मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप यातून ई-कचरा पर्यावरणासाठी धोकादायक पातळीपर्यंत पोहोचला आहे.

ज्याला वाचता येते तो गरीब असला तरी तो कुठेही पुस्तके वाचू शकतो. सार्वजनिक ग्रंथालयात जाऊन तिथली पुस्तके वाचू शकतो. परंतु ई-पुस्तके वाचण्यासाठी विशेष यांत्रिक संसाधने आणि कौशल्ये आवश्यक आहेत. ज्यासाठी आर्थिक खर्च आणि थोडेफार प्रशिक्षण आवश्यक आहे. जसेः- संगणक, लॅपटॉप, मोबाईल, वीज, इंटरनेट आणि तांत्रिक प्रशिक्षण, तर कागदी पुस्तकांमध्ये या गोष्टी आवश्यक नाहीत. वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना पेपर बुकच्या माध्यमातून शिकवणे सोपे जाते, तर ई-बुक्सद्वारे शिकवण्यासाठी प्रोजेक्टरचा खर्च उचलावा लागतो.

पुस्तकांचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी वाचन करताना लक्ष, मन आणि डोळे पुस्तकावर केंद्रित करावे लागतात. परंतु इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या स्क्रीनवर सतत लक्ष केंद्रित केल्याने काही काळानंतर तणाव, डोकेदुखी, दृष्टीदोषसारख्या समस्या जाणवू लागतात. कारण संगणकाची स्क्रीन दृष्टीवर परिणाम करते. ई-पुस्तकांची सहज उपलब्धता, वेळेची बचत आणि सहज साठवणूक असूनही पुस्तकांमध्ये असलेले संपूर्ण ज्ञान वाचकांनी आत्मसात करणे हा पुस्तकाचा मुख्य उद्देश कागदी पुस्तकांच्या तुलनेत ई-पुस्तकांमध्ये पूर्णता दिसून येत नाही. ई-पुस्तके वाचन हे गंभीर काळात किंवा अल्प कालावधीसाठी वरदान आहे, परंतु दीर्घकाळापर्यंत ते शारीरिक आणि मानसिक समस्या निर्माण करू शकतात. यांत्रिक उपकरणांच्या सतत वाढत्या वापरामुळे आपण त्या साधनांवर अवलंबित झालेले आहोत. आता आपल्याला आपल्या प्रियजनांचे मोबाईल नंबरही आठवत नाहीत. यामुळे आपली विचारशक्ती-स्मरणशक्ती क्षीण होत आहे. आधुनिकतेचा हा खूप मोठा दोष आहे. आजपर्यंत कोणत्याही संशोधनात किंवा सर्वेक्षणात छापील पुस्तके वाचल्यामुळे कोणत्याही समस्या किंवा हानी झाल्याचे दिसले नाही, परंतु कोरोनाच्या काळात ऑनलाईन अभ्यासामुळे अनेक शारीरिक आणि मानसिक समस्या समोर आल्या आहेत.

ई-पुस्तके आणि छापील पुस्तके यातील निवड हा शेवटी आपला वैयक्तिक निर्णय आहे. परंतु जेव्हा आपण जागतिक स्तरावर वाचकांची पसंती पाहतो, तेव्हा जगभरातील वाचकांच्या हृदयात छापील पुस्तकांसाठी विशेष स्थान दिसून येते. जेव्हा की, ई-पुस्तकांचे वेगळे फायदे आहेत. आता वाचकांनी या दोघांच्या संभाव्य गुण-दोषांची जाणीव ठेवावी आणि आपल्या मागणीनुसार समतोल साधावा. जे आपल्या वैयक्तिक गरजा आणि वाचनाच्या आवडी-निवडींसाठी उत्तम आहे.

Pune Edition
Apr 23, 2024 Page No. 4
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकमत

# मान्यतेसह शैक्षणिक शुल्क तपासून घ्या प्रवेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना अभ्यासक्रमाची मान्यता व निर्धारित शुल्क याची खातरजमा करावी. याबाबत नवीन शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात प्रवेश घेताना, विद्यार्थ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी विद्यापीठ प्रशासनाने संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या माध्यमातून पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सूचनांचे परिपत्रक काढले आहे.

शुल्क भरण्याची कार्यवाही महाविद्यालय / संस्थेच्या खात्यामार्फतच करावी. विद्यार्थ्यांनी शुल्क कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक बँक खात्यावर ट्रान्सफर करू नये. प्रवेश प्रक्रियेसाठी वापरण्यात आलेला स्वत:चा पासवर्ड, ई-मेल आयडी, ओटीपी इत्यादी कोणालाही शेअर करू नये, तसेच वापरण्यास देऊ नये. संयुक्तिक ऑफर विद्यापीठाकडून दिल्या जात नाहीत. अशा प्रलोभनास बळी पडू नये. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी त्या-त्या प्रवेश नियंत्रण समितीच्या संकेतस्थळावर माहिती घ्यावी.

## शासनाच्या योजनांची माहिती घ्या

महाविद्यालयांत प्रवेश घेताना तसेच शैक्षणिक वर्षाचे शुल्क भरण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी महाविद्यालयांकडून संपूर्ण माहिती घ्यावी, असेही सूचनांमध्ये नमूद केले आहे.

महाविद्यालयात प्रवेश घेताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता अभ्यासक्रमास संलग्नता असलेल्या पत्राची खातरजमा केल्याशिवाय प्रवेश निश्चित करू नये. विद्यार्थ्यांनी स्वत:हून अशा अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास त्यास संबंधित विद्यार्थी पूर्णत: जबाबदार राहील.

**- डॉ. विजय खरे, प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Pune Main
Page No. 4 Apr 24, 2024
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# एकीकडे मोकळीक, दुसरीकडे नियमांचे बंधन!

## बीबीए, बीएमएस, बीसीए संदर्भात शिक्षणसंस्थांचा आरोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** व्यवस्थापनशास्त्र, संगणक उपयोजन आणि ट्रॅव्हल टुरिझम विषयांतील पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम ऑनलाइन, दूरस्थ पद्धतीने राबवण्यासाठी विद्यापीठांना मोकळीक देण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) घेतला. मात्र, अभ्यासक्रमाचे माध्यम बदलले म्हणून नियामक संस्था बदलणे समानतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. एकीकडे विद्यापीठांना अभ्यासक्रमांसाठी मोकळीक द्यायची, दुसरीकडे शिक्षण संस्थांना नियमांमध्ये बांधून ठेवायचे, असा विरोधाभास असल्याचा आरोप शिक्षण संस्थांकडून करण्यात येत आहे.

> पारंपरिक पद्धतीने राबवले जाणारे एमबीए, एमसीए, एमटेक, बीटेक अभ्यासक्रम एआयसीटीईच्या अखत्यारित आहेत. त्याच धर्तीवर बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम एआयसीटीईच्या अखत्यारित घेण्यात आले आहेत. काही लोक याबाबत दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रमाच्या चार हजार संस्थांना 'जशा आहेत तशा' तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. सर्व भागधारकांशी चर्चा करून या अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र निकष तयार केले जाणार आहेत. - डॉ. अभय जेरे, उपाध्यक्ष, एआयसीटीई

यूजीसी (दूरस्थ अभ्यासक्रम आणि ऑनलाइन अभ्यासक्रम) नियमावली २०२० नुसार दूरस्थ आणि ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी यूजीसीकडे अर्ज करण्यापूर्वी संबंधित नियामक संस्थेची मान्यता, शिफारस घेणे बंधनकारक आहे. मात्र अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) पत्रानुसार सर्वोच्च न्यायालयाने भारथीदासन विद्यापीठ आणि अन्य विरुद्ध अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि इतर (२००१) ८ एससीसी ६७६ या प्रकरणात दिलेल्या निर्णयानुसार राज्य, केंद्रीय आणि खासगी विद्यापीठांनी तंत्रशिक्षण अभ्यासक्रम राबवण्यासाठी एआयसीटीईची परवानगी घेणे बंधनकारक नाही. त्यामुळे केंद्रीय, राज्य आणि खासगी विद्यापीठांना यूजीसी (दूरस्थ अभ्यासक्रम आणि ऑनलाइन अभ्यासक्रम) नियमावली २०२० नुसार दूरस्थ, ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी एआयसीटीईचे नाहरकत पत्र, मान्यता, शिफारस घेण्याची गरज नाही असा निर्णय यूजीसीने घेतला.

बीबीए, बीएमएस, बीसीए अशा पदवी अभ्यासक्रमांची प्रक्रिया आतापर्यंत महाविद्यालय स्तरावर होत होती. मात्र आता हे अभ्यासक्रम एआयसीटीईने आपल्या अखत्यारित घेतले आहेत. तसेच हे अभ्यासक्रम राबवण्यासाठी एआयसीटीईची मंजुरी अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच राज्यात या अभ्यासक्रमांचे प्रवेश सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे (सीईटी) होणार आहेत. त्यामुळे या निर्णयाविरोधात शिक्षण संस्थांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विनाअनुदानित शैक्षणिक संस्था संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुधाकर जाधवर म्हणाले, की अभ्यासक्रम ऑनलाइन असो, दूरस्थ की प्रत्यक्ष, त्याला वेगळी नियामक संस्था असणे समानतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. त्यामुळे बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रमांबाबत घेतलेला निर्णय बदलून पूर्ववत केला पाहिजे.

24/04/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता

लोकमान्य लोकशक्ती

# पदवीपूर्व प्रथम वर्ष ऑगस्टपासून; द्वितीय वर्ष जुलैअखेरीस सुरू

### विद्यापीठ अनुदान आयोगाचे उच्च शिक्षण संस्थांना निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांना निर्देश दिले आहेत. त्यानुसार बिगरव्यावसायिक पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे वर्ग ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात, तर द्वितीय वर्षाचे वर्ग जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात सुरू करावे लागणार आहेत. तसेच सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जुलैअखेरपर्यंत जाहीर करावे लागणार आहेत.

यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. करोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांचे शैक्षणिक वर्ष विस्कळित झाले होते. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ते बऱ्याच प्रमाणात पूर्वपदावर आले आहे. या पार्श्वभूमीवर यूजीसीकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सुरू करण्याच्या अनुषंगाने सूचना दिल्या आहेत.

24/04/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

प्रभात

# तृतीयपंथी विद्यार्थ्यांचे शुल्क माफ

### पुणे विद्यापीठाचा निर्णय; यंदापासून अंमलबजावणी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि संलग्न सर्व महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त उच्च शिक्षण संस्थांमध्ये तृतीयपंथी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्याची अंमलबजावणी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून होणार आहे.

याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने मंगळवारी काढले. तृतीयपंथी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक टक्का वाढवा, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून गेल्या वर्षी डिसेंबर २०२३ मध्ये याबाबत शासन निर्णय प्रसिद्ध केला होता. त्यानुसार विद्यापीठ अधिकार मंडळाने आगामी शैक्षणिक वर्षापासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील तृतीयपंथी विद्यार्थ्यांचे सर्व अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली माफ करण्यात येणार आहे. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या तृतीयपंथी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क विद्यापीठ निधीतून भरण्यात येणार आहे.

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, उच्च शिक्षण संस्थांचे प्राचार्य, संचालक आणि परीक्षा विभागप्रमुखांना या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शहरात तृतीयपंथी विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. या निर्णयामुळे तृतीयपंथी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची टक्केवारी वाढण्यास मदत होणार आहे.

PuneCity, 24 Apr 2024, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

प्रभात

# अकरावी प्रवेशाबाबत सावळागोंधळ

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २३** - इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे मागील पाच वर्षांत कोणत्याही प्रकारचे लेखापरीक्षणच झाले नसल्याचे उघड झाले आहे. सन २०१९ नंतर लेखापरीक्षण झालेले नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे, असे सिस्कॉमच्या अध्यक्ष वैशाली बाफना यांनी स्पष्ट केले आहे.

सन २०१४ च्या प्रकरणात राज्य शासनाने उच्च न्यायालयात प्रतिज्ञेवर सादर केल्यानुसार इयत्ता ११ वीच्या प्रवेश प्रक्रियेचे त्रयस्त संस्थेमार्फत लेखापरीक्षण करणार असल्याचे जाहीर केले; परंतु खेदपूर्वक नमूद करावे लागते की सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षी

## ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे लेखापरीक्षणच नाही

शासकीय अधिकाऱ्यांमार्फत प्रवेश प्रक्रियेचे लेखापरीक्षण केले व सन २०१८-१९ मध्ये एका संस्थेमार्फत लेखापरीक्षण करताना ते केवळ ऑनलाइन सिस्टिमचे केले गेले. या लेखापरीक्षणात अत्यंत गंभीर ताशेरे ओढण्यात आले. त्यामध्ये सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सर्व प्रक्रिया सिस्टीमच्या बाहेर करून तयार केलेल्या गुणवत्ता याद्या केवळ ऑनलाइन अपलोड केल्या जातात. विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश मिळेलच, याची खात्री नाही.

सन २०२३-२४ मध्ये राबविलेल्या प्रवेश प्रक्रियेतून एकूण प्रवेश क्षमतेपैकी केवळ ७० टक्के जागा भरल्या आहेत. प्रवेश प्रक्रियेचा आढावा घेतल्यास प्रवेश समिती ही केवळ प्रवेश झालेत का, एवढेच पाहण्याचे काम करीत आहे. ते गुणवत्तेनुसार झाले का? दरवर्षी नवीन कनिष्ठ महाविद्यालयाला मान्यता देताना क्षमता वाढवून देण्यापूर्वी किती कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश झाले नाहीत किंवा २० टक्क्यांपेक्षा कमी प्रवेश किती महाविद्यालयांत झाले? त्यामध्ये किती महाविद्यालये अनुदानित आहेत? अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे काय करायचे? अशा बाबींचा आढावा घेतला नसल्याचे बाफना यांनी शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

PuneCity, 24 Apr 2024, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

प्रभात

# खासगी विद्यापीठांना युजीसीची मुभा

## ऑनलाइन अभ्यासक्रमासाठी एआयसीटीईच्या परवानगीतून सूट

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३** - देशभरातील राज्य, केंद्रीय आणि खासगी विद्यापीठांना दूरस्थ, ऑनलाइन पद्धतीने अभ्यासक्रम राबविण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची (एआयसीटीई) परवानगी, शिफारस घ्यावी लागणार नसल्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) घेतला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने भारथीदासन विद्यापीठ आणि अन्य विरुद्ध एआयसीटीई आणि इतर (२००१) ८ एससीसी ६७६ या प्रकरणात दिलेल्या निर्णयानुसार राज्य, केंद्रीय आणि खासगी विद्यापीठांनी तंत्रशिक्षण अभ्यासक्रम राबविण्यासाठी एआयसीटीईची परवानगी घेणे बंधनकारक नाही. याबाबत सविस्तर चर्चा केल्यानंतर केंद्रीय, राज्य आणि खासगी विद्यापीठांना युजीसी (दूरस्थ अभ्यासक्रम आणि ऑनलाइन अभ्यासक्रम) नियमावली २०२० नुसार दूरस्थ, ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी एआयसीटीईचे नाहरकतपत्र, मान्यता, शिफारस घेण्याची गरज नाही, असा निर्णय युजीसीने घेतला आहे.

या पार्श्वभूमीवर व्यवस्थापन, संगणक उपयोजन आणि ट्रॅव्हल टुरिझम या विषयातील पदवी, पदव्युत्तर आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी केंद्रीय, राज्य आणि खासगी विद्यापीठांना एआयसीटीईचे नाहरकतपत्र, मान्यता, शिफारस घेण्याची गरज नाही. युजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी यासंदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले.

### अभिमत विद्यापीठांची सुटका नाही

राज्य, केंद्रीय आणि खासगी विद्यापीठांना आता मुभा मिळाली असली, तरी यातून अभिमत विद्यापीठांची नियमातून सुटका झालेली नाही. दूरस्थ आणि ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी युजीसीकडे अर्ज करण्यापूर्वी अभिमत विद्यापीठांना एआयसीटीईची मान्यता, नाहरकतपत्र, शिफारस घेणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

PuneCity, 24 Apr 2024, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# ४५५ कॉलेजमध्ये शून्य प्रवेश

## मग, दरवर्षी अकरावीच्या जागा वाढवता कशाला?; सिस्कॉम संघटनेचा सवाल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**अकरावी प्रवेश प्रक्रियेत गतवर्षी २०२३-२४ मध्ये मुंबईसह पुणे, नाशिक, नागपूर आणि अमरावती विभागात पार पडलेल्या अकरावी ऑनलाइन आणि कोट्यातील प्रवेश प्रक्रियेद्वारे केवळ ७० टक्के प्रवेशच झाल्याची माहिती माहिती अधिकारातून समोर आली आहे. यात १०० टक्के प्रवेश झालेल्या विभाग आणि माध्यमांचे प्रमाण १० टक्केदेखील नाही. ऑनलाइन प्रवेश राबविलेल्या पाच विभागातील ४५५ कॉलेजमध्ये शून्य प्रवेश झाल्याची माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीतून उघड झाले आहे.**

अकरावी प्रवेशासाठी स्वयंअर्थसहाय्याच्या नावाने विनाअनुदानित महाविद्यालयांना दरवर्षी नव्याने मान्यता दिली जाते. त्यामुळे जिथे विद्यार्थ्यांची मागणी नाही अशा ठिकाणी या महाविद्यालयांची संख्या वाढताना दिसत आहे. अकरावी बहुतांश तुकड्यांत विद्यार्थीच प्रवेशासाठी फिरकत नसल्याने रिक्त राहणाऱ्या जागांची संख्या वर्षानुवर्षे वाढत आहे. याचा फटका मात्र प्रवेशांना बसल्याचे चित्र आहे.

सिस्कॉम संघटनेने माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीच्या आधारे अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेतून विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश मिळेलच याची खात्री नसल्याचे म्हटले आहे. माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार वर्ष २०२३-२४ मध्ये झालेल्या अकरावी प्रवेशात एकूण क्षमतेच्या ७० टक्केदेखील प्रवेश झालेले नाहीत, असा दावा सिस्कॉमच्या अध्यक्षा वैशाली बाफना यांनी केला आहे.




**माहिती अधिकारातून माहिती समोर**

मिळालेल्या आकडेवारीतून अकरावी प्रवेशप्रक्रिया केवळ नावापुरतीच असल्याचेही म्हटले जात आहे. शिक्षण विभाग अकरावीला नवीन महाविद्यालयांना मान्यता देते आणि जागांची भर पडताना दिसत आहे. ज्या महाविद्यालयात पायाभूत सुविधा नाहीत, शैक्षणिक वातावरण नाही, अशा ठिकाणी दरवर्षी मान्यता घेऊन जागा वाढतात, अशा महाविद्यालयांचा फायदा विद्यार्थ्यांना काडीमात्र होत नाही. तरीही अशा महाविद्यालयांना मान्यता देऊन शिक्षण विभाग कोणाचा फायदा करते ? दरवर्षी नवीन महाविद्यालये सुरू केली जातात, यातून शैक्षणिक गुणवत्ता काय साधणार असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

### यंदा प्रवेश प्रक्रियेकडे दुर्लक्ष

दरवर्षी या ना त्या कारणाने अकरावी प्रवेशात विद्यार्थी किंवा प्रवेश यंत्रणेला गोंधळाला सामोरे जावे लागते, यामुळे अनेक विद्यार्थी प्रवेशातील अर्धवट माहितीमुळे प्रवेशापासून दूर राहतात. तर प्रवेश सर्वांना मिळावा या हेतून अनेकदा प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या जूनपासून दिवाळीच्या सुट्यांपर्यंत वाढवाव्या लागतात. दहावीनंतर अकरावीला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातील गोंधळ कमी करण्यासाठी दरवर्षी विद्यार्थी दहावीत असतानाच शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून ऑनलाइन प्रवेशाची तयारी करून घेण्यात येते. यंदा मात्र याकडे दुर्लक्ष झालेले आहे.

### ॲडमिशनचा गोंधळ

- अकरावी प्रवेश गोंधळ हा कधी मिटणार
- गुणवत्तेनुसार प्रवेश मिळेल याची खात्री नाही
- शून्य फेरीपासून नियमित फेरीच्या अंतिम टप्प्यापर्यंत कोट्यातील प्रवेश सुरू असतात.
- ही प्रक्रिया ऑनलाइन नसून गुणवत्ता याद्या केवळ ऑनलाइन अपलोड केल्या जातात.
- वर्ष २०१९ नंतर प्रवेशाचे लेखापरीक्षण नाही.
- इनहाऊस, अल्पसंख्याक आणि व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश नियमित प्रवेशफेरीच्या १५ दिवस आधी पूर्ण होणे आवश्यक आहे, मात्र तसे होताना दिसत नाही.

Pune Edition
Apr 24, 2024 Page No. 10
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# पदवीच्या प्रवेशापूर्वी करा 'एनईपी'चा अभ्यास

## यंदा चार वर्षांचा अभ्यासक्रम : इंटर्नशिप बजावणार महत्त्वाची भूमिका

**पुणे, ता. २४ :** बारावीच्या परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशाची उत्सुकता असते. कोणत्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा, कोणते महाविद्यालय निवडायचे किंवा कोणत्या शहरात उच्च शिक्षण घ्यायचे असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांसमोर असतात. पण यंदा जर तुम्ही पदवीला प्रवेश घेणार असाल, तर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांबाबत (एनईपी) माहिती घ्या. कारण पदवी आता चार वर्षांची होत असून, तुम्ही निवडलेल्या विषयामुळे तुमचे करिअर घडणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमापासून एनईपी लागू होत आहे. त्यामुळे पदवी आता चार वर्षांची होणार असून, आंतरविद्याशाखीय अभ्यासाची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध असेल. आंतरवासिता (इंटर्नशिप), हँड्स ऑन ट्रेनिंग, ऐच्छिक विषय, मल्टिपल एन्ट्री-मल्टिपल एक्झिट, ॲकॅडमिक बॅंक ऑफ क्रेडिट्स, अशा अनेक नव्या संकल्पना पदवीच्या अभ्यासक्रमांत अंतर्भूत झाल्या आहेत. आजवर अभ्यासक्रम किंवा महाविद्यालयाभिमूख असलेले शिक्षण आता विद्यार्थी केंद्रित असणार आहे. विद्यार्थ्यांनी निवडलेले विषय, औद्योगिक कार्यानुभव, प्राप्त केलेले श्रेयांक आणि त्यातून मिळालेली कौशल्ये त्याच्या करिअरमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे.

### विद्यार्थ्यांनी काय करावे..

- 'एनईपी'तील नव्या बदलांची माहिती घ्यावी. महाविद्यालयांच्या माहितीपुस्तिकेत त्याचा अंतर्भाव आहे का, हे तपासावे.
- आपल्याला ज्या क्षेत्रात करिअर करायचे आहे, त्याला पूरक अभ्यासक्रम निवडावा.
- त्याच क्षेत्रातील आधुनिक व सुसंगत इंटर्नशिप देणाऱ्या महाविद्यालयांची चौकशी करावी.
- दर्जेदार ऐच्छिक विषय, इंटर्नशिप आणि हँड्स ऑन ट्रेनिंग उपलब्ध असलेल्या महाविद्यालयांना प्राधान्य द्यावे.
- संबंधित महाविद्यालयातील एनईपी कक्षाला भेट देऊन, अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती मिळवावी.

“ महाविद्यालयांना त्यांच्या माहितीपुस्तिकेत एनईपीच्या वैशिष्ट्यांचा अंतर्भाव असावा, तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि साहाय्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात एनईपी कक्षाची रचना करायला सांगितले आहे. पदवीच्या प्रवेशापूर्वी विद्यार्थ्यांनी एनईपीबद्दल माहिती घेणे गरजेचे आहे.

**डॉ. नितीन करमळकर,** अध्यक्ष, राज्य सुकाणू समिती, एनईपी

“ एनईपीमध्ये बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमाला प्राधान्य असून, आपल्या आवडीच्या विषयाशी पुरक अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांना विद्यार्थ्यांनी प्राधान्य द्यावे. ४० टक्के अभ्यासक्रम हा ऐच्छिक (मायनर) विषयांचा आहे. त्यामुळे इंटर्नशिप, हँड्स ऑन ट्रेनिंग आदींचाही विचार विद्यार्थ्यांनी करायला हवा.

**डॉ. नितीन कुलकर्णी,** प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय

Pune, Main
25/04/2024 Page No. 7

सकाळ

# उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी अभाविप आक्रमक

## परीक्षा भवनमध्ये ठिय्या आंदोलन; १२० विद्यार्थ्यांची यादी हस्तांतरित

**पुणे, ता. २४ :** उन्हाळी सत्राची परीक्षा तोंडावर आली तरी मागच्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत (फोटोकॉपी) मिळालेली नाही. अजूनही पुनर्मूल्यांकनाचे निकाल घोषित करण्यात आलेले नसल्यामुळे विद्यार्थी अडचणीत सापडले असून, त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जात आहे. परीक्षा विभागाकडून मागील दोन वर्षांपासून फॉटोकॉपी आणि पुनर्मूल्यांकनाबाबत विद्यार्थ्यांची फसवणूक करण्यात येत आहे, असा आरोप अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) बुधवारी केला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागात अभाविपने ठिय्या आंदोलन केले. प्रदेश मंत्री अनिल ठोंबरे म्हणाले, “अभियांत्रिकी आणि विधी विद्याशाखेतील अनेक विद्यार्थ्यांना त्यांची फोटोकॉपी अजूनही मिळालेली नाही. परीक्षा अर्ज भरून त्याचे शुल्कही भरले आहे. मात्र मागील विषयात ते उत्तीर्ण झाले किंवा नाही, याबद्दल अजूनही स्पष्टता नाही. विद्यार्थ्यांनी बॅकलॉगच्या विषयांचा अभ्यास करायचा का नाही? असा प्रश्न पडला आहे. परीक्षा विभाग फॉटोकॉपी आणि पुनर्मूल्यांकनाचे शुल्क घेतो. मात्र, वेळेवर विद्यार्थ्यांना ही सुविधा उपलब्ध करत नाही.”

शेकडो विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे निकाल अडकल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत आहे, असेही ठोंबरे यांनी सांगितले. परीक्षा विभागाच्या वतीने निवेदन स्वीकारण्यात आले आणि आठवडाभरात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. तसेच अभाविपने फॉटोकॉपी न मिळालेल्या १२० विद्यार्थ्यांची यादी परीक्षा विभागाला हस्तांतरित केली.



**परीक्षा भवन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ :** पुनर्मूल्यांकन आणि फॉटोकॉपी तातडीने मिळावी, यासाठी अभाविपने परीक्षा विभागातच ठिय्या आंदोलन केले.

Pune, Pune-Today
25/04/2024 Page No. 3

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# कॉलेजांची माहिती घ्या ; मगच प्रवेश घ्या

### त्रयस्थ संस्था, एजंटांपासून दूर राहण्याचा सल्ला

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असण्याचा दावा करणाऱ्या कॉलेजांची आणि शिक्षण संस्थांची विद्यार्थ्यांनी व्यवस्थित माहिती आणि खातरजमा करूनच तेथे प्रवेश घ्यावा. प्रवेश घेण्यापूर्वी कॉलेजला विद्यापीठ आणि शिखर संस्थांच्या मान्यता आहेत का, याची माहिती घेऊनच प्रवेशाची कार्यवाही पूर्ण करावी,' असे आवाहन पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विजय खरे यांनी विद्यार्थ्यांना केले आहे.

राज्य मंडळ आणि इतर मंडळांकडून घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल येत्या काही दिवसांत जाहीर होणार आहे. या निकालानंतर पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या कॉलेज आणि शिक्षणसंस्थांत विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी उत्सुक असतात. पुणे विद्यापीठाच्या नावाचा लौकिक राज्यात आणि देशातील इतर भागांत असल्याने, मोठ्या संख्येने विद्यार्थी पुण्यात शिक्षणासाठी येतात. या विद्यार्थ्यांना कॉलेजांची आणि शिक्षण संस्थांची माहिती नसते. याचाच फायदा काही बोगस आणि अनधिकृत पद्धतीने चालणाऱ्या कॉलेजांकडून घेण्यात येत आहे. पुण्यासोबतच नगर आणि नाशिक जिल्ह्यांत अशा कॉलेजांची संख्या आहे. या कॉलेजांमध्ये प्रवेश करून देणाऱ्या काही त्रयस्थ संस्था आणि एजंटही कार्यरत आहेत. या संस्थांच्या आणि एजंटांच्या आमिषांना बळी पडून विद्यार्थ्यांची फसवणूक होत असून, त्यांचा प्रवेश बोगस कॉलेजांमध्ये होत असल्याचे काही घटनांमुळे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विजय खरे यांनी विद्यार्थी आणि पालकांना परिपत्रकाद्वारे आवाहन केले आहे.

'एकावर एक मोफत' अशा कोणत्याही योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून महाविद्यालय/संस्थांमधील अभ्यासक्रमासाठी दिल्या जात नाहीत. अशा प्रलोभनांना बळी पडू नये. विद्यार्थ्यांनी स्वतःहून अशा अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्यास त्यास संबंधित विद्यार्थी पूर्णतः जबाबदार राहील, अशी माहिती विद्यापीठाने प्रसिद्ध केली.

### पुणे विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या सूचना

- महाविद्यालय किंवा शिक्षणसंस्थेत प्रवेश घेताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४-२५साठी अभ्यासक्रमाला संलग्नता असलेल्या पत्राची खातरजमा केल्याशिवाय प्रवेश निश्चित करू नये.
- प्रवेश प्रक्रियेसाठी वापरण्यात आलेला स्वत:चा पासवर्ड, ई-मेल आयडी, ओटीपी इत्यादी कोणालाही शेअर करू नये/वापरण्यास देऊ नये.



- केंद्रीय पद्धतीने व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयातील किंवा संस्थांमधील प्रवेश केंद्रीय पद्धतीने होत असल्याचे त्या प्रवेश नियंत्रण समितीच्या वेबसाइटवर जाऊन प्रत्यक्ष माहिती घ्यावी.
- अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेताना अभ्यासक्रमाची मान्यता व निर्धारित शुल्क याची खात्री करण्यात यावी, शुल्क भरण्याची कार्यवाही महाविद्यालय किंवा संस्थेच्या खात्यामार्फतच करावी. विद्यार्थ्यांनी शुल्क कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक बँक खात्यावर ट्रान्स्फर करू नये.
- शैक्षणिक वर्षाचे शुल्क भरण्यापूर्वी महाराष्ट्र सरकारने वेळोवेळी जाहीर केलेल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी महाविद्यालयांकडून संपूर्ण माहिती घ्यावी.
- विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित करण्यापूर्वी स्वत: विहीत पात्रता धारण करत असल्याची खातरजमा करून घ्यावी.

Maharashtra Times 25.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

**लोकमत**

**दृष्टिक्षेप**

# लोक काय वाचतात?- पुस्तक की ई-बुक?

**२०२३ : ई-बुक आणि छापील पुस्तक विकत घेणाऱ्या वाचकांचे प्रमाण**




**संदर्भ :** स्टॅटिस्टा ॲडव्हर्टायझिंग ॲड मीडिया आउटलूक

माणसाचं जेवणखाण सोडून सगळं डिजिटल होईल की काय, अशा शंकेने ग्रासलेल्या लोकांसाठी एक बातमी : ई-बुक्सचा बोलबाला वाढत असला, तरी अजूनही जगभरातले (पुस्तक विकत घेऊन वाचणारे) वाचक छापील पुस्तकालाच प्राधान्य देतात! जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने प्रसिद्ध झालेल्या एका विस्तृत अभ्यासानुसार चीन वगळता बहुतांश देशांमध्ये गेल्या वर्षी ई-बुकपेक्षा छापील पुस्तके विकत घेणाऱ्या लोकांचं प्रमाण किती तरी जास्त होतं. एकुणातच ई-बुक हा छापील पुस्तकांचा कर्दनकाळ नसून उलट तो एक पूरक पर्याय आहे, अशी मते आता प्रकाशकांच्या जगात व्यक्त होऊ लागली आहेत.

Pune Main
Page No. 6 Apr 25, 2024
Powered by: erelego.com

**सामना**

# सर्व परीक्षांचे निकाल जुलैअखेर लागणार

## यूजीसीचे विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांना निर्देश

पुणे, दि. २४ (प्रतिनिधी) – शैक्षणिक वर्ष २०२४–२५संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांना दिलेल्या निर्देशानुसार बिगरव्यावसायिक पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे वर्ग ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात, तर द्वितीय वर्षाचे वर्ग जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात सुरू करावे लागणार आहेत. सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जुलैअखेरपर्यंत जाहीर करावे लागणार आहेत.

यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांचे शैक्षणिक वर्ष विस्कळित झाले होते. शैक्षणिक वर्ष २०२३–२४मध्ये ते बऱ्याच प्रमाणात पूर्वपदावर आले आहे. या पार्श्वभूमीवर यूजीसीकडून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ सुरू करण्याच्या अनुषंगाने सूचना दिल्या आहेत.

नव्या शैक्षणिक वर्षाचे वर्ग सुरू करण्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्ष आणि त्या पुढील विद्यार्थ्यांना प्रकल्प, कार्यप्रशिक्षण (इंटर्नशिप) वगैरे लक्षात घेता दोन आठवड्यांची सवलत देता येऊ शकते.

### यूजीसीच्या सूचना

■ शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी विद्यापीठांनी त्यांचे शैक्षणिक वेळापत्रक जाहीर करणे आवश्यक आहे. त्यात वर्षभरात होणाऱ्या सर्व उपक्रमांचा समावेश असणे आवश्यक आहे. पदवी प्रदानासंदर्भातील तारखांचाही त्यात समावेश असला पाहिजे. त्यामुळे युजीसी किंवा संबंधित नियामक परिषदेच्या नियमांनुसार उच्च शिक्षण संस्थांनी शैक्षणिक वर्ष सुरू करणे, परीक्षेचे वेळापत्रक, निकाल जाहीर करणे या बाबतच्या नियोजनाचे पालन करावे, शैक्षणिक वेळापत्रक जाहीर करावे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

Pune Edition
Apr 25, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकमत

# शिक्षणाचे खासगीकरण थांबवणार कसे ?

## तरुणाईचा लोकसभा उमेदवारांना सवाल : शिक्षणक्षेत्रासाठी निधी वाढवण्याची मागणी

### पीपल्स मॅनिफेस्टो

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोकसभा निवडणुकीमुळे देशभर राजकीय वातावरण तापले आहे. विविध पक्ष, संघटनांकडून आपापला जाहीरनामा मांडला जात आहे. आश्वासनांची बरसात होत असतानाच तरुणाई त्यांचा अजेंडा उमेदवारांपुढे मांडू पाहत आहे. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न उपस्थित करण्याबरोबरच 'केंद्र व राज्य सरकारने शिक्षणावरील खर्च वाढून प्रत्येकाला दर्जेदार शिक्षण द्यावे. त्यासाठी खासगीकरण करणे थांबवावे,' अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

सध्या सर्वत्र खासगीकरणाचा सपाटा सुरू आहे. याला शिक्षण क्षेत्र देखील अपवाद नाही. केंद्र सरकारने उच्च शिक्षणाचे खासगीकरण करणे सुरू केले असून, ते तातडीने थांबवावे. सरकारी शाळा, महाविद्यालयातून दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी निधीची तरतूद वाढवावी. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढावा, यासाठी प्राध्यापकांची रिक्त पदे भरावीत. मुलींच्या उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी व्हावे, तसेच शासकीय उच्च शिक्षण संस्था, विद्यापीठांमध्ये सोयीसुविधा वाढविण्यावर भर दिला पाहिजे, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. यादृष्टीने लोकसभा निवडणुकीला सामोरे जात असलेल्या उमेदवारांना प्रश्नही केला जात आहे.





देशात पीएच.डी. आणि सेट, नेट पात्रताधारक उमेदवारांची संख्या मोठी आहे. दुसरीकडे विद्यापीठे आणि कॉलेजमध्ये प्राध्यापक आणि शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. हा विरोधाभास दूर करण्यासाठी पदभरती करावी. एनईपी-२०२० अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर पदभरती करावी, त्यामुळे शैक्षणिक दर्जा वाढविण्यास मदत होणार आहे.

**- स्वप्नील तांबे, विद्यार्थी, इतिहास विभाग**



उच्च शिक्षण घेण्यासाठी दुर्गम गडचिरोली भागातून पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आलो आहे. आमच्या गावात शाळा नाही. त्यामुळे शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी विशेष कष्ट घ्यावे लागत आहेत, ही बाब विचारात घेऊन केंद्र सरकारने आदिवासी भागात शाळा उघडाव्यात. वाढत्या महागाईनुसार शिष्यवृत्तीत वाढ करावी; अन्यथा आमच्यासारखे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू शकतात.

**- नरेश लेखामे, विद्यार्थी, इतिहास विभाग**



मुलींच्या शिक्षणावर पालक जास्त खर्च करायला धजावत नाहीत. त्यामुळे उच्च शिक्षण संस्था, विद्यापीठांमधील अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क, वसतिगृहाचा शुल्क यामध्ये मुलींसाठीच्या सवलतीत वाढ करावी.

**- सिद्धी कुरकुटे, राज्यशास्त्र विभाग**



भारताच्या वाढत्या लोकसंख्येनुसार राज्यांमध्ये विशेषत: ग्रामीण भागात राज्य आणि केंद्रीय विद्यापीठांची निर्मिती करावी.

**- रोहित बनसोडे, विद्यार्थी, डिपार्टमेंट कम्युनिकेशन अँड जर्नालिझम**



उच्च शिक्षणावरील खर्च केंद्र सरकारने वाढविला पाहिजे. विद्यापीठांत जातीय आणि धार्मिक वादातून संघर्ष वाढला आहे. शैक्षणिक वातावरण उत्तम राहावे आणि शैक्षणिक दर्जा वाढविण्यावर भर दिला पाहिजे.

**- शुभम बुटले, संशोधक विद्यार्थी**



ग्रामीण असो वा शहरी भाग; मुलींना दुय्यम वागणूक दिली जाते. गरिबी आणि निरक्षरता यामुळे मुलींचे कुटुंबीय मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. उच्च शिक्षणात मुलींच्या गळतीचे प्रमाण जास्त आहे. केंद्र सरकारने मुलींचे शिक्षणावर लक्ष केंद्रित केले पाहिजेत.

**- आरती देशमुख, विद्यार्थिनी, राज्यशास्त्र**



केंद्र शासनाने ग्रामीण भागातील मुलांच्या अपेक्षा विचारात घेत शैक्षणिक धोरण आखावे. ग्रामीण भागातील मुलांचे शैक्षणिक आलेख कसा उंचावता येईल? त्यांना वसतिगृह, शिष्यवृत्ती सोयी, बौद्धिक क्षमता वाढण्याच्या दृष्टीने आवश्यक सुविधा देण्यासाठीची योजना विद्यापीठ स्तरावर तयार केल्या पाहिजेत.

**- रोहिदास खेडकर, संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग**



सोर्स : एआय इमेज



भारतातील मोठ्या प्रमाणात लोकसंख्या ही गरीब, अल्प उत्पन्न गटातील आहे. त्यामुळे शिक्षणासारख्या अत्यावश्यक बाबीचे खासगीकरण तातडीने थांबवावे; अन्यथा गरिबांचे मुले शिक्षणापासून दूर लोटली जातील. सध्याच्या काळात विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी-शिक्षक यांचे प्रमाण विसंगत आहे. शिक्षकांची तत्काळ भरती केली पाहिजे.

**- शुभम बच्छाव, विद्यार्थी**

Hello Pune
Page No. 8 Apr 25, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

— SINCE 1972 —

# SSC, HSC results likely in May, says state board chief

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune:** The Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education is likely to announce the results of the higher secondary certificate (HSC, Std XII) and secondary school certificate (SSC, Std X) exams in May.

HSC results are usually announced in the last week of May, and SSC is out by June 10. This year, the evaluation process has been on track, which would enable the board to announce the results earlier, state board chairman Sharad Gosavi told **TOI**.

HSC exam started in the third week of Feb, whereas SSC exam began on March 1 this year.

"The evaluation process of HSC exams is almost 98% complete. Some reports from 10-12 centres is awaited and they are on track. Similarly, SSC evaluation is almost nearing completion and students should expect the results by May-end," Gosavi said.

More than 15 lakh students appeared for the HSC exams and over 16 lakh wrote SSC exams from the state's nine divisions of Pune, Mumbai, Amravati, Aurangabad, Nagpur, Latur, Nashik, Konkan and Kolhapur in this year.

Gosavi said, "The state board had made special efforts this year for a copy-free environment during both exams. As many as 271 flying squads were set up by the state board in Maharashtra to oversee the proceedings."

"District collectors across the state were also given the responsibility to set up special committees that were entrusted with the job of conducting the exam smoothly," Gosavi added.

This year, 30,000 more students appeared for the SSC exam as compared to last year, Gosavi said. "These enrolments, though higher than 2023, are lesser than the previous years," he added. "Apart from the trust in SSC board schools, students who were admitted to private schools under the Right to Education Act scheme of 25% quota also move to state board schools after Std VIII usually."

The Times of India 25.4.2024

लोकमत

# एनईपी जनजागृतीचे ओझे विद्यार्थ्यांवर

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : देशात नवीन शैक्षणिक धोरण (एनईपी-२०२०) अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे 'एनईपी सारथी' (स्टुडंट ॲम्बेसिडर फॉर अकॅडेमिक रिफॉर्म्स इन ट्रान्सफॉर्मिंग हायर एज्युकेशन इन इंडिया) हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी देशातील विद्यापीठांमधून तीनशे विद्यार्थी प्रतिनिधींची नेमणूक केली जाणार आहे. हे प्रतिनिधी एनईपीतील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणीसाठी वातावरण निर्मिती आणि विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणार आहेत.

राज्यातील विद्यापीठांसह स्वायत्त महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण एनईपी-२०२० अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे. संस्थाचालक, प्राचार्य-प्राध्यापक व विद्यार्थी-पालकांसमोर अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सर्व उच्चशिक्षण संस्थांमध्ये याची सरसकट अंमलबजावणी होणार आहे.

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास काही महिन्यांचा अवधी राहिला आहे. मात्र, अद्यापही एनईपीनुसार बदललेली पदवीची रचना, विषयांची निवड कशी करावी? याबाबत विद्यार्थी आणि पालकांमध्ये जागृती झालेली दिसून येत नाही.

### एका विद्यापीठातून तीन नामांकने

प्रमाणपत्र, पदविका, पदवीपूर्व, पदव्युत्तर पदवी आदी उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उपक्रमात सहभागी होता येईल. प्रत्येक विद्यापीठाकडून तीन विद्यार्थ्यांचे नामांकन मागविण्यात येत आहेत. मे-जूनमध्ये नामांकन मागविणे तसेच जुलैमध्ये प्रतिनिधी नियुक्ती करण्यासह त्यांना प्रशिक्षण दिले जाईल.

### विद्यार्थी प्रतिनिधींवरील जबाबदाऱ्या

- एनईपी जनजागृतीसाठी कार्यक्रमाचे आयोजन
- विद्यार्थ्यांच्या गटाशी संपर्क साधणे
- यूजीसी आणि विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासन यांचा संवाद घडविणे
- कार्यक्रम, चर्चा, वादविवाद, स्पर्धा, प्रश्नमंजुषा, पथनाट्य आयोजन
- कॉलेजमधील कार्यक्रमात एनईपी मदत केंद्र उभारणे

या पार्श्वभूमीवर युजीसीने 'एनईपी सारथी' हा उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे आणि त्यासाठी विद्यार्थ्यांचे सहकार्य घेणार आहेत. एनईपी सारथी उपक्रम, प्रतिनिधींची भूमिका आणि जबाबदारी याबाबत https://www.ugc.gov.in/pdfnews/1566510_SAARTHI-UIDELINES.pdf या संकेतस्थळावर अधिक माहिती दिली आहे.

Pune Main
Page No. 3 Apr 26, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकमत

# एक वर्षापर्यंत तात्पुरते सदस्यत्व मिळणार

## जयकर ग्रंथालयाच्या सेवेचा विस्तार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील जयकर ज्ञानस्रोत केंद्रात संशोधक व बाहेरील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या तात्पुरत्या सदस्यत्वाच्या सेवेमध्ये विस्तार होणार आहे. या सेवेचा कालावधी एक दिवस ते एक वर्षापर्यंत वाढविण्यात यावा, अशी शिफारस जयकर ज्ञानस्रोत समितीने कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत केली होती. या प्रस्तावाला मान्यता मिळाली असून, लवकरच हा कालावधी वाढवण्यात येणार आहे. सध्या हा कालावधी १ ते ८ दिवसांपर्यंतच मर्यादित असून, ही सुविधा सशुल्क व नियमांच्या अधीन सुरळीत सुरू आहे.

पुणे, नाशिक आणि नगर जिल्ह्यातील अनेक संशोधक विद्यार्थी जयकर ज्ञानस्रोत केंद्रात संशोधनासाठी संदर्भ शोधणे व आवश्यक साहित्य मिळविण्यासाठी येत असतात. या विद्यार्थ्यांना केंद्रातर्फे सशुल्क तात्पुरते सदस्यत्व देण्यात येते. या सदस्यत्वाचा सध्याचा कालावधी हा जास्तीत जास्त ८ दिवसांचा आहे. मात्र, आता वेगवेगळ्या आवश्यकतेनुसार या सदस्यत्वाचा कालावधी वाढविण्याची शिफारस केंद्रातर्फे करण्यात आली होती. या सुविधेचा बाहेरच्या जिल्ह्यातील विद्यार्थी, अभ्यासक आणि संशोधकांना मोठा फायदा होणार आहे.



> विद्यार्थ्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार १, ८, १५ दिवस तसेच १, ३, ६ महिने तसेच १ वर्षापर्यंत हे सदस्यत्व घेता येईल. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जयकर ज्ञानस्रोत समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता मिळाली असून केंद्रातर्फे लवकरच अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
>
> **- डॉ. अपर्णा राजेंद्र, संचालिका, जयकर ज्ञानस्रोत केंद्र**

Hello Pune
Page No. 6 Apr 26, 2024
Powered by: erelego.com

सकाळ

# 'पीएचडी'तील गैरप्रकार रोखणार

## मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात समन्वयकांची बैठक

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. २५ : पीएच.डी.च्या प्रवेशापासून प्रमाणपत्र प्रदान करण्यापर्यंत विविध पातळ्यांवर गैरप्रकार घडत आहेत. याला पायबंद घालण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पावले उचलली असून, लवकरच मार्गदर्शक तत्त्वे (एसओपी) जाहीर करण्यात येणार आहेत.

सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील प्राध्यापिकेला पीएच.डी.च्या विद्यार्थ्याकडून लाच घेताना पकडण्यात आले होते. 'सकाळ'नेही पीएच.डी.तील गैरप्रकारांची मालिकाच प्रसिद्ध केली होती. दरम्यान विद्यापीठाने संशोधन केंद्राच्या स्तरावर पीएच.डी. मार्गदर्शक आणि विद्यार्थ्यांची बैठक घेण्याचे निर्देश दिले होते. तसेच त्यांचा कार्यपालन अहवालही विद्यापीठाकडे पाठविण्यास सांगितले होते. मात्र, अजूनही काही संशोधन केंद्रांनी विद्यापीठाकडे अहवाल पाठविला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. ३० जूनपर्यंत उर्वरित संशोधन केंद्रांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विद्यापीठ स्तरावर बैठक घेण्यात येईल, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी दिली. या बैठकांनतर पीएच.डी. प्रक्रियेतील गैरप्रकार रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत. यासंदर्भात लवकरच मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करण्यात येतील, असेही डॉ. काळकर म्हणाले.

### 'एसओपी'त याचा व्हावा विचार

- प्रवेश प्रक्रियेत आणि प्रबंधाचा विषय बदलण्यासाठी सुलभ सुविधा
- मार्गदर्शकांकडून वेळोवेळी होणाऱ्या आडकाठीला पायबंद
- प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे पैसे आणि भेटवस्तूची मागणी करणे
- मुलाखतीवेळी रेफरी अथवा पॅनेलकडून होणारी आर्थिक पिळवणूक
- विद्यार्थ्यांकडून होणारा शिष्यवृत्तीचा गैरवापर
- संशोधनातील सातत्य आणि दर्जा

> बहुतांश संशोधन केंद्रांमध्ये पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांसोबत बैठक घेण्यात आली आहे. राहिलेल्या संशोधन केंद्रांना पुन्हा सूचना केली आहे. पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील अशा ठोस उपाययोजना करण्यात येतील.
>
> **- डॉ. पराग काळकर**, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
26/04/2024 Page No. 2

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# समूह विद्यापीठ योजनेला राज्यभरातून अल्प प्रतिसाद

**चिन्मय पाटणकर, लोकसत्ता**

**पुणे :** उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या समूह विद्यापीठाच्या योजनेला राज्यभरातून थंड प्रतिसाद मिळाल्याचे चित्र आहे. आतापर्यंत या योजनेअंतर्गत राज्यभरातून केवळ दोनच संस्थांचे प्रस्ताव दाखल झाले आहेत. त्यामुळे राज्यातील नामांकित शिक्षण संस्थांनी समूह विद्यापीठ स्थापनेसाठी पुढाकार घेतल्याचे अद्याप दिसून येत नाही.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये 'समूह विद्यापीठ' ही संकल्पना मांडण्यात आली आहे. तसेच 'विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये' ही संकल्पना मोडीत काढून २०३५ पर्यंत सर्व शिक्षणसंस्था या पदवी प्रदान करणाऱ्या संस्था, म्हणजेच विद्यापीठे व्हावीत असे उद्दिष्ट आहे. सध्या विद्यापीठांना संलग्नित महाविद्यालयांचे नियमन करावे लागते. समूह विद्यापीठांमुळे शासकीय विद्यापीठांवरील महाविद्यालयांचा भार कमी होणे अपेक्षित आहे. त्या दृष्टीने समूह विद्यापीठांची कल्पना पुढे आली.

> समूह विद्यापीठ योजनेला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. दोन प्रस्ताव आले तरी आणखी पाच प्रस्ताव सादर होण्याची कार्यवाही संस्थास्तरावर सुरू आहे. प्रस्तावाची प्रक्रिया मोठी आहे. या योजनेबाबत मार्गदर्शन कार्यशाळा घेण्याचे नियोजन असून येत्या काळात समूह विद्यापीठांसाठीचे प्रस्ताव वाढतील.
>
> – डॉ. शैलेंद्र देवळाणकर,
> उच्च शिक्षण संचालक

सध्या राज्यात तीन समूह विद्यापीठे अस्तित्वात आहेत. समूह विद्यापीठ धोरणाअंतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मार्गदर्शक सूचना तयार केल्या. पाचपेक्षा जास्त महाविद्यालये किंवा संस्था समूह विद्यापीठात समाविष्ट करण्यासाठी राज्य शासनाकडून मूल्यांकन केले जाईल. समूह विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचना जवळपास वर्षभरापूर्वी प्रसिद्ध करण्यात आल्या. या योजनेसाठी दोनच प्रस्ताव सादर झाले आहेत. त्यात एक मुंबईतील संस्थेचा, तर दुसरा कोल्हापूर जिल्ह्यातील संस्थेचा समावेश आहे.

26/04/2024 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## News Paper Clippings During April 2024

## Section: Education

लोकमत

# पाचशे महाविद्यालयांचा कारभार प्राचार्यांविनाच

## परीक्षा पारदर्शक कशा पार पडणार, एनईपी अंमलबजावणी कशी होणार?

**प्रशांत बिडवे**

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यांतील सुमारे पाचशे महाविद्यालयांचा कारभार पूर्णवेळ प्राचार्यांविनाच सुरू आहे. विशेष म्हणजे, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १५८ अनुदानित महाविद्यालयांपैकी ५५ महाविद्यालयांत प्रभारींवर प्राचार्यपदाचा 'भार' सोपविला आहे. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, एनईपीची अंमलबजावणी करणे, तसेच आगामी उन्हाळी सत्र परीक्षा पारदर्शकपणे कशा पार पडतील, असा सवाल शिक्षण क्षेत्रातून उपस्थित केला जात आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न १ हजार १६६ महाविद्यालये आहेत. त्यापैकी सुमारे सहाशे महाविद्यालयांमध्ये नियमित आणि प्रभारी प्राचार्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर उर्वरित सुमारे पाचशे महाविद्यालयांचा कारभार पूर्णवेळ प्राचार्यांविना सुरू आहे. शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुणे शहरात ४३ अनुदानित महाविद्यालये आहेत, त्यापैकी १८ महाविद्यालयांत प्रभारी प्राचार्यांकडे धुरा सोपविली आहे.

प्राचार्य नियुक्तीसंदर्भात राज्य शासनाकडून एनओसी मिळणे, संस्था स्तरावर बिंदुनामावली तपासणी, तसेच पद राखीव असावे अथवा नसावे, यावरूनही वाद होतात. प्राध्यापकांकडे पात्रता असूनही प्राचार्यपदी विराजमान होऊन वाढलेली जबाबदारी अनेकांना नको असते.

विद्यापीठ समिती वेळोवेळी प्राचार्य, शारीरिक शिक्षण संचालक आणि ग्रंथपाल यांची पदे नियमित, तसेच पूर्णवेळ भरली आहेत का? याची तपासणी करते. नॅक मूल्यांकन, तसेच यूजीसीकडे प्रस्ताव पाठवायचा असेल, तर पूर्णवेळ प्राचार्य नियुक्ती गरजेची आहे.



### प्राचार्य पद का महत्त्वाचे?

कॉलेजमधील विद्यार्थ्यांची सुरक्षितता, सोईसुविधा, शिस्त ठेवणे आदींसह शैक्षणिक विभाग, प्रशासकीय सेवा, तसेच परीक्षा प्रक्रियेचे प्रमुख प्राचार्य असतात. शिस्तबद्ध आणि पारदर्शकतेने परीक्षांच्या आयोजनात त्यांचा महत्त्वाचा वाटा असतो.

### विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी खेळ

- विद्यापीठात गत दीड वर्षापासून पूर्णवेळ अधिष्ठात्यांची नियुक्ती रखडली आहे, तर दुसरीकडे कॉलेजमध्ये नियमित प्राचार्य नसल्याचे निदर्शनास येत आहे.
- प्राचार्यांविना कॉलेज चालविणे म्हणजे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य वाऱ्यावर सोडण्याचाच प्रकार आहे.

### अधिसभेतही यावर झाली होती चर्चा

- गतवर्षी ऑक्टोबरमधील अधिसभेत अधिसभा सदस्य डॉ. चिंतामण निगळे यांनी प्राचार्य नियुक्तीसंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी ५१३ महाविद्यालयांचा कारभार प्रभारी प्राचार्य सांभाळत असून १९ महाविद्यालयांना प्राचार्यच नसल्याचे उघडकीस आले होते.
- प्राचार्य नियुक्तीबाबत संस्थाचालकांना पत्र पाठवू, असे उत्तर विद्यापीठ प्रशासनाने दिले होते. मात्र, आजही 'जैसे थे' परिस्थिती आहे.

> प्राचार्यांची नियुक्ती करावी, या संदर्भात महाविद्यालयांना, शिक्षण संस्थांना विद्यापीठाच्या वतीने गत सहा महिन्यांत तीन वेळा स्मरणपत्र देण्यात आले आहे.
>
> **- डॉ.पराग काळकर, प्र-कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.**

> पुणे विभागात अनुदानित महाविद्यालयांत प्राचार्य नियुक्तीसंदर्भात एकही ना हरकत प्रमाणपत्राचा प्रस्ताव प्रलंबित नाही. शिक्षण विभागाने प्राचार्य नियुक्ती करण्याबाबत मार्चमध्ये आदेश दिले. मात्र, आचारसंहिता लागल्यामुळे नियुक्ती रखडली आहे.
>
> **- डॉ.केशव तुपे, सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग**




### अठरा विधि महाविद्यालयांना प्राचार्य नाहीत

पुणे विद्यापीठाशी संलग्न ४६ विधि महाविद्यालये आहेत. त्यापैकी केवळ ६ महाविद्यालयांत नियमित, तसेच उर्वरित २२ महाविद्यालयांत प्रभारी प्राचार्य नेमले आहेत, तर १८ महाविद्यालये प्राचार्यांविना सुरु आहेत.



Pune Main
Page No. 2 Apr 27, 2024
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# विद्यापीठाच्या पेट परीक्षेवरून प्रश्नचिन्ह



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीकडून पीएच.डी. प्रवेशाबाबत नवनवीन निर्णय जाहीर केले जात असल्याने पीएच.डी. प्रवेशास इच्छुक असणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. परंतु पीएच.डी. प्रवेशासाठी पेट परीक्षा घेण्याबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यूजीसीकडे केलेल्या पत्रव्यवहाराला अद्याप उत्तर मिळाले नाही. त्यामुळे यूजीसी विद्यापीठाच्या पेट परीक्षेला हिरवा कंदील दाखवणार की नेट परीक्षेच्या आधारेच पीएच.डी. प्रवेश होणार यावरून विद्यापीठातील अधिकाऱ्यांची धाकधूक वाढली आहे.

यूजीसीच्या सूचनेनुसार विद्यापीठाने पीएच.डी. प्रवेशासाठी नियमावलीत बदल केले असून पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेची पूर्ण तयारी केली आहे. परंतु नेट परीक्षेच्या गुणांच्या आधारे पीएच.डी.ला प्रवेश देण्याची घोषणा केल्यामुळे विद्यापीठाने पेट परीक्षा घेण्याबाबत यूजीसीकडे पत्रव्यवहार केला. परंतु १५ दिवस उलटून गेले तरी यूजीसीकडून विद्यापीठाला उत्तर मिळाले नाही. त्यामुळे विद्यापीठाची पेट परीक्षा रखडली असून विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांची चिंता वाढली आहे. तसेच यूजीसीकडून पत्राला केव्हा उत्तर मिळणार याकडेही अधिकारी डोळे लावून बसले आहेत. विद्यापीठाला पेट परीक्षा घेण्याची परवानगी मिळाली तर पुढील एक दोन महिन्यात परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना प्रवेश देणे शक्य होईल. परंतु यूजीसीने नेट परीक्षेच्या आधारेच प्रवेश देण्याबाबत आदेश दिले तर विद्यार्थ्यांना येत्या जून महिन्यात होणारी नेट परीक्षा द्यावी लागेल. त्यानंतर जाहीर होणाऱ्या निकालाच्या आधारे जुलै-ऑगस्ट महिन्यात विद्यापीठाला पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया राबवणे भाग पडेल. परिणामी विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आणखी तीन ते चार महिने वाट पाहावी लागेल. त्यामुळे यूजीसी पेट परीक्षेबाबत काय निर्णय देणार याकडे विद्यार्थ्यांसह विद्यापीठ प्रशासनाचे डोळे लागले आहेत.

**विद्यापीठ प्रशासनाचे यूजीसीच्या निर्णयाकडे डोळे**

Pune Edition
Apr 27, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

# शालेय शिक्षणात यंदा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांची पायाभरणी

## पूर्व प्राथमिकसाठी अभ्यासक्रमनिर्मिती, वर्ग जोडण्यावर भर

**पुणे : गणेश खळदकर**

उच्च शिक्षणात अंमलबजावणी सुरू असलेल्या आणि यंदा जोर धरणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आता शालेय शिक्षणातही केली जाणार आहे.

यंदा पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम निर्मिती, एकसंध पहिली ते बारावीचे वर्ग आणि शैक्षणिक 'क्रेडिट'बरोबरच कला, क्रीडा, कार्यानुभव याअंतर्गत मिळालेल्या 'क्रेडिट'ला शालेय शिक्षणात महत्त्व दिले जाणार असल्याचे शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे यंदा शालेय शिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची पायाभरणी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीस येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरुवात करण्यात येईल. पहिल्या टप्प्यात पूर्वप्राथमिक शिक्षणात नेमके काय शिकवायला हवे, याचा अभ्यासक्रम तयार झाला आहे. त्यानुसार बालवाड्या आणि अंगणवाड्यांना पाठ्यपुस्तके मिळतील. त्याची छपाई बालभारतीमध्ये सुरू झाली आहे. राज्यात आतापर्यंत तीन ते सहा वर्षे वयोगटातील पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी ठोस आराखडा नव्हता. आता तयार झालेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून होईल. हे धोरण टप्प्या-टप्प्याने पुढे जाणार आहे. २०३० पर्यंत या धोरणाची प्रत्यक्षात अंमलबजावणी होणार आहे. याची सुरुवात पूर्वप्राथमिक स्तरावरून होईल. लवकरच अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या प्रशिक्षणाची प्रक्रिया पूर्ण होईल. तीन ते आठ वर्षे वयोगटातील मुलांची आकलनशक्ती, बौद्धिक क्षमता विलक्षण असते. त्यामुळे या वयातील मुलांच्या क्षमतांना अधिक वाव मिळावा, असा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचा 'लर्निंग आउटकम' यापुढील काळात नोंदविला जाणार आहे. शैक्षणिक 'क्रेडिट'बरोबरच कला, क्रीडा, कार्यानुभव याअंतर्गत मिळालेल्या 'क्रेडिट'ला शालेय शिक्षणात महत्त्व दिले जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

> यंदापासून शालेय शिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यामध्ये यंदा पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात येणार असून, संपूर्ण राज्यात पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी एकच अभ्यासक्रम शिकवण्यात येणार आहे. तसेच, हे वर्ग प्राथमिकला जोडणे आणि प्राथमिक शिक्षणात पाचवी आणि आठवीचे वर्ग चौथी आणि सातवीला जोडण्यात येणार आहेत. त्याचबरोबर आवश्यक तेथे अकरावी-बारावीचे वर्ग जोडून एकसंध शाळा निर्मितीवर भर देण्यात येणार आहे.
>
> **- शरद गोसावी, संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय**

# *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रभात

## पुणे विद्यापीठात अध्यासन प्रमुखांच्या भरतीला सुरुवात

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अध्यासन प्रमुखांच्या भरतीला अखेर सुरुवात झाली आहे. विद्यापीठाने विविध ११ अध्यासनांसाठी प्राध्यापकांकडून ऑनलाइन अर्ज मागविले असून, नामनिर्देशित पद्धतीने पदे भरली जाणार आहेत.

विद्यापीठांना लोकाभिमुख करण्याबरोबरच संशोधन आणि सामाजिक योगदानात अध्यासनाची प्रमुख भूमिका असते. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, डी. एस. सावरकर, शंतनुराव किर्लोस्कर, बँक ऑफ महाराष्ट्र एनर्जी स्टडी या अध्यासनांसाठी अर्ज मागविले आहेत. वय वर्षे ६० ते ७० दरम्यानच्या प्राध्यापकांची तीन वर्षांसाठी अध्यासनाच्या प्राध्यापकपदी निवड होते, असे विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे. सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

PuneCity, 29 Apr 2024, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

प्रभात

## बीबीए प्रवेश नोंदणीसाठी उद्या शेवटचा दिवस

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८ -** व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन (बीसीए) पदवी अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षेच्या नोंदणीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदत आहे. नोंदणीसाठी केवळ दोन दिवस उरले असून, विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी वेळेत नोंदणी करावी, असे आवाहन राज्य सीईटी सेलने केले आहे.

एमबीए, एमसीए या व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या धर्तीवर बीसीए, बीबीए, बीएमएस हे पदवी अभ्यासक्रम आपल्या अखत्यारीत घेण्याचा निर्णय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) घेतला. त्याच धर्तीवर बीसीए, बीबीए, बीएमएस या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीही प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे.

दरम्यान, बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम प्रवेश सीईटीसाठी ३० एप्रिलपर्यंत, तर एमबीए, एमसीए एकात्मिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी ३० एप्रिलपर्यंत अर्ज करता येणार आहे. या दोन्ही अभ्यासक्रमांची परीक्षा २७ ते २९ मे या कालावधीत होणार आहे.

PuneCity, 29 Apr 2024, Page:007
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# शालेय शिक्षणात यंदा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण!

**पुढारी विशेष**

गणेश खळदकर
पुढारी प्रतिनिधी

### पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम निर्मिती, वर्ग जोडण्यावर भर

### शैक्षणिक 'क्रेडिट'बरोबरच कला, क्रीडा, कार्यानुभव याअंतर्गत मिळालेल्या 'क्रेडिट'ला शालेय शिक्षणात महत्त्व

**पुणे : उच्च शिक्षणात अंमलबजावणी सुरू असलेल्या आणि यंदा जोर धरणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आता शालेय शिक्षणातदेखील केली जाणार आहे. यंदा पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम निर्मिती, एकसंध पहिली ते बारावीचे वर्ग आणि शैक्षणिक 'क्रेडिट'बरोबरच कला, क्रीडा, कार्यानुभव याअंतर्गत मिळालेल्या 'क्रेडिट'ला शालेय शिक्षणात महत्त्व दिले जाणार असल्याचे शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे यंदा शालेय शिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची पायाभरणी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीस येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरुवात होईल. पहिल्या टप्प्यात पूर्वप्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार झाला आहे. त्यानुसार बालवाड्या आणि अंगणवाड्यांना पाठ्यपुस्तके मिळतील. त्याची छपाई बालभारतीमध्ये सुरू झाली आहे.

राज्यात आतापर्यंत तीन ते सहा वर्षे वयोगटातील पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी ठोस आराखडा नव्हता. नव्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून होईल. हे धोरण टप्प्या-टप्प्याने पुढे जाणार आहे. २०३० पर्यंत या धोरणाची प्रत्यक्षात अंमलबजावणी होणार आहे. याची सुरुवात पूर्वप्राथमिक स्तरावरून होईल. लवकरच अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या प्रशिक्षणाची प्रक्रिया पूर्ण होईल. तीन ते आठ वर्षे वयोगटातील मुलांच्या क्षमतांना अधिक वाव मिळावा, असा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. शिक्षणातील विद्यार्थ्यांचा 'लर्निंग आउटकम' यापुढील काळात नोंदविला जाणार आहे. शैक्षणिक 'क्रेडिट'बरोबरच कला, क्रीडा, कार्यानुभव याअंतर्गत मिळालेल्या 'क्रेडिट'ला शालेय शिक्षणात महत्त्व दिले जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### दोन महिन्यांत तयारी अशक्य

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीपूर्वी राज्यातील पूर्वप्राथमिकची शिक्षण व्यवस्था नियंत्रणात आणणे हा महत्त्वाचा भाग आहे. दुसरीकडे पूर्वप्राथमिकचे प्रवेश खासगी संस्थांनी उरकले आहेत. तसेच, आरटीई प्रवेश, अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया, दहावी-बारावीची परीक्षा पद्धत बदलण्यासाठी मोठा वेळ लागणार आहे. शिवाय, नव्या अभ्यासक्रमाची पुस्तके, तसेच अभ्याससाहित्यांची तयारी पुढील दोन महिन्यांत शक्य नसल्याचे शालेय शिक्षण विभागातील तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

### नव्या शैक्षणिक धोरणातील वैशिष्ट्ये

- १०+२ ऐवजी आता शिक्षणाचा ५ +३ +३+ ४ पॅटर्न
- पाचवीपर्यंत शिक्षण मातृभाषा, प्रादेशिक किंवा घरातील भाषेत
- पूर्वप्राथमिक शिक्षण आंतरराष्ट्रीय दर्जाचं करण्याचा प्रयत्न
- सहावीपासून व्यावसायिक शिक्षणाचा समावेश
- विद्यार्थी स्वत:चे मूल्यांकन स्वत:च किंवा सहविद्यार्थी, शिक्षक करणार
- शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्य मिळण्यावर भर
- सरकारी आणि खासगीशाळांमधील शिक्षणात समानता

"यंदापासून शालेय शिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यामध्ये यंदा पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात येणार असून, संपूर्ण राज्यात पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी एकच अभ्यासक्रम शिकवण्यात येणार आहे. तसेच, हे वर्ग प्राथमिकला जोडणे आणि प्राथमिक शिक्षणात पाचवी आणि आठवीचे वर्ग चौथी आणि सातवीला जोडण्यात येणार आहेत. त्याचबरोबर आवश्यक तेथे अकरावी-बारावीचे वर्ग जोडून एकसंध शाळा निर्मितीवर भर देण्यात येणार आहे. या प्रमुख दोन गोष्टींची अंमलबजावणी यंदा करण्यात येणार आहे.

**- शरद गोसावी,**
संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय

Pune Edition
Apr 29, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# No foreign students in distance learning

### UGC bars their admission to ODL programmes in higher education institutions, sparks debate over implications

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror



PIC FOR REPRESENTATIONAL PURPOSES ONLY

The recent directive from the University Grants Commission (UGC) prohibiting the admission of foreign students to open and distance learning (ODL) programmes in higher education institutions (HEIs) has ignited a debate among education experts.

The directive, issued in accordance with Regulation 23 of the UGC ODL Programmes and Online Programmes Regulations, 2020, has raised questions about its potential implications and the rationale behind it.

Under the directive, HEIs have been instructed to adhere strictly to the eligibility criteria specified in Annexure III of UGC regulations, limiting enrollment to learners residing within India.

The UGC has directed that all academic activities, including admissions and examinations, must be conducted within the territorial jurisdiction of the institution concerned.

Meanwhile, the Ministry of Home Affairs (MHA) has provided further clarification stipulating that student visas cannot be granted to international students funded by franchise educational institutes, off-campus centers, or study centers of open universities offering distance learning programs. This restriction extends to outreach programmes and courses lacking regulatory sanctions.

The UGC directive mandates HEIs authorised to offer ODL programs to comply with the guidelines and refrain from enrolling foreign nationals. Enrollment is restricted to learners residing in India to ensure compliance with territorial jurisdiction requirements outlined in Annexure III of the UGC regulations.

Professor Manish Joshi, secretary, UGC, said, "The eligibility criteria specified by the UGC Open and Distance, Online Courses Regulations, 2020, for admissions to HEIs provides that students must fall within the regional jurisdiction of the institution. Thus, students residing in the country can enroll in courses offered by HEIs recognised by the UGC. This decision was made following clarification from the MHA stating that student visas will not be granted for campuses operated by franchise educational institutions, study centers for distance courses of open universities, extension courses of educational institutions, and courses conducted without regulatory approval."

Professor Siddharth Meshram, a higher education expert, expressed concerns over the potential decline in the number of international students from developing nations and the loss of foreign currency due to this decision.

"The UGC should reconsider this action because many aspiring students from developing nations such as Sri Lanka, Bangladesh, Afghanistan, Iraq, and Iran seek admission to Indian universities. However, due to visa and inter-country political issues, most of these students face challenges in pursuing regular studies in Indian colleges," he said.

Meshram pointed out that open and distance learning provides a middle ground for students to obtain degree certificates from esteemed Indian universities and colleges. "By offering distance and open courses to foreign students, we attract the inflow of foreign currency, thereby boosting the Indian economy. Closing the avenue for foreign students would lead them to seek educational opportunities in other countries."

Professor Milind Joshi, a faculty member at a renowned city college, supported the UGC decision stating that it would encourage foreign students to enroll in regular courses in the country.

"The UGC has made the decision after thorough consideration. The move is aimed at encouraging students to pursue studies directly within university or college campuses. The prevalence of distance and open learning has led to a decline in foreign student tourism. Consequently, this decision is expected to have a definite impact on the number of foreign students," he added.

**UGC's directive**

- UGC directs Indian universities to not admit foreign nationals to online courses
- Ministry of Home Affairs (MHA) guidelines restrict student visas for international learners
- HEIs mandated to comply with UGC directive, admitting only residents for ODL programs

Pune Mirror 29.4.2024

# *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

# To foster research culture, UGC allows FYUP students to take NET

Ayushi.Gupta1
@timesgroup.com

The University Grants Commission (UGC) in a recent notification said that students with four-year undergraduate degrees can now appear in the National Eligibility Test (NET) exam and pursue PhD in the subject irrespective of the subjects of their undergraduate degree. The provision has been introduced to strengthen the research ecosystem by increasing the pool of PhD candidates. Moreover, the UGC aims to shatter the perception that a PhD is an 'elite qualification'.

The four-year UG students enrolling for PhD will promote innovation, generate new knowledge across various fields, including science and technology. M Jagadesh Kumar, chairman, UGC, says, "Doctoral studies provide students with an opportunity to delve into their chosen fields, develop critical thinking and become subject matter experts. This will prepare them for careers in research, academia, or industry leadership roles. By investing in human capital through accessible PhD programmes, the UGC is directly contributing to the goals outlined in NEP 2020."

Furthermore, the provision of a Four-Year Undergraduate Programme (FYUP) has been introduced to promote flexibility and create alternative pathways for higher education. It shall not replace the need for specialised, advanced, and professional postgraduate degrees.

Students who do not opt for the FYUP or have chosen the three-year UG course will be required to complete their master's degree before appearing for the PhD entrance examination. Additionally, students scoring less than 75% will need to undertake a one-year master's programme if they wish to pursue a PhD.

### New guidelines for PhD

FYUP students will have to adhere to the following rules:

- Only students with a minimum of 75% marks can pursue a PhD after qualifying NET
- Those with less than 75% will have to do a one-year master's before taking NET
- Three-year UG grads can pursue a PhD after passing two-year master's and NET



The Times of India 29.4.2024

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

लोकमत

# आशियातील ३ देशांशी विद्यापीठाचा करार

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ज्ञानशाखांचा विस्तार करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लेटर ऑफ इंटेन्टवर कझाकिस्तान, जॉर्जिया आणि किरगिझिस्तानातील तीन विद्यापीठांनी स्वाक्षरी केली असून, विद्यापीठ लवकरच या देशात आपल्या ज्ञानशाखा विस्तारणार आहे. यासह विद्यार्थी, शिक्षक, सुविधांची देवाण-घेवाण करण्यासह संयुक्त अभ्यासक्रमही विकसित केले जाणार आहेत.

तिन्ही देशांतील विद्यापीठांच्या शिष्टमंडळाने आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला भेट दिली. शिवाजी सभागृहात झालेल्या कार्यक्रमात आशय पत्र (लेटर ऑफ इंटेन्ट) स्वाक्षरी करून शैक्षणिक आणि प्रशासकीय बाबींची देवाणघेवाण करण्यासंबंधी चर्चा केली.

कझाकिस्तानमधील कॅस्पियन विद्यापीठाचे नुसेनोव्ह झोल्डास्बेक, जॉर्जियातील इस्ट युरोपियन विद्यापीठाचे डॉ. काखाबेर लाझाराहविली आणि किरगिझस्तानमधील इंटरनॅशनल विद्यापीठाचे प्रा. अल्दारारालिव्ह असिलबेक यांच्यासह कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ. विजय खरे, अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. गोसावी म्हणाले, सहभागी विद्यापीठ एकमेकांची कार्यप्रणाली जाणून घेऊन त्यांच्या विस्तारीकरणावर भर देणार आहेत. विद्यार्थी, शिक्षक आणि इतर प्रशासकीय कर्मचाऱ्यांची देवाणघेवाण करण्यासंबंधी फ्रेमवर्क तयार जाणार आहे, उपलब्ध सुविधा आणि संसाधने यांचे आदानप्रदान करण्यावरही भर देण्यात येणार आहे. याशिवाय, यांतर्गत विविध चर्चासत्र, परिषद आणि कार्यशाळांचेही आयोजन केले जाईल, विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेता यावे यासाठी नवीन संयुक्त अभ्यासक्रमही विकसित केला जाणार आहे.

> विद्यापीठ आंतरराष्ट्रीय स्तरावर पाय रोवत आहे. वैद्यकीय शास्त्र, व्यवस्थापन शास्त्र आणि शिक्षणशास्त्र या विषयावर विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी संलग्नता करार करुन नवीन सामायिक अभ्यासक्रम सुरु करण्यासंबंधी चर्चा सुरु आहे.
>
> **- प्रा. डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरु सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ**

Pune Main
Page No. 4 Apr 30, 2024
Powered by: erelego.com

*News Paper Clippings During April 2024*

*Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# विद्यापीठ होणार 'ऑक्सफर्ड ऑफ द सेंटर आशिया'

## तीन आंतरराष्ट्रीय विद्यापीठांची पुणे विद्यापीठाच्या आशय पत्रावर स्वाक्षरी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'ऑक्सफर्ड ऑफ द इस्ट' म्हणून प्रसिद्ध असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ लवकरच आपल्या ज्ञानशाखा विस्तारत 'ऑक्सफर्ड ऑफ द सेंटर आशिया' बनण्याचा मार्गावर आहे. याचाच एक भाग म्हणून सोमवारी (दि.२९) मध्य आशियातील तीन आंतरराष्ट्रीय विद्यापीठांनी पुणे विद्यापीठाच्या आशय पत्रावर (लेटर ऑफ इंटेट) स्वाक्षरी केली.



लेटर ऑफ इंटेट दाखवताना कॅस्पियन युनिव्हर्सिटी, इस्ट युरोपियन युनिव्हर्सिटी, किरगिझस्तानमधील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे पदाधिकारी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी.

विद्यापीठाच्या शिवाजी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कॅस्पियन युनिव्हर्सिटी, कझाकस्तानचे रेक्टर नुसेनोव्ह झोल्डास्बेक, इस्ट युरोपियन युनिव्हर्सिटी, जॉर्जियाचे रेक्टर डॉ. काखाबेर लाझाराहविली आणि किर्गिझ प्रजासत्ताक, किरगिझस्तानच्या इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे रेक्टर प्रा. अल्दारारालिव्ह असिलबेक, विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे आदी उपस्थित होते.

कझाकस्तानमधील कॅस्पियन युनिव्हर्सिटी, जॉर्जियामधील इस्ट युरोपियन युनिव्हर्सिटी आणि किरगिझस्तानमधील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या शिष्टमंडळाने सोमवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला भेट दिली. या वेळी त्यांनी आशय पत्रावर स्वाक्षरी करत शैक्षणिक आणि प्रशासकीय बाबींची देवाण-घेवाण करण्यासंबंधी चर्चा केली.

या प्रसंगी डॉ. गोसावी म्हणाले, विद्यापीठ आपले पाय आंतरराष्ट्रीय स्तरावर रोवत असून ही आशय पत्रावरील स्वाक्षरी म्हणजेच आपल्या 'ऑक्सफर्ड ऑफ द सेंटर आशिया' होण्याच्या मार्गावरील पहिले पाऊल आहे.

सोमवारी झालेल्या हेतू पत्रावरील स्वाक्षरीमुळे सहभागी विद्यापीठ एकमेकांची कार्यप्रणाली जाणून घेऊन त्यांच्या विस्तारीकरणावर भर देणार आहेत. या अंतर्गत विद्यार्थी, शिक्षक आणि इतर प्रशासकीय कर्मचाऱ्यांची देवाण-घेवाण करण्यासंबंधी फ्रेमवर्क तयार करण्यात येणार आहे. तसेच, उपलब्ध सुविधा आणि संसाधनांचे आदान-प्रदान करण्यावरही भर देण्यात येणार आहे. याशिवाय याअंतर्गत विविध चर्चासत्र, परिषद आणि कार्यशाळांचेही आयोजन करण्यात येईल. तसेच, विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी नवीन संयुक्त अभ्यासक्रमही बनविण्यात येणार आहे.

My Pune Edition
Apr 30, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Education*

सकाळ

# प्रवेश वाढविण्याचे विद्यापीठासमोर आव्हान

## विद्यार्थ्यांची संख्या कायम राखण्यासाठी विभागांना विशेष प्रयत्न करावे लागणार

**पुणे, ता. २९ : प्रवेश परीक्षेला झालेला उशीर, प्लेसमेंटचा अभाव आणि कालबाह्य अभ्यासक्रमांमुळे दिवसेंदिवस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विभागांकडे विद्यार्थ्यांचा ओढा कमी होत आहे. मागील वर्षी अनेक विभागांमधील प्रवेश संख्या रोडावल्याचे चित्र होते. यंदा ही प्रवेशसंख्या कायम राखण्यासाठी विद्यापीठाला विशेष प्रयत्न करावे लागणार आहे.**

'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' अशी ओळख असलेल्या विद्यापीठात एकेकाळी प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी चढाओढ असायची. आजही देशभरातील विद्यार्थी विद्यापीठात प्रवेशासाठी अर्ज करतात. मात्र, सर्वांत उशिरा प्रवेश प्रक्रिया पार पाडत असल्याने अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झालेले असतात. त्यातच खासगी विद्यापीठांचे आव्हानही विद्यापीठासमोर असून, आपला दर्जा कायम राखण्यासाठी विद्यापीठाला मोठी पावले उचलावी लागणार आहेत. कोरोनानंतर आता विद्यापीठाचे शैक्षणिक वेळापत्रक पूर्ववत होत आहे.

विद्यापीठाने वेळेवर प्रवेश परीक्षेची घोषणा केली आहे. मात्र त्यानंतर प्रत्यक्ष गुणवत्ता यादी घोषित करत विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण करणे विभागांसमोरील आव्हान असणार आहे.



विद्यापीठातील मानव्य विद्याशाखेला एक दीर्घ परंपरा आहे. अनेक दिग्गज विचारवंत, तत्त्वज्ञ, लेखक आणि संशोधक या शाखांनी दिली आहेत. मात्र, आज या विद्याशाखेतील अनेक विभागांत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटली आहे. याबद्दल वरिष्ठ प्राध्यापक सांगतात, "कोरोनाच्या आधीपासूनच विद्यापीठातील काही विषयांना विद्यार्थ्यांची संख्या रोडावली आहे. एकंदरीत रोजगाराकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल आणि कौशल्याभिमूख अभ्यासक्रमाच्या अभावाने विद्यार्थी विभागांमध्ये प्रवेश घेत नाहीत. स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाबरोबरच फक्त वसतिगृहात खोली मिळण्यासाठी देखील विद्यार्थी कला शाखेतील विभागांना प्रवेश घेतात."

### कशाची अत्यावश्यकता?

- सर्व विभागांचे शैक्षणिक ऑडिट गरजेचे
- अभ्यासक्रम खरंच संशोधनाभिमुख किंवा कौशल्याभिमुख आहे का, याची पडताळणी होणे गरजेचे
- अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे आवश्यक
- वेळेवर प्रवेश प्रक्रिया पूर्ण करत देशभरातील विद्यार्थ्यांना आकर्षित करणे गरजेचे
- उद्योगांचा सहभाग आणि नोकऱ्यांसाठी मेळावे घेणे आवश्यक

> गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढावे यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. विद्यापीठाने नुकतीच प्रवेश परीक्षेची घोषणा केली असून, ती वेळेवर पार पाडली जाईल.
> **- डॉ. पराग काळकर,**
> प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
30/04/2024 Page No. 5

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Research*

पुढारी
www.pudhari.com
/news 020/67639900 पुणे शहर पुणे, बुधवार, १० एप्रिल २०२४



# छत्रपती संभाजी महाराजांच्या नृशंस छळाचा ऐतिहासिक दस्तऐवज सापडला

## औरंगजेबाच्या दरबारातील कागदपत्रे भारत इतिहास संशोधक मंडळाच्या सभेत सादर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**भारत इतिहास संशोधक मंडळात रविवारी पाक्षिक सभा संपन्न झाली. यात मुघल बादशाह औरंगजेबाच्या दरबारातील अधिकृत कागदपत्रांतील 'जवाबित-ए-आलमगिरी' या अप्रकाशित साधनातील औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांच्या केलेल्या निर्घृण व नृशंस छळाचा आणि हत्येचा अप्रकाशित पुरावा सादर करण्यात आला.**

सदर दस्तऐवज प्रसिद्ध फारसी तज्ज्ञ राजेंद्र जोशी यांना अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या ग्रंथालयात आढळून आला. तो त्यांनी मंडळातील विद्यार्थ्यांकडे सुपूर्त केला. या दस्तऐवजावरील संशोधन मंडळातील फारसी भाषेचे अभ्यासक सत्येन वेलणकर, पराग पिंपळखरे, रोहित सहस्रबुद्धे, मनोज दाणी, प्रशांत सोमण, अभिजित मोहिरे व गुरुप्रसाद कानिटकर यांनी केले. ते प्रातिनिधिक स्वरूपात पराग पिंपळखरे यांनी



ऐतिहासिक दस्तऐवज.

सभेमध्ये मांडले. त्यासंदर्भात श्रोत्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांना त्यांच्यासोबत गुरुप्रसाद कानिटकर, सत्येन वेलणकर यांनी समर्पक उत्तरे दिली.

यासाठी फारसी तज्ज्ञ राजेंद्र जोशी यांनी आपल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. मंडळाचे चिटणीस व इतिहासकार पांडुरंग बलकवडे म्हणाले की, इतिहास संशोधनामध्ये विरुद्ध बाजूच्या पुराव्यांनाही तितकेच महत्त्व असते. हा पुरावा प्रत्यक्ष औरंगजेबाच्या दरबारातील सरकारी कामकाजातील कागदपत्रांचा असल्यामुळे त्याच्या सत्यतेबद्दल शंका घेण्यास वाव नाही. छत्रपती संभाजी महाराजांनी औरंगजेबाने दिलेल्या कोणत्याही प्रलोभनांना न जुमानता त्याच्याशी अविरतपणे संघर्ष केला तसेच स्वराज्याच्या आणि हिंदू धर्माच्या रक्षणार्थ बलिदान दिले, हे पुन्हा समोर आले आहे.

बलकवडे यांनीही मंडळातील सर्व अभ्यासकांचे कौतुक केले. हा दस्तावेज पूर्णपणे उपलब्ध करून पुस्तकरूपाने प्रकाशित करू, अशी ग्वाही उपस्थितांना दिली.

Pune Edition
Apr 10, 2024 Page No. 09
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Research*

सामना

# आकुर्डीतील महिला शास्त्रज्ञाकडून दुर्मिळ कीटकाच्या प्रजातीचा शोध

## शवविच्छेदनात अचूकता आणण्यासाठी मदत करू शकणार

पिंपरी, दि. २१ (प्रतिनिधी) - आकुर्डीतील शास्त्रज्ञ डॉ. अपर्णा कलावटे यांना दुर्मिळ कीटकाच्या (बीटलच्या) प्रजातीचा शोध लावण्यात यश आले आहे. नवीन प्रजातीचे कीटक फॉरेन्सिक सायन्ससाठी महत्त्वाचे ठरणार असून, ते शवविच्छेदनात अचूकता आणण्यासाठी मदत करू शकतात. पुणे जिल्ह्यातील मोरगाव येथे ही प्रजाती सापडल्याने याला ओमोर्गस (ॲफ्रोमोर्गस) मोरेश्वर कलावटे आणि स्ट्रम्फर, २०२४ असे नाव देण्यात आले आहे.

आकुर्डी येथील भारतीय प्राणी सर्वेक्षण, पश्चिमी प्रादेशिक केंद्रात कार्यरत असणाऱ्या डॉ. अपर्णा कलावटे यांनी हा शोध लावला आहे. याबाबतचा अपर्णा यांनी सादर केलेला शोधप्रबंध नुकताच 'झुटेक्सा' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे. दक्षिण आफ्रिका येथील डिट्सॉन्ग नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्ट्रीचे संचालक वर्नर पी स्ट्रम्फर यांनी या पेपरचे सह-लेखन केले होते. नव्याने सापडलेला कीटक ट्रोगिडे कुळातील आहे. एखाद्या जीवाच्या मृत्यूनंतर, शरीराच्या विघटनादरम्यान, ब्लोफ्लाइज हे पहिल्या टप्प्यात येतात आणि त्यानंतर मोठ्या संख्येने अळ्या खाणारे विविध शिकारी कीटक येतात. सामान्यपणे मृत शरीरावर विघटनाच्या अंतिम टप्प्यात आढळून येणारे हे कीटक जळालेल्या मृतदेहांवर मात्र इतर कीटकांच्या तुलनेत पहिल्यांदा आढळून येतात. पोस्टमार्टममध्ये अचूकता आणण्यासाठी त्याची मदत होते. ओमोर्गस या कीटकाच्या (बीटलच्या) जातीची उपजाती असणाऱ्या ॲफ्रोमोरगसमध्ये एकूण नऊ प्रजाती आहेत. या नवीन प्रजातीच्या समावेशासह हिंदुस्थानातील या उपजातीची संख्या दहावर पोहोचली आहे. या गटातील कीटकांना काहीवेळा हाईड बीटल म्हणतात कारण ते त्यांचे शरीर मातीखाली झाकून लपतात. ते सहसा काळे किंवा राखाडी असतात. कीटकाच्या या प्रजातीविषयी अत्यंत कमी माहिती उपलब्ध आहे, असे डॉ. अपर्णा कलावटे यांनी सांगितले.



डॉ. कलावटे गेल्या १५ वर्षांपासून कीटकांच्या विविध प्रजातींचा अभ्यास करत आहेत. जगाच्या इतर भागाच्या तुलनेत हिंदुस्थानात केराटिन बीटलच कमी अभ्यास झालेला आहे. आतापर्यंत केवळ परदेशी शास्त्रज्ञच भारतीय ट्रॉजीड जीवजंतूंवर अभ्यास करत होते. मात्र, या कीटकाच्या शोधामुळे 'ट्रॉगिड बीटल'वर काम करणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये डॉ. अपर्णा यांचा समावेश झाला आहे. त्यांनी दोन नवीन प्रजातींचा अभ्यास केला आहे.



"हे लहान कीटक मृत जीवांचे शव खाऊन पर्यावरणाची स्वच्छता करण्यात मानवजातीला मदत करीत आहेत. तसेच, जीवाच्या मृत्यूच्या वेळेचा अभ्यास करताना फॉरेन्सिक सायन्ससाठीही हे कीटक महत्त्वाचे ठरणार आहेत. या कीटकांच्या संवर्धनासाठी आपण सर्वसामान्यांना त्याचे महत्त्व आणि स्वरूप याविषयी जागरूक करणे आवश्यक आहे. देशात या कमी अभ्यासलेल्या गटातील अधिक प्रजातींचे दस्ताऐवजीकरण करणे हे माझे उद्दिष्ट आहे. अजून अनेक प्रजातींचा शोध घेणे सुरू आहे.

**- डॉ. अपर्णा कलावटे** (शास्त्रज्ञ)

Pune Edition
Apr 22, 2024 Page No. 8
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2024*

## *Section: Career*

# प्रभात

**भारत सध्या क्रीडा आणि त्याच्याशी संबंधित व्यवसायासाठी भरभराटीस येत आहे. आयपीएल (क्रिकेट), हॉकी इंडिया लीग, प्रो कबड्डी, इंडियन सुपर लीग (फुटबॉल) यांसारखे मोठे उपक्रम आणि गोटी, गिल्ली दांडा, लागोरी, किलिथट, गट्टा गुष्टी सारख्या हेरिटेज क्रीडा स्पर्धांचे व्यावसायिकीकरण भारतीय खेळांचा चेहरामोहरा बदलत आहेत आणि म्हणूनच खेळासह करिअर. त्यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य, सेल्स अँड मार्केटिंग, स्पोर्ट्स मीडिया कंटेंट सर्व्हिसेस अशा क्रीडा उद्योगाला आधार देणाऱ्या नोकऱ्यांना आता मागणी असणे स्वाभाविक आहे.**



# स्पोर्ट्समधील करिअर

स्पोर्ट्समध्ये प्रोफेशनल करिअर करण्यासाठी बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन, बॅचलर ऑफ स्पोर्ट्स मॅनेजमेंट, स्पोर्ट्स ॲनालिस्ट/स्टॅटिस्टिशियन, स्पोर्ट्स सायकॉलॉजिस्ट असे अनेक पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. कौशल्य विकासासाठी उमेदवार विविध पदविका किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम देखील निवडू शकतात.

उमेदवार १०+२ परीक्षेनंतर यूजी कोर्सेसमध्ये प्रवेश घेऊ शकतो. सर्वसाधारणपणे प्रवेश गुणवत्ता यादीवर आधारित असेल. पात्रता परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार केली जाते. स्पोर्ट्समध्ये करिअर करण्यासाठी विविध अभ्यासक्रमासोबत ऑर्गनायझेशनल स्किल्स, कम्युनिकेशन स्किल्स, निगोशिएशन स्किल्स, फायनान्शियलॲक्युमेन, लीडरशिप क्वालिटीज, मार्केटिंग अँड प्रमोशन स्किल्स, लीगल अंडरस्टँडिंग, नेटवर्किंग ॲबिलिटीज, ॲनालिटीकल अँड स्ट्रॅटेजिक थिंकिंग, कल्चरल सेंसिटिव्हिटी, टेक्नॉलॉजी स्वावीनेस, प्रॉब्लेम सॉल्विंग ॲबिलिटी, टीम वर्क अँड कोलाब्रेशन, नॉलेज ऑफ एक्सरसाइज सायन्स अँड स्पोर्ट्स मेडिसिन इत्यादी, यासारखे अनेक कौशल्य संच आणि गुण आवश्यक आहे.

रीना भुतडा

## अभ्यासक्रमाचे प्रकार

डिप्लोमा इन स्पोर्ट्स मॅनेजमेंट, डिप्लोमा इन स्पोर्ट्स मेडिसिन, डिप्लोमा इन स्पोर्ट्स कोचिंग, डिप्लोमा इन स्पोर्ट्स सायन्स अँड न्यूट्रिशन, बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन, बीए इन स्पोर्ट्स मॅनेजमेंट, B.Sc. स्पोर्ट्स अँड रिक्रिएशन मॅनेजमेंटमध्ये B.Sc. स्पोर्ट्स एज्युकेशन, हेल्थ एज्युकेशन अँड स्पोर्ट्स सायन्स, B.Sc (ज) स्पोर्ट्स सायन्स, बीबीए इन स्पोर्ट्स मॅनेजमेंट, बॅचलर ऑफ स्पोर्टस मॅनेजमेंट, B.Sc. स्पोर्ट्स सायन्स, मास्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन, M.Sc. स्पोर्ट्स कोचिंग, एमबीए इन स्पोर्ट्स मॅनेजमेंट, मास्टर ऑफ स्पोर्ट्स मॅनेजमेंट, पीएच.डी. फिजिकल एज्युकेशन, एमफिल इन फिजिकल एज्युकेशन, पीएच.डी. स्पोर्ट्स मॅनेजमेंट इ. यासारखे अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

## टॉप सेक्टर्स

स्पोर्ट्स फ्रँचायझी, प्लेयर मॅनेजमेंट, स्पोर्ट्स ब्रॉडकास्टर्स, स्पोर्ट्स मर्चेंडाइज मॅन्युफॅक्चरर्स, स्पोर्ट्स मार्केटिंग, स्पोर्ट्स लॉजिस्टिक्स, रिक्रिएशन फॅसिलिटी, फिटनेस क्लब, स्पोर्ट्स कन्सल्टन्सी, एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, नॅशनल स्पोर्टिंग असोसिएशन इत्यादी.

## नोकरीच्या संधी

प्रोफेशनल ॲथलीट, स्पोर्ट्स कोच आणि इंस्ट्रक्टर, पर्सनल ट्रेनर, ॲथलेटिक ट्रेनर, स्पोर्ट्स फिजिकल थेरपिस्ट, स्पोर्ट्स सायकॉलॉजिस्ट, फिटनेस प्रोग्राम कोऑर्डिनेटर, हेल्थ ॲडव्हाइस ऑफिसर, स्पोर्ट्स कमेंटेटर, स्पोर्ट्स फोटोग्राफर, स्पोर्ट्स जर्नलिस्ट, स्पोर्ट्स मेडिकल डॉक्टर/फिजिशियन, स्पोर्ट्स मॅनेजर, स्पोर्ट्स अँड फिटनेस न्यूट्रिशनिस्ट, स्पोर्ट्स डायरेक्टर, स्पोर्ट्स शो होस्ट, स्पोर्ट्स आंत्रप्रेन्योर, स्पोर्ट्स ॲनालिस्ट, ॲडव्हेंचर स्पोर्ट्समधील करिअर, ई-स्पोर्ट्समधील करिअर इत्यादी.

## टॉप रिक्रूटर्स

ग्रुप एम, आयएमजी, रिती स्पोर्ट्स, एज्युस्पोर्ट्स, स्टार स्पोर्ट्स, ईएसपीएन क्रिकइन्फो, जेएसडब्ल्यू स्पोर्ट्स, उंब्रो, आयटीडब्ल्यू कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड, आयओएस स्पोर्ट्स अँड एंटरटेनमेंट, एसपीटी स्पोर्ट्स, लिबेरो स्पोर्ट्स, केओओएच स्पोर्ट्स, सन स्पोर्ट्स, डेकॅथलॉन स्पोर्ट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, स्पोर्ट्स लिव्ह, स्पोर्टी सोल्युशन्स, प्रोकॅम इंटरनॅशनल, राइज वर्ल्डवाइड, डिस्ने स्टार, ड्रीम स्पोर्ट्स, कॉर्नरस्टोन, स्पोर्ट्स इंटरॅक्टिव्ह इत्यादी.

## मुंबई आणि पुण्यातील अव्वल महाविद्यालय

राष्ट्रीय क्रीडा संस्था (एनएएसएम), घाटकोपर. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स मॅनेजमेंट (आयआयएसएम). डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ मॅनेजमेंट. के. जे. सोमय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट. आयर्नवूड स्पोर्ट्स मॅनेजमेंट ग्लोबल अकॅडमी. सोमय्या स्पोर्ट्स अकादमी. ईएमडीआय इन्स्टिट्यूट ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन. किशनचंद चेल्लाराम कॉलेज. इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी (आयआयएसटी). सिम्बायोसिस स्कूल ऑफ स्पोर्ट्स सायन्स. इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी. डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ मॅनेजमेंट. भारती विद्यापीठ. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय इत्यादी.



## भारतातील अव्वल महाविद्यालये

दिल्ली विद्यापीठ, नवी दिल्ली. इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्ट्स सायन्स, नवी दिल्ली. राष्ट्रीय क्रिकेट अकादमी, बंगळुरू. टाटा फुटबॉल अकादमी, जमशेदपूर. युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, मेघालय. नॅशनल ॲकॅडमी ऑफ स्पोर्ट्स मॅनेजमेंट (एनएएसएम), महाराष्ट्र. अलगप्पा विद्यापीठ, तमिळनाडू. नेशनल इन्स्टीट्यूट ऑफ स्पोर्ट्स, पटियाला. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स मॅनेजमेंट (आयआयएसएम).

PuneCity, 01 Apr 2024, Page:010
https://epaper.dainikprabhat.com

# *Upcoming Events*

## May 2024

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 ***Mahatma Basweshwar Jayanti***  | 11 | 12 |
| 13 | 14 ***Chhatrapati Sambhaji Maharaj Jayanti***  | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 ***Anti Terrorism Day*** | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 ***Swatantryaveer Savarkar Jayanti***  | 29 | 30 | 31 ***Ahilyadevi Holkar Jayanti***  | | |

**Knowledge is power. Information is liberating. Education is the premise of progress, in every society, in every family.**

Kofi Annan

*Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*